# प्रश्नचिन्हांचा प्रवास

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... प्रवास
अ. क्र.



REFBK-0027085

मनोहर रणपिसे

संदर्भ
भू-प्रवास
७५४
२७०८५
८।८।८३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

3 NOV 1993
6 NOV 1993
3 1 NOV 1993
18 DEC 1993
29 DEC 1993
12 1994
12 MAR 1994

23 JUL 1994
20 AUG 1994
27 MAY 1995
24 APR 1996.
6 JUN

(क्र. मा. पहा)
१००००-११-८९

# प्रश्नचिन्हांचा प्रवास !

REFBK-0027085

लेखक
मनोहर रणपिसे
३०१-सी, लवकुश अपार्टमेंट,
सिंधी सोसायटी, चेंबूर ,
मुंबई - ४०० ०७१
दूरध्वनी ५५३ १८ ७८

# प्रश्नचिन्हांचा प्रवास

सबोधि प्रकाशन,
गोरेगाव, मुबई

प्रकाशन क्रमाक ३०
ISBN-81-85334-15-3

आवृत्ती पहिली -
३० मार्च १९९३

©
सौ. रजंना रणपिसे
३०१- सी, लवकुश अपार्टमेट,
सिधी सोसायटी, चेबूर,
मुबई - ४०० ०७१
दूरध्वनी ५५३ १८ ७८


प्रकाशक
जगदीश रा मोरे,
सरचिटणीस, 'सबोधि'
१०/८०, उन्नत नगर (३),
महात्मा गाधी रोड,
गोरेगाव (प), मुबई - ६२
दूरध्वनी ८७३५९३९

मुद्रक
राजेश आर्ट
मधाणी इस्टेट,
सेनापती बापट मार्ग,
दादर मुबई.

मुखपृष्ठ
व
सजावट
मधुकर आरकडे
गोरेगाव (प.),
मुबई - ४०० ०६२

लेझर टाईपसेटींग
लेसर फॉंट सिस्टम्स
मालाड (प.),
मुबई - ४०० ०६४
दूरध्वनी · ८८९६४६३,
८८९३७८३

मूल्य : रूपये ६०/-



*ऐन तारूण्यात*
*सर्वसगपरित्याग करून*
*बुध्दभिक्षू झालेले*
*व*
*निरलसपणे*
*भारतीय जनतेची सेवा करणारे*
*वरळी बुध्दमदिराचे*
*जपानी भन्तेजी*
***“टी. मोरीता”***
*यास अतःकरणपूर्वक*
*अर्पण !*

# ।। ऋणनिर्देश ।।

——प्रश्नाचिन्हाचा प्रवास' च्या निर्मितीमध्ये अनेकाचा हातभार लागला आहे. त्यापैकी काहीजणाविषयी मी शब्दातून कृतज्ञता व्यक्त करू शकतो परतु काही उपकारकर्ते असे आहेत ज्याच्या ऋणातून मला कधीही मुक्त होता येणार नाही. या बाबतीत सर्वप्रथम ज्याचा उल्लेख करावा लागेल ते आहेत जपानी बुध्द भिक्षू मोरीताजी केवळ त्याच्यामुळेच मी अमेरिकेचा प्रवास करू शकलो आणि या पुस्तकाच्या निर्मितीस त्याचीच प्रेरणा कारणीभूत आहे.

दुसरी व्यक्ति म्हणजे मला पितृतुल्य असलेले श्री एम बी व्होरा. एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्व, सच्चे गाधीवादी विद्वान, त्यानी स्वेच्छेने या पुस्तकाचा आर्थिक भार उचलला. इतकेच नव्हे, तर त्याचा उत्तम इग्रजी अनुवाद करण्याचे कामही अत्यत चागल्या तऱ्हेने व परिश्रमपूर्वक केले अशा देवतुल्य व्यक्तिचा स्नेह मला लाभला हे मी माझ भाग्य समजतो.

'निप्पोनझॅन म्होहोजी' या जपानी बुध्द भिक्षूच्या पथातील अनेक बुध्द भिक्षूनी मला हे पुस्तक निर्मितीसाठी उत्तेजन दिले त्यात प्रामुख्याने अमेरिकेत सेवा कार्य करणारे बुध्द भिक्षू कातो शोनीन, इशिबाशी शोनीन, बुध्द भिक्षुणी क्लेअर कार्टर, बेथ इन्गहॅम यानी मला अतःकरणपूर्वक प्रेम व सहकार्य दिले त्याचे ऋण मी कोणत्या शब्दात व्यक्त करू ?

---

[illegible] मित्र व प्रसिध्द साहित्यिक श्री भीमसेन देठे यानी पुस्तक निर्मितीसाठी मी कार्यरत रहावे म्हणून सतत पाठपुरावा केला. माझे दुसरे साहित्यिक मित्र डॉ. प्रकाश कवळी हे वेळोवेळी मला बहुमोल सूचना करीत होते थोर साहित्यिक श्री रवीन्द्र पिंगे याचा माझ्यावर फार लोभ आहे त्याचा शुभेच्छा या पुस्तकाच्या निर्मितीला लाभल्या आहेत

आकाशवाणी मुबई केंद्राचे केंद्राधिकारी श्री मधुकर गायकवाड यानी आकाशवाणीवर अनेक नवनवीन उत्तमोत्तम प्रयोग सुरू केले त्यात साहित्यिकाच्या कलाकृतींचे वाचन हा देखिल उपक्रम होता त्यासाठीही 'प्रश्नचिहाचा प्रवास' ची निवड होऊन २९ ऑगस्ट ते २४ सप्टेंबर ९२ या काळात २४ भागात त्याचे प्रसारण झाले पुस्तक प्रकाशित होण्याआधी लाखों लोकापर्यंत पोहोचविण्याच श्रेय सपूर्णपणे श्री मधुकर गायकवाड व मराठी विभाग निर्माते श्री महेश केळुसकर याचेकडे जाते त्याचा मी कृतज्ञ आहे

दलित साहित्यातील मान्यवर कादबरीकार व कवी श्री बा. स हाटे यानी सदर पुस्तकाविषयी चार मोलाचे शब्द लिहून मला उपकृत केले आहे.

माझे जुने मित्र व 'सबोधि' या मान्यवर प्रकाशन सस्थेचे प्रमुख श्री जगदीश मोरे यानी आपण होऊन पुस्तक अत्यत कमी वेळात उत्तम तऱ्हेने काढण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली व ती पार पाडली मालाडच्या 'लेसर फॉट सिस्टम्स्' यानी मुद्रणास उत्तम सहकार्य दिले

माझे कविमित्र श्री मधुकर आरकडे हे उत्तम चित्रकारही आहेत त्याच्या कुचल्याच्या जादूने सजलेले मुखपृष्ठ या पुस्तकास लाभले आहे.

माझ्या खात्यातील अधिकारी व कर्मचारी यानी मला नेहमीच प्रोत्साहन व सहकार्य दिले आहे त्यात श्री राळेगणकर याचा प्रकर्षाने उल्लेख करावा लागेल श्री रवीन्द्र चव्हाण यानी टकलेखनाच्या कामात मोलाची मदत केली

माझी पत्नी सौ रजना हिने घरच्या जबाबदारीचा भार मला जाणवू न देता लिखाणासाठी भरपूर वेळ, मानसिक शातता व उत्तेजन दिले

माझ्या अनेक मित्रानी अनेक तऱ्हेने सहकार्य केले या सर्व मित्राचा अकृत्रिम स्नेह, जिव्हाळा, प्रेम, सहकार्य यामुळे या पुस्तकाच्या निर्मितीचा भार मला जाणवलाच नाही 'प्रश्नचिन्हाचा प्रवास' हे पुस्तक या साऱ्या सुहृदाच आहे मी केवळ निमित्तमात्र आहे.

भगवान गौतम बुध्द हा सर्वश्रेष्ठ महामानव, मानवासाठी शील, प्रज्ञा व करूणेचा चिरतन दीप लावून गेला आहे त्या दिव्याचा प्रकाश आमच्या हृदयात पोहोचविणारे डॉ. बाबासाहेब आबेडकर आणि त्याच परपरेतील बोधीसत्व निचिदात्सु फुजीगुरूजी माझे प्रेरणास्त्रोत आहेत 'प्रश्नचिन्हाचा प्रवास' या पुस्तकाची निर्मिती ही त्याच प्रेरणेतून जन्मलेली कलाकृती आहे मराठी साहित्य रसिकाना ती मी अत्यत विनम्रपणे सादर करीत आहे

**मनोहर रणपिसे**

# ?

[illegible] धुक्याच्या लाटाप्रमाणे ती एकामागोमाग एक येत राहतात. त्याना आपण घाबरायच नसत. त्याना भिऊन आपण उभ रहायच नसत. तसच पुढे चालत राहायच असतं काहीशा निग्रहाने काहीशा सावधपणे. आपण चालत राहीलो की आपल्याला पाऊलवाट दिसू लागते धुक तेवढस दाट नाही हे जाणवत आणि चालता चालता पुढे दूर कुठेतरी प्रकाशाचा किरण दिसतो. आपली उमेद वाढते गती वाढते. धुक वितळू लागत अचानक सोनेरी किरणाच्या वर्षावात आपण न्हाऊन निघतो. -- आणि मग केलेल्या प्रवासाच आपल्याला सार्थक वाटायला लागत. थकलेल्या गात्रात पुन्हा उत्साह सचारतो मन उल्हसित होते जीवन जगण्यातील गोडी वाढत जाते ।

जीवनाच कधीही न सुटणार प्रश्नचिन्ह। त्याच उत्तर शोधायला आपण नव्या जोमाने निघतो हा प्रवास आजतागायत अगणित प्रवासी करीत आले आहेत यापुढेही करणार आहेत. आपणही हा प्रवास असाच करीत राहायचा आहे प्रश्नचिन्हाचा प्रवास !

प्रवास ७५४
क्र. ५७०८५
८।७।९३

# १ : देशाटनाची पूर्वतयारी

"इवना इवना खाली उतर
इवना इवना खाली उतर

आभाळातून उचावरून जाणाऱ्या विमानाला पाहून लहानपणी आम्ही उघडीनागडी बालगोपाळ मडळी, टिऱ्या बडवीत, उड्या मारीत नाचायचो व "इवना इवना खाली उतर' म्हणत त्या विमानाला खाली बोलावयाचो आमच्या खेडेगावी बालपणी आकाशात विमानदर्शनाचा दुर्मिळ योग असायचा व तो आम्ही अशा तऱ्हेने साजरा करीत असू. निरभ्र उच आभाळातून सथ गतीने चकाकत्या पाढऱ्या शुभ्र मासोळी सारखे जाणारे ते विमान दिसले की जमीनीवरून काट्याकुटयातून दगड-धोड्यातून धावत मी त्याचा पाठलाग करायचो हातवारे करीत, ओरडत पळायचो, शेवटी एखाद्या उच दगडावर बसून ते दृष्टीआड होईपर्यत एकटक पहात बसायचो तो माझा आवडता छद होता आभाळाच्या पोटातून जाणाऱ्या त्या विमानात आपल्याला कधीकाळी बसायला मिळेल अस कधीच वाटल नव्हत नदी-नाले, डोगर-दऱ्यावरून उडत जाणार ते विमान, ढगाच्या पोटात शिरणार ते विमान, बालपणी कल्पनेचे पख लावून देखील कधी त्याच्या जवळपास पोहोचता आल नव्हत. एवढच काय, वयाची चाळीशी गाठेपर्यत, वीस वर्ष मुबईत स्थायिक होऊन देखिल मी अजून पर्यत विमानतळ पाहिलेला नव्हता विमान आतून कस असत ते मला माहीत नव्हते तसा कधी योगच आला नव्हता आणि मुद्दाम होऊन तसा योग जुळवून आणण्याचा मी प्रयत्नही केला नव्हता. पण माझ्या नशीबी विमानप्रवासाचा योग होता. तोही थोडाथोडका नव्हे, तर आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका या

पृथ्वीच्या चार खडावरून प्रवास करण्याचा योग होता तो घडून आला

आयुष्यात आजपर्यंत ठरवून मला कधीच काही करता आल नाही करता येणार नाही तो माझा स्वभाव नव्हे चागले योग माझ्या नकळत येत गेले आहेत अनपेक्षितपणे चागल्या गोष्टी घडत गेल्या आहेत प्रयत्नपूर्वक दुष्प्राप्य वाटणाऱ्या अनेक दुर्लक्ष गोष्टी अशीच अचानक मला लाभत गेल्या आहेत. मुबई ते न्यूयॉर्क विमान प्रवास त्यापैकीच एक.

अमेरिकच्या विमानप्रवासाचा योग येण्याआधी माझा इग्लडच्या विमानप्रवासाचा योग येऊन हुकला होता. एप्रिल १९८५ च्या दुसऱ्या आठवड्यात 'दि फ्रेंडस ऑफ दि लडन पीस पॅगोडा' या इग्लडच्या सस्थेचे ते निमत्रण होते बॅटरसी पार्क, लडन येथे या सस्थेने बौध्द शातीस्तूप बाधला होता व तो स्तूप जागतिक शाततेसाठी इग्लडच्या जनतेला अर्पण करण्याचा कार्यक्रम होता ४ मे ते १२ मे ८५ या काळात कॅटरबरी ते लडन अशी सर्वधर्मीयाची जागतिक शाततेसाठी पदयात्रा होती १३ मे ८५ रोजी पिकॅडलीच्या सेट जेम्स चर्चमध्ये सर्व धर्माच्या प्रतिनिधींची जागतिक शातता व मानव कल्याण या विषयावर परिषद होती १४ मे ८५ रोजी 'पीस पॅगोडाचे उद्‌घाटन' व इग्लडच्या जनतेला तो अर्पण करण्याचा सोहळा होता. मला सन्माननीय प्रतिनिधी म्हणून निमत्रण होते

त्याआधी या निमत्रणाची पार्श्वभूमी सागणे अधिक उचित ठरेल. १९५६ साली अस्पृश्याचे बौध्द धर्मातर डॉ आबेडकरानी केले माझे दिवगत वडील गणपतराव रणपिसे बाबासाहेबाचे कट्टर अनुयायी त्या दिवसापासून आमच्या वडीलानी आमच्या घरात बौध्द सस्काराचा परिपाठ सुरू केला बौध्द पुजा-पाठ, धार्मिक विधी नियमाने आमच्या घरी सुरू झाले अशा रितीने बाळपणापासून मला बौध्द धर्माची गोडी लागली पुढे नोकरीनिमित्त मी मुबईला येऊन स्थायिक झालो व सुदैवाने मला 'वरळी-सी-फेस' च्या सरकारी वसाहतीत जागा मिळाली. तब्बल १२ वर्षे माझे वरळीला वास्तव्य होते बिर्ला ट्रस्टने बाधलेले वरळीचे जपानी बुध्द मदिर हे माझे अत्यत आवडीचे मदिर. त्या मदिरातील बुध्दमूर्तिपुढे ध्यान लावून बसायला मला फार आवडत असे त्या मदिरात लावलेली, जपानी चित्रकाराने काढलेली बुध्दचरित्रावरील पेटिग्ज पाहून व त्यातून प्रेरणा घेऊन मी "बुध्द-गीताजली" हे भगवान बुध्दाचे गीतमय चरित्र लिहिले व त्यावर मला "मिनिस्ट्री ऑफ एज्यूकेशन अण्ड कल्चर" भारत सरकार, याजकडून "रीसर्च फेलोशिप" चा सन्मान मिळाला. तिथेच माझी, त्या

मदिराचे प्रमुख जपानी बौध्द भिक्षू 'टी मोरीता' याचेशी मैत्री झाली. त्याचेमुळे मला बौध्द धर्माची अधिकाधिक गोडी उत्पन्न झाली तेथील विविध धार्मिक कार्यात मी सहकुटुब हिरीरीने भाग घेऊ लागलो "निप्पोनझॉन म्योहयोजी" या जपानच्या बौध्द भिक्षूच्या सस्थेचा भारतातील मी छोटासा झपाटलेला कार्यकर्ता झालो सस्थेच्या सेवाव्रताच्या कार्यात मी रमून गेलो निरपेक्षपणे व आवडीने माझ्या कुटुबाने त्या कार्याला वाहून घेतले त्यातून आम्हाला निर्मळ आनद व मन:शाती मिळत होती

त्या दहा-बारा वर्षात माझ घर अनेक महान व्यक्तिच्या चरणधुळीने पावन झाले जपान, इग्लड, अमेरिका, इटली वगैरे अनेक देशातून बौध्द भिक्षू, तरूण विद्यार्थी, कलाकार, प्रोफेसर, व्यापारी आणि बुध्दाची जन्मभूमी भारत देश पहायाल आलेले जगाच्या विविध देशातील अनेक बौध्दधर्मीय, मोरिता भन्तेजीसमवेत माझ्या घरी आले. मी आणि माझ्या कुटुबाने त्याची आमच्या परीने सेवा केली त्याना प्रेम दिले, आपुलकी दिली त्यानी आपापल्या देशात जाऊन आम्हाला जी जिव्हाळ्याने ओथबलेली पत्रे पाठविली त्याने आम्ही कृतकृत्य झालो माझ्या कुटुबाच्या निरपेक्ष सेवेची परदेशीय बौध्दाच्या मनात नोद होत होती घरबसल्या आम्ही सज्जनाच्या आतरराष्ट्रीय कुटुबाचे सदस्य झालो होतो आणि या सर्व सत्कृत्याचा परिपाक म्हणून मला जागतिक स्तरावर भारतीय बौध्दाचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान इग्लडच्या त्या निमत्रणाने मिळाला होता

त्यावेळी २० दिवसाच्या अवधित मला पासपोर्ट, व्हिसा, विमानाचे टिकिट, फॉरीन एक्स्चेज सार काही मिळवायच होते पासपोर्ट लवकर मिळावा म्हणून मी जग जग पछाडले, पण त्या अवधित पासपोर्ट मिळाला नाही आणि आमचे इग्लडचे प्रयाण रहित झाले ती सगळी धडपड निष्फळ ठरली पण त्यातून खूपस काही शिकायला मिळाल. आपल्या शेजारी मित्रत्वाचे मुखवटे घेऊन वागणारी माणस, रक्ताच नात सागणारे नातेवाईक, मोक्याच्या वेळी कसा सूड उगवितात, मदत करायचा आव आणून आपल्या कार्यात कशी खीळ घालतात आपल्याला अपयश आल्यावर त्याच्या आसूरी आनदाच कस हिडीस प्रदर्शन करतात त्याची प्रचीती आली. त्याचप्रमाणे जिवाभावाच काही नात नसलेली सहृदय माणस अनपेक्षितपणे मदतीचा हात कसा पुढे करतात, कशी मनाची उमेद वाढवतात, कसा आधार देतात याचेही प्रत्यतर आले

खूपस शिकायला मिळाल इग्लडच्या न घडलेल्या प्रवासात पदोपदी

मी ज्या ठेचा खाल्ल्या त्यातून मला शहाणपण प्राप्त झाल व ते अमेरिका प्रवासाच्या वेळेच्या पूर्वतयारीला मला उपयोगी पडले

इग्लडला जाता येणार नाही हे निश्चित झाल त्या रात्री माझ्या कुटुबियाना मी शातपणे म्हणालो होतो की, "मला ह्यावेळी परदेशी जायला मिळाल नाही म्हणून वाइट वाटून घ्यायच काही कारण नाही कोणी सागाव भगवान बुध्दाच्या कृपेने आपल्याला कधीतरी यापेक्षाही चागली सधी मिळेल."

माझे हे वाक्य चार-सहा महिन्यातच खर ठरेल हे माझ मला तरी कुठ माहीत होत।

जुलै महिन्यातील एक सोमवार सकाळी १० चा सुमार असावा. मी वर्तमानपत्र वाचत बसलो होतो मुल शाळेत गेली होती किचनमध्ये पत्नीची सकाळच्या न्याहरीनतरची सावरासावर चालली होती. त्यावेळी "टींग, टींग" डोअरबेल वाजली पत्नीने दरवाजा उघडला पोस्टमनने तिच्या हाती एक रजिस्टर्ड पत्र दिले. मी पोस्टमनला सही दिली लिफाफा छोटासाच होता. पण बराच जड लागत होता उघडून पाहतो तो काय? आतमधे माझा पासपोर्ट। मी कपाळाला हात लावला

"काय ते?" पत्नीने विचारणा केली

"पासपोर्ट" पासपोर्टची पाने चाळीत मी म्हणालो

"चागल आहे, आता जा इग्लडला" हसत हसत ती म्हणाली. व पासपोर्ट हातात घेऊन उत्सुकतेने चाळून पाहू लागली

तिच्या हातातील त्या छोट्या निळया पुस्तकाकडे मी पहात राहीलो. काहीसा सतापाने, काहीसा उद्वेगाने, काहीसा हताशपणे हे छोट निळ पुस्तक वेळेवर न मिळाल्यामुळे केवढी मोठी सधी मला गमवावी लागली होती. मधल्या दोन महिन्यात मी पासपोर्ट मिळण्याची आशाच सोडून दिली होती. साधी चौकशी करायलाही मी त्या पासपोर्ट कार्यालयात गेलो नव्हतो पासपोर्ट अर्जाच्या त्या प्रचड ढिगाऱ्यात आपला अर्ज कुठेतरी गहाळ झाला असावा असेच मी समजून चाललो होतो पण नाही. आज अचानक पासपोर्ट आपण होऊन जणू माझ्या घरी आला होता.

आकाशात उडण्यासाठी आधुनिक मानवाला पासपोर्टच्या त्या कृत्रिम पखाची गरज होती. पासपोर्ट मिळवण्यासाठी मी जे सायास केले होते व त्यातून जो मनस्ताप पदरात पडला होता. तो सर्व कटू आठवणीचा

कालखंड झर्रकन माझ्या डोळ्यासमोरून गेला पण पासपोर्टच्या दर्शनाने काही क्षणातच उगाचच मला उल्हसित वाटू लागले माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे आपण होऊन आलेल्या या आनंददायी पाहुण्याचं स्वागत मी माझ्या पध्दतीने करायचे ठरविले. पासपोर्ट भगवान बुध्दाच्या मुर्तीच्या पायाशी ठेवून मी हात जोडून मनोभावे बुध्दाची प्रार्थना केली आणि पासपोर्टची पाने चाळीत गालातल्या गालात हसत जुन्या आठवणीत रमून गेलो

नंतरच्या दोन महिन्यात मी पासपोर्टला विसरूनही गेलो होतो १७ ऑगस्ट शनिवारचा दिवस होता. सायकाळी ७ च्या सुमारास मी कामावरून घरी परत आलो घरात येऊन पाहतो तो काय! माझी तिन्ही मुले व पत्नी सोफ्यावर बसलेले आणि सर्वजण माझ्याकडे पाहून आपले खुदूखुदू हसताहेत काय प्रकार आहे ते मला कळेना. शेवटी माझ्या मोठ्या मुलीने पाठीमागे लपविलेले एक पत्र माझ्यापुढे धरले आणि म्हणाली, "दादा, जा आता अमेरिकेला. हे घे निमंत्रण"

"काय सांगतेस?" अविश्वासाने मी म्हणालो व पत्र लिफाफ्याच्या बाहेर काढले आतमध्ये पॅगोडाचे चित्र असलेली एक निमंत्रण पत्रिका व एक छापील पत्र होते

पत्र व निमंत्रण पत्रिका उभ्याउभ्याच मी वाचून काढली माझं मलाच खरं वाटेना

"अरे, होय रे बाळानो, खरोखर अमेरिकेचे निमंत्रण आहे रे।" मी स्वतःशीच बोलल्याप्रमाणे म्हणालो

"मग आम्ही काय म्हटलो, आता काहीपण करून ह्यावेळी तू जाच" माझी मोठी मुलगी मनिषा म्हणाली

"आणि आम्हाला कपडे आण" माझा मुलगा किरण म्हणाला.

"आणि मला खेळणी" माझी धाकटी मुलगी रागिणी म्हणाली.

"अरे, जरा दम धरा. आधी त्याना अमेरिकेला जाउद्या तरी नाहीतर व्हायच मागच्या सारख' पत्नी हसत म्हणाली

"हं, आम्हाला फसवू नका. त्यावेळी पासपोर्ट नव्हता म्हणून दादा गेला नव्हता. आता पासपोर्ट आहे. म्हणजे दादा नक्कीच जाणार." माझी मोठी मुलगी आवेशाने म्हणाली

"दादा जाणार! दादा जाणार! माझी दोन्ही लहान मुले घोषणा दिल्याप्रमाणे ओरडू लागली व टाळ्या वाजवू लागली सर्वजण आनदाने हसू , बागडू लागले. मीही त्याच्या हसण्यात सामील झालो

"बर चला, भगवान बुध्दाने पुन्हा एकवार आपल्याला सधी दिल्याबद्दल आपण देवाची प्रार्थना करूया." मी म्हणालो सर्वांनी मिळून मनोभावे प्रार्थना केली व पुन्हा चर्चा करीत बसलो

त्या पत्रात काय काय आलय ते आम्हाला नीट समजावून सागा ना मला काही नीट कळल नाही ते" माझी पत्नी म्हणाली

"कार्यक्रम वेगळा असा काही नाही जवळ जवळ मागच्याप्रमाणेच आहे. फक्त यावेळी इग्लड ऐवजी अमेरिका." पत्रावर पुन्हा एकदा नजर फिरवीत मी म्हणालो.

"म्हणजे इग्लडपेक्षाही खूप पुढे. होय का नाही रे दादा" माझी मोठी मुलगी म्हणाली.

"होय, खूपच पुढे. इग्लड हे युरोपखडात येते मग मधे येतो अटलाटीक महासागर, मग येते अमेरिका खड" मी आपली पुस्तकी माहिती सागितली.

"किती वेळ लागतो रे दादा, विमान तेथे पोहोचायला?" माझ्या मोठ्या मुलीने प्रश्न केला.

"लागत असतील एक दोन दिवस" मी हवेत तीर मारला आणि स्वतःशीच हसलो. "गॉडस मस्ट बी क्रेझी" ह्या इग्रजी चित्रपटातील एक प्रसग मला आठवला.... दक्षिण आफ्रिकेतील दूर वाळवटी प्रदेशात एक १०-१२ जणाचे रानटी अवस्थेत राहणारे आफ्रिकन कुटुब असते. वरून जाणाऱ्या विमानातील वैमानिकाने बेफिकीरपणे टाकलेली एक थड पेयाची रिकामी काचेची बाटली त्या कुटुबातील एका मुलाला सापडते. सुसस्कृत जगाशी यत्किंचितही सबध नसलेल्या त्या कुटुबाला प्रथम ती गुळगुळीत पारदर्शक बाटली म्हणजे पराकोटीची नवलाईची वस्तू वाटते. पण लवकरच त्या बाटलीवरून त्या कुटुबात भाडणे, माऱ्यामाऱ्या सुरू होतात तेव्हा त्या कुटुबातील वयोवृध्द माणूस असा निर्णय घेतो की देवाने ही जी चकाकती वस्तू आपल्याकडे पाठविली ती अशुभ आहे. तिने आपल्या कुटुबावर सकटे कोसळायला लागली, तेव्हा ती वस्तू आपण दूर दूर नेऊन टाकून दिली पाहिजे

म्हणून त्याने असा निर्णय घेतला की जग जेथे सपते तिथे ही वस्तु नेऊन टाकायची त्या कामगिरीवर त्याच कुटुबातील एका तरूणाची नेमणुक होते अर्थात तो तरूण त्या वयोवृध्द गृहस्थाला विचारतो की, 'जग कुठे सपते आणि तेथे पोहोचायला त्याला किती दिवस लागतील ?' त्यावर मावळतीला बोट दाखवित त्या म्हाताऱ्याने सागितले की 'त्या.... दिशेने सरळ चालत जा म्हणजे जग तिथे सपते तिथे तू पोहोचशिल.' तिथे पोहोचायला तुला आठ दिवस लागतील कदाचित चाळीसही दिवस लागतील' म्हाताऱ्याने हे नमुनेदार उत्तर दिले त्या आफ्रिकन म्हाताऱ्यासारखे माझेही उत्तर नव्हते काय ? कारण अमेरिकेला विमानाने पोहोचायला किती वेळ लागतो हे माझे मलाच कुठे माहीत होते ?

"बापरे, मग तू दोन दिवस विमानात उडत राहणार, मजा आहे रे दादाची" माझा पोरगा मला बिलगत म्हणाला.

"किरण तू थाब, अहो आधी तुम्ही मला तिकडच्या कार्यक्रमाचे पत्रात काय लिहिलय ते सागा." माझ्या मुलाला दूर करीत पत्नि म्हणाली आणि मी सुटकेचा निश्वास सोडला. पोराच्या पुढच्या प्रश्नानी मी अडचणीत आलो असतो. स्वत॰ माझ्यासमोरच भल मोठ प्रश्नचिन्ह असलेला त्याच्या प्रश्नाना मी काय उत्तर देणार होतो एखाद्या गोष्टीची माहिती नसताना ठणकावून खोटे बोलायला मी काय भारतातील मत्री थोडाच होतो पत्रावर पुन्हा एकदा नजर फिरवीत मी पत्निला उद्देशून म्हणालो

"हे बघ, २१ सप्टेंबर १९८५ रोजी अमेरिकेतील प्लायमाऊथ ह्या शहरापासून, जिथे इग्लडच्या पहिल्या प्रवाशाने अमेरिकेच्या ह्या भूमीवर प्रथम पाय ठेवला होता, त्या प्लायमाऊथ शहरापासून ही पदयात्रा सुरू होईल. ती कोहॅसेट, अर्सेस्टर,बोस्टन,लिकन, बोल्टन, प्रिंसटन, बॅरे, स्पेन्सर, चिकोपी, नॉर्दहॅम्पटन, ॲमहर्स्ट या शहरातून जात जात लॅव्हरेट येथील बौध्द शाती स्तुपाजवळ पदयात्रेचे विसर्जन होईल, ५ ऑक्टोबर १९८५ रोजी त्या आधी २ ऑक्टोबर रोजी मॅसेच्युसेटस् युनिव्हर्सिटीच्या प्रागणात अमेरिकन शाती कार्यकर्त्यासमवेत गाधी जयती साजरी करणार आहोत व ४ ऑक्टोबर रोजी मॅसेच्युसेटस् युनिव्हर्सिटीच्या स्टूडट युनियन हॉलमध्ये जगातील मान्यवर वक्त्याच्या उपस्थितीत जागतिक शाततेवर सर्वधर्मीयपरिषद होणार आहे

५ ऑक्टोबरला शाती स्तुपाच्या उद्‌घाटनाचा भव्य सोहळा होणार आहे जगातून हजारो प्रतिनिधी तिथे येणार "कार्यक्रमपत्रिकेवरील माहिती

वाचीत व नकाशे पाहत मी म्हणालो एव्हाना माझा स्वर अत्यत उत्तेजित झाला होता. मोठ्या आत्मविश्वासाने मी बोलत होतो जणू काही सर्व तयारी होऊन उद्याच मी प्रवासाला निघणार होतो

अर्थात यावेळी मी पुर्वीसारखा अगदीच दिशाहीन प्रवासी नव्हतो आता माझ आभाळ पूर्वीसारख ढगाळलेले नव्हत. निवळलेल होत त्या निवळलेल्या आभाळातून आता आशेच्या किरणाचे कवडसे दिसू लागले होते

दुसऱ्या दिवशी सायकाळी आम्ही सहकुटुब वरळीच्या बुध्द मदीरात गेलो प्रार्थना आटोपल्यानतर मोरीता भन्तेजीच्या हाती ती निमत्रण पत्रिका दिली व आशीर्वाद घेतला. आनदाने आशीर्वाद देत मोरीता भन्तेजी म्हणाले, "इस वक्त जरूर जाना। सब कोशिश करो। आपका डिव्होशन बहुत सिन्सीयर है। भगवान बुध्द के आशिर्वादसे आप इस बार सफल हो जायेंगे।"

"मैं अपनी तरफसे पूरी कोशिश करूँगा, भन्तेजी !" - मी नम्रपणे म्हणालो. नकळत माझ्या पापण्याचा कडा ओलावल्या

ह्यावेळी वेळ अजिबात वाया घालावयाचा नाही आणि कोणावरही वाजवीपेक्षा अधिक विसबून रहावयाचे नाही असे मी ठरविले. दुसऱ्या दिवशी शिवाजीपार्क येथील "रडार" नावाच्या तिकिट बुकिंग एजन्सीमध्ये माहिती मिळविण्यासाठी गेलो. तिथल्या तरूणीने माझ्या सर्व शंकांचे निरसन तर केलेच शिवाय माझे बरेच गैरसमज दूर करून उपयुक्त सूचनाही दिल्या मुबई ते न्यूयॉर्क विमान प्रवासाचे परतीचे तिकिटासाठी १२,००० रू. खर्च होणार होता. पण ती एजन्सी मला परतीच्या तिकिटासाठी २००० रुपये सवलत देणार होती म्हणजे विमान तिकिटासाठी १०,००० रू. लागणार होते. सरकारी नियमानुसार मला ५०० डॉलर्स म्हणजे भारतीय रूपयातील विनिमय दर रू. ११६५ प्रमाणे जवळ जवळ ५५०० रू. त्यासाठी लागणार होते. सर्व प्रथम मला अमेरिकन कॉन्सुलेटमध्ये जाऊन व्हिसा मिळवावा लागणार होता. त्यानतर मग तिकीटाचे बुकिंगसाठी एजन्सी पैसे स्वीकारणार होती. मग फोर्टमधे थॉमस कुक कपनीत जाऊन फॉरीन एक्स्चेंज मिळवायचे होते मग साताक्रूझला एअर इडियाच्या ऑफिसमध्ये जाऊन "इमिग्रेशन क्लिअरन्स" घ्यावयाचे होते

या सगळ्या आघाडीवर मला एकट्याला लढायचे होते एजन्सीतल्या त्या मुलीने मला ही माहिती दिली त्यावेळी मला फार सोपे वाटले. पण नतर त्या एकेक अग्निदिव्यातून जाताना काय यातना होतात ते मला कळले

अमेरिकेत महिन्याभराच्या मुक्कामातील माझी राहण्याची व्यवस्था,

जेवण्याचा खर्च, प्रवास खर्च वगैरे सर्व जरी आमची सस्था करणार होती तरी देखिल विमानाचे तिकीट व फॉरीन एक्स्चेज यासाठी कमीत कमी पधरा हजार रूपये लागणार होते एवढी रक्कम उभी करणे माझ्या दृष्टीने चॅलेज होते ते चॅलेज स्विकारून मी कामाला लागलो

दहा-बारा दिवस याच धावपळीत निघून गेले तहानभूक, विश्राती, झोप कशाचीही पर्वा न करता माझी धावपळ चालली होती पायाला चाके लावल्याप्रमाणे मी दाही-दिशाना धावत होतो कुठे काही हाती लागत होते कुठे निराशा पदरी पडत होती कुठे अपमान, हेटाळणी होत होती तर कुठे नुसत्या सात्वनेच्या शब्दानीही आत्मबळ वाढत होते

त्यावेळचे कट्रोलर ऑफ रेशनिग श्री उपाध्ये, त्याचप्रमाणे श्री. शेख, शिरसाट, जी ए. कुळकर्णी, गुहागरकर, सरदेसाई, पी. टी कामत, सिध्दार्थ काबळे, अरूण शिदे, सुरेश शानभाग, कामाठीपुरा विभागातील रेशनिगचा व्यापारी वर्ग, ताडदेव येथील माझा रेशन दुकानदार मित्र वल्लभ व रेशनिंग खात्यातील अनेक कर्मचाऱ्यानी आर्थिक हातभार लावला. माझे जिवलग मित्र भीमसेन देठे, शकर किराळे, शफी पटेल, मुश्ताक पटेल हे तर सुरवातीपासूनच माझ्या खाद्याला खादा लावून माझ्यासाठी सर्वतऱ्हेचे प्रयत्न करीत होते

ह्या सर्व व्यापात ऑगस्ट महीना सपून सप्टेंबर कधी उजाडला ते कळलेच नाही आर्थिक बाबी जवळ जवळ आटोक्यात आला होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ठीक ८ वाजता भलाभाई देसाई रोडवरील अमेरिकन कॉन्सुलेटवर पोहोचलो. माझ्याआधी तेथे गेटच्या बाहेर ५०-६० लोक निमुटपणे लाईनमध्ये उभे होते. एकेकाच्या कागदपत्राची, बॅगाची तपासणी करून आत सोडीत होते माझा नबर आल्यावर गेटवरच्या रक्षकाने माझा पासपोर्ट, कागदपत्र पाहिले. बॅग तपासली. 'फोटो आणलात का? म्हणून विचारणा केली. सुदैवाने माझ्याकडे फोटो होता. आतमध्ये शिरल्यानतर पुन्हा तशीच लाईन, पुन्हा कागदपत्रे, बॅगची तपासणी, पण सर्व काही शिस्तीत व शातपणे.

आत हॉलमध्ये गेल्यावर एकदम वेगळ्या वातावरणात गेल्याचे जाणवले. तो प्रशस्त हॉल, त्याची ती अमेरिकन पध्दतिची सजावट, मद प्रकाशाचे दिवे, ध्वनिक्षेपकावरून सौम्य स्वरात दिल्या जाणाऱ्या सूचना, काचेच्या खिडक्यांपलीकडे मुलाखती घेण्यासाठी उभे असलेले अमेरिकन कॉन्सुलेटचे गोरेपान कर्मचारी, हॉलमध्ये असलेली तणावपूर्ण शातता

आत गेल्यावर भरण्यासाठी एक फॉर्म दिला गेला. ह्यावर माहिती

भरून फोटो चिकटवून पासपोर्टसह तिथेच परत दिला. त्याने मला माझा क्रमांक दिला. तो घेऊन मुलाखतीसाठी आपला नंबर कधी येतो या विवंचनेत मी बसलो मुलाखतीसाठी पाचसहा खिडक्या होत्या काही खिडक्यांवर अमेरिकन कर्मचाऱ्यांना दुभाषे म्हणून भारतीय कर्मचारी होते साधारण ११ वाजण्याच्या सुमारास माझा नंबर आला धडधडत्या छातीने मी कागद हातात धरून खिडकीजवळ गेलो माझी मुलाखत घ्यायला सफेद कुरळ्या केसाचा एक अमेरिकन तरूण उभा होता.

"गुड मॉर्निंग सर" मी नमस्कार केला.

"मॉर्निंग, हाउ डू यू डू" त्याने प्रतिनमस्कार केला

"फाईन सर" मी उत्तरलो

माझ्या अमेरिकेच्या प्रवासाच्या हेतूविषयी प्रवास खर्च, तेथील राहणे विषयी त्याने प्रश्न विचारले मी योग्य ती उत्तर दिली निमंत्रण पत्रिका दाखविली

माझा माहितीचा फॉर्म वाचीत पासपोर्ट पहात त्याने प्रश्न केला.

"आर यू गव्हर्मेंट ऑफीसर सर ?"

"येस, आय. एम सर" मी उत्तरलो

"आय ए. एस ?" त्याने पुन्हा प्रश्न केला

आता आली का पंचाईत, आता माझी क्लास थ्री ऑफीसरची कॅटेगरी त्याला कशी सांगायची भारतातून फक्त आय ए. एस ऑफीसर्सच परदेशी जातात असा त्याचा समज असावा. तो मला आय ए. एस. समजल्यामुळे आपण अगदीच काही फालतू वाटत नाही या जाणीवेने मी ही सुखावलो

"नो सर, बिलो द रॅंक ऑफ आय ए. एस" मी ही नरो वा कुंजरो वा धर्तीचे उत्तर दिले

"ओह" खांदे उडवीत स्मित हास्य करीत तो उद्गारला.

माझ्या उत्तराने त्याला माझ्या विद्वतेची कल्पना आली असावी कारण त्यानंतर लगेच कागदपत्र आवरून "कम ॲट फोर ओ क्लॉक ॲण्ड कलेक्ट युवर व्हीसा सर"

पुन्हा स्मितहास्य करीत तो म्हणाला

"थँक यू सर, थँक यू व्हेरी मच" मी त्या अनपेक्षित गोड बातमीने ·ामाचित होऊन म्हणालो

पुन्हा ४ वाजता गेलो. ५ मिनिटात व्हीसाची नोद झालेला पासपोर्ट नळाला ६ महिने अमेरिकेत राहण्याची परवानगी त्यावर दिली गेली होती

दुसऱ्याच दिवशी शिवाजी पार्कच्या "रडार" एजन्सीत जाऊन तकीटाचे पैसे भरले दोन दिवसात तिकीट मिळाले ट्रान्सवर्ल्ड एअरलाईन्सच्या अमेरिकन विमानाने मी जाणार होतो २३ सप्टेबर १९८५ पहाटे ४४० वाजता सहार विमातळावरून विमान सुटणार होते आपल्या शरीराला पख लागले आहेत असे आत्ताच मला वाटू लागले होते

आत्ता अर्धी लढाई मी जिकली होती उरलेली जिंकणे फारस कठीण नव्हते दुसऱ्य दिवशी सात्ताक्रुझला एअर इडियाच्या ऑफिसाला जाऊन "इमिग्रेशन क्लीयरन्स" व "थॉमस कुक' कपनीत जाऊन फॉरीन एक्स्चेज घेतले आता बहुतेक सर्व सोपस्कार आटोपल्यात जमा होते प्रयाणासाठी फक्त दोन दिवस उरले होते पण गेल्या महिन्याभराच्या सततच्या धावपळीमुळे माझी प्रकृती बिघडली दुसऱ्या दिवशी शिवाजी पार्कचे माझे डॉक्टर मित्र प्रकाश कवळी याचेकडे जाऊन औषध घेतले व लौकर आराम पडू दे अशी मनोमन परमेश्वराची प्रार्थना करीत पडून राहीलो

अखेर प्रयाणाचा दिवस उजाडला सोमवार दि. २३ सप्टेंबर ८५ त्या दिवशी अनत चतुर्दशी होती ट्रान्सवर्ल्ड एअरलाईन्सचे विमान पहाटे ४४० ला सुटणार होते माझ्या सोबत विमानतळावर मोरीता भन्तेजी व पटेल बधू येणार होते मी रात्री ८ वाजल्यापासुनच तयार होऊन बसलो होतो पत्नि व मुलानी ही एअरपोर्टवर येण्याचे ठरले होते मुलानीही एअरपोर्ट अजून पाहिला नव्हता तेही खुशीत तयारीत बसले होते ठीक ११ वाजता मोरीता भन्तेजी आले रात्री १२ वाजून गेले तरी पटेल बधु अजून आले नव्हते

मोरीता भन्तेजीचे म्हणणे होते की अपरात्री मुलाबाळानी एअरपोर्टवर येणे सुरक्षित नाही आपण दोघेच निघूया ते ऐकून मुलाचे चेहरे उतरले मला त्याना न्यायची इच्छा असुनदेखील माझा नाईलाज होता. पटेल बधूचा अजून पत्ता नव्हता. अखेर बुध्द भगवानाची प्रार्थना करून मी आणि मोरीता भन्तेजी टॅक्सीने निघालो. मुले, पत्नि फार निराश झाले आतापर्यंत मोठ्या कष्टाने त्यानी आवरून धरलेले अश्रू वाहू लागले मलाही गलबलून आले जड अतःकरणाने मी त्याचा निरोप घेतला आमची टॅक्सी कॉलनीच्या गेटमधुन थोडी पुढे जातेय

गेच समोरून पटेलबधु रिक्षाने येताना दिसले पत्निला व मुलाना आणण्यास परत जावे का? यावर पुन्हा चर्चा झाली पुन्हा दुसरी टॅक्सी शोधावी लागणार, वेळ जाणार. त्यापेक्षा आता निघालोच आहोत तर जाऊया असे ठरले व त्याच टॅक्सीत पटेल बधूना घेऊन आम्ही विमानतळावर निघालो

सहार विमानतळावर आमची टॅक्सी पोहोचली तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. विमानतळ माणसानी नुसता गजबजून गेला होता इतक्या अपरात्री इतकी माणस इथ काय करतात? याचे मनोमन नवल करीत आम्ही मुख्य इमारतीत प्रवेश केला. मोरीता भन्तेजींना आतापर्यंत अनेकवेळा विमानप्रवास केल्यामुळे त्यानी पुढची कामे ५ मिनिटात आटोपली 'टीडब्लूए' च्या काउटरवर सुदैवाने अजिबात गर्दी नव्हती माझ्याकडे फक्त एक सुटकेस व एक हॅण्डबॅग होती सुटकेसचे वजन सीटचे बुकीग वगैरे विधी ५ मिनिटात आटोपले खिडकीजवळची धुम्रपानास परवानगी असलेली सीट मिळाली तद्नतर पोलीस कक्षात पासपोर्ट, व्हिसा तपासणी झाली शफी पटेल याचे मित्र सब इन्स्पेक्टर विष्णू देवकर, राणे वगैर त्याच वेळी ड्यूटीवर होते त्यानी अत्यत अगत्यपूर्वक व तत्परतेने सहकार्य केले एवढेच नव्हे तर आग्रहपूर्वक आम्हाला चहाफराळ दिला.

रात्री ३ च्या सुमारास कस्टमचेकींगची अनाऊन्समेंट झाली आता माझ्याबरोबर आलेल्याचा आणि माझा वियोग होणार होता मुश्ताक व शफी पटेलनी मला कडकडून मिठ्या मारून शुभेच्छा दिल्या मोरीता भन्तेजीच्या पायावर डोके ठेवून मी त्रिवार प्रणाम केला आणि इतका वेळ कष्टाने आवरून धरलेला हुदका बाहेर पडला त्यानी माझी सात्वना करून मनपूर्वक आशिर्वाद दिला अश्रूपूर्ण नयनानी मी त्याचा निरोप घेतला

त्यानतर टीडब्लूए च्या विमानाने त्या फ्लाईटने जाणारे मी आणि माझ्या सोबतचे पाच-पन्नास प्रवासी इमारतीच्या तळमजल्यावरील काचेच्या भिंतीच्या हॉलमध्ये बसलो तिथून टीडब्लूए चे बोईग विमान दिसत होते मी धडधडत्या काळजाने अधूनमधून त्या विमानकडे व अधुनमधुन बाजूला बसलेल्या सहप्रवाशाकडे पाहत होतो प्रवासी मडळी कोणी कोणाशी बोलत नव्हती आधी १०-२० भारतीय होतो आमच्यात १०-१२ जणाचे एक दाक्षिणात्याचे टोळके होते. त्यातल्या ७-८ तरूण मुसलमान स्त्रिया होत्या व बाकीचे ३-४ त्याचे नोकरी लावणारे एजट होते ती मडळी कुवैतला चालली होती मळकट कपड्यातल्या त्या स्त्रिया विलक्षण बावरलेल्या होत्या. अशा तणावपूर्ण शाततेत

अधा तास गेला आणि मग आम्हाला विमानात जायच्या सूचना दिल्या गेल्या. मोटारीने आम्हाला विमानाजवळ सोडले मी अर्थातच चपळाई करून पहिल्या फेरीत पोहोचलो होतो

विमानाला लावलेला जिना चढण्यापूर्वी एकवार मी ते टीडब्लूए च्या बोईंग विमानाचे प्रचंड धूड पाहून घेतले याच प्रचंड धातू पक्षाच्या पोटात शिरून मी हजारो मैलाचा प्रवास करणार होतो आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका या चार खंडाच्या भूप्रदेशाची नवलाई पाहणार होतो आजवर केवळ नकाशात पाहिलेले अरबस्तानचे प्रचंड वाळवंट सुवेझचा कालवा, युरोपखंड, अटलांटिक महासागर अशी अनेकविध सृष्टीची दौलत मी डोळे भरून पाहणार होतो. मनात अमोल ठेव्याप्रमाणे साठवून ठेवणार होतो

क्षणभर मनातल्या मनात मी माझ्या पत्निचे, मुलाचे, माझ्यासाठी अत्यंत परिश्रम घेतलेल्या स्नेह्याचे, माझ्या सर्व आदरणीय व्यक्तिचे, श्रध्दास्थानाचे स्मरण केले माझ्या भारताच्या भूमीला स्पर्श करून प्रणाम केला आणि विमानाला जोडलेल्या जिन्यावर पहिले पाऊल ठेवले

# २ : पंख लाभले मला

विमानात प्रवेश करताक्षणीच वातानुकुलीत हवेचा जोरदार भपकारा नाकातोंडात शिरला. दरवाज्याच्या कडेलाच एका सीटला ओठंगून एक मध्यमवयीन अमेरिकन एअरहोस्टेस सुस्मित मुद्रेने येणाऱ्या प्रवाशाचे निरीक्षण करीत होती. माझी सीट प्रवेशद्वाराजवळच दुसऱ्या रागेत खिडकीशेजारी होती. हातातील हॅन्डबॅग शेजारच्या खुर्चीवर ठेवून मी माझ्या सीटवर बसलो आणि खिडकीतून बाहेर पाहिले. आमच्या विमानाचा एक प्रचड लाबलचक पख दिसत होता खिडकीतून काही क्षण मी विमानतळाचे निरीक्षण केले आतापर्यंत बहुतेक प्रवासी आत आले होते. आपापले सामानसुमान ठेवीत होते. एअर होस्टेस इकडून तिकडे जात होत्या. तेवढ्या अवधीत मी सीटला लागून असलेली व आजूबाजूची दोनचार बटणे दाबून पाहिली सीटजवळचा एक दिवा लागला डोक्यावर लपलेला एक पखा सुरू झाला व गार वाऱ्याचा झोत अगावर येऊ लागला. मी झटकन बटने बद केली नतर सीट बेल्ट कमरेभोवती लावण्याचा प्रयत्न केला. पण ते काही मला जमेना. सीट चागल्या गुबगुबीत व उबदार होत्या. नतर मी उठून उभा राहिलो. आतून विमान प्रचड लाब बोगद्यासारखे दिसत होते. मधल्या पॅसेजमधून फिरत मी प्रवाशाचे निरीक्षण सुरू केले विमानाच्या सुरूवातीच्या पुढच्या भागात फर्स्टक्लासच्या प्रवाशाच्या सीटस् होत्या व त्यानतर इकॉनॉमी क्लासच्या प्रवाशाच्या खुर्च्यांच्या रागा होत्या. एका बाजूला तीन सीट, मध्ये पॅसेज, मध्यभागात चार सीटस् पुन्हा मोकळा पॅसेज व दुसऱ्या कोपऱ्यात तीन सीटस् अशी रचना होती मधल्या भागात ठराविक अतरावर लॅट्रीन्स होती व किचन होते पायाखालच्या जाड गालीच्यावरून चालताना तरगल्यासारखे वाटत होते. १५-२० मिनीटे सर्व्हे करून पुन्हा मी

माझ्या जागेजवळ आलो पासपोर्ट, तिकीट, पेन-पॅड, सिगारेटचे पाकीट वगैर ठेवलेली प्लस्टीकची पिशवी फक्त जवळ ठेवून हॅन्डबॅग वरच्या भागातील खणात ठेवून दिली व पुन्हा जागेवर बसून विमान कधी सुटते (की उडते) याची वाट पाहू लागलो.

पहाटे ४-३० च्या सुमारास विमानाचे इजिन थरथरू लागले मद आवाजात अनाउसमेंटस सुरू झाल्या पट्टे आवळा, सिगरेटी विझवा वगैरे वगैरे. एअर होस्टेसेस लगबगीने सूचना देत चपळाईने फिरू लागल्या ठीक ४४० वाजता विमानाची थरथर वाढली प्रचड बॉयलर सुरू झाल्यासारखे वाटले. सूॅऽऽ असा तीव्र ध्वनी वातावरणात घुमला माझ्या हृदयाची धडधड जणू थाबली होती इतक्यात विमान किंचित हलले व सथपणे धावपट्टीवरून सरकू लागले थोडे थोडे पुढे जाऊन ते उजव्या बाजूला वळले व क्षणात प्रचड वेगाने धावू लागले. विमानतळाच्या धावपट्टीवरील दिव्याच्या रागा झरझर मागे पडू लागल्या आणि झटकन विमानाने जमीन सोडली पोटात खड्डा पडल्यासारखा झाला. काही क्षणातच विमानाने आकाशात झेप घेतली. छातीवर प्रचड दडपण जाणवले कानाचे दडे बसले. मी जीव मुठीत धरून खाली पाहीले झगमगत्या मुबापुरीचे काही क्षणच दर्शन झाले आणि विमान अधाराच्या प्रचड पोकळीत शिरले काही मिनिटानी भीती थोडी कमी झाली फक्त विमानाच्या इजिनाची कर्कश्श शीळ ऐकू येत होती माझ्या शेजारच्या तिन्ही खुर्च्या रिकाम्या होत्या. मला विलक्षण एकाकी वाटले. विमानतळावर निरोप द्यायला आलेल्या माझ्या मित्राची व घरी थाबलेल्या माझ्या मुलाची व पत्निची आठवण उफाळून आली नकळत पापण्याच्या कडा ओलावल्या.

अर्धा पाऊण तास मी शातपणे विचार करीत बसून होतो. आजूबाजूला मान वळवून पाहीले काही माणसे फिरत होती कमरेचा पट्टा सोडून मी ही उठलो बाथरूमला जाऊन आलो बाजूची काही माणसे रिकाम्या खुर्च्याचे हात वर करून झोपायला जागा करीत होती मी ही माझ्या शेजारच्या तिन्ही खुर्च्याचे हॅडल वर करून 'मीनी पलग' तयार केला. वरच्या खणातून उशा ब्लॅकेट काढली व गुरमटून निपचित पडलो. कधी डोळा लागला ते कळलेच नाही.

कोणीतरी मला धरून गदागदा हलविले आहे असा मला भास झाला मी दचकून डोळे उघडले. ध्वनिक्षेपकातून काहीतरी सूचना दिल्या जात होत्या माझ्या उशाजवळ एअर होस्टेज उभी होती 'लॅंडीग - कुवैत' तिचे शब्द

तुटकपणे माझ्या कानी पडले मी झटकन उठून बसलो. सीटबेल्ट (कमरपट्टा ) आवळला खिडकीतून खाली पाहिले चोहीकडे ताबुस वाळूचे प्रचड मैदान दिसत होते. विमान प्रचड वेगाने खाली येत होते क्षणात धावपट्टीवरील पिवळ्या दिव्याच्या रागा दिसू लागल्या. वेगाने दिवे मागे पळत होते माझ्या आयुष्यातील विमानाचे पहिले लँडीग मी अनुभवीत होतो काही क्षण विमान धावपट्टीवर प्रचड वेगाने धावत राहिले आणि पाहता पाहता वेग कमी झाला. विमानतळाची इमारत दिसू लागली आस्ते आस्ते विमान थाबले आम्ही कुवैतच्या विमानतळावर पोहोचलो होतो कुवैतच्या वेळेनुसार पहाटेचे ५-३०वाजले होते माझ्या घड्याळातील वेळ मी बदललीच नव्हती. त्यात सकाळचे ८ वाजले होते

इथे विमान दीड तास थाबणार होते एका प्रचड धातूच्या लबचौरस बोगद्याने आमचे विमानाचा दरवाजा व विमानतळाची इमारत जोडली गेली. विमानतळाच्या इमारतीत जाऊन पाय मोकळे करता येणार होते कुवैतचा विमानतळ, कुवैतच्या भूमीचे दर्शन घेण्यास मी उत्सुक झालो होतो टॉयलेटमध्ये जाऊन मी दाढी, मुखप्रक्षालन वगैरे प्रातर्विधी आटोपले. पासपोर्ट तिकीट वगैरे असलेली छोटी पिशवी घेतली व कुवैत विमानतळाच्या इमारतीत प्रवेश करता झालो तो काचेच्या भिंती असलेला भला मोठा वातानुकुलीत हॉल होता. इतर प्रवासी सोफ्यावर बसून गप्पा मारीत होते. धुम्रपान करीत होते. कोणी इकडून तिकडे फिरत होते. विमानतळाबाहेर पहावे तिकडे पिवळसर ताबूस वाळूच वाळू दिसत होती सूर्य चागला कासराभर आकाशात गेला होता इतक्या सकाळही बाहेर उन रणरणत होते आमच्या विमानात इधन भरले जात होते खाद्यपदार्थ चढविले जात होते. विमानाच्या आसपासचा प्रदेश निर्मनुष्य वाटत होता तरी देखील खूप प्रसन्न ताजेतवाने वाटत होते खाली जाऊन कुवैतच्या वाळुकामय भूमीला स्पर्श करण्याची इच्छा अनावर झाली पण ते शक्य नव्हत काचेच्या थडगार भितीवर गाल टेकवून मी अनिमिष नेत्रानी तो वाळूचा प्रचड पसारा मनात साठवून ठेवला. विमानतळाच्या हॉलमध्ये चागला तासभर फिरून ताजातवाना होऊन मी परत माझ्या जागेवर येऊन बसलो. तिथल्या तिथे परत येताना सिक्यूरिटी-चेक च्या कटकटीला तोड द्यावे लागले मी उगाचच मनात धास्तावलो आता यानतर कायरोला विमान थाबले की जागेवरच बसून रहायचे मी ठरविले. अमेरिकेला पोहोचण्याआधी कुठल्याही प्रकारचा धोका पत्करायला मी तयार नव्हतो

कुवैतच्या उड्डाणानतर सकाळचा ब्रेकफास्ट पुढ्यात आला ते थडगा अमेरिकन चिकनरोल बिस्किट आणि चहा, सारच बेचव लागल भूक्देखी। नव्हतीच सन्त्र्याचा रस मात्र दोन तीन ग्लास प्यायलो खिडकीतून खा पाहीले सपूर्ण वालुकामय प्रदेश. जणू गढूळ पाण्याचा समुद्र. ज्याला अत ना अधूनमधून काळे गोलाकार डागासारखे जमिनीवर काहीतरी दिसत होत व त्य वाळवटात सरळ दूरवर गेलेली करगळी एवढ्या रूदीची डाबरी सडकेची रेष दिसत होती एकदा वृक्षहीन प्रचड पर्वताच्या रागा दिसल्या त्या पर्वताच्य काळ्या पथ्थरावरही वाळू पसरल्यासारखी दिसत होती जणू गणेशोत्सवात तयार केलेला कृत्रिम ताडपत्रीचा डोगराचा देखावा। त्या पर्वतावरून विमान जाताना वाटल की तीस चाळीस हजार फुटावरून उडणाऱ्या या विमानान खाली जाव वाळवटातील एखादी सराय दिसावी विमानाकडे पाहून हात उचावीत ओरडणारी तिथली उघडी नागडी पोर दिसावीत. उर दडपून टाकणाऱ्या त्या प्रचड निर्मनुष्य वाळवटात कुठेतरी माणूस दिसावा पण तसे काही घडल नाही.

स्थानिक वेळेनुसार सकाळचे ९-०० वाजले होते तरी आपल्याकडे दुपारी १२ वाजता असत तसल उन बाहेर रणरणत होत विमानातील वातानुकूलीत यत्रणेमुळे आत मात्र भलताच गारठा होता शुभ्र ढगाचे पुजके विमानाला चाटून जात होते त्या दिवशी लक्षात आले की आपण जमिनीवर पाहतो तो ढगाचा पृथ्वीचा सर्वात जवळचा थर असतो वर अजून असे कितीतरी थर असतत. सर्वात खालच्या थराच्या ढगाची सावली जमिनीवर पडते बाकीचे थर इतक्या अफाट उचीवर असतात की त्याची सावली सुध्दा जमीनीवर पोहोचत नाही खाली वाहता वारा नसावाच कारण ढगाचे विशाल पुजके जणू एका जागी स्थिर असल्याप्रमाणे भासत होते क्षितीजाच्या अतापर्यंत पसरलेले ते वाळवट, तप्त, रखरखीत तरी देखील मानवी मनाला आपल्याकडे आकर्षित करून घेण्याच विलक्षण सामर्थ्य त्यात आहे, हे कोणीही नाकबूल करणार नाही. विस्फारलेल्या डोळ्यानी माझे माझे वाळवटाचे सौंदर्यपान चालले असताना कायरो विमानतळ जवळ आला असल्याची व विमान सुवेझचा कालव्यावरून जात असल्याची अनाउसमेंट झाली मी खाली पाहीले वाळवटात हिरव्या पाण्याचा एक प्रचड पट्टा व त्यात असख्य पाढरे ठिपके दिसत होते पाण्याचा पट्टा हिरव्या रगाचा दिसत होता दोन्ही बाजूला डाबरी रस्ते होते त्यानतर वृक्षहीन वाळू पसरलेल्या पर्वताची पुन्हा एक राग लागली आणि पाहता पाहता आमचे विमान कायरो शहराच्या डोक्यावर येऊन कधी घिरट्या

घालू लागले हे देखील कळले नाही

मी झटकन माझा सीटबेल्ट आवळला आणि उत्सुकतेने खाली पाहू लागलो. कायरो हे भव्य शहर आहे. आमच्या विमानाने त्यावरून दोन घिरट्या मारल्या आणि त्या शहराचा अफाट विस्तार दिसून आला. छोटे बंगले, अनेक मजली इमारती आणि कापडी तंबूच्या वस्त्यादेखील दिसल्या. पण संपूर्ण शहरावर कोणीतरी वाळू पसरून टाकली आहे असे वाटत होते. शहराचे वातावरणही धूरकट भासले. पाहता पाहता विमान जमिनीला टेकले आणि पळता पळता अलगद थांबले. इथेही दीड तासाचा मुक्काम होता. इथे मात्र आम्हाला मुख्य विमानतळाच्या इमारतीत जाता आले नाही. आमचे विमान विमानतळापासून बरेच दूर थांबले होते. इथेही विमानाची आतील साफसफाई झाली. इंधन भरले गेले. ताजे खाद्य पदार्थ आणले गेले. त्याचप्रमाणे पायलट व एअरहोस्टेस देखील बदलल्या. विमानाच्या प्रवेशद्वाराजवळच जिना लावला गेला. काही वेळ मी विमानतल्या विमानात फिरलो व मग प्रवेशद्वारावर लावलेल्या जिन्याला ओटंगून मजेत उभा राहिलो

बाहेर झुळझुळता थंडगार वारा अंगाला झोंबत होता. मी भरपुर मोठा श्वास घेऊन तो वारा पिऊन घेतला. खूप प्रसन्न वाटले. मी जर्कीनच्या खिशातून माझा माऊथ ऑर्गन काढला व त्यावर 'ठंडी हवाए लहराके आये रूत हे जवाँ, तुमको यहाँ कैसे बुलाए...।" हे गीत वाजवू लागलो. एक मध्यमवयीन अमेरिकन सहप्रवासी माझ्याजवळ येऊन लक्षपूर्वक माझे वादन ऐकू लागला. गाणे संपल्यावर मी त्याला लवून नमस्कार केला.

"युवर म्युझिक इज व्हेरी स्वीट" त्याने दाद दिली.

"थँक यू , इटस इंडियन म्यूझिक" मी उत्तरलो

तेवढ्यात आमच्याजवळ एक एअरहोस्टेस आली. मला खाली जाऊन जमिनीवर बसण्याची फार इच्छा झाली होती

"कॅन आय सिट देअर" मी खाली जमिनीकडे बोट दाखवित एअरहोस्टेसकडे विचारणा केली.

"शुअर, बट डोंट गो अवे." ती हसत उत्तरली.

"थँक यू" मी अभिवादन करून उत्तरलो आणि तुरूतुरूही चालून

खालच्या सिमेंटच्या जमिनीवर चक्क माडी घालून बैठक मारली व पुन्हा माऊथऑर्गनवर गाणी वाजवू लागलो माझ्या पाटोपाठ माझा अमेरिकन फॅन देखील आला व त्यानेही माझ्यासारखीच बैठक ठोकून श्रवणाचा आनद घेऊ लागला.

ठीक ११ वाज विमानाने कायरो विमानतळ सोडला पुन्हा एकदा कायरो शहराचा अफाट विस्तार डोळ्यासमोर उलगडला गेला. वस्ती दाट आहे पण रेखीव आहे कुठेही अजागळपणा दिसला नाही मग आमचे विमान नाईल नदीच्या काठाकाठाने उड्डाण करू लागले नाईल नदीच्या दोन्ही काठाला शेकडो मैल हिरवीगार पिकाची दौलत पसरलेली दिसत होती. नाईल नदीने इजिप्तला धनधान्याने किती समृद्ध केले आहे त्याचा प्रत्यय येत होता ३ वाजता पुन्हा समुद्र सुरु झाला आकाशात दाट ढगानी गर्दी केली होती आमचे विमान जणू ढगाच्या अतिविशाल मऊमऊ कापसावरून घसरत चालले होते सारख सारख निळभोर पाणी आणि ढग पाहून मला पेग येऊ लागली पोट भरलेले होते नकळत डोळ जडावले आणि विमानाच्या कुशीत मी झोपी गेलो

तासादिडतासाने दचकून जागा झालो. ध्वनिक्षेपकावरून अनाउन्समेंट होत होती आम्ही आता इटलीवरून चालल्याचे व नेपल्सचा समुद्रकिनारा दिसत असल्याचे अनाउसर सागत होता विमानाच्या उजव्या बाजूच्या खिडक्यातून माणस वाकून पाहत होती मी देखील एक खिडकी पटकावली समुद्राच्या पोटात शिरलेल्या निसर्गरम्य नेपल्सचा किनारा नकाशात दाखवतात तस्सा हुबेहुब दिसत होता मला मात्र बऱ्याच तासानतर जमीनीचा तुकडा पाहून आनद झाला होता सारख सारख समुद्राच निळ पाणी पाहून त्याची ॲलर्जी निर्माण होऊ लागली होती पृथ्वीवर ३/४ भागावर पाणी आहे हे त्यावेळी पटले आता बाहेर अधारून येऊ लागले होते. सायकाळचा डीनर आटोपला आत विमानाच्या स्क्रीनवर कुठलासा अमेरिकन चित्रपट सुरू झाला. मी उशा ब्लॅकेट काढली पुन्हा मीनी पलग काढला आणि चित्रपट पाहतापाहताच झोपी गेलो.

किती वेळ झोपलो होतो कुणास ठाऊक. पुन्हा जाग आली त्या वेळी सूर्य चागलाच वर उगवून आला असावा विमान अटलाटिक महासागरावरून उड्डाण करीत होते खाली समुद्रात विविध आकाराची चारी बाजूनी निळ्या पाण्याने वेढलेली, हिरव्यागार नटराजीने नटलेली छोटी छोटी बेटे दिसत होती समुद्राचे पाणी इतके स्वच्छ व पारदर्शक होते की बेटाच्या

जमीनीच्या प्रतिबिबाचा व पाण्याखालचा भूभागदेखील दृष्टोत्पत्तीस येत होता आता अधूनमधून ही बेटे वारवार दिसू लागली अथाग व असीम महासागराच्या पोटात इथे तिथे विखुरलेल्या या भूभागावर प्रथम वस्ती करायला येणारी माणस किती धाडसी असतील त्याकाळी आपल्या इवल्याश्या होडक्यातून महासागराच्या मस्तवाल लाटावर बेदरकारपणे वल्ही मारीत नव्या नव्या प्रदेशाचा शोध लावणारे व तेथे वस्ती करणारे साहसी वीर . . मनातल्या मनात मी त्या अज्ञात पुरूषाना वदन केले. विमान अखडपणे चाललेच होते हा महासागर कधी सपणार नाही आपला प्रवास कधीही सपणार नाही असे वाटू लागले होते गेल्या २०-२२ तासाच्या सततच्या विमानोड्डाणामुळे तसले विचार मनात येऊ लागले असावेत. माझ्या मुलाची व पत्निची आठवण मनात जागी झाली सहकारी मित्राचे चेहरे आठवले पुन्हा मनाला तरतरी आली आपला प्रवास निर्विघ्नपणे पार पडणारच असे निश्चितपणे वाटू लागले

दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास अनाउन्समेट झाली - आपण लवकरच न्यूयॉर्कला पोहोचणार आहोत हवामान ढगाळ आहे. पण बाकी सर्व ठीकठाक असल्याचे सागितले गेले त्या घोषणेने प्रवासी मडळीत उत्साह सचारला. माणसे उठून आपापल्या सामानाची आवराआवर करू लागली एअरहोस्टेसनी कसलेसे फॉर्म भरून आणून दिले व माहीती भरावयास सागितले पाचच मिनिटात ते मी भरून पूर्ण केले विमानतळावर उतरल्यावर ते कस्टम ऑफीसरला दाखवायचे होते विमान न्यूयॉर्कला पोहोचण्याची वेळ दुपारी ४ २० ची होती म्हणजे अजून तासभर अवकाश होता मी उठून उभा राहीलो अगाला आळोखे पिळोखे देत मस्तपैकी आळस दिला. पुन्हा सीटचा 'मीनी बेड' तयार करून आरामात १०-१५ मिनिट लोळत राहिलो मग उठलो हॅडबॅगमध्ये सामान व्यवस्थित भरले दुसऱ्या छोट्या चामड्याच्या थैलीत तिकीट, पासपोर्ट, विमानात दिलेले फॉर्म, चष्मा, पेन वगैरे व्यवस्थित ठेवले व विमानात या टोकापासून त्या टोकापर्यंत चकरा मारू लागलो अर्ध्या पाऊण तासात मी अमेरिकेला पोहोचणार होतो तरी मी पुन्हा सीटवर बसलो व मजेत शीळ घालू लागलो

खिडकीतून सहज मी बाहेर डोकावले, पाहतो तर काय ? वातावरणात एकदम बदल झालेला. काही वेळापूर्वीच्या निरभ्र आकाशाचा मागमूसही कुठे दिसत नव्हता आजुबाजुला सर्वत्र दाट मातकट रगाचे ढग

भरलेले होते ते आक्राळविक्राळ ढग प्रचड वेगाने विमानाला चाटून जात होते माझ्या खिडकीतून दिसणारा विमानाचा पखाही आता पूर्णपणे दिसत नव्हता अर्धा पाऊण तास त्या करड्या मातकट ढगाच्या साम्राज्यातून सुसाट वेगाने विमान चाललेच होते त्या वातावरणात मला गुदमरल्याप्रमाणे होऊ लागले. प्रवासी मडळी आपापल्या जागावर निमुटपणे बसून निसर्गाचे ते रौद्र स्वरूप भयभीत होऊन पाहत होती

साडेतीनच्या सुमारास पुन्हा अनाउसमेट झाली "सीटबेल्ट आवळा, सिगरेटी विझवा, लौकरच आपण न्यूयॉर्कच्या जॉन एफ. केनेडी विमानतळावर उतरणार आहोत.' त्या अनाउन्समेटने मला जो आनद झाला तो काय विचारता ? जागच्या जागेवर उड्या माराव्या, जोरात टाळ्या वाजवून आपला आनद व्यक्त करावा असे मला वाटू लागले मी माझे सामान माझ्या शेजारी ठेवले काही राहिले नसल्याची खात्री केली सीट बेल्ट आवळला व उत्सुकतेने खिडकीबाहेर पाहू लागलो. अजूनही बाहेर मातकट रगाच्या मेघाचे ताडव चालूच होते पण मला आता त्याची अजिबात भीती वाटत नव्हती उलट खिडकीबाहेर हात काढता येत असता तर त्याना मी स्पर्श करण्याचा प्रयत्न केला असता

४ वाजण्यास १० मिनिटे अवकाश होता पुन्हा अनाउन्समेट झाली आणि त्या दाट ढगातून विमानाने खाली सूर मारल्याचे जाणवले प्रचड वेगाने विमान खाली जाऊ लागले तसतसे ढगाचे थरही विरळ होऊ लागले मातकट, मग करड्या, मग धुरकट अशा क्रमाक्रमाने ढगाच्या छटा ओलाडित विमान मोकळ्या वातावरणात कधी आले ते कळलेच नाही अचानक डोळ्यासमोर रगीबेरगी सुबक छोटे बगले, त्याचे हिरवे लॉन्स, रेखीव वस्त्या, आखीव रस्ते अस अत्यत लोभसवाण आणि तत्रशुध्द चित्र डोळ्यासमोर उलगडले 'आहा, किती सुदर !' असा सहजोद्गार तोडातून बाहेर पडला अधाशासारखा त्या शहराची वास्तुरचना मी पाहू लागलो आणि पाहता पाहताच आमचे विमान जॉन एफ. केनेडी या विशालकाय विमानतळाच्या धावपट्टीवर कधी टेकले व दुडक्या चालीने कधी थाबले ते कळलेही नाही 'हाय न्यूयॉर्क' मी बसल्या जागेवरच आनदाने आरोळी ठोकली बाजूचे प्रवासी चकीत होऊन माझ्याकडे पाहू लागले पण कोणाला काय वाटेल याची पर्वा करण्याच्या मनःस्थितीत मी आता नव्हतो जगातल्या अत्यत प्रगत शहरात मी आता प्रवेश करणार होतो जगात प्रथम क्रमाकावर असलेल्या अमेरिका राष्ट्राच्या भूमीवर मी पाय ठेवणार

होतो पुरोगामीत्वाची परपरा असलेल्या अमेरिकन माणसाना मी भेटणार होतो

मी सीटबेल्ट सोडला उठून उभा राहिलो गेले २०-२२ तास न कुरकुरता माझा भार सहन केलेल्या सीटला प्रेमाने थोपटले समोर येतील तेवढ्या प्रवाशाशी, एअर होस्टेसशी हस्तादोलन केले व बाहेर पडण्यासाठी प्रवाशाच्या रागेत सामील झालो

# ३ : न्यूयॉर्कशी जवळीक

हॅंडबॅग खांद्याला अडकवून आणि पासपोर्टची पिशवी हातात धरुन मोठ्या रुबाबात मी विमानाला जोडलेल्या धातूच्या बोगद्यातून न्यूयार्कच्या जेएफ्के विमानतळाच्या मुख्य इमारतीत प्रवेश केला. कस्टम चेकीगचा तो हॉल चागलाच भव्य होता. ८-१० काउटर होते व प्रत्येक ठिकाणी एक ऑफिसर तपासणीसाठी उभा होता तिथे प्रवेश करताक्षणीच माझा मघाचा उत्साह गायब झाला. ते गोरेपान रुबाबदार अमेरिकन कस्टम ऑफिसर्स, सगळीकडे लावलेले कॅाम्प्यूटर्स, इन-डोअर-क्लोज-सर्किट टी व्ही , ते फिरते जिने आणि त्यावर तरगत जाणारी माणसे, विविध काऊटरवर काचेआड झटपट कामे उरकणा-या देखण्या तडफदार अमेरिकन मुली, सगळीकडे नुसता झगमगाट, डोळे दिपवून टाकणारा, विचाराचा गोंधळ उडवून देणारा

माझ्या पुढचा प्रवासी कस्टम ऑफिसर समोरुन निघून गेल्यावर मी धडधडत्या काळजाने पुढे सरकलो. कस्टम चेकिंगची माझी ही पहिलीच खेप होती आणि ती ही अमेरिकन ऑफिसर समोर ! कस होणार या विवचनेत मी होतो कारण माझ्या अगोदरच्या एका भारतीय प्रवाशाला त्याने चागलाच फैलावर घेतल्याचे मी ऐकले होते. तोडावर जमेल तितक हास्य आणि आत्मविश्वास गोळा करुन मी माझा पासपोर्ट आणि विमानात दिलेले ते दोन फार्मस् त्याच्या हाती दिले

"गुड इव्हीनिग सर" मी हातजोडून नमस्कार केला. त्या सदगृहस्थाने मला एकदा अपादमस्तक न्याहाळले आणि प्रश्न केला.

"गुड इव्हीनिग, ऑन व्हॅाट बिझनेस यू आर हिअर सर?" त्याच्या

बोलण्यातील नम्रतेने मी थोडा आश्वासित झालो

"आय ॲम हिअर टू अटेंड वर्ल्ड पीस कॉन्फरन्स सर" मी उत्तरलो

"हॅव यू ब्रॉट ॲनी इटेबल्स ऑर स्पायसेस सर ? " त्याने प्रश्न केला

"नो सर" मी म्हणालो

"एनी गिफटस् ?"

"नो सर" मी नन्नाचा पाढा सुरु ठेवला.

"हाऊ लॉग यू विल स्टे इन यू. एस्.ए. ?"

"मे बी फॉर ए मथ "

"यू हॅव ब्रॉट ओन्ली फाइव्ह हड्रेड डॉलर्स. डू यू थिंक दे आर सफिशिएंट, सर ?"

"आय थींक दे आर मोअर दॅन सफिशिएंट. बीकॉज माय इन्स्टिटयूशन विल टेक केअर ऑफ एव्हरीथिंग माय फूड, ट्रान्सपोर्टेशन, लॉजीग, ऑलमोस्ट एव्हरीथिंग सर" मी नम्रतापूर्वक स्मितहास्य करीत उत्तरलो

"एन्जॉय युवर स्टे सर" माझ्या फॉर्म्सवर सहया करीत व पासपोर्टवर शिक्का मारीत तो म्हणाला.

'व्हेरी काईंड ऑफ यू सर । '

त्याच्या चागुलपणाने प्रभावित होऊन त्याच्याशी मनःपूर्वक हस्तादोलन करीत मी उद्गारलो हॅडबॅग उचलली आणि चालू लागलो चार पावले जातो कुठे नाही तर अचानक मला माझ्या सुटकेसची आठवण झाली 'अरे देवा । आता सुटकेस कुठे शोधू ?' माझ्या सर्व गात्राना दरदरून घाम फुटला. माझे सर्व कपडे त्यात होते शभर डॉलरची नोट व ४०० डॉलरचे ट्रॅव्हलर्स चेक ।' मी त्या मघाच्या ऑफिसरकडे चौकशी करायला परत जाणार इतक्यात माझी नजर समोर गेली तिथे वर्तुळाकार फिरत्या पट्टयाभोवती मी आलेल्या विमानातील सहप्रवासी उभे होते व फिरत्या पट्टयावर काही बॅगा फिरत होत्या. मी त्या गर्दीत घुसलो माणसे आपापल्या बॅगा येताच उचलून घेऊन जात होती ४-५ मिनिटे झाली पण माझी बॅगकाही येईना. कपाळावरचे घर्मबिंदू मी रुमालाने टिपले माझी बॅग लवकर येऊ दे अशी मनातल्या मनात प्रार्थना सुरु

केली इतक्यात वरच्या गुप्त पोकळीतून माझी लालभडक व्ही.आय.पी फिरत्या पट्टयावर घरगळली सरकत सरकत ती माझ्याजवळ आल्याबरोबर आईने आपल्या एकूलत्या एक लाडक्या मुलाला पटकन उचलून पोटाशी घ्यावे तेवढया मायेने मी माझी बॅग उचलली

बॅगेज हाताशी आल्यावर माझ्यापुढे एक प्रश्नचिन्ह उभे राहिले 'आता जायचे कुठे?' आठशे खिडक्या नऊशे दार...असलेल्या त्या जागेतून नक्की जायच कुठल्या वाटेने? आडवाटा चोखाळण्यापेक्षा आपल नाकासमोर पाहून चालाव असा सुज्ञ विचार करुन समोरच्या फिरत्या जिन्याकडे स्वतःच सामान उचलून निघालो त्या तरगत्या जिन्याने मला अलगद वर आणून सोडले वर आल्यावर लक्षात आले की, आपले सामान खालीच राहिले शेजारच्या खाली जाणा-या सरकत्या जिन्याने खाली गेलो व सामान घेऊन पुन्हा तरगत वर आलो पुन्हा सामान उचलले व चालू लागलो बाहेर पडताना तिथे काही सुटाबुटातली अमेरिकन मडळी हातात चौकोनी छोटे छोटे पुठ्ठयाचे फलक घेऊन उभी असलेली दिसली मी सामान खाली ठेवले व फलक वाचू लागलो अनोळखी व्यक्तिना घ्यायला आलेली ती मडळी होती. त्याच्या त्याच्या कपन्याची, सस्थाची नावे असलेले फलक त्याच्याहाती होते मी आमच्या सस्थेचा फलक असलेला कोणी सद्गृहस्थ दिसतो का ते पाहीले. नव्हता ! सर्व फलक मी तीन तीनदा वाचले पण नाही कदाचित माझ्या सस्थेचा माणूस बुटकाही असू शकेल. म्हणून त्या 'फलकधारी' च्या घोळक्यात डोकावून देखिल पाहिले तिथेही कोणी नव्हता आता काय करायच?

पु.लं च आपल बर असत परदेशातही त्याचे स्नेही व नातेवाईक असतात आमचे नातेवाईक मुबई पुण्यात सुध्दा सापडत नाहीत. परदेशात कुठले! कॉलेजला प्रथम वर्षाला मी प्रवेश घेतला त्यावेळी उशीरा अर्ज केल्यामुळे कॉलेजच्या वसतीगृहात मला प्रवेश मिळाला नव्हता. त्यावेळी दोन महिने मी आणि माझा बाप पुण्यात गुलबकावलीच्या फुलाप्रमाणे नातेवाईकाचा शोध घेत होतो सापडले नाही शेवटी खडकीच्या चाळीत राहणा-या नातेवाईकाचा आसरा घ्यावा लागला होता. मुबईला आमचा एक जवळचा नातेवाईक वरळीला बी.डी.डी चाळीत रहात होता माझ्या लहाणपणी 'हे मुबईला माळयावर कसे रहात असावेत' याचे मला मोठे कोडे पडत असे आमच्या गावी माळा म्हणजे सरपण, पेडा साठविणेची जागा असे नतर पुढे 'त्या माळयावर' दिवस कठण्याचा वनवास माझ्याही नशीबी काही वर्षे आला

होता. असो, तर सागायचे तात्पर्य, मला न्यायला कोणी येणार होता की येणारच नव्हता या प्रश्नाने मला ग्रासून टाकले

मग मला एकदम आठवले मी विमानात बसण्याच्या फक्त १ दिवस आधी अमेरिकेला तार केली होती त्यामुळे त्या तारेचे उत्तर येण्यापूर्वीच मी निघालो होतो समजा माझी तार त्याना मिळालीच नसली तर ? माझ्या गन्तव्य स्थानाचा पत्ता मजजवळ होता पण या अफाट न्यूयॉर्क शहरात आता रात्रीच्या वेळी मी तो शोधणार कुठे आणि कसा ? मी विमानतळाबाहेर पाहिले हवा कुद झाली होती वातावरण ढगाळलेले होते कुठल्याही क्षणी जोराचा पाऊस सुरु झाला असता. मी येणा-या जाणा-याच्या चेह-याकडे केविलवाण्या नजरेने पहात होता. कुणीतरी याव आणि 'मी तुम्हाला न्यायला आलोय' अस सागाव अस फार फार वाटू लागल माणस माझ्या भोवतालून जात येत होती. मी समान घेऊन आत आलो व दरवाज्याकडे तोड करुन तिथल्या कठडयाला टेकून उभा राहिलो पिशवीतून सस्थेचे निमत्रणाचे पत्र काढले त्यावर लिहिले होते. If you are arriving via plane to New York please contact Brother Kimigasu Ishibashi, 41-W, 105 St, NYC, New York-10025, (212) 666-6440

मी विचार करु लागलो ब्रदर किमित्रासू इशिबाशी याचेशी सपर्क साधावयाचा. नावावरुन ते जापानी असावेत बहुतेक बुध्द भिक्षू. आणि हे काय ?हा खालचा फोन नबर दिसतोय. मला नवीन हुरुप आला. आपण फोन करुन विचारु शकतो आपण आल्याचे सागू शकतो एवढ काही घाबरायच कारण नाही. तिथे टेलीफोनचे अनेक बुथ होते त्यात २५ सेटचे एक नाणे टाकले की फोन करता येतो असे तिथल्या काळ्या पोर्टरने मला सागितले.

मी बॅगा उचलून फोनकडे जाणार इतक्यात काषाय रगाची वस्त्रे परिधान केलेले एक तरुण जपानी बुध्द भिक्षू प्रवेशद्वारातून लगबगीने आत येताना दिसले मला न्यायला आलेले ते हेच तर नसावे ? ते देखिल भाबावल्या नजरेने इकडे तिकडे कोणाला तरी शोधीत होते मी मनाचा हिय्या करुन त्याच्याजवळ गेलो व त्याना प्रणाम करुन म्हणालो 'नम्यो -हो रेन्गे - क्यों'

आपल्याकडे 'बुध्द - सरण - गच्छामि' हे वचन आहे जपानी बौध्द भिक्षू एकमेकाना प्रणाम करताना 'नम्यो -हो रेन्गे - क्यो' त्याचा वापर करतात हे मी आमच्या वरळीच्या बुध्दमदिरात अनेकदा ऐकले होते ते वचन

अमेरिकेच्या वास्तव्यात माझ्या दृष्टीने परवलीचा मत्र ठरले कसे ते पुढे ओघाने येईलच

सागायचे तात्पर्य की  माझ्या त्या वचनाच्या उच्चाराचा जादूची काडी फिरल्याप्रमाणे परिणाम झाला आश्चर्याने गर्रकन वळून त्यानी माझ्याकडे पाहिले आम्ही दोघेही एकमेकाना आयुष्यात पहिल्यादाच पहात होतो मी भारतातला, ते जपानचे आणि अमेरिकेच्या भूमीवर ते माझ स्वागत करायला उभे होते काय योगायोग होता पहा !

'आय ॲम मिस्टर मनोहर रणपिसे फ्रॉम इडिया डेलेगेट फॉर पीस कॉन्फरन्स आर यू रेव्हरड किमीगासू इशिबाशी  सर ?' मी उतावळेपणाने म्हणालो

'येस, येस, आय ॲम रेव्हरड इशीबाशी, मिस्टर रॅपिस. आय ॲम व्हेरी सोरी आय केम लेट.' दिलगिरीच्या सुरात माझ्या खाद्यावर थोपटीत ते म्हणाले

"नेव्हर माईड सर, दॅट्स नॉट युवर फॉल्ट. माय प्लेन ॲराईव्हड ट्वेन्टी मिनिटस् बिफोर शेड्युल्ड टाईम  मी त्याना प्रणाम करीतम्हणालो

"हाऊ वॉज द जर्नी - अेनी प्रोब्लेम ? त्यानी चौकशी केली

"नो प्रॉब्लेम सर. बाय द ग्रेस ऑफ लॉर्ड बुध्दा, आय हॅड ए प्लीजन्ट व्हॉयेज. " मी खुलासा केला

"दॅटस् गुड" असे म्हणून पटकन त्यानी माझ्या बॅगा उचलल्या  ते पाहून मी खजील झालो लगबगीने त्याच्या हातातून सुटकेस घेत म्हणालो

"प्लीज सर. लेट मी टेक द बॅग"

"नेव्हर माईड. यू आर टायर्ड मिस्टर रॅपीस" सामान माझ्याकडे न देता लगबगीने चालत ते म्हणाले व पाहता पाहता रस्ता ओलाडून पलिकडे गेले देखील. मी कसाबसा धावत जाऊन त्याना गाठले

ते आपली स्वतःची मोठी व्हॅन घेऊन आले होते व जवळच ती पार्क केली होती माझे लगेज आत ठेवून त्यानी मला फ्रँटसीटला बसण्याचा इशारा केला मी टूणकन उडी मारुन त्याच्या शेजारच्या सीटवर बसलो सफाईदारपणे वळणे घेत ते गाडी चालवू लागले

पाच मिनिटाच्या आतच विमानतळाबाहेर येऊन आमची गाडी मुख्य रस्त्याजवळ आली आणि मोटारीच्या मुग्यासारख्या प्रवाहात सामील झाली

जणू अमेरिकन जीवनप्रवाहात मी सामील झालो होतो

विविध मेकच्या शेकडो रंगीबेरंगी मोटारी लयबध्दपणे परंतु वेगात चालल्या होत्या क्षणभरातच मला काहीतरी विसंगती जाणवली

सर्व गाड्या रस्त्याच्या उजव्याबाजूने चालल्या होत्या सर्व प्रथम माझ्या नजरेत भरलेली गोष्ट म्हणजे तेथील प्रशस्त व नितळ रस्ते, भलेमोठे फुटपाथ रस्त्यावर, फूटपाथवर व आजूबाजूची कमालीची स्वच्छता आम्ही जात असलेल्या भागात रस्त्याच्या कडेला छोटे छोटे टुमदार लाकडी अथवा लाल विटाचे बंगले होते घरापुढे अथवा फुटपाथवर क्वचित एकटा दुकटा माणूस दिसे. बाकी सारी सामसुम रस्त्यावर मोटारी मात्र भरपूर पण त्याही मुक्याचं व्रत घेऊन चाललेल्या. सहसा हॉर्न कुणी वाजवत नव्हते आणि कर्कश आवाजात हॉर्न वाजविणे तर अजिबात नाही नाक्यावर हवालदार नव्हते की त्याच्या शिट्टयाचे आवाज नव्हते नाही म्हणायला मधूनच एखादी पोलीसाची गाडी आमच्या जवळून वेगात पुढे गेल्यावर ड्रायव्हिंग करणारे इशीबाशी माझ्याकडे पाहून हसत म्हणायचे, "क्रेझी साऊंड।" आपल्या मुंबईच्या ट्रॅफिकचे अगणित, कर्कश "स्वरविलास " ऐकून बधीर झालेल्या माझ्या कानाना त्याचा तो "क्रेझी साउंड" "साऊंड ऑफ म्युझिक" वाटला हे त्याना मी कसं सांगणार होतो

आता बाहेर पाऊस पडू लागला होता आणि हवेत चांगलाच गारठा जाणवत होता रस्त्यावर - घरात दिवे लागले होते दुकानापुढे लावलेल्या रंगीबेरंगी न्यूऑन साईन्स झगमगू लागल्या. मी नुस्त्या नजरेन त्या ऐश्वर्यसंपन्न शहराच सौंदर्य पिऊन घेण्याचा प्रयत्न करीत होतो आता बैठे बंगले कमी होऊ लागले होते आणि उंच उंच इमारती दिसू लागल्या होत्या मी आपला एम्पायर स्टेट बिल्डिंग कोणती हेच पाहण्याचा प्रयत्न करीत होतो शेवटी न राहवून मी इशिबाशींना त्याविषयी विचारलं त्यावर त्यानी शहराचा तो भाग अजून खूप दूर असल्याचे सांगितले आम्ही विमानतळावरुन निघाल्याला आता एक तास होऊन गेला आमचा प्रवास चालूच होता. ड्रायव्हिंग करणारे बुध्दभिक्षू इशिबाशी थोडे गोंधळलेले दिसले त्यानी गाडी मुख्य रस्त्याच्या बाजूला एका छोटया रस्त्यावर घेतली. बस एका पेट्रोल पंपाजवळ थांबविली त्यांच्याजवळ असलेला न्यूयार्क शहराच्या रस्त्याचा नकाशा त्यानी काढला व त्यात काही शोधू लागले मधेच माझ्याकडे पाहात हसून म्हणाले " वुई हॅव लॉस्ट द वे" खाली उतरुन त्यानी पेट्रोल पंपावरील व्यक्तिकडे चौकशी केली जरा वेळाने ते आत आले पुन्हा आमचा प्रवास सुरु झाला.

इशीबाशी एक रस्ता चुकल्यामुळे आम्हाला जहवळजवळ अर्ध्या तासाच्या फे-याचा भूर्दंड पडला होता. मला मनातल्या मनात असे वाटले की, इशीबाशिनी अजून दोनतीनदा रस्ता चुकावा तेवढेच जास्तीत जास्त न्यूयार्कचे दर्शन मला घडणार होते पुन्हा ते काही रस्ता चुकले नाहीत. पण मुळातच आमची जागा न्यूयार्क शहराच्या ज्या "हार्लेम" भागात होती तिथून जेएफ्के एअरपोर्ट जवळजवळ दुसरे टोक होते घरी पोहचण्यासाठी २ - २। तास आमचा मोटारीचा प्रवास चालू होता. त्यामुळे न्यूयार्क शहराचे मनसोक्त दर्शन मला पहिल्या भेटीतच घडले

अखेर सायकाळी ७ च्या सुमारास आम्ही आमच्या इच्छित स्थळी पोहोचलो तो एक मजली छोटासा बगला होता मुख्य दरवाजा छोटासाच होता आणि तो बद होता दोन-तिनदा बेल वाजविल्यावर दरवाजा उघडला गेला दारात आमच्या स्वागतासाठी, तीशीच्या वयाची सुमाराची एक तरतरीत, उंच, गोरीपान अमेरिकन स्त्री उभी होती तिने माझे स्मितहास्याने स्वागत केले व तत्परतेने माझ्या हातातली बॅग घेतली छोट्याशा लाकडी जिन्यावरुन आमची वरात वर निघाली जिन्याच्या शेवटी ८-१० वर्ष वयाची दोन देखणी अमेरीकन मुले माझ्याकडे कुतुहलाने पाहत उभी होती मी जाता जाता हसून त्याचे सोनेरी केस विस्कटवले पहिल्या मजल्यावरील एका डबलरुममध्ये आम्ही प्रवेश केला. बाहेरच्या खोलीत दोन तरुण जपानी भावडे होती ते ही माझ्यासारखेच पाहुणे होते आतल्या रुममध्ये छोटेसे बुध्द मदिर होते मध्यभागी १-१ ॥ फुटी प्रसन्न बुध्द मूर्ति व आजूबाजूला खास जपानी पध्दतीने कलात्मक सजावट केलेली होती आल्याआल्या प्रथम आम्ही सर्वांनी बुध्द मूर्तिसमोर प्रार्थना केली ते अमेरिकन कुटुब बौध्द धर्मीयच होते मुलाचे नाव "एबन" व मुलीचे "रीव्ही" होते लगेचच आम्ही सर्वजण "सपर" साठी एकत्र बसलो मी, बुध्दभिक्षु इशिबाशी, ती दोघे जपानी भावडे, ती दोन छोटी अमेरिकन भावडे आणि त्याची आई व त्या मुलाची आजी घरमालकीण लॅडलेडी असे आमचे सर्वजणाचे गप्पा मारीत जेवण सुरु झाले मला भूक अशी नव्हतीच मी माझ्या एअरपोर्टवरच्या ताराबळीचे वर्णन करुन त्याचे मनोरजन केले म्हातारी देखिल खुदुखुदु हसली तासाभरातच आमच्यातला परकेपणा नाहीसा झाला

दोन दिवसाच्या विमान प्रवासाने अग आबल्यामुळे मला गरम पाण्याने स्नान करायचे होते मी तसे बोलून दाखविल्यावर तत्परतेने जपानी तरुणीने मला बाथरुम दाखविले चागलेच प्रशस्त स्नानगृह होते आत मध्ये

टब, बेसीन, शॉवर, आरसे, लॅट्रीन सर्व काही होते त्या जपानी मुलीने मला टबच्या गार-गरम पाण्याच्या नळाचे तत्र समजावून दिले नतरचा अर्धा तास मी मनसोक्त टब मधल्या गरम पाण्याशी दगामस्ती करीत आघोळ केली खूप बर वाटल स्नानगृहातून बाहेर येताना मी स्वीचचे बटन बद करण्यास गेलो पहातो तर बटण वर, म्हणजे आपण इलेक्ट्रिक बटन बद करतो त्या अवस्थेत मी ते खाली केल्यावर लाईट ऑफ अमेरिकन विद्युत पध्दतीचा अशा रितीने माझ्या डोक्यात "प्रकाश" पडला मी आघोळ उरकेपर्यत बिछाने घातले गेले होते बाहेर कमालीचा गारठा आत उबदार बिछाना व मऊ मऊ रग अगावर घेताच पडल्यापडल्या मला झोप लागली

पहाटे माणसाच्या हळू आवाजातील बोलण्याने व पायरवाने मला जाग आली, मी डोळे उघडून पाहिले बुध्द भिक्षू उठून, बिछाने ठेवीत होते मी पटकन उठून बसलो घड्याळात पाहिले पहाटेचे सव्वा पाच वाजले होते मी बाहेरच्या रुममध्ये डोकावून पाहिले ती दोघे जपानी भावडे उठून काहीतरी खुटपुट करीत होते मी चटकन उठून माझा बिछाना व्यवस्थित ठेवला. दाढीचे सामान, टूथपेस्ट टॉवेल वगैरे घेऊन स्नानगृहाकडे निघालो मला जाताजाता वाटेत जपानी तरुण हळूच म्हणाला

"प्लीज कम क्विकली प्रेअर्स बिल स्टार्ट ॲट क्वार्टर टू सिक्स"

मी पधरा मिनिटातच दाढी आघोळीसहीत सर्व प्रातर्विधी आटोपले स्वच्छ शरीराने व प्रसन्न मनाने सफेद नेहरु शर्ट पायजमा घालून मी त्याच्यासह प्रार्थनेला बसलो पावणे सहा ते सव्वा सहापर्यत जपानी ड्रम हळू वाजवित "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्राचा सामुदायिक सौम्य स्वरात घोष झाला हळू आवाजात प्रार्थना करण्याचे कारण आजूबाजूला राहणा-या लोकाना त्रास होऊ नये अस होत ते मला जपानी तरुणाने सांगितले दुस-याच्या सोयी, गैरसोयीची ही मडळी किती काळजी घेतात नाहीतर [illegible]

मग इशिबाशीनी जपानी भाषेत बुध्द प्रार्थना केली साडेसहाला आमची प्रार्थना आटोपली मग अर्धातास बसून आम्ही गप्पा मारल्या. ठीक ७ वाजता आमचा ब्रेकफास्ट सुरु झाला ब्रेड, अडी, बटर, शेवयासारखा जपानी पदार्थ, फ्रुट ज्यूस आणि चहा. त्या दिवसाच्या ठरलेल्या कार्यक्रमाविषयी चर्चा करीत आम्ही न्याहरी आटोपली

मी ज्या शाती पदयात्रेत सहभागी होण्यासाठी आलो होतो ती पदयात्रा दोन दिवसापूर्वीच सुरु झाली होती मी त्यात सहभागी होण्यासाठी

उतावळ झालो होतो मी त्याविषयी इशिबाशीजींकडे विचारणा केली असता त्यानी सागितले की, "आज तुम्हाला विश्राती घेण्यास सागितले आहे उद्यापासून तुम्हाला पदयात्रेबरोबर सहभागी व्हायचे आहे त्याच्या विषयी सूचना लॅव्हरेट येथील प्रमुख कार्यालयातून आज रात्री मिळणार आहेत." म्हणजे आजचा दिवस मला विश्राती अधिक न्यूयॉर्क शहरात भटकणे असा दुहेरी कार्यक्रम करता येणार होता

मुबईहून मोरीता भन्तेजीनी अमेरिकेतील जपानी भन्तेजीना पाठविलेली पत्रे व चदनाच्या पावडरचे पुडके मी इशिबाशीच्या स्वाधीन केले.

इशीबाशीजींचे आज दुपारचे कार्यक्रम आधीच ठरले होते अमेरिकन स्त्रीची डेन्टीस्टकडे अपॉईटमेंट होती व तिथून त्या त्याच्या मैत्रीणीकडे जाणार होत्या जपानी भावडे न्यूयॉर्कमधील त्याच्या कुठल्याशा नातेवाईकाकडे जाणार होती आणि ही सर्व मडळी दुपारपर्यंत परत येणार होती मला खूपशी पत्र लिहायची होती मी घरीच थाबण्याचे ठरविले व सायकाळी बाहेर फिरायला जायचे ठरविले आज सकाळपासून बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. तशा पावसात बाहेर जाण्याची इच्छाही होत नव्हती

तासाभरातच मुले शाळेला गेली व बाकीची सर्व मडळी आपापल्या ठरलेल्या कामाला गेली वरच्या सबध मजल्यावर मी एकटाच उरलो लॅडलेडी आजी खालच्या मजल्यावरच्या त्याच्या गुहेत कुठे लपून बसल्या होत्या कोणास ठाऊक. त्याची चाहूल देखिल लागत नव्हती

११ वाजेपर्यत माझी सर्व पत्रे लिहून झाली नतर मला एकाकी वाटू लागले बाहेर पाऊस धो धो पडतच होता. गारठा चागलाच जाणवत होता मी त्या दोन खोल्यात शतपावली सुरु केली अधूनमधून बुध्दमुर्तिपुढे माझे ध्यानस्थ बसण्याचे 'व्रत' ही चालले होते दुपारचा एक वाजला होता. चागलीच भूक लागली होती बर, घर माझ्या एकटयावर सोडून ते गेले असल्यामुळे कुठे बाहेर पडता येत नव्हते शेवटी कटाळून अगावर ब्लॅकेट गुरमटून कुणी येतय का याची चाहुल घेत पडून राहीलो

दुपारी दोन अडीजच्या सुमारास कुठून कुणास ठाऊक. भराभरा सर्व मडळी परत आली दुपारी जेवण उरकेपर्यत ४ वाजले तोपर्यत मुल शाळेतून परतली आता पाऊसही उघडला होता मी बाहेर जाण्यासाठी बेचैन झालो होतो पण बोलणार कसा ? इतक्यात त्या जपानी भावडानी बाहेर फिरायला जाण्याचा बेत काढला आणि मी लगेच त्याच्या ग्रुपमध्ये सामील झालो

अमेरिकन दुकानात खरेदीसाठी प्रथमच शिरायचा मला योग आला दुकान प्रशस्त चकचकीत., नानाविध रगीबेरगी वस्तूनी तुडुब भरलेली मग ती खेळण्याची असोत, ग्रोसरीची असोत, पुस्तकाची अथवा कुठलीही असोत जगातल्या सगळया देशाचा माल त्यात भरलेला प्रत्येक मालावर किमतीचे लेबल माल उचला. काऊटरवर पैसे द्या मामला खतम

मला १०० डॉलरची नोट सुटी करायची होती मी ३ डॉलरची एक छानपैकी छत्री घेतली व मुलासाठी एकदोन खेळणी व इतर वस्तु घेतल्या १५ डॉलर बिल झाले दुकाने इतकी छान आणि प्रशस्त की, आत गेलो की बाहेर येऊच नये असे वाटे माझी ही अवस्था पाहून माझा जपानी तरुण दोस्त म्हणाला की, 'उद्या तुला वेळ असेल तर तुला एम्पायर स्टेट बिल्डिग दाखवीन व तिथली सुपर मार्केटची भव्य दुकाने पाहिलीस तर तुझी तबियत खूष होईल' अशारितीने १-२ तास तिथल्या दुकानात फेरफटका मारुन आणि आईस्क्रिम खाऊन आम्ही परत घरी आलो

सायकालीन बुध्द प्रार्थना आटोपल्यावर इशीबाशी भन्तेजीही मला म्हणाले की, आज रात्री ८ वाजता न्यूयॉर्क शहरात राहणा-या जगातील सर्व देशातील प्रमुख बौध्द नागरिकाची एक बैठक आहे त्या बैठकीचे इशीबाशिना आमत्रण होते 'तुम्ही येणार का?' असे त्यानी मला विचारताच मी तात्काळ होकार दिला अशी सुवर्णसधी मी थोडीच दवडणार होतो

बैठक न्यूयार्क शहराच्या मॅनहॅटन या मध्यवर्ती भागात होती बैठकीच्या ठिकाणी जवळच एम्पायर स्टेट बिल्डिग, युनायटेड नेशन्सच्या इमारतीही होत्या. जाता जाता त्या देखील पहायला मिळणार होत्या. ठीक ७ ३० ला इशीबाशीजी, मी व अमेरिकन तरुणी आमच्या व्हॅनमधून निघालो. रात्री न्यूयॉर्कच्या रस्त्यावर मोटारीची रहदारी अगदीच तुरळक. फुटपाथवर चालणारा माणूस तर औषधाला सापडत नाही न्यूयॉर्क शहराच्या त्या नितळ रस्त्यावरुन आजूबाजूच्या दिव्याच्या झगमगाटातून मोटारींतून फिरण्यासारखी आनददायक दुसरी गोष्ट नाही मात्र त्यावेळी खरोखर वाटले की, इशीबाशी कालच्या सारखा आज पुन्हा रस्ता चुकावेत आणि आपण असच मनमुराद वेगात भटकत रहावे पण तसे काही घडले नाही ठीक ८ ला ५ मिनिटे कमी असताना आम्ही त्या इमारतीच्या लिफ्टसमोर उभे होतो,, सस्थेच्या बैठकीच्या भव्य हॉलमध्ये ३०-४० माणसे खुर्च्याचे गोल रिंगण लावून बसली होती त्यात चिनी, जपानी, सिलोनी, जर्मन, इग्रज, थायलड, मलेशिया वगैरे अनेक देशातील बौध्दधर्मीय प्रतिनिधी होते मी भारतातून आलो हे कळल्यावर त्याना

फार आनद झाला. प्रथम प्रत्येकाने आपली ओळख करुन दिली, मग तिथल्या अमेरिकन बौध्द धर्मीय व्यक्तिने ते त्या सस्थेचे सेक्रेटरी होते, त्यानी सस्थेच्या कामाचे स्वरुप सर्वाना समजावून सागितले भगवान बुध्दाच्या जन्मस्थानी लुम्बीनी येथे भव्य प्रमाणात बुध्दाचे स्मारक उभारण्याची त्याची "लुम्बीनी प्रोजेक्ट" नावाची भव्य योजना होती त्यावर चर्चा झाली व त्यानतरचा स्मरणीय कार्यक्रम म्हणजे तेथे हजर असलेल्या प्रत्येकाने आपापल्या भाषेत बुध्दवदना म्हटली मी ही ,खड्या सुरात पालीभाषेतील 'नत्थिमे सरण अय ......'' ही वदना म्हटली कार्यक्रम सपल्यावर श्रीलकेचे एक बुध्द भिक्षु मजजवळ आले व म्हणाले "खूप वर्षानतर आज मी पालीभाषेचे शुध्द उच्चार ऐकले खूप बर वाटल" त्याची प्रशसा ऐकून मला मात्र उगाच लाजल्यासारखे झाले

सर्व आटोपून रात्री घरी यायला खूप वेळ झाला माझ्यासाठी खास इशीबाशी भन्तेजीनी येण्याचा मार्ग बदलून मला युनायटेड नेशन्स व एम्पायर स्टेट इमारती जवळून दाखविल्या त्या भागातील बहुतेक इमारती इतक्या प्रचड उचीच्या आहेत की एम्पायर स्टेट बिल्डिगचा खास वेगळा असा ठसा मनावर उमटत नाही

रात्री झोपताना भन्तेजीनी मला सागितले की, पहाटे पावणे पाचला तुमच्या पुढील कार्यक्रमाच्या सूचना देणारा फोन लॅव्हरेत वरुन येणार आहे उद्या पासून तुम्ही "पीसमार्च" मध्ये सहभागी व्हायचे आहे तेव्हा उद्या लवकर तयारी करावी लागेल

मी गुडघे टेकून त्याना प्रणाम केला व समतीदर्शक सुरात म्हटले.

"नम्यो - हो - रेन्गे क्यो ।"

# ४ : सुहाना सफर . . .

पहाटे फोनच्या "टुर्रर टुर्रटुर " अशा बेलने मला जाग आली मी डोळे उघडून पाहिले, इशिबाशीजी फोनवर सभाषण करता करता कागदावर भरभर काहीतरी लिहून घेत होते. मी चटकन उठलो आघोळ दाढी वगैरे दहा मिनिटात आटोपून आलो प्रार्थना सपताच ताबडतोब आम्ही सर्वजण ब्रेकफास्टला बसलो त्यावेळी इशिबाशींनी मला माझ्या आजच्या नियोजित प्रवासाच्या सूचना दिल्या. सकाळी ७४५ च्या "ट्रेलवेज" बसने मी निघणार होतो तिथून मला बोस्टनला जायचे होते बोस्टनच्या ट्रेलवेज स्टँडवर मला न्यायला कोणीतरी येणार होते, ट्रेलवेज बस दुपारी १२० ला बोस्टनला पोहोचणार होती सर्वात महत्वाचे म्हणजे अनोळखी प्रदेशातील हा सहा तासाचा प्रवास मला एकटयानेच करायचा होता पुन्हा माझ्या समोर प्रश्नचिन्हे उभी होती पण आता मी त्याना सरावलो होतो आल्या प्रसगाला न डगमगता सामोरे जायची मी मनाची तयारी केलेली होती.

प्रवास लाबचा असल्यामुळे माझ्या अमेरिकन बहिणीने इतक्या पहाटे उठून ब्रेकफास्ट रुचकर बनवला होता अळिब - मटणाचे तुकडे - फलावर, टाकून केलेली भाजी, भाजलेल्या ब्रेड, हाफ फ्राय आमलेट, स्पॅगेटी, कॉफी, फ्रुट ज्यूस असा थाट होता. मला भरपूर खाण्याचा सर्वजण आग्रह करीत होते आणि माझा प्रवास सुखाचा व्हावा अशी सदिच्छा देत होते त्याच्या त्या माणुसकीच्या ओलाव्याने मला गहीवरुन आले परक्या भूमीवरची ही माणस त्याच्यात माझ्यात अस काय नात होत केवढया आपुलकीने मला ते वागवीत होते केवढया ममतेने खाऊ पिऊ घालीत होते केवढया जिव्हाळयाने मला धीर

देत होते त्या अकृत्रिम वात्सल्याने मला भडभडून आले निरोपाच्या क्षणी प्रयत्न करुनही मला अश्रू आवरता आले नाहीत

सकाळी ७ च्या सुमाराला न्यूयॉर्कच्या रस्त्यावर मोटारीची रहदारी जवळ जवळ नव्हतीच. आज पाऊस नव्हता. विरळ धुके वातावरणात दिसत होते त्यात सिग्नलच्या दिव्याची शोभा मनमोहक दिसत होती नागमोडी वळणे घेत आम्ही ट्रेलवेज बस स्टँडवर पोहोचलो त्यावेळी ७.३५ झाले होते बोस्टनची बस उभी होती तिकिट ऑफिस पहिल्या मजल्यावर होते सरकता जिना इथेही होताच न्यूयॉर्क ते बोस्टन तिकिट २२ डॉलर होते मी तिकीट काढून येईपर्यंत बसच्या तळाशी असलेल्या लगेज ठेवण्याच्या जागेत इशिबाशींनी माझे सामान ठेवलेही होते मी त्याच्या पायावर डोके ठेवून प्रणाम केला त्यानी माझ्या हातात १० डॉलरची नोट ठेवली मी ती घेईना. त्यावेळी ते इतक्या अजीजीने "प्लीज तेक" म्हटले की त्याचे मन मला मोडवेना. बस प्रशस्त आणि एअर कडीशण्ड होती पाचच मिनिटात बस निघाली इशीबाशी भन्तेजी तिथे उभे राहून ड्रम वाजवित "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" म्हणत होते माझ्या प्रवासाला शुभचिंतन करीत होते इतक्या दिवसानतर अजूनही तो प्रसग आठवला की, काषाय वस्त्रे परिधान करुन ड्रम वाजविणारे व चेह-यावर अतीव वात्सल्य घेऊन उभे असलेल्या इशीबाशी भन्तेजींची मूर्ति टळटळीतपणे माझ्या नजरेसमोर उभी राहते

न्यूयॉर्क शहरातून बाहेर पडताना रस्त्यावर वाहनाच्या प्रचड रांगा सरपटत होत्या. येणा-या व जाणा-या मार्गावर हजारो मोटारी चालल्या होत्या पण कुठेही गडबड गोधळ नव्हती अत्यत शिस्तीने वाहने चालली होती न्यूयॉर्क शहराची हद्द सपताना जकात नाका लागला पण तिथे क्षणाचाही खोळबा झाला नाही प्रत्येक वाहनाचा ड्रायव्हर जाता जाता तिथल्या मशिनमध्ये ठराविक नाणी टाकीत होता. पुढे जात होता. २०-२५ चेकपोस्ट होती जाणा-या गाडयाची वेगळी येणा-या गाड्याची वेगळी पोलीस ऑफिसर्स गटागटाने उभे राहून शातपणे वाहतुकीवर देखरेख करीत होते

अमेरिकेतील सर्वात प्रचड शहर मी पाहिले होते आता अमेरिकेतील खेडी पाहण्यास मी उत्सुक होतो तिथल्या घराची, माणसाची कल्पनाचित्रे रगविण्यात मी दग झालो होतो जसजशी आमची बस न्यूयॉर्क पासून दूर जाऊ लागली तसतशी वस्ती विरळ होऊ लागली मधूनच दोनचार लाकडी बगले दिसत त्याच्या सभोवती हिरवेगार टवटवीत लॉन असे टेकडयावरही सपूर्ण हिरवळ व मधून मधून दाट झाडाचे पुजके दिसत

रस्त्याच्या दूतर्फा हिरवीगार दाट झाडी होती. मधून मधून रस्त्याला ओलांडणारे पूल लागत त्याच्यावरुनही गाडया वेगात जात येत होत्याच जिथवर नजर टाकावी तिथवर एकतर हिरवळ नाहीतर दाट झाडी माझ्या ६ तासाच्या प्रवासात जमीनीचा एकही उघडा बोडका तुकडा मला दिसला नाही कुठेही घराची दाटी दिसली नाही, कच-याचे ढीग नाहीत. अस्वच्छता जराही नाही सगळीकडे हिरवळ, दाट झाडी, टूमदार घरे, मध्ये मध्ये जोपासलेले रंगीत फुलाचे ताटवे तुळतुळीत रस्ते, कलात्मक पुल, रंगीबेरंगी गाड्या सुबत्ता, समृध्दी, सुव्यवस्थितपणा. मध्येच हिरवळीवर आपली कार थाबवून फराळ करीत अथवा त्या प्रसन्न सकाळी कोवळया उन्हात गप्पा मारीत बसलेली गोरीपान अमेरिकन माणसे. न्यूयॉर्क शहर हे आता "हया" (ज्याला ते "कट्रीसाइड" ) म्हणतात त्या अमेरिकेच्या तुलनेने मला बकाल वाटू लागले खाली उतरावे व अनवानी पायानी त्या मऊ ओल्या हिरवळीवर धावत सुटावे टेकडीवरुन बागडत खाली येणा-या झ-याचे स्फटिकासारखे शुभ्र जल ओंजळीत घेऊन पोटभर प्यावे एखाद्या पुलाच्या कठडयावर पाय सोडून बसावे व मुक्त कठाने गाणे म्हणावे, "सुहाना सफर और यह मौसम हसीं .... हमे डर है हम खो न जाए कही !"

हया निसर्गरम्य प्रदेशातील प्रवास म्हणजे जणू एखाद्या स्वप्न नगरीतून केलेल्या अधातरी प्रवासासारखा अनिर्वचनीय आनद देणारा होता. ४-५ तास कसे अगदी पा-यासारखे भूर्रदिशी उडून गेले मन कस हलक फुलक झाल होत वेगात जाणारी आमची बस आणि तितक्याच वेगात डोळयापुढ उलगडत जाणारा नवनवीन लोभसवाण्या दृष्याचा स्वप्नील पट. मध्येच एखादा अप्रतिम लॅंडस्केप दिसायचा. तो पुर्ण पाहून होतो न होतो तोच बस पुढे गेलेली असायची ६०-७० प्रवाशानी भरलेली ती बस, पण कोणाचा जराही आवाज नव्हता. माणस कशी चित्रासारखी स्तब्ध बसलेली होती जणू काही त्यांच्यावर मोहिनी घातली होती.

मध्ये दोन तीन थाब्यावर बस थाबली काही प्रवासी उतरले. काही चढले बस पुढे निघाली सार कस अगदी निमूटपणे, शिस्तीने, लयबध्दपणे चालले होते

जसजस बोस्टन शहर जवळ येऊ लागल तसतसे अधिकाधिक बगले, इमारती, कारखाने दिसू लागले, तरीही कुठेही गिचडी नव्हती बकालपणा नव्हता, पर्यावरण दूषित झालेल नव्हत की, निसर्गाचा समतोल बिघडलेला नव्हता. तशीच दाट झाडी, हिरवेगार लॉन्स आणि रेखीव रस्ते जिर्ण झालेली,

टेकू लावलेली अथवा मोडकळीस आलेली एकही इमारत दिसत नव्हती खणखणीत देखण्या इमारती निरोगी शहर, निरोगी वातावरण , निरोगी टवटवीत माणस हसरी, उत्साही, उल्हसित अशा वातावरणात माणसाची मनदेखील निकोप आणि निरोगीच न राहीली तरच नवल।

ठीक ११५ ला आमची बस बोस्टनच्या ट्रेलवेज स्टँडवर थाबली तो शेवटचा स्टॉप होता सर्व प्रवासी तिथे उतरले मी ही उतरलो

तिथल्या पोर्टरने बसच्या तळाच्या लगेजच्या खणातून माझे सामान काढून दिले शेजारीच एक काचेचे घर होते ते तिकीट ऑफिस कम-वेटिंग रुम होते ३०-४० प्लॅस्टिकच्या खुर्च्या ओळीने माडलेल्या होत्या. समोर तिकिटाच्या खिडक्या. ४-५ टेलीफोन बुथ आणि त्याच्या समोरच्या भीतीशी ४-५ व्हिडीयोगेम मशीन्स एक ५-६ वर्षाचा मुलगा व त्याची आई एका मशीनवर काहीतरी गेम खेळत होती काही खूर्च्यावर अमेरिकन, जपानी, काळे प्रवासी शातपणे बसले होते

बसलेल्या सर्व माणसावर मी सावकाशपणे नजर फिरविली मला न्यायला यातल कोण आलेल आहे ते जाणण्याची मला उत्सुकता होती विमानतळाप्रमाणे हातात सस्थेच्या नावाचा फलक घेऊन बसलेला कोणी आलाय का तेही पाहिले तस कोणी दिसल नाही बसलेल्या माणसानी क्षणभर उत्सुकतेने माझ्याकडे पाहिले व पुन्हा आपल्या उद्योगात गर्क झाले मलाही तशीकाही घाई नव्हती नाही म्हणायला आता मी थोडासा निर्ढावलो होतो धीटही झालो होतो कोप-यातल्या एका खुर्चीजवळ मी माझे सामान ठेवले अल्पोपहाराच्या स्टॉलजवळ जाऊन काहीवेळ तिथल्या खाद्यपदार्थचे निरीक्षण केले एक अमेरिकन तरुणी तिथे विक्रेती म्हणून उभी होती. मी काचेच्या कपाटातील खाद्यपदार्थावर नजर फिरवली त्याचवेळी ती विक्रेती डोळ्याच्या कोप-यातून माझे निरीक्षण करीत होती मी दोन डोनट आणि कोल्ड मिल्क घेतले व खूर्चीवर बसून खाऊ लागलो डोनट तुपट, खुसखुशीत व ताजे होते दूध मलईदार गोड होते मला भूक कडकडून लागली होती पाच मिनिटातच मी खाद्यपदार्थ सपविले, पुन्हा कोल्ड मिल्क घेऊन प्यायलो पोट गच्च भरले चागलीच तरतरी आली मी गेले दोन तीन दिवस पहात होतो., इकडच्या बर्फाळ थड हवेत भूक वारवार आणि कडकडून लागत होती बर खाद्य पदार्थही सकस, ताजे, स्वादिष्ट त्यामुळे खाण्याची रगत वाढत असे

खाण सपवून मी सिगरेट पेटवली व तब्येतीत झूरके मारीत,

काचेच्या भींतीतून बाहेरील दृष्याच निरिक्षण करीत धुम्रपानाचा आनद घेत बसून राहिलो इतक्यात मला जाणवले की, चौकशी खिडकीजवळ उभी राहिलेली एक अमेरिकन तरुणी मला टक लावून निरखीत होती नकळत माझेही तिच्याकडे लक्ष गेले ५-५। फुटाची बेताची उंची, नाजुक बाधा, गौरवर्ण, जीन्स पॅन्ट व कॉटनचा गुलाबी टी शर्ट घातलेली तिशीच्या सुमाराची, बोलक्या डोळयाची ती तरुणी होती, क्षणभर काहीतरी मनाशी ठरवून ती मजजवळ आली मी बावळटाप्रमाणे तिच्याकडे पाहात राहिलो

माझ्याजवळ वाकून किंचित स्मित करून मृदु स्वरात ती म्हणाली

"आर यू फ्रॉम इडिया. पीस वॉकर, सर ?"

"येस येस, दॅटस् मी मिस्टर मॅनोहर रॅपीस" इशीबाशी भन्तेजींनी रुढ केलेले माझे नावच मी सागून टाकले" माय नेम इज मॉरेन..

"व्हेरी सॉरी सर. वुई रीचड् लेट. ती हात जोडीत म्हणाली"

"नेव्हर माईंड सिस्टर. आय वॉज जस्ट रिलॅक्सीग" मी ही खिलाडू वृत्ती दाखवीत म्हणालो

"वुई वील हॅव टू वॉक लिट्ल फर्दर. वई व्हॅव पार्कड् द कार आऊटसाइड. दे डीडट अलाऊ फॉर पार्कींग हिअर, यू नो" माझी सुटकेस उचलीत हसत हसत ती म्हणाली व चालू लागली

मी हॅंडबॅग व नवीन घेतलेली छत्री घेऊन तिच्याबरोबर गप्पा मारीत निघालो

गेल्या दोन तीन दिवसातील अनुभवाने माझ्या लक्षात आले होते की, अमेरिकन लोक विलक्षण लयबध्द व शब्दाना सुरेख हेलकावे देत इग्रजी बोलतात. कानाना ते खूप गोड लागत पहिल्या शब्दानतर गोंडस हेल देणारे आणि शेवटचा शब्द झटकन खेचणार किंचित अनुनासिक परतु फारच जलद जस बोलण जलद तस चालणही जलद. या गुणामुळेच त्यानी आपली प्रगतीही जलद करुन घेतली असावी

पाचच मिनिटात आम्ही एका छोटया स्पोर्टस् कार जवळ पोहोचलो त्या गाडीला टेकून दुसरी एक मोरेनच्याच वयाची अमेरिकन तरुणी उभी होती उंचीलाही जवळजवळ मोरेन इतकीच पण बाधा फार दणकट. स्पोर्टसमन (अॅथलेट) प्रमाणे लालबुद चेहरा पण गालावर अधूनमधून तपकिरी वाग. तीनेही जिन्स पॅंट व फुलाफुलाचा टी शर्ट घातला होता.

"मीट माय फ्रेंड मिस टेऽरी" मोरेनने तिच्याशी माझा परिचय करुन

दिला." माय नेम इज मिस्टर रॉपीस" मी म्हणालो

"हैय" नाईस टू मीट यू" हस्तादोलन करीत टेरी म्हणाली

"कम ऑन लेटस् गो" मला फ्रटसीटला बसण्याची खूण करीत टेरी म्हणाली मोरेन मागच्या बाजूला बसली मी मागे पाहिले ती छोटीशी कार विविध प्रकारच्या सामानाने तुडुब भरली होती

भुर्रकन तिने गाडी स्टार्ट केली पाहता पाहता गाडीने वेग घेतला. मला अजूनही स्वप्नात असल्याप्रमाणेच वाटत होते

"हैय, मिस्टर रॉपीस. लुक अॅट दॅट. बोस्टन टी पार्टी" एका फलकाकडे बोट दाखवीत टेरी मला म्हणाली

एका काळ्या रंगाच्या फलकावर सोनेरी अक्षरात "बोस्टन टी पार्टी" असे लिहिले होते ऐतिहासिक चहाचे आदोलन झाले ती ही जागा. मी ती जागा डोळे भरुन पाहून घेतली

इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत असता आमचा प्रवास सुरु झाला मधून मधून छोटी गावे लागत होती रगीत घर, दुकाने, बागा, माणस दिसत होती सगळीकडे हिरवळ, झाडी, रगीत घरे आणि उत्साह भरलेला. या अमेरिकन लोकानी आपला सबध देशच जणू देखणा ठेवलेला. पाहणा-याची दृष्ट लागावी असा

आज वातावरण देखील फारच प्रसन्न होते गार, झोबणारा वारा वाहत होता. वातावरण स्वच्छ आणि कुरकुरीत होते सूर्य जणू मुक्तहस्ताने या पाचूच्या धरणीवर प्रकाशाची उधळण करीत होता त्या प्रकाशाने उब मिळत नव्हती पण तरतरीत वाटत होते ओल्या गवताचा आणि झाडा फुलाचा उन्मादक गध वातावरणात भरुन राहिला होता सगळ कस ताज आणि जिवत वाटत होत मला स्वत लाही इतक उल्हासित आणि हलक फुलक वाटत होत की, अस वाटायच मध्येच थाबाव आणि रस्त्यावरुन जाणा-या येणा-याशी हस्तादोलन करीत सुटावे..

तासभर ड्रायव्हिग केल्यावर रस्त्याच्या बाजूला हिरवळीवर टेरीने कार थाबवली व मागे बसलेल्या मॉरेनला उध्देशून म्हणाली

"मॉऽरेन आय अॅम टायर्ड यू प्लीज टेक द व्हील"

लगेच मॉरेन ड्रायव्हिंग करायला आली आणि टेरी मागील सामानाच्या ढिगावर सरळ अंग टाकून झोपली पुन्हा आमचा प्रवास सुरु झाला.

मला खरं म्हणजे जोरात गाणं म्हणावं अशी इच्छा होत होती पण ती मी आवरली व खिशातला बाजा काढून मॉरेनला विचारले "कॅन आय प्ले द म्यूझिक सिस्टर्स"

"ओह शुअर" ती हसत म्हणाली

निसर्गरम्य प्रदेशातून आणि रमणीय वातावरणातून प्रवास करीत दुपारी ३ च्या सुमारास आम्ही लिंकन शहराजवळच्या एका पेट्रोल पंपाजवळ पोहोचलो

"धीस इज अवर डेस्टिनेशन. मीट द पीस पिल्ग्रीम्स, मिस्टर रॅपोस" कार थांबवित मोरेन म्हणाली

मी पाहिले, बाजूच्या हिरवळीवर ३०-४० माणसे विश्रांती घेत होती जपानी अक्षरातील उभट लांबलचक निळा कापडी ध्वज जवळच उभा करुन ठेवला होता. त्या पदयात्रीत १० -१२ बौध्द भिक्खू होते, आणि बाकीची युरोपियन आणि अमेरिकन स्त्रीपुरुष दिसत होते पुढची १०-१२ दिवसाची शांती पदयात्रा आता मला ह्याच मंडळीच्या सोबत करायची होती

"थॅंक यू मोरेन, थॅंक यू टेरी थॅंक यू फॉर युवर गुडनेस व्हेरी काईंड ऑफ यू !" मी त्यांचे विनम्रपणे आभार मानून खाली उतरलो तोच माझ्या दिशेने लगबगीने एक तरुण बौध्द भिक्षूनी आली वय असेल साधारण २०-२२ वर्षे सुदृढ बांधा जवळजवळ ६ फूटाची उंची, अंगावर भिक्खूणीची काषाय वस्त्रे व अत्यंत तेजःपुंज चेहरा चेह-यावर प्रसन्न हास्य आणि ओसंडून वाहणार वात्सल्य तिच्या पहिल्या दर्शनानेच मी मंत्रमुग्ध झालो.

"नम्यो - हो - रेंगे - क्यों" दोन्ही हात जोडून प्रणाम करीत अत्यंत मधूर स्वरात ती भिक्खूनी म्हणाली "आय ॲम सिस्टर बेथ. वेलकम टू पीस वॉक."

मी तिथल्या तिथे त्यांच्या पायावर डोके टेकून प्रणाम केला "ओह नो, प्लीज डोन्ट" असं म्हणून प्रणाम करायची आवश्यकता नाही असं त्या मला सुचवत होत्या पण मी तिकडे लक्ष दिले नाही. का कुणास ठाऊक त्या

तेजपुज अमेरिकन भिक्खूणीच्या दर्शनराने मला फार पवित्र वाटले इतक्या लहान वयात सर्व सुखाचा त्याग करुन भिक्खुणीच कठोर व्रत स्वीकारायचे म्हणजे केवढा त्याग, केवढा मनाचा मोठेपणा. दिव्यत्वाच्या त्या दर्शनाने कर आपोआप जुळले नसते तरच नवल.

सिस्टर बेथ हया आमच्या अमेरिकेतील शाती पदयात्रीच्या प्रमुख सयोजक मार्गदर्शक व्यवस्थापक, नर्स, सर्वकाही होत्या आमची निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, सामानाची ने आण, जनता सपर्क तिथल्या पोलीस यत्रणेबरोबर चर्चा वगैरे जवळ जवळ सर्व कामे त्याच्या अखत्यारीत होती शिवाय त्या आमच्या बरोबर रोज २५-३० मैल चालत असतच. मुक्कामावर पोहोचल्यावर प्रमुख कार्यालयाशी सपर्क साधणे, कोणाला काय हव नको ते विचारणे, सर्वांच्या प्रकृतीची विचारपूस करणे, आजारी असेल त्याला औषधपाणी करणे अशी नाना त-हेची कामे ही तरुण भिक्खूणी चपळाईने, अगत्यपूर्वक व हसतमुखाने करीत असे ते पाहून मला फार आश्चर्य होई ही मुलगी कधी दमत कशी नाही हिच्या चेह-यावरच हास्य कधी मावळत कस नाही एवढया लहान वयात वागण्याची आणि विचाराची एवढी परिपक्वता हिच्यात कुठून आली याचे राहून राहून मला नवल वाटे. पुढच्या १५-२० दिवसात तिच्या अगच्या गुणाचे अनेक पैलू दृष्टोत्पत्तीस आले आणि तिच्या विषयीचा माझा आदर द्विगुणित होत गेला

बेथने शाती पदयात्री जिथे विश्राती घेत होते तिथे मला नेल व सर्वाशी माझा परिचय करुन दिला जगातल्या कुठल्या कुठल्या दूरच्या प्रदेशातून अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी आणि जगात शातता प्रस्थापित व्हावी या उदात्त हेतूने प्रेरित होऊन शाती पदयात्रेसाठी ही माणस इथ जमली होती त्यात इटालियन भिक्खूणी नारा होती सेवाभावी वृत्तिने अविवाहित राहिलेला फिल एडमड होता केन फलेमिग नावाचा तरुण स्कॉटीश भिक्खू होता. स्वीडनहून आलेली ॲनामारिया होती थॉमस मॅचेस, कुठ जॉकोब हे दोघे वेस्ट जर्मन तरुण होते सेवाभावी अमेरिकन मुलगा ॲरिक नॅश होता आपण होऊन सर्वाचे पाय चेपणारा, मसाज करणारा अमेरिकन कवी रिचर्ड डेयो होता जपानी भिक्खू शिरो नागासे, जुन्जी अशी अनेक मडळी होती आणि त्यातच होते आपले अहमदाबादचे, एकटे जगप्रवासाला निघालेले श्री प्रेमकुमार.

त्या सर्वानी माझी आस्थेवाईकपणे विचारपूस केली. आम्ही सर्वजण हिरवळीवर रिंगण धरुन गप्पा मारु लागलो १०-१५ मिनिटातच त्यानी मला

आपल्यात सामावून घेतले इतक्यात सिस्टर बेथने मला खुणावून बाजूला बोलावले व मला लच घेण्यास सागितले तिथेच स्कूलबस सारखी भली मोठी बस होती त्यातच सर्वांचे बॅगेज व जेवणाचे साहित्यही होते ते सर्व मला दाखवून बेथ लागलीच ड्राइव्हर जो सह पुढील कार्यक्रमाच्या आखणीची चर्चा करु लागली

तिथल्या भाड्यातून मी प्लॅस्टीकच्या प्लेट मध्ये बटाटा टॅमेटोची फिकी भाजी, पाव घेतला व खाऊ लागलो. तिथे पोहोचल्याच्या आनदात माझी भूक पळून गेली होती पट्कन खाणे सपवून मी सफरचदाच्या करडीमधून एक सफरचद घेतले सरफरचदाच्या पहिल्या घासातच मला अमेरिकन सफरचद म्हणजे काय चीज आहे ते कळले अत्यत गोड गर आणि रसाळ फळ. एक सफरचद खाऊन दुसरे मी जाकीटाच्या खिशात कोबले व धावतच येऊन पदयात्रींच्या जथ्यात मिसळलो.

आता पदयात्रा पुन्हा सुरु होत होती. सर्वजण दोन दोनच्या ओळीत उभे राहिले सर्वात पुढे दोन पदयात्रींनी वर्ल्ड पीस मार्च १९८५ चा कापडी फलक धरला होता त्यामागे स्कॅाटिश बुध्द भिक्षू गडद जाभळया रगाचा जपानी ध्वज धरुन उभे होते त्याच्या पाठी सर्व भिक्षू आणि त्यानतर आम्ही सर्व पदयात्री "नम्यो - हो- रेन्गे - क्यो" मत्र तीन वेळा सर्वांनी उच्चरवाने म्हटला व मग बुध्द भिक्षूच्या तालावर रस्त्याच्या डाव्या बाजूने शिस्तीत पदयात्रींची राग पुढे सरकू लागली अमेरिकन भूमीवर जागतिक शातता व मानवकल्याण भावनेने पदयात्रेच पहिल पाऊल मी तिथे टाकल. आणि पुढचे १०-१५ दिवस ३०० - ४०० मैल चालतच राहिलो

अमेरिकन नागरिकाच्या दृष्टीने आमची ही "मिरवणूक" विलक्षण कुतुहलाचा विषय झालेली होती आधी अमेरिकेच्या महामार्गावरुन पायी चालणारी माणसे जवळजवळ नाहीच. त्यात आमची बुध्द भिक्षूसह ड्रम वाजवित, 'नम्यो हो रेन्गे क्यो' म्हणत चाललेली राग पाहिली की जाणारे येणारे अमेरिकन आपल्या गाड्या थाबवित. कुतुहलाने चौकशी करीत. आमच्या पदयात्रेचा उध्देश कळल्यावर मनापासून समाधान व्यक्त करीत.

आज सकाळपासून अमेरिकन "कट्री साईड" चे निसर्ग सौंदर्य मी बसमधून, कारमधून प्रवास करताना पाहिले आता पायी चालत मी ते पहात होतो अनुभवित होतो ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत ऋतु बदलामुळे झाडाची पाने रग बदलतात. आता नुकतीच त्या बदलाला सुरुवात झाली होती.

एकाच झाडावर थोडी हिरवी, ताबुस, पिवळी, फिक्कट, जाभळी अशी विविध रगी पालवी दिसे जिकडे तिकडे नजर टाकावी तिकडे ही अशी विविध रगी पालवी अगावर खेळवणारी दाट झाडी मोकळया जागेत हिरवेगार गवत. पदयात्रा सुरु झाल्यावर १-१ ॥ तासानी रस्त्याच्या बाजूला आम्ही सर्व मडळी पाणी पिण्यासाठी थाबलो आमच्या ग्रुपची पुढे जाणारी एक पायलट कार असे ते आम्हाला ठराविक वेळाने पाणी पुरवित. त्यावेळी मी प्रेमकुमार याच्या शेजारी बोलत बसलो होतो सहज चाळा म्हणून बाजूच्या गवताची एक काडी उपटून घेण्यासाठी मी हात पुढे केला सिस्टर बेथ माझ्याजवळ बसली होती ती चटकन माझा हात अडवीत म्हणाली

"डोन्ट टच इट" मिस्टर रॉफिस, इटस् पॉईझनस. "अमेरिकेत एक गवताची जात फार विषारी असते ते ऐकून मी त्या गवताचा इतका धसका घेतला की, जगली गवतात मी पुढे चुकून हात सोडा पाय देखील टाकला नाही

त्या दिवसाची पदयात्रा सपवून सायकाळी ६ वाजता आम्ही लिकन शहरातील "फर्स्ट पॅरिश ऑफ लिकन" या चर्चमध्ये पोहोचलो चर्चच्या मुख्य प्रिस्टने आमचे जातीने स्वागत केले आम्ही सर्व जण आत हॉलमध्ये आल्यावर मी पाहिले की, एक १५-१६ वर्षाचा साडे चार - पावणे पाच फुट उचीचा लहानसा नाजुक मुलगा सर्वांशी हस्तांदोलन करुन ओळख करुन घेत होता. माझ्याजवळ येऊन हस्तादोलन करीत तो म्हणाला. "हैय ! आय ॲम ब्रायन. नाईश टू मीट यू." मी ही माझा परिचय करुन दिला हया मुलाचा स्वभाव अत्यत निष्पाप आणि लाघवी होता. माझ्या पुढच्या मुक्कामात त्याची माझ्याशी विलक्षण गट्टी जमली त्याची कहाणी पुढे ओघाओघानेच येईल. आमचा रात्रीचा मुक्काम तिथे होता व चर्चतर्फेच आम्हाला रात्रीचे जेवण देखील होते ती जर्मन चर्च होती व अत्यत भव्य व आधुनिक सुख सोयीनी युक्त होती तळमजल्यावर अत्यत स्वच्छ व उत्तम त-हेने ठेवलेली डझनभर बाथरुम्स. पहिल्या मजल्यावर मायक्रोवेव्ह शेगडया, फ्रीज वगैरे अत्याधुनिक साधनानी युक्त असा भव्य किचन. त्याला जोडून एका वेळी २०० व्यक्ती जेवू शकतील एवढा भव्य डायनिग हॉल व त्याच्या शेजारी विशाल प्रार्थनागृह सर्व कस अगदी स्वच्छ निटनेटक. देखण, अद्यावत, प्रसन्न. मनाला शाती देणार !

नाही तर आपल्या कडची देवळ ! बाहेर ५-१० भिकारी, महारोगी बसलेले दिसले की, समजाव तिथ देऊळ आहे. मग ते हारवाले,

अबीरबुक्कावाले, प्रसाद वाले  त्यानी देवळाभोवती करुन ठेवलेले घाणीचे ढीग, मदिरात आतमध्येही अस्वच्छता आणि हेळसाड आणि मग ते देवाच्या नावावर 'दक्षिणा" नामक जिझीया कर वसुल करणारे पुजारी. त्याच ते आस्तिकाला नास्तिक बनवील अस उध्दट वागण शिव । शिव !

इथल्या प्रिस्टला चर्चच्या शेजारी भव्य बगला दिलेला दारात दोन गाड्या आणि सुटाबुटातला तो देखणा जर्मन प्रिस्ट या जमलेल्या आतरराष्ट्रीय पाहुणे मडळीना काय हव काय नको ते पाहण्यासाठी आपल्या कुटुबासह धावपळ करीत होता प्रत्येकाची वैयक्तिक विचारपूस करीत होता आमच्याकडे भलत्यावेळी कुणी देवळात आले तर पुजारी दरवाजा उघडीत नाही "देव झोपलेत" म्हणतो. आम्हाला हव तेव्हा देवाला "झोपविणारे" आम्ही भारतीय खरोखरच ग्रेट !

मुक्कामाला पोहोचल्यावर थोडया वेळाने सामूदायिक बुध्दप्रार्थना झाली मग ख्रिचन, ज्यू, रेड इडियन वगैरे धर्मातील प्रार्थना झाल्या दररोज सकाळी व सायकाळी हा सर्व धर्मीय प्रार्थनाचा कार्यक्रम होई. त्यावेळी तिथल वातावरण अक्षरश भारल जाई. आमच्या पदयात्रींमध्ये जगातील बहुतेक सर्व प्रमुख धर्माचे लोक होते. जरी बौध्द धर्मियाकडे त्या शाती पदयात्रेच नेतृत्व होत तरी त्यात सामिल झालेल्यात बहुसख्येने ख्रिश्चन, ज्यू, हिदू, रेड इडियन वगैरे म्हणजे इतर धर्माचेच अधिक होते

रात्रीचा जेवणाचा बेत फक्कड होता चिकन, टूना फिश, राईस, ब्रेड, बीन्सची भाजी, सॅलड आणि ताजी सफरचद आम्ही गेलो तो सफरचदाचा सीझन होता व आमच्या पदयात्रेच्या मार्गात सफरचदाच्या खूप बागा असायच्या त्यामुळे सकाळपासून रात्रीपर्यंत जाता येता आम्ही सफरचदाचा फडशा पाडीत असू. तर आमचे जेवण सुरु झाले प्रत्येक जेवण आपल्याला हव तेवढ घेऊन हव त्याच्या शेजारी बसून गप्पा मारीत जेवत होतो जेवल्या नतर, मी पाहिले आमचे सर्व पदयात्री बशा धुण्याच्या, झाडू मारण्याच्या, कार्पेट पुसण्याच्या कामावर तुटून पडले. त्यात तरुण, म्हातारे, बुध्द भिक्षू आणि आमचे यजमान प्रिस्ट सुध्दा होते, पधरा वीस मिनिटातच डिश, काटे, चमचे, लखख् होऊन कपाटात बसले उरलेले खाद्य पदार्थ फ्रीजमध्ये गेले. उष्टी, खरकटी कच-याच्या मोठया प्लॅस्टिकची गोणी ठेवलेल्या डब्यात बद झाली. कार्पेट चमकू लागले खूर्च्या टेबल तिथल्या तिथ लागली.

मी इतका वेळ अवाक् होऊन पाहतच राहिलो होतो। मी प्रेमकुमाराला विचारले "असं का? आपणच साफसफाई का करतोय? चर्चचे नोकर नाहीत का? त्यावर प्रेमकुमार हसून म्हणाले "मनोहरजी, यहाँ अमरिकामे ऐसे काम करने के लिए कोई नौकर नहीं होता है। हरेक को ऐसे काम खुद ही करने पडते है। काम करने मे यहाँ कोई शर्म महसूस नहीं करते, हाँ काम न करना बॅड मॅनर्स समझा जाता है।" समझनेवालोंको इशारा काफी होता है" मी प्रेमकुमाराच्या बोलण्यातून काय ते समजलो आणि त्यानतर प्रत्येक लहानमोठया कामास हातभार लावण्यासाठी आपणहून पुढे धावू लागलो अर्थात माझ्या त्या "शहाण्यासारख्या" वागण्यामुळे मी सर्वांचा आवडता झालो. हा माझा फार मोठा फायदा झाला

# ५ : निसर्ग माझा सखा

अमेरिकन कंट्रीसाईडचा थडीचा खरा दणका मला त्या रात्री जाणवला. अगावरील नेहरु सदरा पायजमा सहीत मी मोरीता भन्तेजींनी दिलेल्या माझ्या स्लिपिग बॅगमध्ये घुसलो होतो आणि तरीही थडीने कुडकुडत होतो उद्या पासून अगात स्वेटर घालून झोपायचे ठरविले पहाटे ५ लाच सर्वजण उठले, साडेसहापर्यंत प्रार्थना सपली ७ वाजेपर्यत ब्रेकफास्ट आटोपला. मी आणि फिल एडमडसने इतराबरोबर प्लेट स्वच्छ केल्या. बरोबर ७ । वाजता ड्रायव्हर जो ने सामान नेण्याच्या त्याच्या बसचा हॉर्न वाजविला मी, ऐरिक ब्रायन आणि दोघे जर्मन तरुण मिळून पटपट आम्ही सर्व ब्यागा बसमध्ये रचून ठेवल्या बाहेर दाट धुके आणि कडाक्याची थडी होती बोलताना तोडातुन वाफेचे फवारे निघत होते ठीक ७ ३० वाजता आमची पदयात्रा सुरु होणार होती मी गुपचुप चर्चच्या मागच्या बाजूला जाऊन सिगरेट पिऊन घेतली. पदयात्रेमध्ये धुम्रपानाला बदी होती आम्ही दोघे-तिघेजणच धुम्रपान करणारे होतो चोरुन लपून आम्हाला ते उरकाव लागे

ठीक ७.३० वाजता सकाळी सर्व पदयात्री चर्चच्या बाहेर जमा झालो आमचे यजमान जर्मन प्रिस्ट समोर निरोपासाठी उभे राहिले. आम्ही सर्वांनी "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्र त्रिवार म्हणून त्याना प्रणाम केला पुन्हा कालच्याप्रमाणेच दोन - दोन जणाची ओळ करुन आमची पदयात्रा सुरु झाली धुके अजून खूप दाट होते ४-६ फुटाच्या पुढचे काही दिसत नव्हते थडीने दातावर दात आपटत होते "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" म्हणताना तोडातून वाफेचे ढग निघत होते

मी आज चुडीदार, कुर्ता, जॅकेट असा पूर्णपणे भारतीय पध्दतीचा वेष परिधान केला होता हवामान प्रतिकूल असल तरी उत्साह दुर्दम्य होता. लिकन शहराच्या घराघरातून काचेच्या दरवाज्या, खिडक्या मागून तेथील माणसे मोठ्या आश्चर्याने आमच्याकडे पाहत होती व हात हलवून प्रेमाने निरोप देत होती

अर्ध्या पाऊण तासाने धुके बरेच निवळले आम्ही लिकन शहराच्या मध्यवस्तीतून चाललो होतो तोच पाठीमागून दोन पोलीसाच्या कार 'व्हीऽव्हॉऽ" असा त्याचा ठराविक ध्वनी पसरवीत आल्या. त्यातील एक कार आमच्या मिरवणुकीच्या पुढच्या टोकापुढे आडवी आली व दुसरी शेवटच्या टोकाजवळ थाबली पहिल्या गाडीतून दोन तगडे ऑफिसर फिक्कट निळा शर्ट करडी वुलनची पॅट, कमरेला दोन दोन रिव्हॉल्व्हर, डोळ्याना गॉगल, अशा थाटात बाहेर पडले मागच्या गाडीतील दोन ऑफिसर उतरुन तेही पुढे आले आम्ही सर्वजण आपापल्या जागी जसेच्या तसे शातपणे उभे राहिलो आमच्यामधून केवळ सिस्टर बेथ पुढे आल्या अत्यत नम्रपणे त्यानी त्या अधिका-याना प्रणाम करुन त्याच्या हातात आमच्या सस्थेची काही छापील माहितीपत्रके दिलेली आम्ही पाहिली त्यानतर निमिषार्धात त्याच्या गाड्या वेगाने पुढे निघून गेल्या बेथ धावत धावत आमच्या ओळीच्या पहिल्या टोकापर्यंत गेली व काहीतरी सूचना देत मागे मागे आली मी आणि ब्रायन शेवटी होतो बेथने सागितले "कृपया एकेकाची ओळ करुन चाला आणि "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" जरा हळू आवाजात म्हणा तिच्या सूचनाचे ततोतत सर्वानी पालन केले. राग पुढे निघाली.

पाच दहा मिनिटे चालून एका नाक्यावर जातो तो काय पाहिले। मघाच्या पोलीसाच्या दोन्ही गाड्यानी वाहतुक अडविली होती आम्ही रस्ता ओलाडीपर्यत पुढच्या दोन सिग्नलवर त्यानी आम्हाला अशीच व्हीआयपी ट्रीटमेट दिली त्याच्या सौजन्याची दाद म्हणून आम्हीही प्रत्येकाने जाताजाता त्याना लवून प्रणाम केला.

त्यानतर प्रत्येक दिवशी आमच्याबरोबर जणू पोलीस खात्याची एस्कॉर्टची गाडी कायम तैनात असायची एका शहराची हद्द सपली की पुढच्या पोलीस ऑफिसर्सना आमच्याविषयी कल्पना देऊन आधीचे ऑफिसर्स निघून जायचे त्यानतर आमच्या पदयात्रेच्या काळात आणि शेवटी आठवडाभर माझा न्यूयार्क शहरात मुक्काम असताना देखिल अमेरिकन पोलीस ऑफिसर्सच्या अगदा सभ्यपणा व सुसस्कृतपणा प्रकर्षाने जाणवला त्याची बोलण्यातील नम्रता आणि मदत करण्याची वृत्ती तर खरोखर वाखाणण्याजोगी।

न्आपल्याकडील पोलीस ऑफिसर्सची वर्तणूक ( !) पाहिल्यास त्याना अट्टल गुन्हेगाराकडून ट्रेनिंग मिळाले असावे अशीच रास्त शंका येते साधा हवालदार देखिल शिवीशिवाय त्याच्या वाक्याची सुरुवात करणार नाही आणि पोलीस स्टेशनमध्ये जर आपण त्याच्या तावडीत सापडलो तर पुढच्या सात जन्माची बेअब्रु झालीच म्हणून समजावी अमेरिकन पोलीस अगदीच "माणसा" सारखे वागतात आपल्याकडचा "पोलीसी - खाक्या" ची संस्कृती माहित नसलेले अमेरिकन पोलीस आपल्या "पोलीस - दादा"च्या मानाने खूपच मागासलेले वाटतात ' ।

लिंकन शहर सोडले पुन्हा कंट्रीसाईडच्या त्या निसर्गरम्य प्रदेशातून आमची मार्गक्रमणा सुरु झाली आजचा रात्रीचा मुक्काम बोल्टन शहरात होता. दुपारी ठीक २ ॥ वाजता तेथील " श्रीमती बेथ ड्रिस्कोल याच्या बंगल्यावर आम्हा सर्वाना जेवणाचे आमंत्रण होते सकाळी ७.३० ते दुपारी दोनपर्यंत आम्ही सतत चालतच होतो भोवतालचा लोभसवाणा निसर्ग, नितळ रस्ते, चुरचुरीत थंड हवा आणि मेघाच्छादित सतत सावली देणार आभाळ. त्यामुळे थकवा कसा तो अजिबात वाटत नव्हता मध्ये काय १० मिनिटे दोन वेळा पाणी प्यायला थांबलो तेवढेच बाकी चाललोयच । आमच्यात ६५-७० वर्षाची एक अमेरिकन म्हातारी होती वर्ण लालबुंद, केस पिकलेले, उंच व सडसडीत शरीरयष्टी दुपारी १ नंतर त्या थकल्या व खूप मागे पडल्या. सिस्टर बेथची परवानगी घेऊन मी आणि ब्रायन त्या अमेरिकन आजीला "कंपनी" देण्यासाठी मागे गेलो म्हातारी नेटाने हळू का होईना पण चालतच होती येणा-या काही कार तिला लिफ्ट द्यायला पाहत पण ती हसून त्याना नकार देई. मी आणि ब्रायन आजीच्या जवळ गेल्यावर आजी म्हणाल्या "कशाला तुम्ही परत आलात. मी येते हळू हळू तुम्ही चला ' पण आम्ही त्याना "कंपनी " द्यायचाच आग्रह धरल्यावर त्यानी हसून आमच्या दोघाच्या खांद्यावर हात ठेवून गप्पा मारीत चालू लागल्या मी चालता चालता त्याना दोन तीन हिंदी चित्रपटातील गाणी ऐकविली. म्हातारी खूष होऊन म्हणाली. "तरुण मुला, मला तुझ्या गाण्याची भाषा कळत नराही पण तुझी गाणी ऐकून मला खूप आनंद होतोय. चालण्याचा थकवा मला जाणवत नराही तू गात रहा.." मी ही मग त्या निर्मनुष्य रस्त्यावर निसर्गाच्या सान्निध्यात मुक्तकंठाने गाणे म्हणायची माझी हौस भागवून घेतली.

आम्ही तिघेजण बाकीच्या मंडळीमध्ये पोहोचलो त्यावेळी दुपारचे दोन वाजले होते रस्त्याच्या कडेच्या छोटया पुलाजवळ सर्वजण विश्राती घेत

बसले होते आमच्या यजमानीन बाईचा बगला इथून पाचच मिनिटाच्या अतरावर असल्याचे कळले पण त्यानी दिलेली वेळ २३० असल्यामुळे त्याआधी त्याच्या घरी आम्ही अमेरिकन रिवाजाप्रमाणे जाऊ शकत नव्हतो म्हणून तिथे बसून मडळी गप्पाछप्पा करीत "टाईमपास" करीत होती, काल लिंकन शहरातील आमच्या मुक्कामासबधात तिथल्या स्थानिक वर्तमानपत्रात मोठा वृत्तात व काही पदयात्रींचे फोटो छापून आले होते ड्रायव्हर जो ने कशा कुणास ठाऊक वर्तमानपत्राच्या प्रति मिळविल्या होत्या. आम्ही बसलो होतो त्याच्या जवळ एक पूल होता व त्या खालून स्फटिकासारख्या शुभ्र पाण्याचा ओढा खळाळत वाहत होता मी रस्त्याखाली उतरुन ओढ्या काठच्या दगडावर पाण्यात पाय सोडून बसलो पाणी बर्फासारखे थडगार होते उघड्या पायाला स्पर्श होताच झिणझिण्या मस्तकात गेल्या गेल्या ६-७ तासाचा चालण्याचाथकवा १० मिनिटात फुर्रदिशी उडून गेला. मी पोटभर पाणी प्यायलो पोटात बर्फाचा चुरा विरघळत असल्याप्रमाणे वाटले

श्रीमती ब्रेथ ड्रिस्कोल याचा बगलाही लाकडीच होता. टुमदार एकमजली बगल्याला लागूनच गॅरेज एका बाजूला कोबड्याच भल मोठ खुराड अमेरिकन कोबड्याही चागल्याच गबदूल असतात बगल्यासमोर आणि पाठीमागे ७-८ एकराचे भव्य मोकळे आवार होते त्यावर छान हिरवळ राखलेली होती त्यावर या टोकापासून त्या टोकापर्यंत गडगडत लोळत जावे असे मला वाटले

ड्रिस्कोल बाई चाळीशीच्या सुमाराच्या असाव्यात त्याना दोन मुली होत्या, साधारण ४ ते ६ वर्षाच्या असाव्यात. अत्यत देखण्या आणि बाळसेदार मुली इतके पाहुणे घरी आलेले पाहून आनदाने खिदळत आमच्या मधून हुदडत होत्या. स्वत ड्रिस्कोल बाई खूप देखण्या आणि आतिथ्यशील होत्या. आमच्या स्वागतासाठी छोट्या छोट्या लाकडी कमानीवर रगीत कागदाची फुल-पाखरे सर्व आवारात लावून परिसर सजवला होता आम्ही प्रथम बाहेर हिरवळीवर बसलो ड्रिस्कोल बाईनी स्वत सफरचदाचा ताजा ज्यूस दिला. मग लच झाला उकडलेल्या मटणाच्या चकत्या, ब्रेड, बटर उकडलेली अडी, मध आणि ताजी सफरचद व कॉफी

जेवल्यावर सर्वानी भरपूर विश्राती घेतली मी समोरच्या हिरवळीवर मस्तपैकी ताणून दिली रात्री आम्हाला तेथील चर्चतर्फे जेवण होते उरलेला वेळ आम्ही कॉफी पिण्यात आणि गप्पा मारण्यात घालवला.

रात्री चर्चवर शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिकांनी आमच्या सन्मानार्थ मोठी मेजवानी दिली नतर आमच्यापदयात्रेच्या उद्देशींवर ग्रुप डिस्कशन्स् झाली इथले चर्चदेखिल भव्य व प्रशस्त होते नतरच्या मुक्कामात अनेक चर्चेसना भेटी देण्याचा व तिथे मुक्काम करण्याचा प्रसग आला आणि त्या चर्चेसच्या भव्यपणाने आणि ऐश्वर्याने मनावर कायमचा ठसा उमटला गेला. ख्रिश्चन धर्मीय लोक चर्चेस अद्ययावत व सपन्न ठेवण्यासाठी किती सढळ हाताने योगदान करतात ते पाहण्यास मिळाले.

रात्रीच्या जेवणानतर चर्चच्या आवारात स्थानिक लोकाशी गप्पा मारताना एका वेगळयाच विषयावर सर्वजण मोठ्या उत्सुकतेने बोलत असताना आढळले. सर्वांच्या चेह-यावर काळजीच्या छटा स्पष्ट दिसत होत्या. मी सिस्टर बेथ जवळ जाऊन त्याविषयी चौकशी केली त्यावेळी बेथ म्हणाली की:- "नुकतीच रेडीयो, टी. व्ही.वर अशी न्यूज आलेली आहे की, उद्या प्रचड मोठ चक्रीवादळ येणार आहे. ते चक्रीवादळ फारच विध्वसक असण्याचा सभव आहे व आपला मुक्काम असलेला भाग आणि जवळपासचा काही मैलाचा परिसर त्या चक्रीवादळाचा केन्द्रबिदू आहे. पण तस काळजी करण्यासारख काही नाही वाईट एवढच वाटत की ठरल्याप्रमाणे उद्या पदयात्रा कदाचित होऊ शकणार नाही ।"

आपल्याकडच्या हवामान खात्याच्या अदाजाची मला सवय असल्यामुळे अमेरिकन हवामान खात्याची मला विशेष फिकीर वाटली नाही चक्रीवादळ म्हणजे असून असून काय असणार ? मोठ्या वावटळी येतील. जोरदार पाऊस पडेल. १०-२० झाड पडतील. ईकडची घर वगैरे मजबूत आहेत. पडझड होणार नाही. तासा-दोन-तासानी सार सुरळीत होईल. हा आपला मनाशी केलेला माझा होरा. त्यामुळे इतराची गभीरपणाने चाललेली चर्चा मी विशेष मनावर घेतली नाही

त्या रात्री आमची राहण्याची व्यवस्था तेथील नागरिकानी आपापल्या बगल्यावर केली होती ४-४ जणाचे ग्रुप १०-१२ अमेरिकन स्थानिक लोकाच्या घरी विभागून दिले होते आमच्या ग्रुपमध्ये मी, प्रेमकुमार, स्कॉटीश बुध्द भिक्षु केन फ्लेमिग व स्विडीश तरुणी ॲनामारीया असे चौघेजण होतो. हा बगला बेथ ड्रीस्कोल याच्या बगल्यापेक्षा भव्य होता. आमच्याबरोबर गप्पा मारण्यास शेजार-पाजारची आठ दहा स्त्री पुरुष जमा झाले त्यावेळी मला गप्पांमधून उमगले की, अमेरिकन सामान्य माणूस हा शाततेसाठी आसुसलेला आहे. युध्दाविषयी त्यांना अत्यत तिरस्कार आहे आणि अमेरिकन राज्यकर्त्यांवर व

त्याच्या धोरणावर ते सडकून टीका करतात राजकीय धोरणाची खिल्ली उडवण्यात ते आनद घेतात आशियायी धर्म, आशियाई तत्वज्ञान याविषयी त्याच्यात अतीव कुतुहल आढळल भारत, चीन, जपान सारख्या देशातील प्राचीन तत्वज्ञान जगात शातता प्रसारासाठी सहाय्यभूत ठरेल याविषयी ते आशावादी दिसले आमच्या युध्द विरोधी व मानव कल्याणाच्या कार्याची सर्वजण मनपूर्वक प्रशसा करताना आढळले अमेरिकन माणसात मला अनेक चागले गुण आढळले ते मनाने मोकळे आहेत. नवीन व चागले असेल ते शिकण्याची व समजून घेण्याची त्याची वृत्ती आहे ते दुराग्रही नाहीत पूर्वग्रह बाळगणारा अमेरिकन माणूस अभावनेच आढळला. आपला देश आणि सस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा आढ्यतापूर्ण उल्लेख चुकून देखील कुणाच्या बोलण्यात आढळत नाही त्याच्यातील ज्याउणीवा आहेत त्याच्याविषयी मात्र ते उघडपणे व मनमोकळेपणाने चर्चा करतात. उद्योगाची आवड. उत्साह दाडगा. चटकन दोस्ती करतात बोलण्यात नम्रता फार. एखाद्या देशातील सामान्य माणसे जी भाषा बोलतात, ज्या त-हेने बोलतात त्यावरुन तो देश किती सुसस्कृत किवा असस्कृत आहे ते कळते सर्वसामान्य अमेरिकन माणसाच्या भाषेत शिव्या अगर कठोर शब्दाचा वापर जवळजवळ नाहीच बाजारहाटात, रेल्वे स्टेशनवर, रस्त्यावर, जिथ जिथ त्याचे सभाषण ऐकायचा योग आला तिथ तिथ चागल्या शब्दाचा वापर आणि सौजन्यशील मृदु शब्दच कानावर आले याला अपवाद न्यूयॉर्क शहरातली काळी मडळी त्याच्या बोलण्यात भाषेतील शिवराळपणा अधिक जाणवतो गोरे अमेरिकन जी इग्रजी बोलतात तीच काळेही बोलतात पण निग्रोच्या तोडातून ती भाषा कर्णकटू हेल आणि कठोर शब्द प्रयोग घेऊन येते आपल्याकडच्या सर्वसामान्य माणसाच्या तोडची भाषा तर विचारुच नका. सार्वजनिक ठिकाणी आपली माणस इतकी असस्कृत आणि गलिच्छ भाषा वापरतात की, वाटाव सकाळी उठून गटारात तोड बुडवून आले असावेत.

झोपडपट्टीतील अथवा कामगार वस्तीतील लोकाच सोडा चागल्या शिवाजी शिवाजी पार्क, गिरगाव, मलबारहील, कुलाबा वगैरे सुशिक्षित व सुसस्कृत म्हणविणा-या वस्तीतील तरुण मुलाची सभाषणे ऐका. हिडीस हावभाव व गालीप्रदान करणा-या त्या पोराची मुक्ताफळे ऐकून कानात बोट घालविशी वाटतात असो कोळसा उगाळावा तितका काळाच. ।

तर त्या रात्रीच्या आमच्या गप्पा ११ च्या सुमारास सपल्या सर्व मडळी हस्तादोलन करुन आपापल्या गाड्यातून भूर्रकन निघून गेली. मी , वर मला दिलेल्या खोलीत आलो स्लिपीग बॅग काढली बाथरुमला गेलो तिथे

पाहतो तर हॉट वॉटर शॉवर वगैरे अद्यावत व्यवस्था होती मी मग मस्तपैकी हॉट वॉटर शॉवरखाली बसून अर्धा तास गरम पाण्याच्या वेगवान धारा उघड्या अंगावर झेलीत राहिलो आंघोळ संपवून बाहेर आलो त्यावेळी सर्वजण दिवे मालवून गप्पगार झोपी गेले होते मी ही माझ्या स्लीपींग बॅगमध्ये घुसलो बाहेर रातकिड्याची किर्र किर्र ऐकू येत होती मध्येच दूर कोठेतरी ढगाचा गडगडाट ऐकू आला मी झोपेतच दचकलो. "बापरे, म्हणजे खरोखरेच उद्या चक्रिवादळ येतय की काय ?" मी स्वतःशीच म्हणालो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास ७९४
क्र. २८०८५


# ६ : ग्लोरिया आणि मी

पहाटे ५-५॥ ला मला जाग आली बाहेर लाकडी तक्तपोशीवर माणसाचे पदरव ऐकू येत होते मी पटकन स्लिपींग बॅगची घडी घातली टूथपेस्ट, टॉवेल, दाढीचे सामान वगैरे 'आयुधे' घेऊन बाथरुमकडे निघालो दरवाजा उघडून पाहतो तो बाहेर स्कॉटीश बौध्दभिक्षू केन शतपावली करताहेत. मला पाहतांच किंचित थाबून ते म्हणाले,

"गुड मॉर्निग मिस्टर रॉपीस"

"गुड मॉर्निग सर" मी बाथरुमकडे पळता पळता खालच्या मानेने प्रतिनमस्कार केला

मी इथ आल्यापासून पहात होतो आमच्या बरोबरचे जपानी व इतर सर्वच बुध्द्भिक्षू रोज आमच्या बरोबरच झोपायचे, पण सकाळी ५ ला उठून पहावे तो आमच्या आधीच त्याची आघोळ-पाघोळ सर्व विधी आटोपून तयारी झालेली असायची. बर सर्व काम करायला पुढे. बशा विसळणे, झाडू मारणे, सामान उचलणे, सर्वात अग्रेसर. पदयात्रेला सुरुवात झाली की अफाट वेगाने चालणार. त्याच्या गतीशी जुळवून घेण्यास मला पहिले दोन दिवस अक्षरश धावावे लागले होते सेवाभावी वृत्ती तर किती? प्रत्येक पदयात्रीच्या तब्येतीची चौकशी करणार. दुखल खुपल पाहणार. सिस्टर बेथ म्हणजे तर आमची "मदर तेरेसा" होती प्रत्येकाची जातीने काळजी घ्यायची नेहमी प्रसन्न व हसतमुख शिवाय आमच्याबरोबर असलेले सर्व भिक्षू तरुण होते २० ते ३० च्या वयोगटातले. पण त्याची वागणूक अगदी पोक्त, सुसस्कृत माणसासारखी त्याना पाहिल की, आदराने नतमस्तक व्हावस वाटे. इतक्या लहान वयात बुध्द

तत्वज्ञानाच्या प्रभावाने त्याच्यामध्ये केवढा समजसपणा, केवढी त्यागी वृत्ती आलेली होती जणू समस्त मानवजाती विषयी बुध्दाने शिकविलेल्या "करुणेने" त्याची हृदयं ओतप्रोत भरलेली होती

त्याच्या सान्निध्यात राहून माझ्याही सवयीमध्ये खूप बदल झालेले माझे मलाच जाणवत होते आपण होऊन मी काम करीत होतो. दुसऱ्याची सेवा करण्यातील आनद अनुभवीत होतो. स्वावलबन, परिश्रम आणि त्याग यातून प्राप्त होणाऱ्या एका वेगळ्या सुखशातीचा आस्वाद घेत होतो.

घरी मी कधी आपण होऊन पहाटे ५ ला उठलोय असे मला आठवत नाही. लहानपणापासून मी "सूर्यवशी" मुबईला आमच्याकडे रोज सकाळी ५ ॥ ला दूधवाला येतो (म्हणतात !) तो कसा काळा की गोरा तो अजून मी पाहिला नाही. माझी बायको रोज सकाळी दूध घेते सकाळी ७ वाजता पेपरवाला बेल वाजवितो. ती कधीकधी मला ऐकू येते पण खरी जाग येते ती बायकोच्या आरोळ्यानी "अहो पेपर आला उठा" असा चार-सहा वेळा तिने गजर केला की मग मी ७ ॥ पर्यत उठतो. इथ मात्र पहाटे ५ चे ५ । झाले तरी खजील व्हायला व्हायच

तर प्रातर्विधी आटोपून, हॉट वॉटर शॉवर बाथ घेऊन मी खोलीत आलो काचेच्या खिडकीतून बाहेर पाहीले मुसळधार पाऊस पडत होता ढगाचा प्रचड गडगडाट चालला होता. बगल्यापाठची झाडे वाऱ्याने हिंदकळत होती मी शेजारच्या खोलीत गेलो तिथे केन, प्रेमकुमार रेडियोजवळ बसून काहीतरी ऐकत होते मी त्याच्याजवळ बसलो वादळाविषयी सूचना दिल्या जात होत्या.

इथल्या हवामान खात्याचा अदाज ततोतत खरा ठरत होता. अदाजाप्रमाणे शुक्रवार दि. २८ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजता ताशी १०० मैलाच्या प्रचड वेगाने आणि समुद्राच्या १२ फुटी लाटा घेऊन अमेरिकेच्या दक्षिणपर्व किनाऱ्यावर चक्रीवादळ धडकले होते [illegible]

आयलड, न्यूपार्ट, न्यूबडफाऊड या भागाला वादळाचा प्रचड तडाखा बसला होता. सखल भागात पाणी भरले गेले होते, घराची छप्पर उडून गेली होती. हजारो झाडे उन्मळून पडली होती विजेचे खाब जमीनदोस्त झाले होते अपरिमित नुकसान झाले होते सिव्हील डिफेसचे गव्हर्नर मायकेल डूकाकीस यानी आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली होती. गेल्या २५ वर्षात प्रथमच या भागात एवढ प्रचड सहारक चक्रीवादळ आल होत अमेरिकन लोकाच्या रसिक

खिलाडू वृत्तीनुसार त्यानी त्या चक्रीवादळाला "ग्लोरीया" अस लोभसवाण नावही दिल होत

रेडियोवरील निवेदक सागत होता, "ग्लोरीया सॉयक्लॉन" प्रचड वेगाने सहार करीत चालल आहे. लोकानी घराबाहेर पडू नये, मुलाना शाळेत पाठवू नये, आज सर्व शाळा, कॉलेज, दुकाने व्यापारी सस्था, कार्यालये बद राहतील, दुपारी १२ ते ३ दरम्यान वादळाचा जोर सर्वाधिक राहील, दुपारी ४ नतर वादळाचा जोर कमी होईल, सायकाळी ७ पर्यत वादळ ओसरेल, लोकानी आपल्या भितीच्या, खिडक्याच्या काचेच्या तावदानाना टेप लावावेत, वीज जाण्याचा सभव आहे, पर्यायी व्यवस्था तयार ठेवावी, लोकानी शातपणे घरात बसून रहावे, घाबरुन जाण्याचे काही कारण नाही, सिव्हील डिफेन्सचे अधिकारी सर्वत्र परिस्थितीवर नजर ठेऊन आहेत, मदत कार्ये चालू आहेत, वगैरे वगैरे वगैरे "

बातम्या ऐकल्यावर आता कुठे परिस्थितीचे गाभीर्य माझ्या लक्षात आले मी सुचकपणे प्रेमकुमारकडे पाहीले माझ्या खाद्यावर हात ठेवीत हसत ते म्हणाले, "मनोहरजी, लगता है, आज का दिन हमे यही रुकना पडेगा।"

आम्ही ब्रेकफास्टसाठी खाली हॉलमध्ये आलो पाहतो तर काय! आमची यजमानीन बाहेर पावसात रेनकोट घालून दिवाणखान्याच्या काचेच्या भितीना टेप लावित होती सबध भिंत आडव्या-तिडव्या टेप ने भरुन गेली होती घरातील पुरुष मडळी काही कामानिमित्त लवकर बाहेर गेली होती आमच्या यजमाननीचे नाव मिसेस 'टेडी' होते. वय ३०-३२ वर्षे असावे अमेरिकन बायका पण हिम्मतबाज घरात पुरुष नाही म्हणून ती अडून बसली नाही आणि पाहुण्यानाही तिने त्रास दिला नाही काचेपलिकडे हसत आमच्याकडे पाहून त्या हात हलवित "तुम्ही बसा मी आत्ता येते" अस खुणेने सागत होत्या

टेबलावर ब्रेकफास्टच सगळ साहित्य माडलेल होतच. आम्ही आमच्यासाठी डिश तयार करुन घेतल्या आणि मिसेस टेडीचीही डिश बनविली पाचच मिनिटात त्याही आल्या गप्पा मारीत आमचा ब्रेकफास्ट सुरु झाला गप्पा अर्थात "ग्लोरीया" विषयीच होत्या. एवढ प्रचड चक्रीवादळ पहिल्यादाच मी पाहतेय अस बाई सागत होत्या. सकाळपासून त्याच्या मैत्रिणीचे फोन येत होते व वादळाने त्या भागात केलेल्या नुकसानीच्या बातम्या मिळत होत्या. आमच्या बगल्याच्या आवारातही तीन झाडे उन्मळून पडली होती "बहुतेक

तुमचा मुक्काम आज सध्याकाळपर्यंत तरी इथच राहणार, अस मिसेस टेडी म्हणताहेत तोच फोनची घटा खणखणली मिसेस टेडीनी फोन घेतला" केन प्लेमिग सिस्टर बेथ ऑन द लाईन -------" फोनवर बोलून रिसीव्हर आमच्या दिशेने करीत त्या म्हणाल्या

ताबडतोब बुध्दभिक्षू केन प्लेमिंग फोनवर गेले. पलिकडून सिस्टर बेथ बोलत होत्या दोन मिनिटे फोनवर बोलून केन पुन्हा आमच्यामध्ये येऊन बसले. त्यानी सागितले की, "सिस्टर बेथ सागत होत्या की पदयात्रींना घेऊन कारने पुढील मुक्कामावर जाण्याचा निर्णय ठरला आहे. दुपारी वादळाचा जोर फार आहे त्या आधीच मुक्कामावर पोहोचायचे ठरले आहे. कारण आमच्या पुढच्या मुक्कामावरील यजमान मिस्टर जिम जय्यत तयारी करुन दुपारच्या जेवणासाठी आमची वाट पहात होते. श्री जिम हे ज्यू गृहस्थ होते विन्चेन्डन् शहरातील त्याच्या स्वत· च्या "जून हे फार्म" या बगल्यात त्याचे कुटुबीय मोठ्या आतुरतेने आमची प्रतिक्षा करीत होते.

ब्रेकफास्ट सपताच आम्ही सामानाची बाधाबाध करुन तयारीत बसलो. बाहेर क्षणाक्षणाला वादळाचा जोर वाढत होता. काही वेळापूर्वी नुसते वेगात वाहणारे वारे आता घोगावत होते झाडाच्या फाद्या एकावर एक आपटत होत्या. पावसाचे जोरदार सपकारे काचेच्या भितीवर सपासप आपटत होते कुठल्याही क्षणी ती काचेची भित खळ्ळकन खाली येईल अशी भिती वाटत होती पण घरधननीला त्याचे काही वाटत नव्हते शातपणे ती आपले काम उरकीत होती अधूनमधून आमच्यात येऊन गप्पा मारात होती

सकाळी १० च्या सुमारास पुन्हा सिस्टर बेथचा फोन आला बाकीचे पदयात्री ग्रुप ग्रुपने कारमधून निघाले होते आम्हाला पुढील मुक्कामावर पोहोचविण्यासाठी आमच्या कालच्या यजमानीन बाई "बेथ ड्रिस्कोल" आपली व्हॅन घेऊन निघाल्या होत्या.

पुढील २-३ मिनिटातच आम्ही आमच्या चौघाचे सामान आणून दरवाज्याजवळ रचून ठेवले. रात्रीपासून आमच्यासाठी धडपडणाऱ्या मिसेस टेडी आम्ही जाणार म्हणून उदास झाल्या. "तुम्ही आज आमच्याकडे मुक्काम केला असता तर बर झाल असत तुमच्या सहवासात मला खुप आनद मिळाला. पुन्हा भेटूया" अस त्या आम्हा प्रत्येकाजवळ जाऊन आपुलकीने म्हणाल्या होत्या व बाहेर क्षणाक्षणाला घोगावणाऱ्या वादळाच्या रौद्र रुपाकडे काळजीने पहात होत्या.

थोड्याच वेळात बगल्यासमोर व्हॅन थाबलेली आम्ही पाहिली रेनकोट अगावर कसाबसा टाकून बेथ डिस्क्रोल मुसळधार पावसातून बगल्याच्या दिशेने धावत येताना दिसल्या आम्ही त्या पावसात धावत धावत आमचे सामान उचलून गाडीत ठेवू लागलो मिसेस टेडीही आमचे सामान घेऊन पावसात भिजत आमच्या बरोबर धावपळ करीत होत्या पाच मिनिटातच आम्ही सामान ठेवले मिसेस टेडी आम्हाला निरोप देण्यासाठी गाडीजवळ भर पावसात उभ्या होत्या. भिजून चिंब झाल्या होत्या गाडी रिव्हर्स घेऊन बगल्यातून बाहेर पडेपर्यंत तशाच हात हालवित उभ्या होत्या

आतापर्यंत आम्ही बगल्यात बसून वादळाची गमत पाहात होतो आता आम्ही वादळाला सामोरे चाललो होतो बगल्यातून बाहेर पडल्याबरोबर बर्फासारखा गार पाऊस आणि आतडी गोठवून टाकणाऱ्या थड वेगवान वाऱ्याने आमचे स्वागत केले नशापाणी केलेल्या दारुड्यासारखे भेलकाडत आम्ही मोटारीपर्यंत कसेबसे पोहचलो होतो व्हॅनमध्ये जाऊन बसल्यावर एखाद्या बर्फाच्या गुहेत बसल्यासारखे वाटत होते

आमच्या आधी व्हॅनमध्ये अेरिक नॅश, रिचर्ड डेयो, भिक्षूणी नारा व बेथ ड्रिस्कोल याच्या दोन चिवचिवणाऱ्या बाळसेदार मुली बसल्या होत्या. आम्हा चौघाना घेतल्यावर व्हॅन गच्च भरली प्रत्येकजण थडीने कुडकुडत होता. बाहेर भयानक वेगाने वाहणारा वारा होता धो धो कोसळणारा पाऊस होता. वाऱ्याने एकमेकीवर आदळणारी झाडे होती रस्तावर गाड्याची रहदारी जवळजवळ नव्हतीच. तशा त्या धडकी भरवणाऱ्या वातावरणात शातपणे पण अतिशय वेगात बेथ ड्रिस्कोल गाडी चालवीत होत्या. रस्त्यावर अधूनमधून जाणाऱ्या गाड्याही सुसाट वेगाने जात होत्या अमेरिकन लोकाना वेगाचे जबरदस्त आकर्षण. ट्रॅफिक जाम असल्याखेरीज हळू चालणारी गाडी मला दिसलीच नाही हायवेवर तर गाड्या जणू वाऱ्याशी स्पर्धा करीत धावताहेत असे वाटे. अर्थात अमेरीकेतील रस्ते म्हणजे जणू विमानाच्या धावपट्ट्या. इथूनतिथून सपाट, गुळगुळीत काय बिशाद आहे कुठे खड्डा दिसेल. आपल्याकडच्या पी.डब्ल्यू.डी खात्यात मजुरापासून, इजिनीयर पर्यंत सगळे पुरातत्व विभागतले सशोधक भरले आहेत अशी शका येते रस्ते सगळीकडे खोदत राहणे हेच याचे काम. चागला धडधाकट रस्ता याना पाहवत नाही प्रवासी आणि वाहनाची कबरडी मोडणे हेच याचे समाधान. त्यात प्रवासाचा आनद द्विगुणीत करण्यासाठी वेगवेगळ्या नगरपालिकानी लावलेले "सहर्ष स्वागताचे" फलक. कोणालाही "हर्षवायू" होईल असा आपल्याकडचा प्रवास

सुखरुप मुक्कामावर पोहचलो म्हणजे आपली गेल्या जन्माची काही पुण्याई होती, असे खात्रीने समजायचे असो

अर्धा पाऊण तास त्या "अमेरिकन ग्लोरीया" चे तांडव अनुभवल्यानतर आम्हीही सावरु लागलो होतो कुठे एखादा पूल कोसळेल का? रस्त्याच्या कडेचे एखादे झाड आमच्या गाडीवर पडेल का? आमची गाडी कुठे रस्त्याकडेच्या खोल खड्ड्यात पडेल का? झाडावर आपटेल का? दुसऱ्या गाडीशी टक्कर होईल का? अशासारख्या अशूभ शकानी धीरे धीरे माझ्या मनातून काढता पाय घेतला. उलट आता असही वाटू लागल की "ग्लोरीया" ची विविधरुप पहायला मिळावीत. आक्राळविक्राळ, भयभीत करणारी। हा प्रवास लवकर सपू नये या आगळ्या प्रवासाच थ्रिल आता अगात भिनू लागल होत थडी आता तितकीशी जाणवत नव्हती रिचर्ड डेयो भसाड्या आवाजात गाण म्हणू लागला होता भिक्षू केन व नारा टाळ्या वाजवून ताल धरीत होती ड्रायव्हीग करता करता मागे वळून पहात बेथ ड्रिस्कोल त्याला "दाद" देत होती व्हॅनच्या मागच्या भागात एरिक नॅश बरोबर बेथ ड्रिस्कोल यांच्या दोन गबदूल पोरींची दगामस्ती चालली होती मी ही मग रगात आलो रिचर्ड डेयोच्या गाण्यावर साथ म्हणून मी व्हॅनच्या दरवाजावर तबला वाजवायला सुरुवात केली तास दीड तास भुर्रकन उडून गेला आणि आमचे "पुष्पक विमान"जीमच्या भव्य बगल्यासमोर अलगदऽ येऊन थाबले

मिस्टर जीम, त्याची तरुण पत्नि, पत्निच्या पाठीवर बाधलेला खुर्चीत बसलेला एक लालबूद छोकरा, जीमचे दोन भाऊ सर्वानी आमचे अत्यानदाने स्वागत केले इतर सर्व पदयात्रीच्या गाड्या आमच्या आधीच सुखरुप येऊन पोहोचल्या होत्या सर्वांनी आनदाने एकच जल्लोष केला प्रेमकुमार आणि जिम पूर्वपरिचीत होते त्यानी एकमेकाना कडकडून आलीगन दिले माझ्या अगावरचा सदरा, चुडीदार, जाकीट पाहून जिम आनदाने हिंदीत उद्गारले, "हैय हिदूस्थान, क्या नाम हौयै?" "मनोहर" मी पहिल्यादाच माझ्या नावाचा योग्य उच्चार केला श्री. जीम आणि त्याच्या पत्नि काही वर्ष भारत व बागला देशात युनोच्या कुठल्याश्या मदत कार्याच्या प्रोजेक्टसाठी येऊन राहीले होते. त्याच्या तोडून हिंदी भाषा ऐकून मी मनोमन सुखावलो

श्री जीम याचा लाकडी बगला दोन मजली व भव्य होता त्याला लागूनच त्याचा भला मोठा फार्मदेखील होता. अमेरिकेतील शेतकऱ्याच्या घरी आजचा आमचा मुक्काम होता.

आम्ही पोहोचलो त्यावेळी वादळाचा जोर अधिकच वाढला होता जीमचे घर मात्र उल्हासाने भरुन गेले होते देशोदेशीच्या पाहुण्याचे पाय आज आपल्या घराला लागले म्हणून जीमचे कुटूंबिय सुखावले होते घरातील सर्व मडळी आमची लचची तयारी करण्यात गुतले होते आम्ही मदत करायला गेलो नको नको म्हणायचे आणि हाताला धरुन हॉलमध्ये आणू बसवायचे जीमच्या हॉलच्या काचेच्या भिंतीही प्लॅस्टिकच्या आडव्यातिडव्या टेप्सनी भरुन गेल्या होत्या सफरचदानी भरलेले दोन भले मोठे बॉक्स आमच्या समोर टेबलावर ठेवले होते. ज्याला हव ते येऊन खात होते. गप्पा मारीत होते. कुणी पुस्तके वाचीत होते. मी तोपर्यंत जीमच्या बगल्याची एकूण एक खोली पाहून घेतली घरालगतच्या गॅरेजमध्ये शेतीची अवजारे पडली होती. गॅरेजच्या दरवाज्यात उभ राहील की बाहेरच वादळाच तुफान दिसत होत वादळाचा जोर वाढतच होता थडी कडाक्याची होती दुपारच्या जेवणानतर बरेच जण इथेतिथे झोपी गेले सिस्टर बेथसह इतर भिक्षू, मॅरेन, टेरी वगैरे दुसऱ्या मजल्यावरील एका रुममध्ये पुढील प्रवासाची चर्चा करीत बसले होते मी माजरीच्या पावलाने सगळीकडे फिरत होतो बाहेर जाऊन पावसात भिजण्याची व अनवाणी पायानी हिरवळीवरुन फिरण्याची मला अनावर इच्छा होत होती मोठ्या मुश्किलीने मी ती आवरुन धरीत होतो गॅरेजच्या दारात उभा राहून पावसाच्या धारा हातावर झेलीत असताना श्री जीम माझ्याजवळ आले व माझा हात धरुन मला पहिल्या मजल्यावर एका खोलीत घेऊन गेले प्रेमकुमार तिथे आधीच बसले होते खोलीच्या मध्ये एक छोट फोटो प्रोजेक्टर मशीन ठेवल होते. समोरच्या भिंतीवर शुभ्र कापडी पडदा लावला होता. मी प्रश्नार्थक मुद्रेने प्रेमकुमारकडे दृष्टीक्षेप केला.

"मिस्टर जिम हमे अपने देश के कुछ फोटोग्राफ्स् दिखा रहे हैं!" प्रेमकुमार म्हणाला

"अपना गॉवकी याद" प्रोजेक्टर सुरु करता करता हसत जीम म्हणाले. या खास कार्यक्रमाला सन्माननीय दर्शक आम्ही दोघे भारतीयच होतो तासभर भारतातल्या खेड्याचे विविध फोटोग्राफ्स, जीमच्या मोडक्या तोडक्या हिदीतील कॉमेंट्री ऐकत मी आणि प्रेमकुमार पहात होतो. मधेच पडद्यावर म्हशीचे चित्र पाहून गमत वाटली खेडेगावची दृष्ये पाहून घराची, बायको-मुलाची आठवण उफाळून आली

सायकाळी ५ वाजता वादळ जवळ जवळ सपलेच. पाऊस सपूर्ण थाबला होता फक्त जोरदार बर्फाळ वारे अजून वहात होते परतु त्याचाही जोर

खूपच कमी झाला होता पश्चिम क्षितीजावर केशरी, पिवळ्या, नारींगी रगाच्या ढगानी चित्रकारी करायला सुरुवात केली क्षणाक्षणाला बदलणारे ते मावळतीचे रग जिमच्या दुसऱ्या मजल्या वरच्या खिडकीत बसून आम्ही मतरल्यासारखे पाहत होतो

———मा आणि ब्रायन घराभोवती हिरवळीवर फिरण्यासाठी बाहेर पडलो मला अनवाणी पायानी हिरवळीवर फिरायचे होते म्हणून तसाच बाहेर पडलो घराबाहेर पडताच गार वाऱ्याचा झोत नाका तोडात शिरला बरे वाटले मी भलामोठा श्वास घेउन गार हवा पोटात घेतली मी आणि ब्रायन गप्पा मारीत हिरवळीवर, झाडाच्या बुध्याना स्पर्श करीत फिरत राहिलो. हिरवळीवर, साचलेल पाणी तळव्याना बर्फासारख गार लागत होत. झिणझिण्या मस्तकाला भिनत होत्या चालता चालता अचानक ब्रायनचे लक्ष माझ्या अनवाणी पायाकडे गेले गवतात एखाद श्वापद दिसाव तसा जागच्या जागी उडी मारुन तो किंचाळला "व्हॉट। बेअर फूटेड"

"आय लाईक धिस वे" मी हसत हसत म्हणालो

"नो नो" माझा हात धरुन ओढीत घराकडे नेत तो म्हणाला "यू मे कॅच कोल्ड व्हेऽई डेंजरस।"

६ ॥ वाजता सायकाळची प्रार्थना आटोपल्यावर कॉफी झाली आता सर्वजण हॉलमध्ये एकत्र जमले होते किचनमध्ये सर्व मामला थडगार पाहून मला नवल वाटले "सध्याकाळच्या जेवणाचे काय ?" सफरचद खाता खाता मी विचार करीत होतो पण मला फार वेळ काळजी करावी लागली नाही

रात्री ७ च्या सुमारास ७-८ गाड्या भराभर आमच्या बगल्यासमोर येऊन उभ्या राहिल्या. त्यातून बरीचशी तरुण मुले व मुली आणि काही मोठी माणसे उतरली. भराभर त्यानी गाड्यातले सामान आत आणले खाद्यपदार्थ भरलेली भाडी होती ती एक दोन मुलाच्या खाद्यावर गिटार लटकत होते जागतिक शाततेसाठीच्या चळवळीला पाठींबा देणारी ही इथली स्थानिक तरुण मडळी होती त्यात तिथल्या चर्चचे धर्मगुरु ही होते त्याच्यातर्फेच आमच्या सन्मानार्थ आजचा डिनर होता.

आम्ही आता एकूण ५०-६० स्त्री पुरुष जमा झालो होते जवळ जवळ सर्व धर्माची, पृथ्वीच्या चारी खडामधून आलेली शातीप्रिय माणस भगवान बुध्दाचा मानवतेचा, शातीचा, करुणेचा संदेश घेऊन आलेले जपानी बुध्दभिक्षू, युद्धात पोळलेल्या म्हणून शातीची महती पटलेले युरोप खडातील,

अमेरिकेचे शातीला आसुसलेले नागरिक. जगात शातता प्रस्थापित व्हावी, सर्व मानवजात गुण्यागोविंदाने रहावी, सर्वांच कल्याण व्हाव अस स्वप्न उराशी बाळगुन प्रार्थना करण्यासाठी एकत्र आलेलो, आम्ही कुठली कुठली माणस! वश वेगळे, भाषा वेगळ्या, देश वेगळे, पण ध्येय एकच होतं. जागतिक शातता. मानव कल्याण. तस पाहता तो खुळचटपणा वाटत होता आमच्या दुर्बळ हातानी गगनाला गवसणी घालण्याचाच तो प्रकार होता. कुठल्याही राजकीय पक्षाच पाठबळ आम्हाला नव्हत कुठल्या धनवान दात्याने आमच्यासाठी पैसा ओतला नव्हता. जगात शातता हवी, युद्ध नको, या भावनेने झपाटलेली, स्वत ची पदरमोड करुन जगातल्या कानाकोपऱ्यातून आलेली आम्ही शातीप्रिय सामान्य माणस बुध्दाच्या करुणेचा सदेश घेऊन फुजी गुरुजी आणि त्याचे सहकारी बुध्दभिक्षू काही वर्षापूर्वी युरोप, अमेरिकेत गेले तिथ त्याना जाणवल की लोकाना युध्द नको आहे. शाती, प्रेम यासाठी येथील सामान्य माणूस आसूसला आहे ते आणि त्याचे शिष्यगण भिक्षू या सामान्य माणसात मिसळले अणुशक्ती वापराच्या, सहारक युद्धाच्या विरुद्ध खदखदत असलेल्या असतोषाला त्यानी वाचा फोडली त्याचे नेतृत्व केले युरोपखडात आणि अमेरिकेत त्यानी मदोन्मत्त राज्य सत्तेविरुद्ध प्रचड अहिसक चळवळी सुरु केल्या

फुजी गुरुजी आणि त्याच्या जपानी बुध्दभिक्षूची आतरिक तळमळ, निरलस सेवाभावी वृत्ती आणि हेतूची शुध्दता, प्रामाणिकपणा, अमेरिका आणि युरोप खडातील सुज्ञ जनतेने ओळखला आणि त्याना आपलेसे केले नेतृत्व बहाल केले त्यानी पाहिले की हे जपानी बुध्दभिक्षू बटबटीत धर्मप्रचार करीत नाहीत, देणग्या मागत नाहीत, त्याची वणवण, धडपड ही स्वार्थी हेतूने प्रेरित नसून जात, धर्म, पथ याच्या कक्षा ओलाडून आखिल मानवजातीच्या भल्यासाठी हे कष्ट सहन करताहेत. भगवान बुध्दाच्या शिकवणीनुसार मानवी दु.खाच मूळ शोधून ते दूर करण्याचा ही मडळी प्रयत्न करताहेत. युरोप अमेरिकेच्या जनतेला हे बुध्दभिक्षू देवदूतासारखे वाटू लागले त्याच्या मनात त्यानी आदराचे स्थान प्राप्त केले.

त्या बुध्दभिक्षुच्या सत्कृत्याची फळ आम्ही चाखीत होतो मी पाहात होतो अमेरिकेत कुठली कुठली ही आड बाजूची गावं तिथली माणस एकत्र येतात काय! आमच्यासाठी सर्वतोपरीने झटतात काय! आपण होऊन आमच्या जेवणाखाण्याची, राहण्या उतरण्याची सोय करतात काय! दुखल खुपल तर सेवा करतात काय! आमच्या कार्याची प्रशसा करतात काय! आम्हाला

खूपच कमी झाला होता पश्चिम क्षितीजावर केशरी, पिवळ्या, नारींगी रगाच्या ढगानी चित्रकारी करायला सुरुवात केली. क्षणाक्षणाला बदलणारे ते भावळतीचे रग जिमच्या दुसऱ्या मजल्या वरच्या खिडकीत बसून आम्ही मतरल्यासारखे पाहत होतो

मी आणि ब्रायन घराभोवती हिरवळीवर फिरण्यासाठी बाहेर पडलो मला अनवाणी पायानी हिरवळीवर फिरायचे होते म्हणून तसाच बाहेर पडलो घराबाहेर पडताच गार वाऱ्याचा झोत नाका तोंडात शिरला बरे वाटले मी भलामोठा श्वास घेउन गार हवा पोटात घेतली मी आणि ब्रायन गप्पा मारीत हिरवळीवर, झाडाच्या बुध्याना स्पर्श करीत फिरत राहिलो हिरवळीवर, साचलेल पाणी तळव्याना बर्फासारख गार लागत होत झिणझिण्या मस्तकाला भिनत होत्या. चालता चालता अचानक ब्रायनचे लक्ष माझ्या अनवाणी पायाकडे गेले गवतात एखाद श्वापद दिसाव तसा जागच्या जागी उडी मारुन तो किंचाळला "व्हॉट ! बेअर फुटेड"

"आय लाईक धिस वे" मी हसत हसत म्हणालो

"नो नो" माझा हात धरुन ओढीत घराकडे नेत तो म्हणाला. "यू मे कॅच कोल्ड व्हेऽई डेजरस !"

६ ॥ वाजता सायकाळची प्रार्थना आटोपल्यावर कॉफी झाली आता सर्वजण हॉलमध्ये एकत्र जमले होते किचनमध्ये सर्व मामला थडगार पाहून मला नवल वाटले "सध्याकाळच्या जेवणाचे काय ?' सफरचद खाता खाता मी विचार करीत होतो पण मला फार वेळ काळजी करावी लागली नाही

रात्री ७ च्या सुमारास ७-८ गाड्या भराभर आमच्या बगल्यासमोर येऊन उभ्या राहिल्या. त्यातून बरीचशी तरुण मुले व मुली आणि काही मोठी माणसे उतरली भराभर त्यानी गाड्यातले सामान आत आणले खाद्यपदार्थ भरलेली भाडी होती ती एक दोन मुलाच्या खाद्यावर गिटार लटकत होते जागतिक शाततेसाठीच्या चळवळीला पाठीबा देणारी ही इथली स्थानिक तरुण मंडळी होती. त्यात तिथल्या चर्चचे धर्मगुरु ही होते त्याच्यातर्फेच आमच्या सन्मानार्थ आजचा डिनर होता.

आम्ही आता एकूण ५०-६० स्त्री पुरुष जमा झालो होते जवळ जवळ सर्व धर्माची, पृथ्वीच्या चारी खडामधून आलेली शातीप्रिय माणस भगवान बुध्दाचा मानवतेचा, शातीचा, करुणेचा सदेश घेऊन आलेले जपानी बुध्दभिक्षू. युद्धात पोळलेल्या म्हणून शातीची महती पटलेले युरोप खडातील,

अमेरिकेचे शातीला आसुसलेले नागरिक जगात शातता प्रस्थापित व्हावी, सर्व मानवजात गुण्यागोविंदाने रहावी, सर्वाचं कल्याण व्हाव अस स्वप्न उराशी बाळगुन प्रार्थना करण्यासाठी एकत्र आलेलो, आम्ही कुठली कुठली माणस। वश वेगळे, भाषा वेगळ्या, देश वेगळे, पण ध्येय एकच होतं. जागतिक शातता मानव कल्याण. तस पाहता तो खुळचटपणा वाटत होता. आमच्या दुर्बळ हातानी गगनाला गवसणी घालण्याचाच तो प्रकार होता कुठल्याही राजकीय पक्षाच पाठबळ आम्हाला नव्हत कुठल्या धनवान दात्याने आमच्यासाठी पैसा ओतला नव्हता. जगात शातता हवी, युद्ध नको, या भावनेने झपाटलेली, स्वत: ची पदरमोड करुन जगातल्या कानाकोपऱ्यातून आलेली आम्ही शातीप्रिय सामान्य माणस. बुध्दाच्या करुणेचा सदेश घेऊन फुजी गुरुजी आणि त्याचे सहकारी बुध्दभिक्षू काही वर्षापूर्वी युरोप, अमेरिकेत गेले. तिथ त्याना जाणवल की लोकाना युध्द नको आहे शाती, प्रेम यासाठी येथील सामान्य माणूस आसूसला आहे. ते आणि त्याचे शिष्यगण भिक्षू या सामान्य माणसात मिसळले अणुशक्ती वापराच्या, सहारक युद्धाच्या विरुद्ध खदखदत असलेल्या असतोषाला त्यानी वाचा फोडली त्याचे नेतृत्व केले युरोपखडात आणि अमेरिकेत त्यानी मदोन्मत्त राज्य सत्तेविरुद्ध प्रचड अहिंसक चळवळी सुरु केल्या.

फुजी गुरुजी आणि त्याच्या जपानी बुध्दभिक्षूची आतरिक तळमळ, निरलस सेवाभावी वृत्ती आणि हेतूची शुध्दता, प्रामाणिकपणा, अमेरिका आणि युरोप खडातील सुज्ञ जनतेने ओळखला आणि त्याना आपलेसे केले नेतृत्व बहाल केले त्यानी पाहिले की हे जपानी बुध्दभिक्षू बटबटीत धर्मप्रचार करीत नाहीत, देणग्या मागत नाहीत, त्याची वणवण, धडपड ही स्वार्थी हेतूने प्रेरित नसून जात, धर्म, पथ याच्या कक्षा ओलाडून आखिल मानवजातीच्या भल्यासाठी हे कष्ट सहन करताहेत. भगवान बुध्दाच्या शिकवणीनुसार मानवी दु:खाच मूळ शोधून ते दूर करण्याचा ही मडळी प्रयत्न करताहेत युरोप अमेरिकेच्या जनतेला हे बुध्दभिक्षू देवदूतासारखे वाटू लागले. त्याच्या मनात त्यानी आदराचे स्थान प्राप्त केले

त्या बुध्दभिक्षुच्या सत्कृत्याची फळ आम्ही चाखीत होतो मी पाहात होतो अमेरिकेत कुठली कुठली ही आड बाजूची गावं तिथली माणस एकत्र येतात काय। आमच्यासाठी सर्वतोपरीने झटतात काय। आपण होऊन आमच्या जेवणाखाण्याची, राहण्या उतरण्याची सोय करतात काय। दुखल खुपल तर सेवा करतात काय। आमच्या कार्याची प्रशसा करतात काय। आम्हाला

हिम्मतबाजपणे साथ देतात काय। खरोखर या अतिथ्याने आणि आपुलकीने कोणीही माणूस हेलावून गेला असता यामुळ आमची उमेद वाढत होती आमच्यात नव बळ येत होत एवढ्या दूरवर येऊन या चागल्या कार्यासाठी परिश्रम घेतल्याच सार्थक वाटत होत

तर जीमच्या घरच्या डिनर विषयी सागत होतो प्रथम आम्ही सर्वजण जेवणाच्या टेबलाभोवती गोलाकार उभे राहीलो मेजवर मेणबत्ती तेवत होती नतर पवित्र दारुचा प्याला आणि भाकरी सर्वामध्ये फिरवली गेली मी ही त्या पेल्यात किंचित जीभ बुडविली व भाकरीचा तुकडा घेतला. हे सर्व "ज्यू" रितीरिवाजाप्रमाणे चालले होते ते झाल्यावर मग काही सामुदायिक प्रार्थना झाल्या "कम - ओ - सब्बाथ डे, ब्लेसिग ओव्हर द कँडल्स, ब्लेसिग ओव्हर द वाईन, ब्लेसिग ओव्हर द ब्रेड" अशा त्या सामुदायिक प्रार्थना होत्या दिवसभर चाललेल सहारक वादळाच थैमान त्यातून काहीही अनिष्ट न घडता सुखरुप राहीलेलो आम्ही, या पार्श्वभूमीवर त्या गभीर प्रार्थनेचे स्वर अतःकरणात कुठे तरी खोल जाऊन भिडत होते आणि त्याचे प्रतिध्वनी जणू साऱ्या आसमतात फेकले जात होते विलीन होत होते

तिथल्या तरुण अमेरिकन मुला-मुलीनी आम्हाला त्याच्यात सामावून घेतले हसत खेळत जेवण झाल त्यानतर सुरु झाली गाण्याची मैफल मिस्टर जीमच्या पियानोचे स्वर आणि पोराच्या गिटारचे झणत्कार आणि कोरस गीते यानी घर दणाणून गेले आनदाच्या जल्लोषात आम्ही सारे एकरुप झालो

# ७ : नैसर्गिक आपत्ती आणि अमेरिकन माणूस

२८ सप्टेंबर च्या सकाळी पुन्हा आम्ही आमच्या मोहीमेवर निघालो आभाळ राखाडी ढगानी झाकळलेल होत फिक्कट सुर्यप्रकाश त्यातून झिरपत होता थडगार बोचरे वारे वाहत होते ठीक सात वाजता ड्रायव्हर जो आपली भली मोठी बसगाडी घेऊन हजर झाला होता. आज प्रथम आम्ही बैरे शहरापर्यत बसने जाणार होतो व नतर बैरे पासून पदयात्रा सुरु होणार होती

यजमान जीमच्या कुटूबियाचा भावपूर्ण निरोप घेऊन आमची बस निघाली मी ड्रायव्हर जो च्या बाजूला फ्रट सिटला बसलो होतो. नेहमीप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा दाट हिरविगार झाडी होती कालच्या वादळाने झाडाची काय वाताहात केली होती ते दिसत होते शेकडो झाडे मोडून, उन्मळून पडली होती. अधून मधून दिसणाऱ्या घराजवळ माणस घराची डागडूजी करताना दिसत होती सार काही शातपणे चाललेल होत कुठही गडबड, गोंधळ दिसत नव्हता. आरडाओरड नव्हती. घोळके करुन उत्तेजित चर्चा करणारे रिकामटेकडे जमाव दिसत नव्हते की, कलकलाट करणाऱ्या आया बाया दिसत नव्हत्या. रस्ते स्वच्छ होते. पडलेली झाडे आणि छपरे उडालेली घरे दिसली नसती तर काल ह्याच भागाला प्रचड चक्री वादळाने घुसळून काढले हे सागूनही खरे वाटले नसते.

मला एका गोष्टीच फार नवल वाटल तासभर आम्ही बसमधून प्रवास केला पण रस्त्यात एकही झाड आडवे पडलेले दिसले नाही किंवा एखादा विजेचा खाब आडवा येऊन वाहतुकीचा खोळबा झाला असे आढळले नाही. सिव्हील डिफेन्सची तेथील यत्रणा किती कार्यक्षम आणि कार्यतत्पर आहे हे त्यावरुन दिसले लोकाचा यत्किंचितही खोळबा होऊ नये म्हणून रात्रीच्या

रात्रीत काम करुन सारे रस्ते अडथळ्याविना, पूर्वी जसे होते तसे करुन ठेवले होते

आपल्याकडे कुठे अशी वादळाची अथवा पुराची आपत्ती आली की, ती बजबजपुरी काय वर्णावी। गावातून आणि रस्त्यावर तुबलेले ते कचऱ्याचे आणि घाणीचे ढीग बोंबाबोब करीत फिरणारी ती माणस रोडवर लाबलचक खोळबलेल्या त्या मोटारींच्या रागा, कर्कश आवाजात किंचळणारे ते हॉनर्स्, त्याच्यातून शिट्टया फुकीत सैरावैरा धावणारे ते ट्रॅफीक पोलीस, तो गोगाट त्या शिट्टया, एस टी. मध्ये अडकून हाल झालेले ते हवालदील प्रवासी, प्रचड गोधळ आणि गैरव्यवस्था. त्यात मदतीसाठी म्हणून आलेल्या बेपर्वा सरकारी यत्रणेच्या मुजोर वागणुकीची भर. अशा वेळी लोकाचे हाल अक्षरश· कुत्रे खात नाही

देशाच्या कुठल्या भागात आपल्याकडे अशी आपत्ती ओढवली की, शासनाच्या कार्य पध्दतीचा एक विलक्षण भावनाशून्य आणि मुर्दाड साचा ठरुन गेलेला आहे पूर, वादळ अशामुळे प्राणहानी, वित्तहानी झाली की तिथला मुख्यमत्री हेलिकॉप्टर मधून पहाणी करणार. मग सचिवालयात सबधित अधिकाऱ्याची, पत्रकाराची घाईघाईत बैठक बोलावणार. नुकसानीचा काल्पनिक आकडा ठोकून देणार. लगेच विमान पकडल की गेले दिल्लीला, पतप्रधानाकडे मदत मागायला, पतप्रधानाची भेट दोन तीन दिवसात मिळाली तर भाग्य समजायचे पुन्हा परत आले की मग सचिवालयात बसून आपत्कालिन समितीची नेमणूक, मग मर्जीतल्या लोकाची त्यावर वर्णी लावणे, मग त्या समितीच्या बैठका होऊन काही निर्णय होईतो आणखी एक आठवडा जाणार. म्हणजे पूरात अथवा वादळात सापडून अर्धमेली झालेली बहुतेक प्रजा गचकणार. म्हणजे त्याना मदत करण्याचा प्रश्न आपोआप सुटला आपत्कालिन समितीचे सदस्य राजधानीच्या शहरातच आपल्या वातानुकुलिन बगल्यावर बसून अथवा पचताराकित हॉटेलात बैठका घेऊन कागदी घोडे नाचवित राहणार, एखाद दुसरा सदस्य चुकून त्या भागात गेलाच तर तो सरकारी डाकबगल्यात ऐष आरामी पाहुणचार घेत सरकारी नोकराना दादागिरी करीत राहणार, तिथला कलेक्टर धूर्तपणे त्याची मर्जी साभाळीत सी.एम ला आपल्या कार्याचे (!) अवास्तव अहवाल पाठवित राहणार. त्या भागातला आमदार सत्ताधारी पक्षाचा असला तर तो कमिटीवर असतोच. मग तो मदतनिधीतला जास्तीजास्त मलिदा आपणच कसा ओढू शकू या तऱ्हेने प्रयत्नशील राहणार, विरोधी पक्षाचा आमदार असला की, तो पक्षपाताची स्वार्थी कोल्हेकुई करणार आणि त्याच्या

हिश्श्याचा तुकडा मिळाला की गप्प बसणार. इकडे आपत्ती पिडीत लोक सडत राहणार. हाल अपेष्टा आणि रोगाच्या साथीतून जे कोणी वाचतील ते स्वतःला भाग्यवान समजणार. पुरानतर अथवा वादळानतर महीन्याभराने सरकारी मदत पथके त्या ठिकाणी जाणार. मग गजलेले पत्रे, फाटक्या चटया आणि किडके धान्य लोकाना वाटणार. लोक देखील ते मिळाव म्हणून एकमेकाच्या उरावर बसणार. सी.एम. मग राजधानीत पत्रकाराची बैठक एखाद्या पचताराकित हॉटेलात बोलावणार. खाण, पिण यथेच्छ होणार. आपत्ती निवारणासाठी सरकारने केलेल्या कठोर परिश्रमाचा वृत्तात वर्तमान पत्रात येणार. आपत्तीनिवारण कमिटीकडे जमा झालेल्या प्रचड निधीचे काय झाले हे कोणाला कधीच कळणार नाही ह्या कार्यपध्दतीत सारेच खूष सी.एम. खूष, पी एम. खुष अगदी "यम" देखील खुष असतो. आपल्याकडची ही सर्वाना खूष करणारी "चमत्कारी" कार्यपध्दती अमेरिकन लोकाना कधी कळणार नाही कळली तरी पचणार नाही भारतीय लोकशाहीचा "अद्‌भुत फॉर्म्युला" आम्ही अमेरिकनापासून लपवून ठेवू शकलो याबद्दल आमची आम्हीच पाठ थोपटून घेतली पाहिजे

भरधाव वेगाने आमची बस चालली होती आणि माझे विचार त्याहीपेक्षा अधिक वेगाने पळत होते पाहता पाहता ते मायदेशी धावती भेट देऊन आलेही

आमची बस दाट झाडीच्या भागातून जात असता एक वैशिष्ट्यपूर्ण दृष्य माझ्या पाहण्यात आले समोरच्या बाजूने अधून मधून लाकडाचे ओडके भरलेली, अथवा ओडक भरलेली ट्रॉली जोडलेली खाजगी वाहने येत होती मला वाटल पुढ बरीच झाडाची पडझड झाली असावी सगळेजण तिथूनच गाड्या भरुन ओंडके आणताहेत पण तरीही माझ्या मनात शका आली की, आजूबाजूला एवढी झाडे पडलेली दिसत असताना त्याला हात न लावता ही माणस लाबून कुठून आणताहेत ? त्या शकेचा पाच मिनिटातच उलगडा झाला पुढे रस्त्याच्या बाजूला एक मोठा फलक लावला होता. त्यावर "जळाऊ लाकडाची विक्री करणारा जगलविभाग" असा मजकूर होता. तिथे अनेक खाजगी वाहन ओळीने उभी होती आणि लाकड विकत नेत होती आपल्याकडे, आजूबाजूला झाडे मोडून पडलेली असताना त्याच्याकडे ढुकून न पाहता कोणीही माईचा लाल लाकड विकत घ्यायला गेला नसता. दसऱ्याच सोन लुटाव तशी लोकानी झाड लुटली असती शेजाऱ्याच चुकून घराबाहेर राहीलेल, बहिर्दिशेला जायच टिनपाट पळविणारे भारतीय कुठे आणि हे अमेरिकन कुठे.

अशा प्रसगातून एखाद्या राष्ट्राच्या राष्ट्रीय नीतिमत्तेचे दर्शन घडते सुसस्कृत पणाचे दर्शन घडते तेथली प्रजा कोणत्या मानवी मुल्याना जपते त्याचे दर्शन घडते आपल्या देशातील जनतेच्या स्वभाव वैगुण्याच्या पार्श्वभुमीवर अमेरिकन लोकाच्या स्वाभावगुणदर्शनाने मी मात्र उगाचच मनातल्या मनात खजील झालो

बैरे शहराच्या मध्यवर्ती भागात सकाळी ८-३० च्या सुमारास आमची बस थाबली. त्यातुन उतरलेल्या आम्ही अठरा-पगड देशातील मडळीना पाहून आजुबाजुच्या बगल्यातून माणसे आम्हाला उत्सुकतेने पाहू लागली. त्या दिवशी तिथून आमची पदयात्रा सुरू झाली

"नम्यो - हो - रेन्गे - क्यो" अशी उच्चरवात घोषणा करुन त्याच मत्राचा उच्चार करीत बुध्दभिक्षूच्या ड्रमच्या तालावर वेगाने पावले टाकीत बैरे शहरातून आम्ही ओळीने निघालो. इतक्यात कुठून कुणास ठाऊक दोन पोलिस ऑफीसर अवतरले आणि आमच्यासह चालू लागले

आता मला ग्लोरीयाने केलेल्या विध्वासाचे चित्र व्यवस्थित पाहता येऊ लागले अनेक बगल्याची छपर उडाली होती लाकडी भिती कोसळल्या होत्या. आवारात झाडे मोडून पडली होती काही पडलेल्या झाडानी मोटारीचा चेदामेदा केला होता तर काहीनी घराची मोडतोड केली होती. जवळ जवळ प्रत्येक घरातील माणसे आपल्या घराच्या आवारात येऊन काम करताना दिसत होती कोणी पडक्या घराची डागडूजी करीत होते, कोणी हातातील इलेक्ट्रीकच्या करवतीने पडलेल्या झाडाचे छोटे छोटे ओंडके करीत होती. कोणी आवारातील पालापाचोळा साफ करीत होती. कोणी आपल्या हिरवळीच्या लॉन्सवर कापणी यंत्रे फिरवीत होती. अत्यत शातपणे आणि शिस्तीने सार काही चालल होत. आमची मिरवणुक जाताना पाहून नवलान काही क्षण माणस आमच्याकडे पाहत राहत काही क्षण हात हलवून आम्हाला निरोप देत. काहीजण हसत हसत काही तरी उत्साहवर्धक आरोळी ठोकीत आमच्यापैकी काहीजण धावत धावत जाऊन त्याच्या हातात आमची माहीतीपत्रके कोंबून पुन्हा धावत पदयात्रेत सामील होत अमेरिकन गाव असू नाही तर शहर असू सारीच आरशा प्रमाणे स्वच्छ, लखलखीत. विविधरगी आकर्षक घर, लोभसवाणे बगीचे, झाड, उमद्या मनाची हसरी आणि निरोगी माणस कुठल्याही शहरातून अथवा गावातून जाताना मन प्रफुल्लित व्हायच आणि दाट जगलातून जाताना मनाला धीर गभीर शाततेचा साक्षात्कार व्हायचा. एका बाजूला वैज्ञानिक प्रगतीला राबवून अमेरिकन माणसानी आधुनिक सुखसोयींचा स्वर्ग तेथल्या घराघरात आणला होता. त्याचवेळी निसर्गाच भव्य आणि उदात्त रुपही त्याने तेवढ्याच

आस्थेने आणि ममत्वाने जोपासलेल दिसत होत मोठ्या द्रष्टेपणाने अमेरिकन समाजाने विज्ञान आणि निसर्गाला एकाच वेळी आपलेसे केले होते आणि मोठ्या रसिकतेने त्या दोन्हीचा आस्वाद घेताना दिसत होते

त्या दिवशी मोठी गमतच झाली. आमचे दुपारचे जेवण व पाणी वगैरे घेऊन निघालेली मॉरेन आणि टेरी याची कार रस्ता चुकली आणि कुठेतरी भरकटली ती चुकामुक आम्हाला चागलीच भोवली सकाळी ७ ३० पासून दुपारी ४ वाजेपर्यंत आम्ही चालतच होतो. मॉरेन आणि टेरीची कार काही दिसेना भुकेने जीव व्याकुळ झालेला. त्यात आमची सत्व परीक्षा पाहण्यास म्हणून की काय आमच्या पदयात्रेच्या मार्गाच्या दुतर्फा सफरचदाच्या बागा होत्या. लालबुद रसाळ सफरचदानी लहडलेली ती सफरचदाची छोटी छोटी झाड पोटात अजून कालवाकालव निर्माण करीत होती. रस्त्याला लगटून झाडे होती कुपण देखील नव्हती नुसता हात पुढे करुन सफरचद सहज तोडता आले असते पण कुणीच हात लावीत नव्हते तर मी कसा लावणार. शातपणे मडळी "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" म्हणत चालली होती जणू त्याना आजूबाजूचे काहीच दिसत नव्हते रिकाम्यापोटीही त्या दिवशी २५-३० मैल चाललो "नम्यो - हो - रेन्गे - क्यों" चे स्वर ओठातून न येता पोटातून येताहेत असा भास होऊ लागला होता.

४ वाजता स्पेन्सर शहरातील पाम चर्च या मुक्कामाच्या जागेवर आम्ही पोहोचलो. पाहतो तर काय? मॉरेन आणि टेरीची कार तेथे उभी आम्हाला शोधण्याचा निष्फळ प्रयत्न करुन त्या शेवटी मुक्कामाजवळ येऊन थाबल्या होत्या त्यानी दिलगिरी व्यक्त केली पण कोणीही त्याच्यावर रागावले नाही उलट हास्य विनोदात सर्वजण सामील झाले. इतक्यात समोरच्या झाडीतून १०-१२ व्यक्ती आमच्या दिशेने येताना दिसल्या. त्यात एक वयस्कर बुध्द भिक्षूही होते मुळचे जपानी पण भारतीय नागरिकत्व स्विकारलेल्या त्या वयोवृध्द जपानी भिक्षूचे नाव "शाती शुगे शोनीन" होते व इतर आलेल्या नवोदितामध्ये इटालियन भिक्षुणी नारा याची तरुण पुतणी लोरेता, कॅलिफोर्नियाच्या पत्रकार तरुणी बार्बारा आणि मार्था, कुरळ्या केसाची देखणी अमेरिकन तरुणी मर्सिडीस, ॲर्नोल्ड एरिक्सन नावाचा दाढीवाला अमेरिकन तरुण आणि एक पन्नाशीच्या सुमाराचे अमेरिकन जोडपे ही सर्व मडळी आमच्यापैकी बऱ्याच जणाशी पूर्वपरिचित होती जागतिक शाततेसाठी अमेरिकेत सतत कार्यरत असलेले हे कार्यकर्ते होते त्याच्या आगमनाने आमच्या गोटात नवीन उत्साह सचारला. ओळखीपाळखी झाल्या. हस्तादोलने, आलिंगने झाली

आणि सर्व मिळून तिथल्याच हिरवळीवर आमचे सहभोजन सुरु झाले

आमचे निवासस्थान "पामर चर्च" टेकडीच्या शिखरावर विराजमान झाले होते चर्च भव्य होते आणि इतर चर्चप्रमाणे सुखसोईंनी युक्त होते मी पहिल्या मजल्यावरील एक खोली पटकावली तिथून आजूबाजूच्या निसर्गाचे विहगम दृष्य दिसत होते बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश होता हवा उबदार होती आणि दुसर काही काम नव्हत जगलात मनसोक्त भटकण्याची उर्मी अनावर झाली. मी ब्रायनला तसे सागितले तो लगेच माझ्या समवेत यायला तयार झाला

गरम गरम कॉफी पिऊन आम्ही निघालो छोटा ब्रायन आणि मी हातात हात घालून टेकडीच्या उतारावरुन मजेत गप्पा मारीत चाललो भटकत भटकत आम्ही दूर गेलो एका टेकडीच्या पायथ्याशी खळखळत वाहणारा झरा मला दिसला उतारावरच्या दाट झाडीतून वाट काढीत आम्ही तिथे जाऊन पोहोचलो त्या थड स्फटीकशुभ्र पाण्याचे फवारे मी तोडावर मारले तरतरी आली ब्रायन शेजारी उभा राहून गालातल्या गालात हसत माझ्याकडे पाहत होता बाजूच्या हिरवळीवर बसून आमच्या गप्पा सुरु झाल्या मी खिशातून "रिजन्ट स्पेशल" सिगरेटचे पाकीट काढले. एक सिगरेट ब्रायनला ऑफर केली

"ओह, इडियन सिगरेट ! आय विल ट्राय इट" सिगरेटचा स्विकार करीत तो म्हणाला.

त्याने पहिला झुरका घेतल्यावर मी प्रतिक्रियेच्या अपेक्षेने त्याच्याकडे पाहिले

"ह, ह ! व्हेऽ ई गुद आय लाईक इट." तो म्हणाला. एक दोन झुरके मारल्यावर ब्रायन रगात आला आणि तो आपण होऊन आपली कहाणी सागू लागला.

छोटा ब्रायन, वरवर नाजुक दिसणारा, बालिश हसऱ्या चेहऱ्याचा ब्रायन अत करणात मोठ दु ख बाळगुन जगत होता. अमेरिकेत मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या कुमारी माताच्या सततीपैकी तो एक होता आईने आता लग्न करुन दुसरा ससार थाटला होता सावत्र बाप त्याला जवळ करीत नव्हता आई अधून मधून कधीतरी ५-१० डॉलर त्याला पाठवित असे अमेरिकन सरकारचे समाज कल्याण खात्याने असल्या लाखो अनौरस मुलाना जवळ केले आहे दर आठवड्याला याना ठराविक आर्थिक मदत मिळते याच्या शिक्षण आणि निवाऱ्याचा खर्च अमेरिकन सरकार करते. आई वडीलाच्या मायेला आसूसलेली

ही पोर दोरी कापलेल्या पतगासारखी भरकटत असतात. कोणी जीवनाच्या जोडीदाराच्या शोधात, तर कोणी मायेच्या शोधात, कोणी निवाऱ्याच्या शोधात तर कोणी मन शातीच्या शोधात.

ब्रायन हा उपजतच गुणी व सवेदनाशील मनाचा मुलगा होता शाती आणि प्रेमाची महती त्याला पटली होती अमेरिकेत जिथे जिथे शाती पदयात्रा, शाततेसाठी निदर्शन होत, तिथे तिथे हा पाठीवर आपल्या स्लिपिंग बॅगचे गाठोडे घेऊन जाई. ह्या पदयात्रेत सामिल होण्यासाठी तो दूरवरुन "हिच् - हायकिंग" करीत आला होता. त्याच्या खिशात ५ डॉलर सुध्दा नव्हते. हे ऐकून मी चकित झालो

"देन हाऊ विल यू मॅनेज टू गो बॅक ?" मी आश्चर्याने विचारले

"लॉर्ड बुद्धा इज ग्रेट. आय एम हियर फॉर गुड कॉज. ही विल टेक केअर ऑफ मी" तो शातपणे म्हणाला मी निरुत्तर झालो जरावेळाने मी प्रश्न केला

"ब्रायन व्हाय डीड यू टोल्ड मी यूवर सिक्रेटस् ?"

"बिकॉज यूआर इडियन. आय लव्ह इडियन्स " अशी सुरुवात करीत ब्रायनने सागितले की त्याचा कोणी तरी मूळ पूर्वज भारतीय होता अनेक वर्षापुर्वी गवडी कामासाठी तो पुर्वज अमेरिकेत आला आणि स्थाईक झाला आम्ही त्याचे वशज असे त्याची आई त्याला सागत असे म्हणून त्याला भारतीय माणसाविषयी विलक्षण ओढ होती ब्रायनने आपले अत:करण उघडे केले आणि माझे अतःकरण जिकून घेतले सध्याछाया झाकाळून येत होत्या ब्रायनच्या खाद्यावर हात टाकून चर्चकडे आम्ही परत येत होतो लहान मुलासारखा तो मला बिलगुन चालला होता. जणू त्याला आधार सापडला होता आणि मला ? मला जणू गतजन्मी हरवलेला माझा लहान भाऊ या अमेरिकेच्या भूमीवर सापडला होता !

सायकाळी सामुदायिक प्रार्थना आणि जेवण ७.३० पर्यंत आटोपले सकाळी घेतलेला "बोस्टन हेरॉल्ड" चा अक वाचायला मिळालाच नव्हता जेवणा नतर खालच्या प्रशस्त हॉलमध्ये सर्वजण गप्पागोष्टी करीत बसले होते मी वर माझ्या खोलीत आलो काचेच्या खिडकीतून बाहेर पाहिले चद्राचा पिवळट प्रकाश ढगातून दाट धुक्यातून कसाबसा वाट काढीत येत होता झाडाचे शेडे पिवळ्या पानाचे वाटत होते आज पौर्णिमा होती. अमेरिकेतील चादण्याची शोभा माझ्या मुक्कामात पाहण्याची माझी इच्छा सफल झाली नाही.

कारण सायकाळी ७ नतर गारठा पडे. दाट धुके पसरत असे मग चादणे तर सोडा पुढच पचवीस पावलावरचही काही दिसत नसे

अनिच्छेने मी पेपर हातात घेतला अमेरिकन लोकाच्या खिलाडूवृत्तीला साजेस पहिल्या पानावरचे हेडिग होत ------

"By by Gloria it's great to see you go!" सपूर्ण वर्तमानपत्र ग्लोरीया वादळाच्या बातम्यानी आणि छायाचित्रानी भरुन गल होत वादळाचा वृतात वाचून माझी मती चक्रावून गेली गेल्या २५ वर्षानतर या भागात आलेल भयानक चक्रीवादळ होत १०० मैल वेगाने वाहणारे भयानक वारे, १२ ते १५ फुटी समुद्राच्या प्रलयकारी लाटा आणि मुसळधार पावसाने न्यू पोर्ट, न्यू बेडफोर्ड, मॅसॅच्यूसेटस्, व्होड आयलड, न्यू हॅम्पशायर, मैने, व्हेरमाऊट, कनेक्टीकट एवढ्या विशाल किनारपट्टीच्या भूभागाला वादळाचा प्रचड तडाखा बसला होता. त्यात ५ जण मृत्यूमुखी पडले होते हजारो घराची छप्परे उडाली होती २ दशलक्ष घरात वीज खडीत झाली होती. सखल भागातील लाखो घरात पाणी भरले होते. तेथील नागरिकाना तात्पुरता पर्यायी निवास द्यावा लागला होता. हजारो झाडाची पडझड झाली होती त्यामुळे वाहतूकीत अडथळे निर्माण झाले होते. कित्येक मिलियन्स डॉलर्सच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते फ्रॅमिग हॅम येथे ४५० फुट उचीचा लोखडी कम्युनिकेशन टॉवर रेडिओ स्टेशनच्या इमारतीवर कोसळला होता. जवळ जवळ १५० शहराना "ग्लोरिया" चा फटका बसला होता परतू पूर्व सूचना दिली गेल्यामुळे व वादळाशी मुकाबला करण्याच्या जय्यत पूर्वतयारीमुळे मनुष्यहानी फारशी झाली नव्हती व मालमत्तेच नूकसानही वाचल होत.

या विनाशकारी "ग्लोरिया" च्या "सोनेरी कडा" दाखविणाऱ्याही काही बातम्या होत्या. "ग्लोरिया" च्या धसक्यामुळे डोर्चस्टर येथील एक माता दोन आठवडे आधीच प्रसूत झाली मुलगी झाली मुलीचे नाव "ग्लोरिया" ठेवले आई मुलीचे छायाचित्रही छापून आले होते एका क्रूझरच्या कॅप्टनने त्याच्या कुत्र्याला बरोबर नेता येणार नाही म्हणून बोट सोडून दुसरीकडे आश्रयाला जाण्यास नकार दिला. त्या कॅप्टनचे असे म्हणणे पडले की या कुत्र्याशिवाय जगात जवळचे असे मला कोणीच नाही म्हणून "If my dog can't go, I don't go" तसेच भर वादळात किनाऱ्यावर "बीचपार्टी" साजरी करणाऱ्या पतिपत्नीचे छायाचित्र होते

"ग्लोरिया" शी सामना करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने जी पूर्व

तयारी केली होती त्याचा वृत्तात वाचल्यावर एखादा समारभ असो अथवा सकट असो अमेरिकनाचे नियोजन किती तत्रशुध्द असते याचे प्रत्यतर येते तिथली यत्रणा किती कार्यक्षम व जबाबदारीच्या जाणीवेतून काम करणारी आहे हेही दिसून येते व आलेल्या प्रसगालाही किती धीराने, सयमाने किती खिलाडूवृत्तीने ते तोड देतात हे पाहिले की त्याच्या गुणाचे कौतुक वाटते

"ग्लोरिया" च्या सदर्भातील हकीकतीवरुन ते आपल्या लक्षात येते चक्रीवादळात कशा तऱ्हेच्या प्रसगास तोड द्यावे लागेल हे कळण्यासाठी राज्य व स्थानिक अधिकाऱ्याची "Mock hurricane drill" घेण्यात आली होती २७०० नॅशनल गार्डस् लोकाच्या मदतीसाठी तैनात होते १२५ नॅशनल गार्डस् कोणी स्टोअर्स लुटू नयेत म्हणून तैनात ठेवले होते फ्रॅमिनगहॅम किल्ल्यात जमिनीखाली ४० फुट खोल सिव्हील डिफेन्स बकरमध्ये १५० निवडक अधिकाऱ्यासह स्वत जातीने गव्हर्नर मायकेल डुकाकीस, रुमर कट्रोल डायरेक्टर माईक फिलब्रेन याजसह रात्री २ ते दुसऱ्या दिवशी सायकाळी ७ पर्यत डोळ्यात तेल घालून सगळीकडे सपर्क साधित होते, आदेश देत होते, नियत्रण ठेवित होते साधी सॅन्डवीच, बटाटा चीप्स् खाऊन हसतमुखाने एवढी प्रचड जबाबदारी झेलीत होते वादळाशी प्रत्यक्ष झुज देण्यास आपल्या हाताखालच्या लोकाना योग्य त्या सूचना देत होते तसेच धीराचे आणि कौतुकाचे चार शब्द सागून त्याची हिंमत वाढवित होते. आपण प्रत्यक्ष आघाडीवर जाऊ शकत नसल्याची त्याना खत वाटत होती म्हणून वार्ताहाराना मुलाखत देताना त्यानी सागितले "I felt like the legendary stay-at-home General telling his troops, he was sorry he couldn't be with them !"

आपल्याकडे अशा काही आपत्ती आल्यावर काय परिस्थिती होते? मत्री, वरीष्ठ आधिकारी, शासन यत्रणा अशावेळी कुठे असते? आपत्तीच्या प्रसगी आणि तदनतर लोकाच्या काय हालअपेष्टा होतात? हे मायभुमीचे चित्र अमेरिकेच्या या चित्राच्या पार्श्वभूमीवर माझ्या डोळ्यासमोर आले. आणि मी एक मोठा आवढा गिळला.

"गिळला एक आवढा

आणिक गिळले सारे

# ८ : वेस्ट ओव्हर एअर बेसवर धडक

वयोवृध्द बुध्दभिक्षू शाती शुगे शोनीन याच्या नेतृत्वाखाली आजची आमची पदयात्रा स्वच्छ सुर्यप्रकाशात सुरु झाली उबदार ऊन, ताजातवाना निसर्ग, उत्साही माणस आणि उल्हसित वातावरण त्या राखाडी तुळतुळीत रस्त्यावरुन धावत जावे असे वाटत होते चर्चच्या टेकडीवरुन उतरत आमची राग मुख्य रस्त्यावर पोहोचते तोच स्थानिक पोलिस अधिकाऱ्याची गाडी हजर आमच्या 'पब्लिक रिलेशन' प्रमुख सिस्टर बेथ यानी नेहमीप्रमाणे पोलिसदादाची समजुत घातली पण आजचे पोलिस आम्हाला दृष्टीआड करायला तयार नव्हते आम्ही रस्त्याच्या डाव्या बाजूने चाललेलो असायचो व त्याची गाडी सथपणे उजव्या बाजूने आमच्या बरोबर चाललेली असायची अर्थात आम्हालाही आता अमेरिकन पोलिस अधिकाऱ्याची चागलीच सवय झालेली होती त्याची उपस्थिती आम्हाला सहाय्यभूत ठरत असल्यामुळे ते बरोबर असल्याचा आम्हाला आनदच वाटत होता

कालच्या ७-८ पदयात्रींच्या सहभागामुळे आमची आजची राग बरीच लाबलचक झाली होती आमच्या पदयात्रेचे दृष्य मोठे आकर्षक दिसत असे सर्वात पुढे "World Peace March - 1985" असा छोटा कापडी फलक दोन्ही बाजूनी धरुन दोन पदयात्री चालत आज मर्सिडीज व एक दाढीवाला अमेरिकन तरुण या दोघानी तो फलक धरला होता. त्याच्या मागे परुण देखणा बुध्दभिक्षू केन फ्लेमिग गडद जाभळ्या रगाचा जपानी अक्षरे लिहिलेला ध्वज घेऊन ताठ कण्याने चालत असे हा ध्वज अत्यत देखणा व भव्य होता. आठ फुटी ॲल्युमिनियमच्या पोलवर, दोन फुट रुद व सहा फुट लाब असा तो

ध्वज, त्याचा तो गडद जाभळा रग व शुभ्र रगातील भली मोठी "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" ही जपानी अक्षरे सभोवतालच्या वृक्षराजीच्या पोपटी रगाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत. त्यामागे ७-८ बुध्दभिक्षू - भिक्षूणी एका तालात छोटे ड्रम वाजवित, धीर गभिरपणे "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्राचा घोष करीत चाललेले असत त्याची ती तेजपुज रुप, ती पीत वस्त्रे पाहणाऱ्याला नतमस्तक करीत त्यामागे आम्ही ३०-४० पदयात्री विविध देशाचे, विविध वशाचे, विविध वर्णाचे. ह्या सर्वाचे मिळून एक लोभसवाण दृष्य तयार होई. जे पाहणाऱ्याला आकर्षित करीत असे खिळवून ठेवित असे भरधाव वेगाने जाणारे मोटारवाले आम्हाला पाहून क्षणभर थाबत, वेग कमी करीत, कोणी कार रस्त्याच्या बाजूला लावून चार पावले आमच्या समवेत चालत एखाद गाव अथवा शहर लागल की प्रेक्षकाच्या उत्साहाला उधाण येत असे. मोटारींच्या भल्यामोठ्या राग आमच्याबरोबर सथपणे चालत आमच निरीक्षण करीत. घरातली, दुकानातली माणस हातातल काम सोडूनबाहेर येत आणि आम्ही दृष्टीआड होईपर्यंत पाहत राहत तरुण पोर हात हलवून, ओरडून आम्हाला उत्तेजन देत बालगोपाळ मडळी तर भिक्षुच्या ड्रमच्या तालावर नाचत नाचत दूरपर्यंत आनदाने आमच्याबरोबर येत. अमेरिकन समाजाला हे दृष्य अपरिचित होते त्याच्या नजरेत विलक्षण उत्सुकता व कुतुहल असे अबालवृद्ध सारेच आमच्याकडे आकर्षिले जात. जाता जाता आमचे पत्रके वाटण्याचे, प्रणाम करण्याचे काम चालूच असे अमेरिकन लोकाच्या आपुलकीच्या प्रतिसादामुळे आमचा उत्साह द्विगुणित होत असे

आज दुपार पर्यत आम्ही २-३ शहरे ओलाडली होती जाताजाता खूपशी माहितीपत्रके वाटली होती. स्वच्छ व तरतरी आणणाऱ्या झुळझुळ वाऱ्यात दुपारच्या जेवणापर्यंत आम्ही चागला वीस एक मैलाचा पल्ला गाठला होता मजेची गोष्ट म्हणजे पोलिसाच्या गाडीने आज क्षणभरही आमची साथ सोडली नव्हती दुपारी दिडच्या सुमारास एका हॉलिडे कॅम्पच्या हिरवळीवर आम्ही लचसाठी विसावलो ते पाहून ते पोलिस ऑफीसर्स भूर्रकन गाडी घेऊन पुढे कुठेतरी गेले

भूक चागली जोरदार लागली होती मी तिथल्या एका लाकडी ओडक्यावर बसलो ब्रायनने आमच्या दोघाच्या वाट्याचे सँडवीच आणले त्याचवेळी त्याने बातमी सागितली की आज आपल्याकडे लचसाठी भरपूर जेवण नाही आज लचचे "रेशनिग" आहे प्रत्येकाला एक सँडवीच व सर्वांना वाटून उरले तर फारतर अर्धं अर्धं सँडवीच मिळण्याची शक्यता होती. पीनट

बटर, मध लावलेल व आत टोमॅटोची फोड सॅलेडचा कोवळा पाला घातलेल सॅंडवीच भूकेपोटी खूप रुचकर लागायच दुसऱ्या राऊंडला सुदैवाने प्रत्येकाला अर्धे अर्धे सॅन्डवीच आल तेवढ्याने काय भूक भागतेय। पण प्रत्येकजण जराही कुरकुर न करता हसतमुखाने तेवडच खाऊन गप्प बसत होता वर एक ग्लास ताजा ॲपलज्यूस पिऊन सर्वजण हिरवळीवर पडून विश्राती घेऊ लागले मी आणि ब्रायन फिरण्याच निमित्त करुन थोडेस दूर गेलो व सिगरेट पिऊन गुपचूप पुन्हा परत आलो

तासभर विश्राती घेऊन पुन्हा आमची पदयात्रा सुरु झाली जरा थोडे चालून जातो तर पुन्हा मघाची ती पोलीस अधिकाऱ्याची गाडी हजर आम्ही आपले त्याच्याकडे पाहिले न पाहिले असे करीत चालू लागतो पलीकडच्या बाजूने त्याची गाडी अलिकडच्या बाजूने आम्ही चाललोय चाललोय। आमची आपली मार्गक्रमणा चालली होती तेही आपली चिकाटी सोडीत नव्हते

दुपारच्या जेवणानतर साधारण २- २ ॥ तास चाललो की आमची त्या दिवसाची पदयात्रा सपायची साधारण पदयात्रेची आखणी तशा तऱ्हेची केलेली असे दर दिवशी साधारण २५ ते ३० किलोमिटर चालावे लागे

आज मात्र काहीतरी वेगळाच प्रकार दिसत होता ४ ॥ वाजते तरी आम्ही आपले चालतच होतो लचनतर दोनदा थाबून पाणी पिण्याचा ब्रेक झाला. तिसऱ्या छोट्या विश्राती नतर जेव्हा पुन्हा उठून आम्ही चालू लागलो त्यावेळी बहुतेक सगळे पदयात्री नवलाने एक दुसऱ्याकडे पाहू लागले पण कोणी काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. निमुटपणे भिक्षूच्या पाठोपाठ आम्ही पाऊले टाकत राहिलो सायकाळी ५ ॥ चा सुमार झाला. सकाळपासून जवळजवळ ४० किलोमिटर अतर आम्ही चाललो होतो सकाळपासून आमच्या सोबत चाललेल्या पोलिस गाडीतील ऑफीसर्स आश्चर्याने आमच्याकडे पाहत होते आमच्याविषयी त्याना कणव वाटू लागल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागले होते आमच्याकडे दयेचा दृष्टीक्षेप ते टाकू लागले होते सध्याकाळच्या सावल्या गडद होत चालल्या होत्या. हवेत गारवा जाणवू लागला होता. दुपारच्या "मिनी लच" मुळे आता भुकेचे कावळे पोटात चोची मारु लागले होते इतक्यात समोरुन वेगात येणारी आमची सुपरीचित बस दिसली. ड्रायव्हर जो ने हॉर्न वाजवून हात हालवून आमचे लक्ष वेधले आणि आनदातिशयाने सर्वांनी एकच जल्लोश केला. जो ने बस वळवून एका बाजूला थाबविली आम्ही ही "नम्यो - हो - रेंगे क्यो" म्हणून पदयात्रेचे विसर्जन केले व उड्या मारीतच बस भोवती जमा झालो सकाळपासून आमच्या बरोबर

चाललेल्या पोलीस अधिकाऱ्यानी आपली गाडी थाबवून ते आमच्याकडे आले आमच्या शात, सयमी वागण्याने आणि कठोर परिश्रमाने ते फारच प्रभावित झाले होते आमच्यासारखे तरुण सोडाच पण आमच्या ग्रुपमधील ६०-६५ वर्षाच्या वृद्धानी ही जवळ जवळ ४५ किलोमीटर रस्ता एका दिवसात तुडवला होता कसलीही कुरकुर न करता सर्वजण सतत चालत राहिले होते पोलीस अधिकाऱ्यानी आमची मुक्तकठाने प्रशसा केली प्रत्येकाशी हस्तादोलन केले आणि गाडी वळवून परत गेले आम्ही ही बसमध्ये भराभरा शिरलो आत बसल्यावर कुणी बुट काढू लागले कुणी कुणी आपले पाय चेपू लागले हास्यविनोदाला उधाण आले ड्रायव्हर जो ने देखील बस चालवता चालवता भसाड्या आवाजात आपले गायन सुरु केले

सायकाळी ६ वाजता आम्ही आमच्या मुक्कामाच्या चर्चवर पोहोचलो थडी कडाक्याची पडली होती सुदैवाचा भाग म्हणजे आमच्या चर्चमध्ये गरम पाण्याच्या शॉवरची सोय होती मनसोक्त शॉवरबाथ घेऊन सायकालीन प्रार्थनेला बसलो तेव्हा खूप प्रसन्न वाटत होत रात्रीच्या जेवणात चिकन, टूनाफिश, ब्रेड, जाम, बटर, ॲपल्स अगदी दणदणीत व्यवस्था होती सगळेजण जेवणावर तुटून पडले रात्री स्लिपिंग बॅग मध्ये घुसल्या घुसल्या डाराडूर झोप लागली

३० सप्टेंबरच्या सकाळी उठलो तेव्हा सारे अग ठणकत होते माड्या, पोटऱ्या पायाचे तळवे यातून गरम वाफा निघताहेत अस वाटत होत मी पायाच्या तळव्याचे निरिक्षण केले टाचाना भेगा पडल्या होत्या. पायाना किंचित सूज आली होती चालताना वेदना होत होत्या. कमी अधिक फरकाने साऱ्याची हीच परिस्थिती झाली होती

सकाळी ब्रेकफास्टच्या टेबलावर सिस्टर बेथ ने सागितले की, आजचा पहिला कार्यक्रम म्हणजे "द वेस्ट ओव्हर एअरबेस" वर निदर्शने करणे व नतर पदयात्रा होऊन आम्ही चिकोपी शहरात सायकाळी मुक्कामाला जाणार होतो प्रथम आम्ही आमच्या बसने "वेस्ट ओव्हर" एअरबेसवर जाणार होतो.

अमेरिकेच्या एअर बेसवर निदर्शन करायचे हे ऐकून माझ्या अगात उत्साह सचारला. त्याच्यात थ्रिल होत एक चॅलेंज होत. मी मनातून अगदी खुष झालो

आमची बस निघाली त्यावेळी बाहेर दाट धुके पसरले होते थडी कमालीची होती धुक्यामध्ये आर्द्रता होती बर्फाचा चुरा उधळून दिल्यासारखा

वाटत होता. बसमध्ये ब्रायन माझ्या शेजारी बिलगून बसला होता बोलताना आमच्या तोंडून वाफा निघत होत्या

तासाभरात "वेस्ट ओव्हर" एअर बेसच्या गेट जवळ आम्ही सर्वजण उतरलो धुके अजून तसेच दाट आणि ओले होते सारेजण थंडीने कुडकुडत होते सिस्टर बेथने आम्हाला आजच्या निदर्शनाचे महत्व थोडक्यात विशद करुन सांगितले अण्वस्त्रे ही मानव संहारक व सृष्टीचा विनाश करणारी आहेत युद्ध आणि अण्वस्त्राच्या वापराला विरोध हे आमच्या शांतता चळवळीचे मूलभूत तत्व होते त्यासाठी अहिंसक, शांततामय निदर्शने करणे हा आमच्या चळवळीचा एक प्रमुख भाग होता

दुसऱ्या महायुद्धात जपानच्या हिरोशिमा, नागासाकी शहरावर हल्ला करण्यासाठी ज्या हवाई तुकडीची नेमणूक करण्यात आली होती. त्या तुकडीचा मुक्काम सध्या वेस्ट ओव्हर एअर बेस येथे होता. हिरोशिमा, नागासाकी बॉम्ब हल्ल्यानंतर जी वाताहत झाली त्याची ह्दयाचा थरकाप उडविणारी पोस्टर्स आम्हाला प्रत्येकाला गळ्यात अडकविण्यास दिली. अणूशक्तीच्या विध्वंसक अस्त्रामुळे मानव जातीला व निसर्गाला किती भयानक यातना सहन कराव्या लागल्या ते या पोस्टर्सद्वारे दाखवून त्या दु:खद स्मृतींना आम्ही पुन्हा उजाळा देणार होतो तिथल्या सैनिकांना मानवतेची साद घालणार होतो मदोन्मत्त सत्ताधिशाच्या संहारक शक्तीसमोर धीटपणे उभे राहून आम्ही त्याचा निषेध करणार होतो त्याबद्दल आम्हाला अटक होऊ शकणार होती. शिक्षा होऊ शकणार होती. अथवा आम्हाला अमेरिकेतून हाकलून दिले जाऊ शकणार होते आम्ही नि:शस्त्र होतो. आमचा मार्ग शांततेचा होता. आम्ही अहिंसक मार्गाने आमच्या भावना व्यक्त करणार होतो

जगातील साऱ्या शांतताप्रेमी मानवांच्या सदिच्छा, त्यांचे आशिर्वाद आमच्या पाठीशी होते. आमचं बळ हेच होत.

बुद्धभिक्षू केन फ्लेमिंगच्या हातात आमचा ध्वज होता. शांततेचा, प्रेमाचा संदेश देणारा तो ध्वज घेऊन केन फ्लेमिंग आमचा अहिंसक योद्धा "नम्यो - हो - रेंगे - क्यो" असा घोष करुन तिरासारखा वेगाने एअर बेसच्या प्रवेशद्वारातून आत घुसला त्याच्या पाठोपाठ बुद्धभिक्षू आणि आम्ही ओळीने मुसंडी मारली. आतमध्ये दोन फर्लांगावर असलेल्या दुसऱ्या तपासणी चौकीजवळ आम्ही पोहोचलो तेव्हा कुठे आतले सिक्युरिटी ऑफिसर्स सावध झाले. पटापट दरवाजे बंद झाले अधिकाऱ्यांची धावपळ झाली त्यांना आम्ही

संपूर्णपणे बेसावध पकडले होते आमच्या अचानक आगमनाने तिथे मोठी धमाल झाली बंद गेटसमोर शांतपणे ओळीने उभे राहून "नम्यो - हो - रेंगे - क्यो" चा सामुदायिक घोष करीत आमचे शांततामय निदर्शन सुरु झाले पाचच मिनिटात कुठूनशा धडाधड वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याच्या गाड्या येऊन धडकल्या छातीवर बिल्ले लटकावलेले ४-५ लष्करी अधिकारी आमच्याकडे आले सिस्टर बेथ पुढे येऊन नम्रपणे त्याच्याशी बोलू लागली एवढ्यात कुठूनशा दूरदर्शन आणि वर्तमानपत्राच्या वार्ताहराच्या गाड्या येऊन थडकल्या. तेथील "ट्रान्सस्क्रिप्ट टेलिग्राम" ची वार्ताहर तरुणी येऊन आम्हाला प्रश्न विचारु लागली तिची सहाय्यक फोटो घेऊ लागली दूरदर्शनच्या कॅमेरेवाल्यानी निदर्शनाचे चित्रण करायला सुरुवात केली.

सिस्टर बेथ बरोबरच्या चर्चेतून बहुधा आमच्या शांततामय निदर्शनाच्या हेतूच्या चांगुलपणाविषयी व आमच्या निषेधाच्या अहिंसक स्वरुपाविषयी वरिष्ठ हवाई अधिकाऱ्याचे समाधान झाले असावे ५-१० मिनिटातच ड्यूटीवरच्या अधिकाऱ्याना काही सूचना देऊन ते निघून गेले एक मोठ संकट टळल होत. याक्षणी काहीही वाईट घडू शकल असत. पण बुद्ध भगवानाच्या कृपेने काही अनिष्ट घडले नाही दोन तास शांततामय निदर्शने करुन आम्ही वेस्ट ओव्हर एअर बेसचा निरोप घेतला तिथून पुन्हा आमची पदयात्रा सुरु झाली व दुपारच्या भोजनाच्या वेळेपूर्वी चिकोपी शहरातील चर्चमध्ये आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो

कालच्या, सहनशक्तीचा अंत पाहणाऱ्या पदयात्रेच्या पार्श्वभूमीवर आजची छोटी पदयात्रा आम्हाला अगदी पिकनिक सारखी वाटली दुपारी जेवल्यावर मी आणि ब्रायन "चिकोपी शहर पाहण्यासाठी निघालो सुपर मार्केट, कपड्याची दुकाने, हॉटेल्स अशी मनसोक्त भटकंती करीत करीत आम्ही आरामात पुन्हा ५ वाजता चर्चवर पोहोचलो अमेरिकेच्या कुठल्याही शहरात फिरताना कधी कटाळा येत नाही कुठल्याही दुकानात शिरा. खरेदी करा अथवा करु नका. कोणीही विचारीत नाही रस्त्यावर मोटारीची रहदारी सतत चालू. रस्ता क्रॉस करायचा असेल तर शेजारच्या खांबावर लावलेला लोखंडी खटका दाबायचा लगेच वाहतुक थांबण्याचा सिग्नल मिळतो गाड्या थांबवितात. आपण रुबाबात रस्ता ओलांडायचा या अमेरिकन माणसाचा, शहराचा, दुकानाचा, निसर्गाचा आता मला विलक्षण लळा लागला होता."

सध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळी माझ्या दृष्टीने एक फारच चांगली घटना घडली सकाळ, सध्याकाळ रोज अनेक धर्माची प्रार्थना होत याचा मागे

मी उल्लेख केलेलाच आहे. आमच्यापैकी ठराविक मडळी त्याच्या त्याच्या प्रार्थना म्हणत त्याचा क्रम देखील टरलेला असे अशा वेळी आपण एखाद भारतीय प्रार्थनाही म्हणण्याची मला अनावर इच्छा होई. त्या दिवशी प्रार्थनेअगोदर बुद्धभिक्षू शाती शुगे शोनीन याच्याकडे पूजेच्या वेळी भारतीय प्रार्थना म्हणण्याची इच्छा मी प्रदर्शित केली आश्चर्य म्हणजे त्यानी ती तात्काळ मान्य केली व सर्वात शेवटी माझा क्रमाक ठेवला. प्रत्येक प्रार्थनेनतर अर्धा मिनिट मौन पाळण्यात येई. फिल एडमडस्ची प्रार्थना सपली की मी प्रार्थना म्हणायचे ठरले

नेहमीप्रमाणे प्रथम बौद्ध प्रार्थना झाली मग ज्यू, रेड इडियन असे एकेक प्रतिनिधी धीर गभीरपणे आपल्या प्रार्थना बोलू लागले इकडे मी विलक्षण अस्वस्थ झालो होतो आपण चुकणार तर नाही ना? घाबरणार तर नाही ना? अशी भिती वाटत होती. फिल एडमडसची प्रार्थना सुरु झाली. मी श्वास रोखून धरला. माझ्या हृदयाची धडधड मला ऐकू येऊ लागली

मधले मौन पाळण्याचे अर्धे मिनिट मला प्रदीर्घ लाबीचे वाटले मी मनातल्या मनात बुद्ध भगवानाचे स्मरण केले आणि चर्चच्या त्या भव्य हॉलमध्ये निरव शाततेत खणखणीत आवाजात ज्ञानेश्वरीतील पसायदान गाऊ लागलो

"आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे"

तोषोनी मज द्यावे, पसायदान हे. "

चर्चच्या घुमटात माझा स्वर घुमला ही कोण प्रार्थना गातो आहे म्हणुन चक्कित होऊन सर्वजण मागे वळून पाहू लागले दुसऱ्या कडव्यानतर माझा स्वर तापला "दुरिताचे तिमीर जावो " च्या वेळी आवाज सणसणीत टिपेला लागला. माझाच स्वर मला गोड वाटू लागला

मी प्रार्थना सपविली पुन्हा त्रिवार सामुदायिक "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" चा घोष झाला आणि सर्वांनी येऊन मला घेरले माझ्यावर कौतुकाचा वर्षाव सुरु झाला. मी रोज सकाळ सध्याकाळ प्रार्थना म्हणावयाचीच असे सर्वांनी माझ्याकडून वचन घेतले त्याच्या प्रशसेने मी हेलावून गेलो मी मनातल्या मनात ठरवून टाकले यापुढे रोज सकाळ सध्याकाळ नवनवीन प्रार्थना म्हणायच्या. या प्रार्थना गायनाने मी त्यानतर सर्वांचा लाडका गायक झालो

# ९ : अमेरिकेतील गाधीजयंती

दुसऱ्या दिवशी पहाटे उठलो त्यावेळी जाणवले की, पाय दुखताहेत टाचेच्या भेगा पाय खाली टाकू देत नव्हत्या चालताना फार वेदना होत होत्या पायाच्या वरच्या शिरेला सॅडल लागून तिथेही सूज आली होती थडी कडाक्याची होती बाहेर दाट धुके होते

सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी "माटी कहे कुम्हारसे तू क्या रुँधे मोहे, एक दिन ऐसा होएगा, मै रुँधूगी तोहे" हे कबीराचे भजन गायले व सर्वांना खुष केले ब्रेकफास्टच्यावेळी "ट्रान्सस्क्रिप्ट टेलीग्राफ" या स्थानिक वृत्तपत्राचा अक पहायला मिळाला पहिल्या पानावर हेड लाईन व फोटोसह आमच्या कालच्या "वेस्ट ओव्हर एअर बेस" वरील निदर्शनाचा सविस्तर वृतात आला होता. त्याचप्रमाणे आमच्या काही जणाच्या मुलाखतीचा काही भागही वार्ताहराने उधृत्त केला होता

आजच्या पदयात्रेला नेहमीप्रमाणे सकाळी ७.३० ऐवजी ७ वाजता सुरुवात झाली त्यावेळी मी पाहिले की सिस्टर बेथ एका पायात मोज्यावर स्लिपर व दुसऱ्या पायात बूट घालून लगडत चालत होत्या. धावतही होत्या. मी त्याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता त्याच्या एका पायाला बूट लागून सेप्टिक झाल्याचे कळले तरीही त्या हसतमुखाने धावपळ करीतच होत्या. आमच्या ग्रुपमध्ये परवा सामील झालेली एक अमेरिकन तरुणी तापाने फणफणली होती पण तरीही तिथे बसमधून जाण्यास नकार देऊन तसल्या जिवघेण्या थडीत अगात टेंपरेचर असताना आमच्यासमवेत चालत होती ते पाहून मी ही "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" चा मत्रघोष करीत चालत राहीलो

आज आम्हाला चिकापा त नॉदर्हम्प्टन या शहरापर्यंत पदयात्रा करायची होती या भागात बरेचसे कारखाने आणि औद्योगिक वस्त्या आढळल्या; तरी देखील कुठेही बकालपणा, ओंगळपणा अजिबात नव्हता. इथ देखील निसर्ग सौंदर्य कटाक्षाने जपलेले दिसत होते थोड्या अतरावर गाव, शहर पण लागत होती एका ठिकाणी, रस्त्याच्या कडेला "कचरा टाकणाऱ्यास २०० डॉलर दड" असा फलक पाहीला आणि मी उडालोच बापरे २०० डॉलर म्हणजे भारतीय रुपयाच्या हिशेबाने झाले २,४०० रु. मी कारण नसताना मनात धास्तावलो अस्वच्छ सवयीच्या माणसाना एवढा जबर दड ! कोण धजावणार इथे कचरा टाकायला.

मध्ये काही गावे लागली. तिथे बगल्याजवळ मोकळ्या जागेत पम्पकीनची शेते आढळली. शेकडो पिवळे धम्मक् ताबूस छटा असलेले भोपळे सर्वत्र पसरलेले काही बगल्याच्या प्रवेशद्वारावर, आजूबाजूला ते भोपळे कलात्मकरित्या रचून आरासही केलेली आढळली. नतर दोन दिवसानी "पम्प्कीन केक" खाण्याचाही योग आला सिस्टर बेथने मला सागितले की हे भोपळे इथले लोकं प्रामुख्याने नाताळात आरास करण्यासाठी वापरतात भोपळ्याला वरुन भोक पाडून आतील गर खरडवून काढतात. मग त्याच्यावर नाक डोळे कापून आत दिवा लावतात. घरावर तऱ्हेतऱ्हेची माणसाची तोडं लटकवल्यासारखी मोठी मजेदार दृष्यं नाताळात पाहावयास मिळतात

दुपारी एका गावाच्या सार्वजनिक पार्कच्या हिरवळीवर आम्ही जेवायला थाबलो त्यावेळी एक महिला पोलीस ऑफीसर आमच्याजवळ आली तिथल्या सार्वजनिक नळाचे पाणी आमच्या प्लॅस्टिक कॅनमध्ये भरुन घेण्याचे काम मी आणि ब्रायन करीत होतो तिने आम्हाला ते पाणी घेण्यास प्रतिबध केला. हा नळ सहसा कोणी वापरीत नाही, म्हणून पाणी दुषित असण्याचा सभव आहे असे तिने सांगितले तिने आमच्या हातातून कॅन घेतला व आपल्या पोलिसी गाडीतून भूर्रकन निघुन गेली पाचच मिनिटात ती आमचा कॅन व अजून दूसरा एक कॅन भरुन कुठूनसे ताजे, स्वच्छ पाणी घेऊन आली दुसर काही लागल तर सागा म्हणाली व आमच जेवण होईपर्यंत गाडीत बसून राहीली तिच्या अनाहूत सौजन्याने आम्ही भारावून गेलो

जेवणानतर विश्राती घेत असताना फिल एडमडस् माझ्याजवळ आला. पाठीवरची छोटी बॅग काढून त्याने बाजूला ठेवली व मला सँडल्स व मोजे काढण्याची विनती केली बहूधा त्याने मला आज चालताना लगडत असता पाहीले असावे मी नको नको म्हणत असता त्याने माझे पाय मोकळे

केले माझे सुजलेले पाय आणि टाचाच्या रक्ताळलेल्या चिरा पाहून त्याला फार वाईट वाटले त्याच्या पिशवीतून त्याने प्रथमोपचाराचे सामान काढले माझ्या टाचाच्या चिराना हळूवार हाताने व्हॅसलीन चोळले पायाच्या वरच्या भागाची चामडी सँडल लागून सोलून निघाली होती तिथे त्याने बँडएड पट्ट्या लावल्या पोटऱ्याना हलक्याहाताने मसाज केला आणि ही सर्व सेवा झाल्यावर वरुन मला "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" अस म्हणून प्रणामही केला नकळत माझे डोळे पाण्याने भरुन आले. कोण कुठली ही माणस. किती ममतेने शुश्रुषा करतात. किती अकृत्रिम जिव्हाळा, केवढी करुणा ह्याच्या हृदयात भरलेली आहे. पुन्हा उठताना हा सर्व प्रथमोचार शेजारी बसून स्मितहास्य करीत पाहणाऱ्या नारा भिक्षूणिला फिल म्हणाला. "माणस अशी दुखऱ्या पायानी, तरी देखील हसत मुखाने चालताना ज्यावेळी मी पाहतो, तेव्हा मला त्याच फार कौतुक वाटत"

नतर पुन्हा आम्ही जेव्हा पदयात्रेला सुरुवात केली तेव्हा मला चागलाच फरक जाणवला आता मी टाचा आरामात टेकू शकत होतो वेदना जवळ जवळ नाहीशाच झाल्या होत्या बँडएडमुळे सॅडलही पायाला खुपत नव्हती मला टूणटूण उड्या मारताना पाहून हसत फिल म्हणाला -

"नाऊ, यू फील बेटर, मॅनहर ?"

"फार बेटर, व्हेरी काईड ऑफ यू, फील।" मी प्रेमभराने त्याच्या हाताचे चुबन घेत म्हणालो

दुपारनतर हवेत चागला बदल झाला होता. स्वच्छ सूर्यप्रकाश चोहीकडे पसरला होता हवा उबदार झाली होती वातावरण अस असल की अमेरिकेत खूप उत्साही वाटत. भोवतालच्या पोपटी निसर्गाची काती अधिकच तजेलदार दिसू लागते फुलाचे रग अधिकच आकर्षक दिसू लागतात. झऱ्याच पारदर्शी पाणी जणू तळाची सगळी दौलत आपल्याला उघडी करुन दाखवतं उन्हाच्या उष्ण स्पर्शाने झाड, पान, सुगधी निश्वास टाकू लागतात. सगळच वातावरण अस गधदूध होऊन जात मला माझ्या तीन आठवड्याच्या अमेरिकेच्या भटकतीत एकच उणीव जाणवली ती म्हणजे पक्षाची मी शेकडो मैल पायी फिरलो, मोटारीतून फिरलो, दाट जगल पाहिली, हिरवीगार वनंही पाहिली ज्याला "व्हर्जीन फॉरेस्ट" म्हणता येईल अशी माणसाच्या पद्स्पर्शापासून दूर असलेली निबिड जगल पाहिली. पण त्या जगलावर मला पाखराचे थवे दिसले नाहीत विशाल वृक्षाच्या फाद्यावर बागडणारे पक्षी दिसले

नाहीत थव्याथव्याने उडणारे, चोचीत चोच घालून बसलेले, शिळ घालणारे, चिवचिवाट करणारे पक्षी अमेरिकेच्या झाडावर काही मला दिसले नाहीत त्यामुळे ती झाड मला वाझोटी वाटायची एखाद्या सुखवस्तू सुस्वरुप पण अपत्य नसलेल्या बाईसारखी कदाचित तो काळ हिवाळ्याच्या आगमनाच्या सुरुवातीचा असल्यामुळे कदाचित त्या काळात पक्षी स्थलातर करीत असावेत. पण तरीही मला अस वाटायचच, की इथ, या वृक्षावर पक्षी असायला हवे होते रगीबेरगी, शिळ घालणारे, फाद्यावर बागडणार. साऊदॅम्प्टन शहराच्या अलिकडे आम्ही पाणी पिण्याच्या छोट्या विश्रातीसाठी थाबलो शेजारुन एक नदी वाहत होती आणि दूरवर तिचे पात्र रुद आणि खोल झालेले दिसत होते आम्ही बसलो होतो तिथे आजूबाजूला छोट्या मोटार बोटी ठेवलेल्या होत्या त्या नदीच्या पात्रात काही मडळी आपल्या छोट्या मोटारबोटीतून जलविहार करीत होती माणस आपल्या मोटार बोटीच्या टपावर ठेऊन अथवा ट्रॉलीने मागे जोडून फायबरग्लासच्या मोटारबोटी घेऊन येत होती नौकाविहार करीत होती तिथून जात होती बहूतेकजण एकटेच येत होते आणि गमत म्हणजे त्यावेळी बहुतेक वृध्दमडळीच दिसत होती आपल्याला हवे ते छद करण्याची ऐपत अमेरिकन माणसात आहे आणि त्यासाठी त्या त्या तऱ्हेच्या सुखसोयी, त्यच्या सरकारने त्याना उपलब्ध करुन दिल्या आहेत

सायकाळा ५च्या सुमारास आम्ही नॉर्थहम्पटन या आमच्या मुक्कामाच्या शहरात दाखल झालो हे एक फॅशनेबल शहर म्हणून त्या भागात ओळखले जाते शहराची बाजारपेठ असलेल्या मुख्य भागातून, ड्रम्सचा गभीर ध्वनी करीत व “'नम्यो - हो - रेन्गो - क्यो' असे म्हणत आमची मिरवणूक चालली त्यावेळी सगळी बाजारपेठ दणाणून गेली रस्त्याच्या दुतर्फा आम्हाला पाहायला माणसानी गर्दी केली. अशा रगसगतीची वैचित्र्यपूर्ण वाद्ये वाजवीत जाणारी व अपरीचीत मत्र घोष करणारी मिरवणूक त्याच्या दृष्टीने कौतुकाचा, नाविन्याचा विषय होती लोकाचे औत्सुक्य पाहून आम्हालाही हुरुप आला.

आजच्या सायकालीन प्रार्थनेच्या वेळी मी “ए मालिक तेरे बदे हम” हे प्रार्थनागीत म्हटले त्यानतर आम्हाला तास दीड तास शहरातून भटकून यायला परवानगी मिळाली परतु ७ वाजेपूर्वी परत येण्याची अट होती नॉर्थहॅम्प्टन शहराची बाजारपेठ नुसती झगमगत होती कपडे, खेळणी, इतर वस्तू यानी ती भव्य दुकाने नुसती ओसडून चालली होती ब्रायन मला सार काही दाखवत सुटला होता. अनेक दुकानाच्या शोकेसेस मध्ये आमच्या लेव्हरेत येथील पीस पॅगोडाच्या रगीत पोस्टर्सची सजावट केलेली आढळली. एके

ठिकाणी फूटपाथवर वर्तमानपत्रे ठेवली होती तिथे विक्रेता नव्हता माणस येत. वर्तमानपत्र उचलीत २५ सेंटसचे नाणे टाकीत आणि चालू लागत एके ठिकाणी सार्वजनीक टेलीफोनचे ४-५ काचेचे सुदर बुथ होते. सर्व टेलिफोन उत्तम स्थितीत होते एका पोस्ट ऑफीसात गेलो फोर्ट एरियात सिटी बँक वगैरे परदेशी बँकात असते तशी सजावट. टापटीप. पोस्टाच्या प्रवेशद्वारातच सुटे पैसे मिळण्याचे एक यत्र ठेवलेले होते त्यात ठराविक पध्दतीने १ डॉलरची नोट सरकवली की चकचकीत सुटी नाणी बाहेर पडतात. मी तीन वेळा एक डॉलरची नोट आत सरकवली व प्रत्येकवेळी चकचकीत कोरी नाणीच बाहेर आली

आमची भटकती सपवून ज्यावेळी आम्ही चर्चवर परतलो त्यावेळी २५-३० नवीन पाहुणे आलेले दिसले आमच्या चर्चचा तळघरातील हॉल गजबजून गेला होता. नवीन आलेल्यात अमेरिकेत आणुशक्ती विरुध्द काम करणाऱ्या सस्थेचे बरेच स्त्री-पुरुष कार्यकर्ते होते. काही जपानी पाहुणे होते आम्हीही त्याच्यात मिसळून ओळखी पाळखी करुन घेऊ लागलो तिथे अचानक मुबईच्या गाधीवादी कार्यकर्त्या पुष्पाबेन भेटल्या. वरळीच्या बुध्द मदिरात अनेक कार्यक्रमाना त्या उपस्थित असायच्या तिथे आमचा परिचय झालेला होताच. त्यानी मोठ्या आस्थेवाईकपणे माझी विचारपूस केली तिथल्या रात्रीच्या थडीने त्या बेजार झाल्या होत्या मी गेले ९-१० दिवस रोज २५-३० मैलाची पदयात्रा करतोय आणि तरीही मला साधी सर्दीदेखील झालेली नाही हे ऐकून त्या आश्चर्यचकीत झाल्या. तिथे त्यानी मला सुमित्रा कुलकर्णींची ओळख करुन दिली. सुमित्रा कुलकर्णी ह्या महात्मा गाधींची नात. माजी राज्यसभा सदस्या. उद्या रात्री ॲमहर्स्ट येथे होणाऱ्या गाधी जयती सोहळ्याच्या त्या खास निमत्रित "प्रमुख पाहुण्या" होत्या. ह्या "घरच्या" मडळीच्या भेटीने मला अत्यत आनद झाला. माझ्या "मराठी मायबोलीत" अनेक दिवसानी बोलायला मिळाल्यामुळे, त्याच्याशी किती बोलू आणि किती नको असे मला झाले.

आजच्या रात्रीचे आमचे जेवण सस्मरणीय होते नॉर्थहॅम्प्टन शहराच्या जेलमधील कैद्यानी ते खास आमच्यासाठी बनवून पाठविले होते. त्याचबरोबर जागतिक शातता आणि मानव कल्याण यासाठी आम्ही करीत असलेल्या प्रयत्नाना अतःकरणपूर्वक शुभेच्छा व त्याचा पाठींबा कळविला होता. आम्हाला सतुष्ट करण्यासाठी त्यानी आपले पाक कौशल्य पणाला लावलेले दिसत होते फडफडीत सुके केलेले टूना फिश, चिकन लेग्स, रश्श्यासहित मटण सॉसेजिस, रोस्टेड मटण स्लाईस, फ्राईड राईस, ब्रेड, चीज, सॅलॅड, व

सॅलॅड, व बीन्सची रश्शाची भाजी आणि ४-५ टोकरी भरुन ताजी सफरचद. त्या कैदी बाधवाच्या मनाच्या मोठेपणाच कृतज्ञबुद्धीने स्मरण करुन आम्ही त्या पवित्र अन्नाला वदन केले आणि त्याच्या सेवनाने तृप्त झालो

त्या दिवशी रात्री दोन फिल्म्स् दाखविण्यात आल्या अणूसाहित्य घेऊन निघालेल्या अमेरिकन सरकारच्या मालगाडीपुढे रुळावर बसून काही जपानी बौद्धभिक्षू आणि अमेरिकन सामान्य नागरिक यानी दिलेल्या अहिसक लढ्याचे त्यात चित्रण होते आणि आमच भाग्य अस की त्या अहिंसक लढ्यात भाग घेतलेल्या बौद्धभिक्षू आणि अमेरिकन सत्याग्रहींच्या प्रत्यक्ष सोबतीत बसूनच आम्ही त्या फिल्म्स् पाहिल्या. नतर त्याच्याशी हस्तादोलन करुन अभिनदन करताना आम्हाला फार धन्यता वाटली

दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता आमची पदयात्रा कडाक्याच्या थडीत आणि दाट धुक्यात सुरु झाली आज आमच्यात अणुशक्ती वापराविरुद्ध काम करणाऱ्या स्थानिक सस्थेचे ५०-६० तरुण मुले-मुली आपल्या भल्या मोठ्या बॅनर्ससहित सामील झाले होते. त्याचा उल्हास वाखाणण्यासारखा होता. आज प्रथमपासून दूरदर्शनचे कर्मचारी ४-५ कॅमेऱ्यासह पदयात्रेचे चित्रण करीत चालले होते आज मॅसेच्यूसेटस् यूनिव्हर्सिटीच्या प्रागणात आम्ही गाधी जयती साजरी करणार होतो त्याच रात्री ॲमहर्स्ट शहरात सुमित्रा कुलकर्णीच्या उपस्थितीत गाधी जयतीचा दुसरा कार्यक्रम साजरा होणार होता.

नॉर्दहॅम्प्टन ते मॅसॅच्यूसेटस् पदयात्रेच्या मार्गावर रस्त्याच्या कडेला एके ठिकाणी एक फलक लावला होता त्यावर लिहीले होते "कचरा टाकणाऱ्यास २०० डॉलर दड" ते वाचून माझ्या उरात धडकीच भरली कुठेही रस्त्याच्या कडेला तसा फलक पाहिला की दर वेळी मी उगाचच अस्वस्थ होत असे

मॅसेच्युसेटस् युनिव्हर्सिटीच्या प्रागणात आम्ही प्रवेश करताच त्या सस्थेच्या भव्यतेची कल्पना येऊ लागली शेकडो विद्यार्थी जात येत होते सस्थेच्या विस्तीर्ण आवारात कॉलेजच्या, विद्यार्थी वसतीगृहाच्या, स्पोर्टस्च्या, विद्यार्थी युनियनच्या, अशा अनेक इमारती दूरवर विखुरल्या होत्या. हिरवळीचा विस्तीर्ण पट्टा मध्यभागी राखलेला होता. त्या हिरवळीच्या मध्यभागी उघड्यावर एक छोटेसे स्टेज होते तिथे आम्ही सर्वजण थाबलो हवेतला गारवा चागलाच वाढला होता हुडहुडी भरत होती आम्ही स्टेज भोवतीच्या हिरवळीवर बसलो आणि टीपटीप् पाऊस पडू लागला. पाऊस कसला, बर्फाचे थेंबच ते।

गाधी जयतीच्या कार्यक्रमाला सुरुवात होणार एवढ्यात स्टुडटस् युनियन हॉलच्या दिशेने जपानी ध्वज घेऊन २०-२५ माणसासह ४-५ जपानी भिक्षूचा जथा आमच्या दिशेने येताना दिसला. आम्ही सर्वजण कोण येत आहेत ते पाहण्यासाठी उभे राहिलो इग्लडवरुन जपानी भिक्षू 'तेरासोवा' याजसह इग्लडहून आलेले पदयात्री त्यात होते. त्याच्या आगमनाने नवीन चैतन्य आले. तेरासोवाचे वरळीच्या बुध्द मदिरात अनेक वर्ष वास्तव्य होते. त्यामुळे ते माझे चागले परिचीत होते. सध्या इग्लडमध्ये आमच्या सस्थेने बाधलेल्या बॅटरसीपार्क' येथील बौध्द शाती स्तुपाची देखभाल करण्यासाठी गेल्या ७-८ वर्षापासून त्याचा मुक्काम इग्लडमध्ये आहे. मी त्याना प्रणाम केला आणि मग हिंदी भाषेत आमच्या गप्पा सुरु झाल्या

त्या हिरवळीच्या प्रागणावर तेथील स्थानिक अमेरिकन कार्यकर्त्यांनी साजरी केलेली गाधी जयती नमुनेदार होती. महात्मा गाधीचा प्लॅस्टर ऑफ पॅरीसचा १२ फुटी भव्य पुतळा बनविला होता त्याचे "स्पेअरपार्ट" त्यानी आमच्या समोरच जोडले मग पचा नेसविण्याचे व अगावर उपरणे टाकण्याचे 'विधी" झाले तद्नतर ७-८ माणसानी कसाबसा तो पुतळा जमिनीत रोऊन उभा केला. गाधीजीचा चेहरा एखाद्या अफ्रिकन माणसासारखा वाटत होता व मान वाऱ्याने सारखी हालत होती माझ्या आगावरील पायजमा, नेहरु शर्ट, जाकीट पाहून त्याचा एक कार्यकर्ता माझ्याजवळ आला व म्हणाला

"आर यू इडियन ?

"यस सर आय एम" मी म्हणालो.

"हाऊ इज द स्टॅच्यू ऑफ मॅहट्मा गॅंडी ?" पुतळ्याकडे बोट दाखवित त्याने पृच्छा केली.

महात्मा गाधीचा तो पुतळा स्थानापन्न करण्यात तास भर वाया गेला होता पावसाची बुरबुर वाढली होती थडीने मी वैतागलो होतो. रागातच मी बोलून गेलो

"दॅट स्टॅच्यू इज लूकीग लाईक ए ग्रॅंड फादर ऑफ महात्मा गाधी"

माझ्या फटकळ उत्तराने तो गृहस्थ चपापला. क्षणभर आश्चर्याने त्याने माझ्याकडे पाहिले आणि तिथून जो सटकला की परत काही त्याने मला तोंड दाखविले नाही.

काही वेळाने शुभ्र वस्त्रे परीधान केलेल्या अमेरिकन युवतीनी त्या

पुतळ्याभोवती फेर धरला ५-१० मिनिटे त्या अगावरची शुभ्र उपरणी हवेत उडवित त्यानी नृत्य केले हा काय प्रकार म्हणून मी ब्रायनकडे चौकशी केली त्यालाही काही अर्थबोध झालेला नव्हता म्हणून त्याने तिथल्या एका कार्यकर्त्याला विचारले त्यानी सागितले की, ही शातीची कबुतरे आहेत मी कपाळावर हात मारुन घेतला

त्यानतर वक्त्याच्या भाषणबाजीत २ तास गेले नतर अहिंसक चळवळीतून शातीसाठी व मानव कल्याणासाठी ११ प्रतिज्ञा सामुदायिकरीत्या म्हटल्या व तेथील उघड्यावरची गाधी जयती सपली पुन्हा आम्ही तिथून ओळीने "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" म्हणत ॲमहर्स्ट शहरातील आमच्या नियोजित मुक्कामाच्या "ग्रेस चर्चच्या" दिशेने प्रयाण केले

चर्चच्या हॉलमधील गाधी जयतीचा कार्यक्रम मात्र सस्मरणीय झाला. तेथील गाधीवादी कार्यकर्त्या श्रीमती करेन यानी कार्यक्रमाचे आयोजन निटसपणे केले होते प्रथमत· महात्मा गाधीनी, मदोन्मत्त राज्यसत्तेशी लढण्यासाठी जी अहिसक चळवळ सुरु केली, सत्याग्रहाचे प्रभावी शस्त्र जगाला दिले त्याबद्दल त्याचा अत्यत कृतज्ञापूर्वक व भावपूर्ण शब्दात उल्लेख करण्यात आला सर्व जगातून तेथे जमा झालेल्या २०० प्रतिनिधींनी महात्मा गाधीना आदराजली वाहिली माझ्या अमेरिकेच्या मुक्कामात मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे महात्मा गाधी विषयी जनसामान्याना देखील माहिती होती त्याच्याविषयी ते आदर प्रकट करीत त्याचवेळी मी इदीरा गाधींविषयी चौकशी करायचो अनेक मडळींना त्याचे नाव देखिल माहित नव्हते आणि आपले पतप्रधान राजीव गाधी तर कोणाच्या खिजगणतीत देखिल नव्हते भारत देश म्हणजे लोकसख्येचा बुजबुजाट असलेल, आत्यतिक गरीबी असलेले, मागासलेल्या लोकाच राष्ट्र आहे असाच सर्वसाधारण समज अमेरिकन आणि यूरोपियन लोकात आढळला ते ऐकून मनाला फार वेदना झाल्या तरीही माझ्यापरीने मी त्याना सागत असे की, आमचा देश आता पूर्वीइतका मागासलेला राहीला नाही त्याने आता अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे ते ऐकून घेत व "रीयली।" ह्या एकाच शब्दात ते अविश्वासदर्शक प्रतिक्रिया व्यक्त करीत"

आमच्या शातीपदयात्रेतील एक जर्मन आणि अमेरीकन पदयात्रींनी आजपर्यतच्या आमच्या शाती पदयात्रेचे अनुभव कथन केले निकारागुआ देशातील एका प्रतिनिधीने त्याच्या सरकारविरुद्ध लढ्याचे वर्णन केले एक दोन अमेरिकन तरुणींनी गीते म्हटली. काही नाट्याभिनय सादर केले गेले बुध्दभिक्षूनी जागतिक शाततेचे महत्व विषद करणारी भाषणे केली. अचानक

श्रीमती करेन यानी माझे नाव पुकारले व एक प्रार्थनागीत म्हणण्याची विनती केली "अल्ला तेरो नाम, इश्वर तेरो नाम" हे भक्तीगीत मी अत्यत तल्लीन होऊन गायलो मत्रमुग्ध झाल्याप्रमाणे सारी माणस ऐकत होती. सगीताची भाषा ही हदयाला भिडणारी आतरराष्ट्रीय भाषा आहे हे त्याक्षणी मला कळले

रात्रीच्या जेवणानतर पुन्हा एका सभेचे आयोजन केले गेले. महात्मा गाधीची नात श्रीमती सुमित्रा कुलकर्णी प्रमुख पाहुण्या होत्या. त्याचे छोटेसे भाषण झाले. श्रोत्याबरोबर गाधी जीवन, तत्वज्ञानाविषयी प्रश्नोत्तरे झाली व "रघुपतीराघव राजाराम" या गीताने कार्यक्रमाची सागता झाली.

त्यानतर भारतावरच्या दोन फिल्मस् दाखविण्यात आल्या. त्या फिल्मस् पाहून शरमेने माझी मान खाली गेली एका फिल्ममध्ये मुबईच्या गलीच्छ झोपडपट्ट्याचे चित्रण होत तरटाची, पत्र्याची मोडकीतोडकी झोपडी, घाणीचे ढीग, त्यात किड्या-मुग्यासारखी वळवळणारी भारतीय माणस भारताचे आत्यतिक दारिद्र्य आणि मागासलेपणाचे चित्रण दाखविणाऱ्या अशा फिल्मस् पाहून परदेशातील लोकाचे भारताविषयी काय मत होणार? मूलभूत गरजाना वचित असलेला, दारीद्र्य, अज्ञान यात खितपत पडलेला, नरकाच जीवन जगणारा बहुसख्य भारतीय समाज आणि "इक्कीसवी सदीत" नेण्याच्या भूलथापा देणारे आमचे राजकीय नेते. किती विसगत चित्र! हे चित्र कधी बदलणार?

# १० : शातिस्तुपाच्या सान्निध्यात

३ ऑक्टोबरची सकाळ आपल्याबरोबर धुवाधार पाऊस घेऊन आली. जणू आभाळातून पाण्याचे धबधबे कोसळत होते बरोबर गारठा आणि वाराही होताच आम्ही सकाळची न्याहारी सपवून पुढील सूचनाची वाट पाहत होतो सिस्टर बेथ लॅव्हरेत मुख्य कार्यालयातून फोनवर काय आदेश आहेत त्याची चौकशी करण्यास गुतल्या होत्या त्याचवेळी अशा पावसात देखील पदयात्रा करण्याचा निर्णय आमच्यातील ५-६ तरुणानी घेतला होता बुध्द भिक्षू केन व जुन्जीही तयार होते आमचे सभाषण सुरु असतानाच सिस्टर बेथ आल्या व आज पदयात्रा होणार नसल्याचे त्यानी स्पष्ट केले परतु त्याचबरोबर त्यानी असेही सागितले की, लॅव्हरेत पीस पॅगोडावर अनेक कामे आहेत व तेथे स्वयसेवकाची गरज आहे. पीस पॅगोडाला रग देणे, मडप उभारणे समोरची जमीन समतल करणे, कागदी फुले बनविणे, सुतार गवड्याच्या हाताखाली मदत करणे. वगैरे वगैरे। तेव्हा आपण सर्वानी आता लॅव्हरेत पीस पॅगोडावर जायचे, आपल्या आवडीची कामे निवडायची आणि कामाला लागायचे लॅव्हरेतला जाण्यासाठी तिथली ८-१० स्वयसेवी मडळी आपापल्या कार घेऊन आम्हाला घेऊन जायला आले देखिल होते

तिथल्या एक आर्कीटेक्ट तरुण आपली छोटी स्पोर्टस् कार घेऊन आला होता त्यातून मी, मर्सिडीज, मार्था आणि भिक्षुणी नारा असे चौघेजण निघालो पाऊस कोसळतच होता. तासभर आम्ही प्रवास केला पण रस्त्यावर कुठेही पाणी साचलेले नव्हते कुठेही मोटारींचा खोळबा होत नव्हता. तशा वाऱ्यापावसात आमचा तो कारवाला मित्र सुसाट वेगाने चाललाच होता

एका उच टेकडीची, चढण चढून एका लाकडी बगल्यासमोर आमची कार थाबली बाजूला तात्पूरते चार पाच कापडी तबू उभारलेले होते. आजूबाजूला त्या तसल्या पावसात शेकडो माणसाची वर्दळ सुरु होती अनेक तऱ्हेचे स्त्री पुरुष, अमेरिकन, युरोपियन, कबोडियन, मलेशियन, सिलोनी, तिबेटी, नेपाळी आणि बहुसख्येने जपानी बहुतेक नखशिखात भिजलेली, कोणी रगाने माखलेली, कोणी चिखलाने बरबरटलेली, कोणी हातोडा, कोणी करवत, कोणी रगाचा डबा, ब्रश कोणी काही, कोणी काही घेऊन चाललेली आनदी, हसतमुख आपापल्या कामात गर्क. आमच्या ग्रुप पैकी आमच्या आधी पोहोचलेल्या मडळीनी दारातच आमचे स्वागत केले बुध्द भिक्षु केन व जुजी याना पॅन्ट-शर्टमध्ये पाहून मी चमकलोच. हातात फावडी घेऊन पॅगोडासमोरची जमीन समतल करायला ते निघाले होते आम्ही त्या एक मजली बगल्यात प्रवेश केला. डाव्या बाजूच्या भागात काही वयस्कर जपानी भिक्षु आणि इतर काही व्यक्ति रगीत कागदी फुल बनविण्यात गर्क झाले होते उजव्या बाजूचा सपूर्ण भाग म्हणजे किचन होता. १०-१२ जपानी बुध्द भिक्षुनी जेवण बनविण्यात गुतल्या होत्या आम्ही गेल्या बरोबर आम्हाला गरमगरम चहा देण्यात आला. डाव्या बाजूच्या कोपऱ्यात एक ६०-६५ वर्षाची गोरीपान अमेरिकन आजी भिक्षूच्या फाटलेल्या कपड्याचा ढीग घेऊन पाय मशिनवर शिलाईचे काम मोठ्या एकाग्रतेने करीत होती वरच्या मजल्यावर अत्यत कलात्मकरीत्या सुशोभित केलेले जपानी बुध्द मदिर होते तिथेच एका कोपऱ्यात बसून ८-१० स्त्री-पुरुष कागदी फुले बनवित होती आमच्या पदयात्रीपैकी फिल एडमडस् व रिचर्ड डेयो त्यामध्ये होते मी आणि भिक्षुनी नारा फुल बनवायला बसलो मर्सिडीज किचन मध्ये मदत करण्याच्या कामगिरीवर गेली

आम्ही गप्पा मारीत कागदी फुल बनवित होतो भला मोटा ढिग तयार झाला होता. तरीही अजून खूप फुल पाहिजे होती २-३ तासानी मी बाहेर पाय मोकळे करायला गेलो पावसाची सततधार सुरुच होती गारठा कमालीचा होता. बगल्याच्या मागच्या बाजूला तीन दगडाच्या चुलीवर भाताची भली मोठी पातेली ठेवली होती दोन जपानी तरुण तो तसला पाऊस अगावर घेत, मजेत गप्पा मारीत, भात शिजवित बसले होते जणूकाही सकाळच कोवळ ऊन अगावर घेत बसलेत, आणि मी एक छत्री घेऊन गेलो आणि पायमोजे भिजले म्हणून हळहळतोय! माझी मलाच लाज वाटली मी मग फुले बनविण्याचे सोडून खाली किचन मध्ये आलो व खरकट्या डिशचा ढीग घेऊन त्या धुवीत बसलो

पॅगोडावर खूप माणस काम करीत असावीत सारखी माणसे येऊन थोड थोड खाऊन जात होता त्यातच आज किचनमध्ये अन्नाचा साठा मर्यादित होता म्हणून जेवणाचे रेशनिंग होते प्रत्येकाला फक्त एक छोटा वाडगा भरुन भात व एक वाडगा उकडलेल्या भाज्यांचे सूप मिळत होते प्रत्येकजण निमूटपणे तेवढेच खाऊन जात होता. एकदा मला वाटल वर पॅगोडावर जाऊन अगमेहनतीच काही काम करावे. पण मग विचार बदलला. पॅगोडाच दर्शन उद्घाटनाच्या दिवशीच मी घ्यायच ठरवल आमच्या बगल्याच्या समोर पॅगोडाची दोन फुटी सिमेटची हुबेहुब प्रतिकृती करुन ठेवली होती त्याच्या दर्शनावरच मी समाधान मानून घेतले दिवसभर तिथे बगल्यावर काम करुन रात्री लॅव्हरेतच्या जवळपास ५-१० मैलावर असलेल्या चर्चवर मुक्कामाला जायला आम्ही निघालो अमेरिकन पती-पत्नी, मी व जर्मन तरुण चौघे त्या कारमध्ये होतो. पाऊस अजूनही धो धो कोसळत होता. तशात आम्ही रस्ता चुकलो दिवसा निसर्गरम्य वाटणारी नयनमनोहर झाडी रात्री भुतासारखी वाटत होती. घोंगावणारे वारे, निर्मनुष्य रस्ते, त्यात आम्ही आपले दिशाहीन भरकटत फिरत होतो अखेरीस एकदाचा योग्य रस्ता सापडला आणि चर्चच्या निवाऱ्याला आमच्या मित्रामध्ये येऊन पोहोचल्यावर हास्यविनोदात सारा थकवा विरुन गेला.

आज दिवसभर अपुरे जेवण घेऊन थडी गारठ्यात पावसापाण्यात, चिखलमातीत कष्टाची कामे करुन आलेले बुध्द भिक्षु अत्यत खेळकरपणे गप्पा गोष्टी करीत होते श्रमाची अथवा थकव्याची पुसटशी रेषाही त्याच्या चेहऱ्यावर नव्हती पॅगोडावरील कामाचा कोणी उल्लेखही करीत नव्हते जणू विशेष काही घडलेच नाही इतक्या सहजपणे आवातर गप्पा चालल्या होत्या. ज्योवृध्द भिक्षु शातीशुगे याजकडे ज्यावेळी मी याविषयी पृच्छा केली त्यावेळी त्यानी हसत हसत सागितले की, निप्पोनझॅन म्योहोजी पथामध्ये बुध्द भिक्षु म्हणून निवड करताना अत्यत कठोर चाचण्याना तोंड द्यावे लागते कितीही प्रतिकूल परीस्थितीशी सामना करावा लागला तरी मन·शाती आणि चेहऱ्यावरच हास्य कायम ठेवण्या इतपत आत्मबल त्याला प्राप्त असाव लागत स्वत· शारीरिक कष्ट आणि यातना सहन करीत असताना स्वत·च्या वेदना विसरुन प्रथम त्याला दु·खीताची सेवा करायला लागते सकटकाळी धिरोदात्तपणा, निर्णयक्षमता हे गुण पारखले जातात. सेवाभावी वृत्तीबरोबरच नम्रपणा त्याच्या ठायी असणे आवश्यक असत. आपण केलेल्या सत्कृत्याची प्रौढी मिरविणे सोडाच त्याने कधी त्याची वाच्यताही करायची नसते. भिक्षु होण्या आगोदर स्वत·च्या दडाचे मास स्वहस्ते तो पलित्याने जाळतो व बुध्दनामाचा शातपणे जप करीत

निमुटपणे तो वेदना सहन करतो. या व अशा अनेक खडतर कसोट्यातून पार पडल्यावर जपानच्या निप्पोनझॅन म्योहोजी पथामध्ये ज्युनियर बुध्द-भिक्षु म्हणून त्याचा स्विकार होतो मग जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात जाऊन मानवतावादी कार्य करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली जाते त्याच्या कार्याचे मूल्यमापन सिनियर भिक्षु करतात. अशा अत्यत कठोर कसोट्यातून तावून सुलाखून निघाल्यावर तो बुध्द भिक्षु पुर्णार्थाने भिक्षु सज्ञेस पात्र होतो ते ऐकून मी आश्चर्यचकीत झालो किती कठोर परीक्षा। असिधारावत देखील यापुढे क्षुद्र वाटावे प्रत्येक जपानी बुध्दभिक्षुच्या चेहऱ्यावर जे तेजोवलय दिसते ते उगाच नाही। अनेक अग्निदिव्यातून दिव्य तेजाची झळाळी घेऊन निघालेले सुवर्णाचे जिते जागते पुतळेच जणू ते।

याच्या अगदी उलट चित्र म्हणजे आमचे भारतीय बुध्दभिक्षू। आबेडकराच्या हाकेला प्रतिसाद देऊन बौध्द धर्म स्विकारण्यात महाराष्ट्र अग्रेसर. त्यामुळे महाराष्ट्रीयन बुध्दभिक्षूचे चित्र प्रतिकात्मक धरावयास हरकत नाही माझ्या पाहण्यातील बहुतेक बुध्दभिक्षू झालेली मडळी उतारवयात अथवा उपजिविकेचे सोपे साधन म्हणून इकडे वळलेली बौध्द तत्वज्ञानाचे त्याचे ज्ञान जवळजवळ शून्य त्याग आणि सेवाभावी वृत्तीपासून हे शेकडो योजने दूर डोक्याचे मुडण करायचे, भगवी वस्त्रे घालायची, गळ्यात झोळी अडकवायची की झाले भिक्षू. इतक सोप काम मग आपले गावोगावी आणि शहरातील झोपडपट्ट्यातून लग्नाचे पौरोहित्य करीत फिरायचे व जास्तीतजास्त दक्षिणा उकळण्यासाठी यजमानाशी भाडायचे बारशाला जायचे मिळेल ते गोळा करुन थैलीत भरायचे पाली भाषेतील चार सहा प्रार्थना मोडक्या तोडक्या रितीने म्हणायच्या, मजेत खायचे आणि ताणून द्यायची जमा झालेले पैसे, चीजवस्तू न्यायला नातेवाईक अधून मधून येतात हा देखील पठ्ठ्या बायका पोराची आठवणा झाली की गावी जातो उरलेल्या वेळात दलित राजकीय पुढाऱ्याचे ऊबरे झिजवत राहणे, त्याची खुशामत करणे आणि मिळेल ते झोळीत गुडाळून नेणे हे कार्य। जगण्याचा मोठा सोपा मार्ग या योगे काही धूर्त आणि बदमाश मडळीना सापडला आहे त्याच्या ह्या अशा वागण्याने भिक्षु या सज्ञेचे पावित्र्य त्यानी घालविले आहे इतर समाजाच्या टीगलीचा व हेटाळणीचा विषय ते झालेले आहेत याच्या या अवगुणामुळे जागतिक बौध्दभिक्षूमध्ये भारतीय बुध्द भिक्षूना कोणी उभे करीत नाही अमेरिकेला जगातल्या प्रत्येक बौध्द धर्मिय राष्ट्राच्या बौध्द भिक्षूना त्या सोहळ्याचे आमत्रण होते पण एकही भारतीय बौध्द भिक्षू तिथे नव्हता एकही भारतीय बौध्दभिक्षू आमत्रित करण्याच्या

लायकीचा वाटू नये हे भारतीय बौध्द चळवळीला अत्यत अशोभनीयच नव्हे तर लाच्छनास्पद आहे एका आतरराष्ट्रीय बौध्द धर्मियाच्या मासिकात भारतीय बौध्दाविषयी खालील मजकूर होता

"The neo-Buddhist from India are excluded from the world Buddhist movement since they are merely a political group"

भारतीय बौध्द किंवा नवबौध्दाची एका जागतिक न मान्यवर अशा बौध्द सघटनेने केलेली ही सभावना अत्यत अचूक व मर्मस्पर्शी आहे. त्यावर वेगळ भाष्य करण्याची गरज नाही

४ ऑक्टोबर ८५ हा दिवस माझ्या दृष्टीने मोठा सस्मरणीय ठरला. मॅसेच्यूसेटस् विश्वविद्यालयाच्या स्टूडटस् युनियनच्या भव्य हॉलमध्ये "फेथ इन ॲक्शन" नावाचा जगातील प्रमुख धर्मातील मान्यवर विचारवताचा जागतिक शातता आणि मानवकल्याण या विषयावर परिसवाद होता. माझ्या दृष्टीने ती एक पर्वणी ठरली. "क्वाकर्स प्लेस" या आमच्या मुक्कामाच्या ठिकाणाहून एका बसने सर्व पदयात्री सकाळी ७ ३० ला निघालो. आज पावसाचा जोर जरा कमी होता तरीही बुरबुर सतत सुरुच होती. दाट ओलसर धुके होते आणि त्याच्या जोडीला नेहमीप्रमाणे गार बर्फाळ वारे।

सकाळी ९ ३० ला परिसवादाला सुरुवात होणार होती आम्ही तेथे ९ वाजताच पोहचलो होतो अर्ध्या तासात त्या इमारतीत भटकून येण्याचा विचार केला. सोबतीला ब्रायन होताच

आमचा परिसवाद होता ती सपूर्ण भव्य इमारत तेथील विद्यार्थी युनियनची होती त्यात काय नव्हत? विद्यार्थ्यांनीच चालविलेले प्रचड मोठे सुसज्ज उपहारगृह होत लक्षावधी डॉलर्सचा सर्व तऱ्हेचा माल खच्चून भरलेल व तळमजल्याचा अर्धा भाग व्यापलेल भव्य डिपार्टमेन्टल स्टोअर होत. भव्य लायब्ररीज होत्या. विद्यार्थ्यांनीच माडलेली खेळाच्या सामानाची, पुस्तकाची, कलाकुसरीच्या वस्तूची, कपड्याची अनेक छोटी छोटी दुकानेही होती "कॉलेजियन" नावाचे मॅसेच्यूसेट्सच्या विद्यार्थ्यांनी चालविलेले सोळा पानी दैनिक पाहून मी आश्चर्यचकित झालो हे विद्यार्थ्यांना व तिथे येणाऱ्या कोणालाही विनामूल्य मिळते. एखाद्या धदेवाईक वृत्तपत्राला लाजविल अस त्याच स्वरुप होत. विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सर्व बाजू त्यात हाताळल्या होत्याच शिवाय अमेरिकेतील सर्व तऱ्हेच्या घडामोडींचा तसेच जागतीक

विषयाचाही त्यात जाणकार रितीने परामर्श घेतलेला आढळला. 'युमास कॅम्पस' मध्ये काल झालेल्या आमच्या गाधीजयती सोहळ्याचा वृत्तात त्या पुतळ्याच्या छायाचित्रासह पहिल्या पानावर त्या दिवसाच्या अकात छापण्यात आला होता मॅसेच्यूसेटस् विश्वविद्यालयात २८००० विद्यार्थी शिक्षण घेतात, त्याच वार्षिक बजेट २६० दशलक्ष डॉलर्सच असत, हे वाचून मी थक्क झालो. यूनिव्हर्सिटी ते आजूबाजूच्या नार्दम्पटन वगैरे शहरापर्यंत विद्यार्थ्यांकरीता फुकट प्रवासासाठी एअर कडिशड बसेसचा ताफा असतो विद्यार्थी यूनियनच्या त्या इमारतीत जागोजागी सरकते जिने होते ठिकठिकाणी कॉम्प्युटर्स लावलेले होते. भव्य प्रसाधनगृहे होती टेलीफोन बूथ होते. आणि विशेष म्हणजे हे सार अत्यत निट निटक आणि उत्तम स्थितीत होत. आपल्या इकडच्या सारखे चौकाचौकात विद्यार्थी उभे राहून टवाळ्या करताना अथवा पोरीबाळींची टिंगल करताना दिसत नव्हते. एका ठिकाणी कॉम्प्युटर समोर २५-३० विद्यार्थी शातपणे उभे असलेले दिसले प्रत्येक जण कॉम्प्युटरवर आपला प्रश्न सोडवित होता. पुढे जात होता प्रत्येक ठिकाणी शिस्त अत्यत गभीरपणे पाळली जात होती कुठेही थिल्लरपणा, उनाडपणाची वर्तणूक विद्यार्थ्यात दिसत नव्हती सर्वार्थाने शैक्षणिक वातावरण दृष्टोत्पत्तीस येत होते विद्यार्थ्याचा गडबड गोंधळ कुठेही नव्हता. ज्ञानार्जनाकडे इतक्या श्रद्धेने आणि गाभीर्याने पाहणाऱ्या तरुण अमेरिकन पिढीविषयी माझा आदर द्विगुणीत झाला नोबेल पारितोषिक विजेते अनेक क्षेत्रातील शेकडो विद्वान उगाच का त्याच्यात निर्माण झालेले आहेत ! अमेरिकन तरुणपिढी उच्छृखल आहे, बेजबाबदार आहे, बापकमाईवर मजा करणारी आहे असा तद्दन खोटा प्रचार आपल्याकडे केला जातो माझ्या अमेरिकेच्या वास्तव्यात मी अनेक अमेरिकन तरुण मुलामुलीना भेटलो, शहरातील मुलाच्या भेटी घेतल्या, गावातील मुलाना भेटलो पण मला बोलण्या वागण्यात ती मुल अत्यत नम्र आणि सुसस्कारित वाटली मोठ्या माणसाविषयी त्याच्या वर्तनात कुठेही अनादर अथवा हेटाळणी दिसली नाही उलट आपल्याकडे घरातील शिकलेली मुल उध्दट आणि शेफारलेली वाटतात. तेथील मुलाची भाषा मार्दवपूर्ण वाटली तेथल्या तरुण पिढीच्या स्वभावाचा आनदीवृत्ती व खेळकरपणा हा स्थाईभाव वाटतो तरुणपिढी निकोप व निरोगी आहे. गरजेच्या वस्तूची खाण्यापिण्याची समृध्दी व सुबत्ता यामुळे त्याच्या चेहऱ्यावर इतर विवचना दिसत नाहीत. श्रमाला प्रतिष्ठा असल्यामुळे मुल आत्मविश्वासाने परिपूर्ण, म्हणूनच कुठलही आव्हान झेलणारी वाटतात. परावलबित्वाच्या भावनेच्या अस्पष्ट छटाही त्याच्या चेहऱ्यावर दिसत नाहीत. असो. हे वाचल्यावर

मला अमेरिकन प्रेमाची काविळ झालेली आहे अस काही जणाना वाटेल पण ह्या वर्णनात एकही शब्द अतिशयोक्तीचा नाही मी जे अनुभवल आणि मला जे वाटल तेच प्रामाणिकपणे लिहील आहे

ठीक ९ ३० वाजता 'फेथ इन ॲक्शन' च्या जागतिक शातता परिषदेच्या अधिवेशनास प्रारभ झाला दोन हजार श्रोते, जे जगातील सर्व भागातून आले होते ते शातपणे बसले होते मी आणि ब्रायनने अगदी पुढच्या रागेत जागा पटकविल्या होत्या. जिथून मान्यवर वक्त्याच्या दर्शनाचा व श्रवणाचा आनद आम्ही मनमुराद घेऊ शकत होतो

आम्हाला दिलेल्या माहितीपत्रकात आजच्या सभेचा उद्देश थोडक्यात खालील शब्दात दिलेला होता —

"Began with prayers and music, this convocation will be a period of serious reflection on the terrible reality of to-day's world and our need to commit ourselves to Ahinsa, non-voilence, in-order to transform violence and hatred to respects and affection for humanity"

वक्त्याची यादी श्वास रोखून धरायला लावील अशी होती हिरोशिमा, नागासाकी शहरावर बॉब टाकणाऱ्या पथकाचे प्रमुख कॅप्टन व तद्नतर ज्यानी स्वतःला पूर्णतयः अहिंसा व शातीच्या कार्याला वाहून घेतले ते 'जॉर्ज बिबेल्का' व जपानच्या अणु हल्ल्यातून वाचलेले, विध्वसाचे चक्षुर्वैसत्यम साक्षिदार "हिबाकुशा" हे जपानी नागरिक। रेव्ह टीम मॅकडोनाल्ड, दक्षिण अमेरिकन ख्रिश्चन लिडरशिप कॉन्फरन्सचे प्रमुख रेव्ह. जीन हुपिन्सन, इग्लडमध्ये शाती कार्य करणारे ब्रिटीश मिनिस्टर, जेनी ड्रूलॅंड, येल्सी ब्ल्यू ही अमेरिकन रेडइडियन समाजाची प्रवक्ती आणि इतरही अनेक होते त्यात जपान, सिलोन, थायलड, कंबोडिया वगैरे देशातील वयोवृध्द बुध्दभिक्षू व इतर अहिसक चळवळीचे प्रवक्ते होते.

बुध्द प्रार्थना आणि वाद्यसगीताने सकाळी ९ ३० ला सुरु झालेली सभा दुपारी २ पर्यंत दोन सत्रात चालली एकेका वक्त्याच्या ओजस्वी वक्तृत्वाने सभेचे वातावरण भारले जात होते अत्यत पोटतिडिकीने वक्ते बोलत होते मत्रमुग्ध झाल्याप्रमाणे श्रोते ऐकत होते हिरोशिमावर बॉब टाकणाऱ्या जॉर्ज बिबेल्काची जबानी अत्यत अस्वस्थ करणारी होती बॉबीग नतरच्या घटनाक्रमाचे त्यानी वर्णन केल्यावर गळ्यात हुदका दाटून आला. आपल्या ह्या कृत्याने होणाऱ्या अभूतपूर्व सहाराविषयी ते अनभिज्ञ होते आणि ज्यावेळी त्यानी ते

पाहिले त्या क्षणापासून त्याचे मनहि पश्चातापदग्ध् झाले व त्या पापाचे परिमार्जन म्हणून आपले उर्वरीत जीवन त्यानी शाती व मानवकल्याणाच्या कार्याला अर्पण केले इतर वक्त्यानी अणूशक्तीच्या भीषण सहारक शक्तीची व त्यायोगे मानवी सस्कृती नष्ट होण्याच्या शक्यतेची माहीती करुन दिली बहुतेकानी अमेरिका, रशिया वगैरे अणूशक्तीनी सुसज्ज अशा बलाढ्य राष्ट्राच्या अमानवी राजकीय धोरणावर सडकून टिका केली व जगातल्या प्रत्येक शातताप्रिय नागरिकाने त्या विरूध्द अहिंसक मार्गाने, परतू प्राणपणाने लढा दिला पाहीजे या गोष्टीचे महत्व प्रभावी शब्दात विषद केले निग्रो वशाच्या वक्त्यानी सूर लावला की आमच्या काळ्या लोकाच्या घामावर ही अमेरिका फुलली, बहरली आणि आता वापरलेल्या चिरगुटासारखे आमच्या समाजाला दूर फेकल जात आहे. येत्सी ब्ल्यू या रेड इडियन स्त्रीने अत्यत जहाल शब्दात सागितले या अमेरिकेचे आम्ही मूळ नागरिक पण अमेरिकन सरकार आमची सस्कृती, आमची जीवनपध्दती उध्वस्त करण्यास कटीबध्द आहे. आमच्या रेड इडियनाच्या राखीव प्रदेशात युरेनियम सापडले आहे म्हणून तिथून आमच्या शातताप्रिय लोकाना, अमेरिकन सरकार हाकलून देशोधडीला लावित आहे. इतर वक्त्यानी प्रामुख्याने अमेरिका व रशियाच्या अणूशक्ती स्पर्धेवर आसूड ओढले ही दोन्ही राष्ट्रे प्रबल आहेत. परतु आपल्या हस्तक देशाकरवी ते जगात युध्दे घडवून आणित आहेत. अणुस्फोट करीत आहेत मानवाची शातता आणि विश्वाचे अस्तित्व नष्ट करण्याचा जणू या दोन राज्यसत्तानी विडा उचलला आहे जगातल्या प्रत्येक शातताप्रिय मानवानी याचा धिक्कार केला पाहिजे याना विरोध केला पाहिजे जपानी व इतर बुध्दभिक्षूनी अहिसक चळवळीचे महत्व, त्यासाठी जनजागृती, शाततप्रेमी नागरिकाच्या अहिंसक चळवळीची उभारणी व बुध्दाच्या तत्वज्ञानाच्या मार्गाने जगात शाततेचे साम्राज्य निर्माण करण्याचे महत्व विषद केले

चार-पाच तास कानात पचप्राण एकवटून आम्ही सारे ऐकत होतो महान वक्त्याचे अमूल्य विचारधन अधाशाप्रमाणे गोळा करीत होतो उरलेल आयुष्य सन्मार्गी लावण्यासाठी सजिवक विचाराची शिदोरी आमच्या झोळीत साठवून ठेवीत होतो हजारो मैल दूर आपला मायदेश सोडून इथ आल्याच सार्थक झाल अस वाटल माझ कोणत्या जन्मीच पुण्य होत जेणेकरुन या भाग्याचा मी धनी झालो होतो ? माझा मलाच सभ्रम पडला होता.

सभा सपल्यावर त्याच इमारतीत पहिल्या मजल्यावर जमलेल्या जवळजवळ हजार, दिड हजार उपस्थिताना मेजवानीचे आयोजन होते त्या

भोजनाच्या हॉलमध्ये जणू जागतिक सम्मेलन भरल्याप्रमाणे वाटत होते जगातील जवळजवळ बहुतेक सर्व देशातील, सर्व धर्माचे, सर्व वशाचे प्रतिनिधी त्यात सहभागी झाले होते मेजवानी अर्ध्यावर आली असतानाच मला आश्चर्याचा धक्का देणारी एक घटना घडली आमच्या पदयात्रींमध्ये मी भक्तिगीत गायक म्हणून आतापर्यत चागलाच लौकिक प्राप्त केला होता. ॲमहर्स्टच्या ग्रेस चर्चमध्ये गाधी जयती समारोहात माझे "अल्ला तेरो नाम"

तिथल्या सयोजकानी ऐकले होते त्यानीच माईकवर, "अवर फ्रेंड फ्रॉम इडीया मिस्टर मॅनोहर रॉपीस विल सिंग ए डिव्होशनल सॉग" अशी अनाऊन्समेट केली. ते ऐकून मी चकित झालो ॲपल पाय आईस्क्रीमचा गोड घास माझ्या घशात अडकला पण क्षणभरात मी सावरलो. आलेल आव्हान स्विकारायच ही माझी लहानपणापासूनची सवय. अशी बहुमानाची सुवर्ण सधी मी थोडीच दवडणार होतो एका क्षणात उठून मी माईकजवळ गेलो. हजारो उत्सुक नजरा माझ्यावर खिळल्या होत्या. मी हात जोडून सर्वांना नम्रपणे अभिवादन केले व अत्यत भावपूर्ण स्वरात, तल्लीनतेने "ए मालिक तेरे बदे हम " हे "दो ऑखे बारह हाथ" ह्या चित्रपटातील प्रार्थनागीत गाईले माझ गाण सपेपर्यत सबध हॉल शात होता त्या निःशब्द शाततेत व भारावलेल्या वातावरणात माझ्या स्वराची मोहीनी श्रोत्यावर पसरल्याचे मी अनुभवित होतो गाणे सपले टाळ्याचा कडकडाट झाला माझ अभिनदन करण्यास लोकाची झुबड उडाली आणि नकळत पापण्याचे बाध फोडून माझ्या नेत्रातून अश्रुधारा ओघळू लागल्या.

कु-प्रवास
ग. क. ७५४
२००८५
८।९८३

# ११ : एक अविस्मरणीय अनुभव ...

५ ऑक्टोबर १९८५. पहाटे ४ - ४॥ च्या सुमारास जाग आली. बहुतेक सर्वजण उठून सकाळी आन्हिक आटोपित होते. मी पट्कन उठलो. पलिकडच्या कोपऱ्यात झोपलेल्या ब्रायनला हलवून जागे केले व प्रातर्विधी आटोपण्यास गेलो. परत येऊन पाहतो तो काय? ब्रायनची स्वारी झोपलेलीच! मी जवळजवळ ओढूनच त्याला स्लिपींग बॅग बाहेर काढले. ॲनामारीया, शेजारी तयारी करता करता आमची गमत पाहून गालातल्या गालात हसत होती. माझ्या धुसमुसळेपणामुळे ब्रायनची उरली सुरली झोप उडाली. पटकन उठून आधी तो मला "थँक्यू" म्हणाला व टुथपेस्ट घेऊन बाथरुमकडे पळाला. कालच तो उशीरा पर्यंत झोपल्यामुळे व सकाळच्या प्रार्थनेला ना आल्यामुळे केन भन्तेजींनी त्याला चागलाच खडसावला होता.

सकाळची सामुदायिक प्रार्थना, ब्रेकफास्ट वगैरे आटोपून आम्ही सर्वजण ७ पूर्वीच तयारी करुन बसलो. आज बाहेर पाऊस पडत नव्हता पण खूप दाट धुके पसरलेले होते व आकाश ढगाळलेले होते. बाहेर नुसताच वारा, गारठा होता. वारा फारसा हलत नव्हता. वातावरण जड जड वाटत होते. वारा वाहू लागला असता तर थोड्याच वेळात धुके आणि ढग पागले असते व सुर्यदर्शनही झाले असते. अमेरिकेत असे वातावरणात पाहता पाहता बदल होतात. क्षणार्धात वातावरण पालटून जाते, ते माझ्या वास्तव्यात मी अनेकदा अनुभवले होते. मी मनातल्या मनात निसर्गाची याचना करीत होतो. "आज वातावरण स्वच्छ राहू दे. पाऊस पडू देऊ नकोस. स्वच्छ सुर्यप्रकाश असू दे. आज आमच्या लॅव्हरेत येथील शाती स्तपाचा उद्घाटन सोहळा आहे. जगाच्या

कानाकोपऱ्यातून हजारो शांतताप्रेमी माणसं तिथे जमणार आहेत. हे निसर्गा तू त्याच्यावर कृपावंत हो. स्वच्छ सूर्यकिरणांची त्याच्यावर बरसात कर. त्याचा आनंद द्विगुणीत कर !. "

आम्ही सर्व पदयात्री बसमधून सकाळी ८०० लॅव्हरेंत शांती स्तुपाच्या पायथ्याशी पोहोचलो ठीक ९०० वाजता भगवान बुध्दाचा अस्थिकलश घेऊन पायथ्यापासून स्तुपापर्यंत मिरवणूक निघणार होती टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या विस्तीर्ण मोकळ्या आवारात आणि आजूबाजूच्या शेतात शेकडो मोटारी पार्क केलेल्या पाहून मला फार नवल वाटले " बापरे !, म्हणजे हजारो माणसं कार्यक्रमाला आलेली असणार" मी मनातल्या मनात म्हटले सतत मोटारी येतच होत्या व पोलीस ऑफिसर्स त्याच्या पार्किंगची चोख व्यवस्था करण्यात करण्यात गुंतले होते येणाऱ्या गाड्यातून जपानी, चिनी, अमेरिकन, युरोपिअन, बर्मी अशा विविध देशातील लोक येत होते आपल्या मुलाबाळांसह येणाऱ्या जगातील विविध वंशाच्या व वेषभूषेच्या नागरिकांमुळे त्या कार्यक्रमाला जागतिक उत्सवाचे स्वरुप आले होते बौध्द भिक्षू तर शेकड्यांनी होते जरी जपानी बुध्दभिक्षू बहुसंख्येने असले तरी थायलंड, सिलोन, नेपाळ, लडाख, चीन, कोरीया वगैरे आशियाई देशातील बुध्दभिक्षूही मोठ्या प्रमाणात होते पीस पॅगोडा जवळचा बंगला आणि शेजारचे तंबू तर माणसांनी फुलून गेले होते

मिरवणुकीला तासभर अवकाश होता तेवढ्या अवधीत पीस पॅगोडाचे दर्शन घेण्याची इच्छा मी ब्रायनकडे व्यक्त केली ब्रायनने चटकन होकार दिला टेकडीच्या शिखराकडे जाता जाता मी कल्पनेने पॅगोडाचे चित्र डोळ्या समोर आणण्याचा प्रयत्न करीत होतो बंगल्यासमोरची पॅगोडाची छोटी प्रतिकृती मोठ्या आकारात कशी दिसत असेल पॅगोडाचा विस्तार किती मोठा असेल, याचा मी मनाशीच अंदाज बांधीत होतो माझ्या "याशिका" कॅमेऱ्यात रात्रीच मी नवीन रोल भरला होता. कॅमेरा खांद्याला अडकवलेला होता. पॅगोडाचे छायाचित्र घेण्यास मी अति उत्सुक होतो धुके आता अधिकच दाट होऊ लागले होते वातावरणातील गारठा अधिक तीव्र झाला होता अवतिभवती रंगीबेरंगी वेषभूषेतील माणसे जात येत होती वातावरण स्वप्नील आणि रम्य वाटत होते का कुणास ठाऊक, पॅगोडा दर्शनाच्या कल्पनेनेच माझा ऊर धडधडत होता. पापणीच्या कडा वारवार ओलावत होत्या. विलक्षण उत्तेजित करणारी एक विचित्र हुरहूर जाणवत होती. सर्वांगावर रोमांच उठले होते एक सुखद गोड शिरशिरी मी अनुभवत होतो वास्तव जगाचा जणू विसर पडला

होता जणू स्वप्न नगरीतील एक नितात सुदर स्थळ मला सापडल होत त्यातून मी प्रत्यक्ष फिरत होतो तिथल्या अलौकिक गोष्टींची प्रत्यक्ष अनुभूती घेत होतो चादीच्या चूऱ्या सारख्या धुक्याने वेष्टीलेली तिथली प्रत्येक चराचर वस्तुमात्र मला अलौकिक तरीही खूप परिचित वाटत होती जणू गेल्या जन्मात हरवलेला माझा सुखाचा अनमोल ठेवा मला सापडला होता कुण्या अज्ञात शक्तीने त्या गतजन्मीच्या माझ्या हरवलेल्या विश्वात मला अलगद आणून सोडले होते तिथल्या पूर्वपरिचित भूमीवर मी सचार करीत होतो भरपूर प्रवास घेऊन तिथला नवजीवन देणारा वारा पिऊन घेत होतो झाडापानाना हळूवार स्पर्श करून पुनप्रत्ययाचा स्वर्गीय आनद अनुभवीत होतो

विचाराच्या वावटळीत, पिसासारख्या हलक्या झालेल्या मनाने टेकडीच्या माथ्यावर मला कधी आणून सोडल ते कळलच नाही नकळत माझी दृष्टी समोर गेली आणि डोळ्या समोरच्या त्या भव्योदात्त शातीस्तुपाच्या दर्शनाने मी अवाक् झालो मत्रमुग्ध झालो. जागच्या जागी मी खिळून गेलो विस्फारलेल्या अनिमिष नेत्रानी मी ते शुभ्र स्वप्न हृदयात प्रतिबिबीत करु पाहत होतो उत्तेजनेने माझे सर्वाग थरथरत होते नकळत माझे हात जोडले गेले "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" चा उच्चार उच्च स्वरात व धीरगभीरपणे मी केला. त्रिवार मत्रोच्चार केल्यानतर खूप शात वाटले खूप खूप प्रसन्न वाटले

त्या टेकडीच्या शिखरावर एवढ विस्तृत मैदान असेल हे कोणी सागुनही खर वाटल नसत ५-६ एकर समतल भूमी पसरलेली होती तिचा आकार गोलाकार होता. सर्व बाजूनी उच आणि दाट झाडानी ती जागा वेढलेली होती समोरच्या टोकाला मध्यवर्ती जागेत शुभ्र रगाचा, भव्य आकाराचा घुमटाकार स्तुप उभा होता. त्याचा उच सोनेरी कळस निळ्या आकाशात गेल्याप्रमाणे भासत होता स्तुपाला आणि कळसाला शुभ्र धुके गोजारीत होते धुक्याच्या लाटावर लाटा येत होत्या आणि स्तुपाला स्पर्शुन जात होत्या जणू उद्घाटनाच्या या पर्वणीच्या दिवशी स्तुपाच्या स्पर्शाने पुनीत होण्याची त्याच्यात अहमहिका लागली होती स्तुप पुर्वाभिमुख होता आणि त्याच्या दर्शनी भागाच्या मध्यात अडाकृती पोखरुन केलेल्या भागात भगवान बुध्दाचे, लुम्बीनी येथील बुध्दजन्म दाखविणारे अत्यत मोहक सोनेरी रगातील दगडी शिल्प बसविले होते त्यावर रगीबेरगी नयनमनोहर पट्ट्या असलेला सिल्कचा विशाल पडदा सोडला होता. वारा जोराने वाहत असल्यामुळे तो फडफडून आतील सोनेरी शिल्पाचे मनाला चटका लावणारे ओझरते दर्शन अधून मधून होत होते बुध्दाच्या त्या सोनेरी बालमुर्तीभोवती कमल पुष्पाची

पाकळी सिमेट क्रॉक्रीटमध्ये अत्यत रेखीवपणे व कलात्मकरित्या कोरलेली होती स्तुपाच्या ह्या दूरच्या दर्शनाने मी विलक्षण उत्तेजीत झालो व कधी एकदा जवळ जातोय, त्याला स्पर्श करतोय, वदन करतोय असे मला झाले

शाती स्तुपासमोरील भव्य पटागणात ४-५ हजार खुर्च्या ओळीने लावलेल्या होत्या. त्याचे ४-५ विभाग पाडलेले होते व त्या त्या ठिकाणी माहितीसाठी तसे फलक लावलेले होते, ओव्हरसीज गेस्टस, ख्रिश्चन शातीकार्य ग्रुप, पीस, पॅगोडा कम्युनिटी असे विविध विभाग होते. अनेक तरुण अमेरिकन मुले स्वयसेवक म्हणून मोठ्या तत्परतेने व्यवस्था पहात होते. शाती स्तुपाच्या समोर बुध्द मूर्ति ठेऊन पूजा विधिसाठी जपानी पध्दतीने बुध्द मदिराची अत्यत नयनमनोहर पध्दतीने सजावट केली होती. जागोजागी ताज्या फुलाच्या शेकडो कुड्या आणि फुलदाण्या ठेवण्यात आल्या होत्या. बुध्द मदिरासमोर शुभ्र चादरीचे आवरण घातलेला विशाल चौकोनी चबुतरा तयार केला होता त्यावर सर्व बुध्द भिक्षु बसून पूजाविधी करणार होते त्या चबूतऱ्याच्या डाव्या बाजूला रगीत कापडाचे छत घातलेले चौकोनी व्यासपीठ केलेले होते त्यावर ध्वनीक्षेपकाची व्यवस्था होती अनेक तत्रज्ञ तेथे तयारीत होते मैदानात चार पाच ठिकाणी उच लाकडी मनोरे बनवून त्यावर टी व्ही. चे कॅमेरे लावलेले होते तेथील कॅमेरामन आणि तत्रज्ञ जय्यत तयारीनिशी कार्यक्रमाच्या चित्रणास सज्ज झालेले होते खूर्च्यांच्यामागे वेगवेगळ्या चार ठिकाणी चार रगीत कापडाचे विशाल तबू बनविले होते त्यात कॉटिनेटल फूड आणून ठेवले होते. जमलेल्या सर्व पाहूण्याना जेवण देण्यात येणार होते एका तबूत ख्रिश्चन चर्चतर्फे अमेरिकन फूड, एकात कबोडीयन, एकात जपानी, एकात सिलोनी अशा विविध तऱ्हेचे खाद्य पदार्थ देण्यात येणार होते, ज्यागा जिथ हव त्याने तिथे जाऊन जेवायचे होते मोकळ्या जागे भोवती गोलाकार लाकडी खाब रोवून त्यावर रगीबेरगी कापडी पट्ट्या उभट ध्वजाप्रमाणे लावून सुदर सजावट केली होती त्याचप्रमाणे कागदी फुलाची विविधरगी असख्य तोरणे रग सगतीत विविधता आणित होती स्तुपासमोरील बुध्द मूर्तीसमोर धुपाचा दरवळ सूटला होता. त्यात सर्व वातावरण भरुन गेले होते आणि चोहीकडे वावरणाऱ्या विविधरगी आणि विविधढगी माणसाच्या, बुध्दभिक्षूच्या हालचालींनी तिथल्या सर्वच गोष्टींना विलक्षण जिवतपणा आणला होता चैतन्य आणल होत.

ब्रायन आणि मी खुर्च्यांच्या रागाच्या मधल्या मोकळ्या पॅसेजमधून चालत चालत स्तुपाजवळ आलो येताना क्षणभरही स्तुपावरुन आमची दृष्टी दूर झाली नव्हती. दृष्टी दूर होतच नव्हती शातीस्तुपाच्या उदात्त गभीर रुपाने जणू

आम्हाला समोहित केले होते त्या शाती स्तूपाच्या रुपाने जणू भगवान बुध्दाच दिव्यत्व आमच्या समोर साकारुन उभ राहिल होत भगवान बुद्धाच्या सर्वसमावेशक, त्रिकालाबाधित तत्वज्ञानाची शीतल किरणे जणू त्या स्तूपामधून बाहेर फेकली जात होती आणि त्यात आम्ही न्हाऊन निघत होतो. आमची मलीनता धुवून निघत होती आम्ही पावन होत होतो शुचिर्भूत होत होतो

पीस पॅगोडाच्या समोरील बुध्द मदिराची सजावट करण्यात ४-५ जपानी बुध्दिभक्षु मग्न झाले होते त्या सजावटीमध्ये ते तल्लीन झाले होते स्तुपाच्या पायथ्याच्या जवळच बुध्दवासी निचिदास्तु, फुली गुरुजी ज्याच्या अथक परिश्रमामुळे हा आणि जगातील अनेक शाती स्तुप उभे राहिले होते त्याचा हुबेहुब सिमेंटचा पुतळा बसविलेला होता. पुतळा रगीत होता. निचिदास्तु फुजी गुरुजी हयात असताना अनेक वेळा वरळीच्या बुध्द मदिरात आले होते मी, माझी पत्नि आणि मुले याना फुजी गुरुजीना प्रत्यक्ष पाहण्याचे, त्याच्याशी सभाषण करण्याचे, त्याच्या सहवासात तासनतास बसण्याचे, त्याच्या चरणाना स्पर्श करुन त्याचा आशिर्वाद घेण्याचे भाग्य लाभलेले होते. फुजी गुरुजीच्या चेहऱ्यावरील तेज व लहान बालकासारख निरागस प्रेमळ हास्य मी आजन्म विसरू शकणार नाही त्याच्या त्या हसण्यातून जणू चादणे साडत असे तर, तो पुतळा ज्या कोणी कारागीराने बनविला असेल त्याची धन्य होय पुतळा कसला? हुबेहुब फुजी गुरूजी ! बुध्द मूर्ती समोर ध्यानमग्न अवस्थेत बसलेले ! त्याच ते चेहऱ्यावरील हास्य, अगावरील भिक्षूची पीतवस्त्रे अगदी जसेच्या तस्से, जणू आत्ता त्याच्या चरणाला स्पर्श करुन आपण प्रणाम केला तर लगेच ते आपला सुरकुतलेला कमळाच्या देठासारखा हात उचलून मद थरथरत्या, अत्यत सुमधूर प्रेमळ, वात्सल्याने ओथबलेल्या स्वरात आशिर्वाद देतील “नम्यो हो रेन्गे क्यों”

फुजी गुरुजींच्या पुतळ्याला प्रणाम करुन आम्ही शातीस्तुपाच्या तळाशी उभे राहिलो स्तुपाच्या भव्यतेची तिथे जाणीव होत होती स्तुपाच्या त्या प्रचड शुभ्र घुमटाने जणू क्षितीज व्यापून टाकल्याप्रमाणे वाटत होते स्तुप नुसताच भव्य नव्हता. तो बाधणाऱ्या कारागिरानी कलात्मकतेची जणू परिसीमा गाठली होती. स्तुपाच्या सभोवती मुळ स्तुपाच्या शिल्पापासून दहा फूट अतरावर गोलाकार १०-१२ फूट उचीची, सारनाथ शिल्पाच्या धर्तीवरची कलात्मक कठड्याची भित उभारली होती त्या भिंतीची कलात्मकता, प्रमाणबध्दता आणि रेखीवपणा त्या बाधणाऱ्या कारागिराच्या कसबीपणाची साक्ष देत होता. स्तुपापासुन कठड्याच्या व स्तुपाच्या मधील गोलाकार भाग

स्तुपाभोवती परिक्रमा घालण्यासाठी ठेवलेला होता. कठड्यालाही शुभ्र रंग दिला होता. स्तुपाच्या पायथ्यापासून आठ फुट उंचीवर स्तुपावर "सारनाथ द्वार" डिझाईनप्रमाणे सबंध स्तुपाला वेढलेले असे गोलाकार नक्षीकाम केलेले होते, ते हुबेहुब बाहेरच्या कठड्याच्या भिंती प्रमाणेच केलेले होते जणु काही बाहेरच्या कठड्याच्या भिंतीचे प्रतिबिंबच स्तुपावर पडले आहे असे वाटत होते त्या डिझाईनच्यावर बाजुला कमल पुष्पाच्या दोन दोन फुटी शुभ्र सिमेंटच्या पाकळ्या, स्तुपाच्या घुमटावर कोरल्या होत्या प्रत्येक पाकळीच आकारमान सारख होत. रेखीवपणा ततोतंत होता. त्यावरील रेषा ठसठसीत होत्या प्रत्येक पाकळीचा बाक समान आणि लयबध्द वाटत होता अशा हजारो पाकळ्यांनी स्तुपाच्या घुमटाला वेढले होते त्या पाकळ्यावर लावून नजर टाकली की, वाटत होते जणू त्या स्तुपाच्या घुमटामधूनच उमलून आल्या आहेत। दर्शनी भागातील बुध्द शिल्पाला वंदन करुन, "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मंत्राचा जप करीत मी आणि ब्रायनने डाव्या बाजूकडून स्तुपाची परिक्रमा सुरु केली चालता चालता स्तुपाला स्पर्श करण्यात अवर्णनीय आनंद प्राप्त होत होता

वीस पचवीस पावलाची प्रदक्षिणा होतेय तोच आमच्या डोळ्यांना वास्तुशिल्पाचे आणखी एक नवल दिसले दर्शनी भागा प्रमाणेच इथेही स्तुपाचा आतील भाग कमल पुष्प पाकळीच्या आकाराचा कोरुन आतमध्ये ५-६ फूट उंचीचे भगवान बुध्दाचे सुंदर रेखीव दगडी शिल्प बसविलेले होते दिव्य ज्ञानाची प्राप्ती होण्याकरीता बुध्द ज्यावेळी बसले होते त्यावेळी 'माराने' म्हणजे दुष्ट शक्तींनी त्याच्यावर हल्ला केला होता त्या "मार - विजय" च्या प्रसंगाचे ते शिल्प होते बुध्दाच्या चेहऱ्यावरील निग्रह आणि शांती मूर्तिकाराने अचूक उतरवली होती विनम्र भावे प्रणाम करुन आम्ही पुढे निघालो पाच पचवीस पावले पुढे जातो तोच पुन्हा मागच्या प्रमाणेच शिल्पे दिसली या ठिकाणी दोन्ही हात जोडलेल्या अवस्थेत आणि धम्मोपदेश करण्याच्या अवस्थेतील अशा दोन बुध्दमुर्ती जवळजवळ बसविलेल्या होत्या व त्या मूर्ति उमललेल्या भव्य कमलपुष्पात बसल्या होत्या. पद्मासन घातलेल्या त्या मूर्तिच्या चेहऱ्यावर सात्विक आणि प्रसन्न भाव विलसत होते त्या दोन मूर्तिंच्या मध्ये उमलल्या कमल पुष्पातच एका पॅगोडाचे शिल्प कोरलेले होते व त्यावर निळ्या रंगात सिमेंटमध्ये अत्यंत रेखिवपणे "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" ही जपानी अक्षरे कोरुन बसवली होती तिथे हात जोडून, डोळे मिटून प्रणाम करीत ध्यानस्थ अवस्थेत आम्ही काही क्षण उभे राहीलो आणि पुढे निघालो स्तुपाच्या उत्तर दिशेला आम्हाला चवथ्या शिल्पाचे दर्शन घडले भगवान बुध्द "परिनिर्वाण"

अवस्थेत प्रवेश करतानाचे ते शिल्प होते उजवा हात उशाखाली घेऊन उजव्या कुशीवर पहुडलेले भगवान बुध्द. चेहऱ्यावर असीम शाती आणि दिव्यत्वाचे तेज साकार झालेले धीरगभीर तरीही उदात्त। चिरविरहाची वेदना देणारे तरीही मानवतेच्या महन्मगल बुध्द तत्वज्ञानाची प्रेरणा देणारे असे ते शिल्प त्याच्याखाली बुध्दाच्या पाच शिष्याच्या वेगवेगळ्या तऱ्हेच्या, हात जोडलेल्या अवस्थेतील, बुध्दाला अखेरचा प्रणाम करणाऱ्या अवस्थेतील शिल्पाकृती कोरलेल्या होत्या पाहणाऱ्याच मन हेलावून टाकील अस ते शिल्प। नकळत माझे डोळे पाण्याने डबडबले, प्रणाम करण्यासाठी जोडलेले हात कप पावू लागले "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्राचा उच्चार करताना गळा रुध्द झाला बऱ्याच वेळाने मी डोळे उघडून शेजारी पाहीले माझ्या शेजारी हात जोडून उभ्या असलेल्या ब्रायनचीही माझ्या सारखीच अवस्था झाली होती. त्याचा मुळचा बालिश चेहरा अधिकच निरागस वाटत होता उत्तेजनेमुळे तो अधिकच लालबुद दिसत होता त्याच्या आणि माझ्या डोळयातील अश्रूमध्ये बुध्दाच प्रतिबिब होत भगवान बुध्दाने त्याच्या आणि माझ्या हृदयाच्या तारा सारख्याच छेडल्या होत्या. भगवान बुध्दाचे तत्वज्ञान सर्वव्यापी आहे। त्याची करुणा सर्वस्पर्शी आहे। त्यानी सागीतलेले सत्य त्रिकालाबाधीत आहे। पाणावलेल्या डोळ्यानी आणि तृप्त मनाने आम्ही आमची प्रदक्षिणा सपविली शातीस्तुपाच्या शातीने आम्ही भारावून गेलो होतो त्या स्तुपाभोवती लावलेल्या शेकडो छोट्या जपानी घटा, ज्या वाऱ्यावर सुमधूर ध्वनी निर्माण करीत होत्या. त्याच्या किणकिणाटाचे सुमधूर प्रतिध्वनी आमच्या हृदयातून उमटत होते कायम उमटत राहणार होते अमेरिकेतील लॅव्हरेत येथील बौध्द शाती स्तुपाच्या भेटीची स्मृती ते आमच्या हृदयात कायम जागी ठेवणार होते

शाती स्तुपाचे दर्शन घेतल्यावर काही वेळ ब्रायनने आणि मी शातीस्तुपाच्या समोरील वेग वेगळ्या ठिकाणी अनेक फोटो घेण्यात व्यतित केला. आता मिरवणुक सुरु होण्यास थोडाच अवधी उरला होता. मी आणि ब्रायन जवळजवळ धावतच टेकडीच्या पायथ्याकडे निघालो आम्ही टेकडीच्या पायथ्याजवळ पोहोचतोय तोच दुरुन "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्राचा हजारो कठातून उमटलेला निनाद आमच्या कानावर पडला

आम्हाला थोडा उशीरच झाला होता मिरवणुक नुकतीच सुरु झाली होती मी जवळच्या एका उचवट्यावर कॅमेरा सरसावून उभा राहिलो शेकडो लोकाची राग ड्रम वाजवीत आणि एक सुरात "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्र म्हणत वर येत होती सर्वात पुढे दोन जपानी भिक्षू निळ्या रगातील दोन

लाबट ध्वज ज्यावर "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्र लिहीला होता, ते ध्वज उच धरुन चालले होते त्यापाठी रगीत कपड्याचे चौकोनी आकाराचे दोन ध्वज धरुन दोन अमेरिकन तरुणी चालल्या होत्या. त्याच्यापाठी एक दाढीवाले अमेरिकन मध्यमवयीन गृहस्थ आठ दहा फुटी पोलवर लावलेला चौकोनी कापडी कदील धरुन चालले होते त्याच्या चारी भागावर जपानी अक्षरात बुध्दवचने लिहीलेली होती त्याच्यामागे शेकडो बुध्दभिक्षू ड्रम वाजवित मत्रघोष करीत चालले होते सर्वात पुढे सिनियर भिक्षू व मागे आपापल्या जेष्ठतेच्या क्रमानुसार भिक्षू चालले होतें त्यापाठी चौकोनी आकारच विविध रगी कापडी छत्र चार रगीत पोलवर सावरीत काही लोक चालले होते त्या छत्राखाली दोन बुध्दभिक्षू डोक्यावरील कलशामध्ये ब्रह्मदेश व नेपाळ भिक्षू सघाने भेट दिलेल्या बुध्दाच्या अस्थि घेऊन चालले होते त्यापैकी एक लॅव्हरेत पॅगोडाच्या उभारणीत सिंहाचा वाटा असलेले जपानी भिक्षू "कतो शोनीन" होते व दुसरे नेपाळी भिक्षू होते त्यापाठी चालण्याचा मान शाती पदयात्रीच्या आमच्या जथ्याला दिला होता माझे पदयात्रेतील सर्व परिचित सहकारी येताना दिसत होते व त्या पाठी शेकडो अमेरिकन, जपानी, चिनी, युरोपियन, अशियाई असे लोक ड्रम वाजवित "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" म्हणत येत होते.

ती विशाल मिरवणूक पाहून मला काही सुचेनाच। मी नुसताच खुळ्यासारखा पहात होतो लगेच मी भानावर आलो व पटापट छायाचित्रे घेऊ लागलो मागे पुढे पळत मी सारखे फोटो घेत होतो खुपशी छायाचित्रे घेतल्यावर मी आणि ब्रायन पुन्हा धावत धावत आमच्या पदयात्रींच्या जथ्यात सामील झालो

हजारो मुखातुन "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्राचा ध्वनी वातावरणात घुमत होता. त्याने व ड्रमच्या लयबध्द गभीर ध्वनीने सारे वातावरण दुमदुमले भारले गेले. सर्वांच्या चेहऱ्यावर अवर्णनीय आनद दृगोच्चर होत होता. आपण काहीतरी जगा वेगळ, काहीतरी अत्यत मगल, उदात्त पण शब्दात न सापडणार, आपण अनुभवीत आहोत अस प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होत निसर्गाने मात्र आपल रुप आता अधिकाधिक रौद्र करायला सुरवात केली होती धुक अधिकच दाट होऊ लागलं होत, त्यातून पाण्याचे थेब पडू लागले होते वारा जोरात वाहू लागला होता. थडीचा कडाका, विलक्षण वाढला होता आकाशात काळ्या ढगानी दाटी केली होती कुठल्याही क्षणी पाऊस कोसळण्याची शक्यता होती. पण त्याची कोणाला फिकीर नव्हती मिरवणुकीतील जोश, उत्साह, मागल्य क्षणाक्षणाला वाढतच होत. जशी जशी

शोभायात्रा स्तुपाच्या दिशेने जवळ जवळ येऊ लागली तसतशी लोकाच्या आनदाची, उत्साहाची कमान वर वर जाऊ लागली मत्रघोष अधिक उच्चरवाने होऊ लागले ड्रमचे धीर गभीर ध्वनी तिथल्या झाडा झुडपाचे पान - न - पान कपित करु लागले सागराच्या विशाल लाटेप्रमाणे गर्जत चाललेला तो जनसमूह शाती स्तुपाच्या पायाशी जाऊन तिथे मिलनास आतूर झालेला होता.

भगवान बुध्दाचे अस्थिकलश भिक्षूनी बुध्दमूर्तिसमोरील सुशोभित मचकावर ठेवले आणि सर्व भिक्षू आपापल्या जेष्ठतेच्या दर्जानुसार विशाल चबुतऱ्यावर स्थापनापन्न झाले. पाठीमागून येणारा ४-५ हजाराचा जनसमूह अत्यत शातपणे येत होता व फलकावर लिहीलेल्या सूचनेप्रमाणे स्थानापन्न होत होता अधून मधून ध्वनिक्षेपकावरुनही सूचना दिल्या जात होत्या. बुध्द भिक्षूच्या स्थानाच्या अगदी जवळ शाती पदयात्रेत सहभागी झालेल्या पीस पीलग्रीम्सची, म्हणजे आम्हा मडळीची बसण्याची व्यवस्था होती आमच्या डाव्या बाजूला "ओव्हरसीज गेस्ट" होते त्याच्या डाव्या बाजूला इतर सन्माननीय निमत्रीताची बसण्याची व्यवस्था होती व मागच्या रागात सर्व अमेरिकन मडळी बसली होती अनेक लोक खूर्च्या कमी पडल्यामुळे मागे उभे होते.

मला मोठे नवल वाटले की, माणसे शातपणे येत होती बसत होती जागा नसल्यामुळे काही उभी रहात होती एवढा ४-५ हजाराचा जनसमूह त्यात लहान बालके, वयोवृध्द व्यक्तिही होत्या पण कुठेही गोंधळ नव्हता, गडबड नव्हती, आरडा ओरडा नव्हता, धावपळ नव्हती सार कस शातपणे, शिस्तीने, सयमाने अबालवृध्दाच्या वागण्यातील समजसपणा वाखाणण्याजोगा होता. तरुण मुले-मुली बहुसख्येने होती पण कुणाच्याही वागण्यात थिल्लरपणा नव्हता. प्रसगाचे गाभिर्य आणि भारदस्तपणा याला गालबोट लागेल अस कुणीही वागत नव्हत अमेरिकन समाजाची सार्वजनिक समारभात वागण्याची पध्दत, त्याचे शिष्टाचार अनुकरणीय आहेत या समारभात अमेरिकन लोकाच्या खालोखाल जपानी लोकाची उपस्थिती होती दीड दोन हजार जपानी तेथे मुलाबाळासह जमले होते जपानी माणूस मुळचाच शात त्याची भाषा, बोलण, वागण सारच मृदू. जखमेवर बाधली तरी न खुपणारी अशी ही माणस या प्रसगी ती सारी मोठ्या श्रध्देने आणि आपुलकीने जमलेली होती

'डॉ. पौला ग्रीन' ह्या मध्यमवयीन अमेरिकन, न्यू इग्लड राज्यातील प्रमुख शाती कार्यकर्त्या आजच्या कार्यक्रमाचे सूत्र सचालन त्याच्याकडे होते. मॅसेच्युसेटस् युनिव्हर्सिटीत झालेल्या "फेथ् इन ॲक्शन" परिसवादाचे प्रभावी

सुत्रसचालन त्यानीच केले होते त्यामुळे त्या आमच्या परिचीत होत्या डॉ पॉला ग्रीन याचे व्यक्तीमत्व आकर्षक, वाणी गोड, भाषेवर प्रभुत्व व सर्वात प्रभावीत करणारी गोष्ट होती ती म्हणजे तरल विनोदबुध्दी, त्याचे सूत्रसचालन म्हणजे श्रोत्याशी केवळ खुसखुशीत सुखसवाद असे.

कार्यक्रमपत्रिकेत जाहीर केल्याप्रमाणे ठीक सकाळी १० वाजता मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. जगाच्या कानाकोपऱ्यातून इथे आलेल्या सर्व शातीप्रिय लोकाचे त्यानी प्रथम हार्दिक स्वागत केले व आभार मानले सर्व प्रथम लॅव्हरेत येथील बौध्द शाती स्तूप ज्याच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने उभा राहिला त्या बुध्दवासी निचिदात्सु फुजी गुरुजीचे अत्यत कृतज्ञतापूर्वक व भावपूर्ण शब्दात पुण्यस्मरण केले गेले व आजच्या शातीस्तुप उद्‌घाटनाच्या व अमेरिकन जनतेला तो अर्पण करण्याच्या सोहळ्याला सुरुवात होत आहे असे जाहीर केले गेले

डॉ पौला ग्रीन एवढी एक दोन वाक्ये बोलताहेत न बोलताहेत तोच पावसाची एक दणदणीत सर कोसळायला सुरुवात झाली एकदम आकाशातून कोणीतरी अनेक झाऱ्यातून पाणी ओताव तसा पाऊस पडू लागला त्यात अमेरिकेचा पाऊस म्हणजे बर्फाच्या धाराच। माणसाच्या चिकाटीचा आणि सहनशीलातेचा अत पाहणारा तो बर्फाळ पाऊस पडू लागला. एवढ्या चागल्या कार्यक्रमाचा आता विचका होणार असे मला वाटले सचित मुद्रेने मी आजूबाजूला पाहीले आणि हबकलोच। तेथे जमलेल्या ५-६ हजार माणसातील एकही माणूस जागच हलल देखील नव्हत माणसात साधी चुळबुळही नव्हती काहीनी रेनकोट आणले होते ते त्यानी शातपणे अगावर चढवल आणि बाकी तसेच शातपणे बसून राहीले अगावर पडणाऱ्या पाऊसधारा झेलीत. ।

तशा कोसळत्या पावसात ठरल्याप्रमाणे कार्यक्रम सुरु झाला. सर्व प्रथम ४ ऑक्टोबर ८५ रोजी मॅसेच्युसटस् युनिव्हर्सिटीमध्ये झालेल्या, सर्व धर्म परिषदेत समत केलेल्या, "स्टेटमेट ऑफ डिक्लरेशन टू नॉन व्हायलन्स" चे वाचन झाले 'कु सुझान बेलोट' सेटर फॉर द स्टडी ॲण्ड प्रॅक्टीस ऑफ ख्रिश्चन नॉन व्हायलन्स' या स्थानिक सस्थेच्या त्या कार्यकर्त्या होत्या

नतर पवित्र धार्मिक विधी सुरु झाले तुफान कोसळणाऱ्या पावसात आणि गारठ्या वाऱ्यात समोरच्या चबूतऱ्यावर बसलेल्या १००-१५० जपानी बुध्दभिक्षूच्या मुखातून धीरगभीर मत्रध्वनीचे घोष उमटले आणि क्षणभर

पाऊसहा थबकला बुध्दप्रार्थनेच्या मत्रघोषाच्या लाटा आणि ड्रम्सचे थरथरते निनाद वातावरणात पसरले आणि सर्व काही भारावल्यासारख वाटू लागल जमलेली हजारो माणस श्वास रोखून ऐकू लागली विविध तऱ्हेच्या प्रार्थना तासभर चालल्या होत्या. मत्रध्वनीची कपन श्रोत्यांच्या हृदयाला भिडत होती ढगाचा गडगडाट आणि विजाचा कडकडाट त्या मत्रध्वनीपुढे निष्प्रभ वाटत होता. पावसाचा जोर क्षणाक्षणाला वाढत होता पण आता कोणालाच त्या पावसाच आणि थडी गारठ्याच काहीच वाटत नव्हत आम्ही आता पावसाला रुळलो होतो ह्या अविस्मरणीय सोहळ्याचा साक्षिदार असा आमच्यासारखा तो निसर्गाचा शातीदुत आहे असे आम्हाला वाटले

त्यानतर प्रार्थना घोषातच स्तुपावरील बुध्दशिल्पाचे उद्घाटन झाले त्यावेळी लोटस सुत्राच्या १६ व्या अध्यायाचे पठण झाले नतर बुध्दाच्या अस्थिची पूजा झाली त्या अस्थिचा कलश स्तुपाच्या शिखरावर असलेल्या अवशेष गृहात ठेवण्यात येणार होता नतर अस्थिना पुष्पाजली वाहून सामुदायिक बुध्द प्रार्थना झाली त्यात जमलेल्या सर्व प्रेक्षकानीही सहभाग घेतला पुन्हा लोटस सुत्राचा ११ वा अध्याय व इतर प्रार्थना झाल्या. नतर "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" ह्या पवित्र मत्राचे प्रथम उद्गाते बुध्दवासी निचिरेन महा बोधीसत्व, जे तेराव्या शतकात जपानमधील महान सत होऊन गेले, त्याच्या उपदेशाचे पठण झाले. तदनतर भगवान बुध्द, त्याचे महान शिष्य याच्या विषयी आदर आणि कृतज्ञता व्यक्त करणारी प्रार्थना झाली मग सर्वात जेष्ठ बुध्द भिक्षुनी आपले मनोगत व्यक्त केले व पवित्र विधी सपला. त्यानतर सभेचे कामकाज सुरु झाले लॅव्हेरेत शहराच्या 'नॅन्सी इमाड' व 'गॅरी ग्रबर' या स्थानिक पदाधिकाऱ्यानी सर्वाचे स्वागत केले त्यानतर बरेचसे वक्ते, जे जगाच्या कानाकोपऱ्यातून आले होते ते थोडक्यात आणि समयोचित बोलले वक्त्यात सौ सुमित्रा कुलकर्णी, ग्रेटर लडन काऊन्सीलचे सदस्य इलियड हॅरिग्टन, लॅव्हेरेत शातीस्तुपाचे बाधकाम प्रमुख तरुण मास्टर इजिनियर बॉब जेनिंग्स वगैरे मान्यवर होते. शुभ सदेश तर शेकडो आले होते त्यातील प्रमुख म्हणजे अमेरिकन सिनेटर जॉन केरी, मॅसेच्युसेटस्चे गव्हर्नर मायकेल डुकाकीस, मॅसेच्यूसेटस् युनिव्हर्सिटीचे चॅन्सलर जोसेफ डूफाया वगैरेंचे होते. अमेरिकन इडियन लोकाच्या हक्कासाठी लढणारे नेते डेनिस बॅकस, जे सध्या साऊथ डॅकोटाच्या तुरुगात होते त्याचा सदेश त्याची तरुण मुलगी तोषीना बॅकस् ज्यावेळी वाचू लागली त्यावेळी साऱ्याची अत करणे हेलावली. अखेर तोकुओ मासूई या निप्पोनझॅन म्योहयोजी पथाच्या जपानी भक्ताने समारोपाचे भाषण केले

व मुसळधार पावसात सतत तीन तास चाललेला हा अविस्मरणीय व हृद्य सोहळा संपला. नखशिखान्त भिजलेल्या हजारो श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला व उठून मानवंदना दिली

त्यानंतर जमलेल्या प्रत्येक श्रोत्याला भेटवस्तू असलेल्या पिशव्या देण्यात आल्या. त्यात पुस्तके, लॅव्हरेंत पॅगोडाचे मोठे पोस्टर, दोन जपानी छोट्या काशाच्या बेल्स अशा वस्तू होत्या. त्यानंतर लंच झाला. प्रत्येक जण आपल्याला हव्या असलेल्या तंबूत शिरुन जेवला जेवण भरपुर होते सर्वांनी मनसोक्त आस्वाद घेऊनही खूप उरले होते

मजेची गोष्ट म्हणजे लंच वगैरे संपवून सर्वजण परतू लागले आणि पाऊस खडखडीत उघडला. धुके निवळले. आभाळ निळेभोर स्वच्छ दिसू लागले. सुर्याची किरणे प्रकाशाचा वर्षाव करु लागली. शांतीस्तूप उजळून निघाला मी हात जोडून शांतीस्तूपासमोर उभा होतो मनातल्या मनात निसर्गाच्या लहरी वागण्याची संगती मनात लावण्याचा प्रयत्न करीत होतो.

दुपारी तीनच्या सुमारास आम्ही सर्व शांती-पदयात्री "क्वाकर्स प्लेस" या आमच्या कालच्याच मुक्कामाच्या स्थळी आलो सायकाळची कोवळी उन्ह अमेरिकेच्या त्या रंगीबेरंगी निसर्गावर पसरली होती चर्चसमोरच्या हिरवळीवर बसून मी कार्यक्रमाची स्मरणिका चाळीत बसलो होतो त्यात लॅव्हरेंत पीस पॅगोडाचे प्रेरणास्त्रोत व मार्गदर्शक निचिदास्तू फुजी गुरुजी याचे जागतिक शांतता आणि मानवकल्याण यावरील मुद्रीत केलेले विचारधन मी वाचीत होतो पुन्हा पुन्हा वाचत होतो डोक्यावर विशाल निळे क्षितिज पसरले होते सभोवती सर्वत्र हिरवागार निसर्ग पसरला होता. उबदार ऊन अंगावर खेळत होते झाडा पानांचा उन्मादक, हवाहवासा गंध घेऊन वारा वागडत होता. आणि फुजी गुरुजींच्या त्रिकालबाधीत विचारांनी मी झपाटला गेलो होतो एखाद्या मंत्राचा उच्चार केल्याप्रमाणे मी मोठ्याने त्याचे वाचन करीत होतो. सभोवतालचा निसर्गही जणू तल्लीन होऊन ऐकत होता

"Non-violent resistance, a gentle movement through which people are spiritually united and raise their voices of protest, is the only way to extinguish the violent fire that would result in human annihilation

This fire must be put out If this fire can be

extinguished, people will no longer be laid astray

Then this world of ours will be tranquil and the minds and hearts of the people will turn in to those of celestial beings filled with joy Flowers will bloom and trees will bear fruits Music will echo and the drums resound Whatever we do will be a celebration of joy This is the world to come We must creat it"

- Nichidatsu Fujii

## १२ : हुरहूर दाटली मनी . . .

६ ऑक्टोबरचा दिवस हुरहुर लावणारा उगवला. आयुष्यातील काहीतरी खूप चागले होऊन गेलल होत. त्याच्या स्मृती मनाला सुखवित होत्या विषण्णही करीत होत्या गेले पधरा दिवस अमेरिकेच्या सुजलाम् सुफलाम् भूमीवरील चाललेला आमचा "पीस-वॉक" सपला होता. लॅव्हरेतच्या शातीस्तूपाच्या पायथ्याशी त्याची सागता झाली होती रोजची धावपळ, रोजची पदयात्रा, रोजचे नवे अनुभव, रोजची उत्कठा, रोजच नाविन्य आता सपल होत. "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मत्राचा तो सामुदायिक घोष, ड्रम्सच्या धीरगभीर तालावर पडणारी आमची जलद, लयबद्ध पावल आता थाबली होती रोज नव्या मुक्कामाच्या जागेवर पोहोचल्यावर होणाऱ्या, शरीराचा रोम-रोम पुलकित करण्याच्या त्या सर्वधर्मीय प्रार्थनाचे स्वर आता ऐकू येणार नव्हते गावागावातून आणि शहराशहरातून आम्हाला उत्सुकतेने पाहणारी अमेरिकन अबालवृद्ध मडळी आता दिसणार नव्हती चालून चालून थकलेल्या आमच्या शरीराना प्रेमळ सावलीचा गारवा देणारी ती अमेरिकन वृक्षराजी आणि हिरवळ आता दिसणार नव्हती ते नितळ रस्ते आणि विविधरगी आकर्षक कॉटेजेस् दिसणार नव्हत्या आमच्या सर्व पदयात्रीच्या सुखसोयीसाठी अविश्रात धडपडणाऱ्या प्रेमळ सिस्टर बेथची लगबग आता थाबली होती विश्रातीच्या प्रत्येक मुक्कामावर पदयात्रीच्या थकलेल्या पावलाना मसाज करणाऱ्या कवी रिटर्ड डेयोच्या हाताना आज काम उरले नव्हते पदयात्रीच्या दुखऱ्या पायाना मलमपट्टी करणाऱ्या फिल एडमडस्ची प्रथमोपचार पेटी पोरकी होऊन पडली होती सगळ्या अगमेहनतीच्या कामाचा भार स्वतःवर घेणारा सेवाभावी ॲरिक नॅश काल रात्रीच सर्वांचा निरोप घेऊन अश्रू ढाळीत आपल्या घरी गेला होता.

अबोल ॲनामारिया वियोगाच्या कल्पनेने व्याकूळ झाला होता पत्रकार तरुणी बार्बरा आणि मार्था सर्वांचे नाव-पत्ते लिहून घेत होत्या पत्र पाठविण्याची, सपर्क ठेवण्याची कळकळीची विनती करीत होत्या पदयात्रेच्या अग्रभागी विशाल जपानी ध्वज उच धरून ताठ कण्याने चालणारे बुध्दभिक्षू केन, त्याची ती देखणी, तेज पुज आकृती केवळ आम्हा पदयात्रीच्या मन-पटलावर कोरलेली राहणार होती मर्सिडीज माझ्या जवळ येऊन वारवार माझा हात हातात घेऊन आपुलकीने सागत होती "मॅनोहर, तुझी प्रार्थनागीत सदैव माझ्या कानात गुजत राहतील त्यायोगे मला तुझी सतत आठवण येत राहील" ब्रायनची अवस्था तर फारच केविलवाणी झाली होती कालपासून मी पाहत होतो ब्रायन क्षणभरही माझ्यापासून दूर रहायला तयार नव्हता. सतत सावलीसारखा मला चिकटून होता वारवार जणू स्वत:शीच बोलल्यासारखा मला म्हणायचा "ओह, मॅनहर, आय फील व्हेरी सॅड. डोट नो व्हाय? " त्याच्या त्या निरागस उद्गारानी माझ काळीज गलबलून जाई चेहऱ्यावर वडिलकीचा भाव आणून कसाबसा मी त्याला धीर देत होतो 'आपण पुन्हा जरुर भेटू' म्हणून सागत होतो आणि काहीतरी निमित्ताने एका बाजूला जाऊन डोळे टिपीत होतो कमीअधिक फरकान साऱ्याचीच मन हेलावली होती डोळे भरुन आम्ही एकमेकाना पाहून घेत होतो पुन्हा कधी भेटणार होतो, की नव्हतो? कोणास ठाऊक!

आज आम्ही सर्व पदयात्री आपल्या बाडबिस्तऱ्यासह प्रथम लॅव्हरेत शातीस्तूपावर जाणार होतो तिथून आमची ग्रॅफ्टन येथे जाण्याची व्यवस्था केली होती आणि त्या जागेचा भूमिपूजन समारभ, "ग्राऊड ब्रेकिंग सेरिमनी" आज दुपारी होता. त्याला आम्ही उपस्थित राहणार होतो. ग्रॅफ्टनच्या कार्यक्रमानतर आमची पागापाग होणार होती कोणी कुठे जाणार होता कोणी कुठे. मला तिथून न्यूयॉर्कला जायचे होते. माझा पुढील आठवड्यातील मातृभूमीकडे प्रयाण करीपर्यंत मुक्काम न्युयॉर्क शहरातच होता.

सकाळी ठीक ७.३० वाजता आम्हाला न्यायला बसेस आल्या. ८ वाजता आम्ही लॅव्हरेतला पोहोचलो. तिथून ठिक ९ वाजता सर्व गाड्या ग्रॅफ्टनकडे निघणार होत्या. आज वातावरण अगदी स्वच्छ व प्रसन्न होते. सुर्यकिरणाची मुक्त उधळण सगळीकडे होत होती. आकाश निरभ्र होते. गार वारा झुळझुळ वाहत होता. तरतरी आणीत होता. बहरलेला निसर्ग रग-गधाची उधळण करीत होता. मी बोस्टनवरुन प्रथमदिवसाच्या पदयात्रेसाठी आलेला दिवस मला नकळत आठवला. तो ही दिवस असाच होता. तजेलदार, कुरकुरीत, गध-धुद करणारा

गध-धुद करणारा

लॅव्हरेत पीस पॅगोडाचा परिसर आजही माणसानी गजबजून गेला होता आम्ही तिथे गेल्याबरोबर जेष्ठ बुध्दभिक्षू 'शाती शुगे शोनीन' याचेसह पीस पॅगोडाचे दर्शन व परिक्रमासाठी निघालो मी, ब्रायन, मर्सिडीज, मार्था, बार्बरा, दोघे जर्मन तरुण, एक नेपाळी बुध्दभिक्षू जपानी बुध्दभिक्षू तेरासोवा अशी आठदहा जण होतो सकाळच्या कोवळ्या उन्हात शुभ्र रगाचा शातीस्तूप स्फटिकासारखा तेजाने चमकत होता भव्य उत्तुग वाटत होता. सभोवताली विविध रगाने नटलेली वृक्षराजी, वर विस्तीर्ण निळे क्षितिज, लालसर जमिनीवर विराजमान झालेला पाढरा शुभ्र शातीस्तूप... जणू आकाशातून अलगद जमिनीवर उतरलेला शुभ्र ऐरावत, शुभ्रवसनधारी शातीदूत• 'नम्यो - हो - रेन्गे - क्यो' म्हणत शाती शुगे शोनीनच्या पाठोपाठ आम्ही तीन प्रदक्षिणा पूर्ण केल्या. समोर जाऊन काही फोटो घेतले डोळेभरुन शातीस्तूपाचे दर्शन घेतले भक्तीभावे वदन केले आणि निघालो काहीतरी भव्य-दिव्य उरात साठवून. काहीतरी अविस्मरणीय अस मनात घेऊन

ग्रॅफटनकडे निघताना आमच्या पदयात्रींपैकी लॅव्हरेतवरुनच आपापल्या मुक्कामाकडे जाऊ लागले निरोप घेऊ लागले दोघे जर्मन तरुण लॅव्हरेत पीस पॅगोडाजवळच काही दिवस राहणार होते मर्सिडीज, मार्था, बार्बारा याना कॅलिफोर्नियाकडे जाणारा कोणी कारवाला सोडणार होता. रिचर्ड डेयो, फिल एडमडस् हे देखील एक कार मधून निघाले होते

एकेक मित्रमडळी भरल्या अत· करणाने आणि रुध्द कठाने निरोप घेऊन भराभर जात होती मी तेरासोवा भन्तेजीजवळ उभा राहून एकेकाना निरोप देत होतो

एकाएकी पाठीवर हॅवरसॅक बाधलेला छोटा ब्रायन लगबगीने माझ्याकडे येताना दिसला• जवळजवळ धावत येवून त्याने मला कडकडून मिठी मारली.

"व्हाय, ब्रायन, आर यू लिव्हींग ?" त्याच्या पाठीवरच्या बाडबिस्तऱ्याकडे पाहत मी म्हणालो "सॉरी, व्हेरी सॉरी मॅनहर. बट आय् व्हॅव टू." आपली मिठी अधिकच घट्ट करीत व माझ्या कुशीत तोंड लपवित तो म्हणाला.

त्याची कर्मकहाणी ऐकून एका सदगृहस्थाला त्याची कणव आली होती. त्याने त्याला जॉब देऊ केला होता. त्यामुळे त्याला त्याच्याबरोबर

ताबडतोब निघावे लागत होते पाच मिनिट मी त्याची समजूत काढीत होतो धीर देत होतो वडिलकीच्या नात्याने सल्ला देत होतो. ब्रायनचा चेहरा लालबुद झाला होता. कुठल्याही क्षणी त्याला रडू कोसळले असते. मी खिशात हात घातला त्याला आवडणारे "रीजन्ट स्पेशलचे" अख्खे पाकीट व एक डॉलरची नोट त्याच्या हातात कोंबली व त्याला कारमध्ये ढकलला कार सुरु झाली उतारावरुन गाडी अदृश्य होईपर्यत काचेतून व्याकूळ नजरेने ब्रायन माझ्याकडे पाहात होता. हात हलवित होता.

ब्रायन दृष्टीआड झाल्यावर मला विलक्षण एकाकी वाटू लागले. गलितगात्र होऊन हताशपणे मी तिथल्या लाकडी ओडक्यावर कपाळाला हात लावून बसलो होतो. डबडबलेल्या डोळ्यानी भकासपणे चोहीकडे पहात राहिलो

"उदासवाणे नेत्र शोधती जे कोठेही नसे.

गलित पाकळ्यातून जुळावे पुन्हा पुष्प ते कसे "

ग्रॅफटनकडे निघालेली आमची मेटेडॉर वातानुकुलित होती एक अमेरिकन तरुणी ड्रायव्हिंग करीत होती मी, तेरासोवा भन्तेजी, एक सिलोनी गृहस्थ, एक जपानी स्त्री व तिचा ८-९ वर्षाचा विलक्षण लाघवी मुलगा, एवढेच होतो प्रवास बराच लाबचा असावा कारण गाडीत खाण्याच्या पदार्थाचा करडा ठेवला होता.

लॅव्हरेतपासून आमचा अर्ध्यापाऊण तासाचा प्रवास होतोय न होतोय तोच या भागातील अप्रतीम निसर्गसौंदर्याची प्रचिती येवू लागली हा विभाग छोट्या छोट्या डोगराळ टेकड्यानी बनलेला आहे. रस्त्यावर दर १०-१२ मिनिटानी आकर्षक छोटे छोटे पूल, त्याखालून खळाळत जाणारे स्फटिकशुभ्र पाण्याचे झरे, टेकड्याच्या उतारावरचे हिरवेगार लॉन्स, झाडाचे विविधरगी पुजके, टुमदार घराच्या वस्त्या, नितळ नागमोडी रस्ते ; मी आतापर्यंत पाहिलेल्या अमेरिकेच्या भूप्रदेशापैकी हा सर्वात रमणीय भूप्रदेश । काय पाहू आणि किती पाहू अस मला झाल ते नितातसुदर निसर्गसौंदर्य पाहून तेरासोवा भन्तेजी म्हणाले की, "फुजी गुरुजी म्हणायचे की, अमेरिका हा इतका सुदर देश आहे की येथे शेकडो शातीस्तूप बाधता येतील " त्याचे म्हणणे अक्षरश: खरे होते हे मला मनोमन पटले

जाताना आमचा मार्ग रेडइडीयन्ससाठी राखीव असलेल्या भागातून गेला आणि मला सागायला अत्यत आनद वाटतो की तो भाग अमेरिकेच्या इतर भागापेक्षा त्यानी अत्यत सुदर ठेवला होता. निसर्गसौंदर्य अधिक

भागाच्या तुलनेने तो काकणभर अधिक सरस होता शिवाय त्यानी आपली सास्कृतिक मूल्येही डोळसपणे जपलेली आढळून येत होती

भूमीपुत्राचा राखीव भूप्रदेश, राखीव वसाहती म्हणजे मूर्तिमत मागासलेपणा हे आपल्याकडे समीकरण ठरुन गेलेले पण अमेरिकन रेड इडीयन्सच्या वसाहती इतरापेक्षा अधिक देखण्या आणि समृद्ध होत्या ते पाहून मला खूप खूप बरे वाटले

निसर्गसौदर्याचा आणि टोकरीतील खाद्य पदार्थांचा आस्वाद घेत आमचा मजेत प्रवास चालला होता. उकडलेली गोड मक्याची कणस, सॅडवीच, डोनट, ॲपल, कॉफी आमची चैन चालली होती दुपारी ११ च्या सुमारास एका पेट्रोलपपावर गॅस भरण्यासाठी आमची गाडी थाबली पाठोपाठ आश्विन पटेल, प्रेमकुमार व इटालियन मुलगी लॉरिता याची कार येऊन थाबली आमच्या गाडीत मक्याच्या कणसाचे बुडखे, ब्रेडचे तुकडे, सफरचदाचे तुकडे वगैरे भरलेली कचऱ्याची पिशवी होती ती घेऊन सिलोनी गृहस्थ परेरा उतरले व पेट्रोलपपाच्या दूरच्या कोपऱ्यात निळ्या रगाच्या उभट चौकोनी लोखडी पेटीत टाकून आले प्रेमकुमारनी सहज परेराना विचारले की, “तुम्ही त्या पेटीत काय टाकलेत ?”

“गार्बेज !” खादे उडवित सहजपणे ते म्हणाले ते ऐकून बाकी सर्वजण हसू लागले परेराना काही केल्या कळेना की हे का हसताहेत.

मग प्रेमकुमारानी हसतहसत सागितले की अशा निळ्या पेट्या सार्वजनिक ठिकाणी असतात त्यात लोक चर्च, ख्रिश्चन मिशनरी सस्थाना मदत म्हणून जुनी कपडे अथवा वस्तू टाकतात

आमच्या इग्लडनिवासी परेरानी त्यात कचऱ्याची पिशवी टाकली होती या अभावितपणे घडलेल्या विनोदामुळे आम्ही सारेजण मनमुराद हसलो परेराही त्यात सामील झाले जपानी बाईचा लहान मुलगा तर टिऱ्या बडवित उड्या मारुन खो खो हसत सुटला

ग्रॅफ्टनला आमची कार दुपारी १ ३० ला पोहोचली इतर बुद्धभिक्षु - भिक्षुणी आधीच पूजास्थानी स्थानापन्न झाल्या होत्या तेरासोवा भन्तेजी धावतच जाऊन त्याच्यात बसले. कालच्याप्रमाणेच तास-दीड तास धीरगभीरपणे बुध्दप्रार्थना झाल्या. आजचा कार्यक्रम छोटा आणि आटोपशीर होता जपानी पध्दतीने स्तुपाच्या सकाल्पत जागवर छाटस बुध्दमदिर आकर्षक जपानी पद्धतीने सजविले होते पूजाविधी सपल्यावर एका जेष्ठ जपानी भिक्षूणीने

टोकदार लोखंडी फावडे घेतले व मंत्रघोषाच्या गजरात सहजपणे जमिनीत रूतविले आणि सोडून दिले. आश्चर्य म्हणजे ते तसेच तिरके जमिनीत घट्टपणे रुतून राहिले आम्ही सारे प्रेक्षक अविश्वासाने ते दुर्मिळ दृष्य अवाक् होऊन पहात राहिलो. "स्तुपाचे ग्राऊंड ब्रेकिंग" संपन्न झाले होते त्यानंतर सर्वधर्मिय प्रार्थना झाल्या. सर्वांत लक्षात राहिलेली प्रार्थना म्हणजे तेथील 'रेड इंडियन चीफ' ने पारंपारिक वेषात केलेली त्याच्या देवतेची प्रार्थना. त्यावेळी फोटोग्राफी आणि रेकॉर्डिंग करण्यास मनाई केली गेली आजही त्या प्रार्थनेचे झपाटून टाकणारे ध्वनी मला कधी कधी आठवतात, आणि अंगावर रोमांच उठतात

पूजाविधी आणि सभेचा कार्यक्रम संपल्यावर लंच झाला आणि मग सर्वांची निघायची एकच गडबड उडाली. गडबडीत कोण कुठे गेले ते कळेना. दोनचार पदयात्री भेटले त्यांचा घाईघाईत निरोप घेतला. सिस्टर बेथ जेष्ठ बुध्दभिक्षूच्या परतीच्या प्रवासाच्या व्यवस्थेच्या गडबडीत होती तिचा निरोपही घेता न आल्यामुळे मनाला रुखरुख लागली. प्रेमकुमार एवढ्या गडबडीत कुठूनसे मला शोधीत आले प्रेमभराने भेटले दोन दिवसांनी ते त्यांच्या अमेरिकेतील पदयात्रेच्या अखेरच्या टप्प्याला सुरुवात करणार होते माझा हात आपुलकीने थोपटीत ते म्हणाले

"मनोहरजी, आपसे परिचय हुआ, मित्रता हुअी इस बात की मुझे बहूत खुशी होती है। एक अच्छे मिलनसार इन्सान, एक कलाकार, डिव्होटेड पीस वॉकर की हैसियत से आपने यहाँ अच्छा सम्मान प्राप्त किया। आपके बारे मे यहाँ के लोग जब जब भी मुझसे बात करते थे, उस वक्त मुझे पता चला के आपके बारे मे उनके मनमें बडा सम्मान था। एक भारतीय होने के नाते मुझे बडा गर्व महसूस होता है के मेरे एक भारतीय भाई ने यहाँ परदेश में आकर अपने देश का नाम रौशन किया। यहाँ के अनुभवों के बारे में, अमेरिका के लोगो के बारे मे आप भारत लौटने के बाद जरुर लिखिए। अखबारो मे लिखिए, किताब लिखिए, ताकी हमारे देशवासी जान जाए की अमेरिकन लोगो की किन अच्छाईयों की वजह से आज वह दुनिया' मे सबसे आगे है। '

सायंकाळी ५ च्या सुमारास दुसऱ्या एका मॅटोडोरने आमचा न्यूयॉर्ककडील प्रवास सुरु झाला. आमच्या पदयात्रेतील सुरुवातीच्या प्रकरणात उल्लेख आलेल्या अमेरिकन आजी मॅटेडोर चालवित होत्या. पायी चालताना मागे रेंगाळणाऱ्या आजी गाडी मात्र सुसाट वेगाने आणि मोठ्या सफाईदारपणे चालवित होत्या मॅटोडोरमध्ये माझ्या व्यतिरिक्त न्यूयॉर्कचे इशिबाजी भन्तेजी,

चालवित होत्या मॅटोडोरमध्ये माझ्या व्यतिरिक्त न्यूयॉर्कचे इशिबाजी भन्तेजी, (न्यूयॉर्क विमानतळावर प्रथम दिवशी माझे स्वागत करणारे) इग्लडचे इलियड हॅरिग्टन, एक जपानी उद्योगपती व त्याची पत्नी, दोन बुद्ध भिक्षूणी व एक पोरसवदा जपानी बुध्दभिक्षू व सिलोनी गृहस्थ पोडीयाप्पुहरीय, असे ९-१० जण होतो इशिबाजी भन्तेजी बरोबर असल्यामुळे मी निश्चिंत होतो. माझ्या पुढील ५-६ दिवसाच्या न्यूयॉर्कच्या मुक्कामाविषयी त्यानी व्यवस्था केलेली असणारच, याची मला खात्री होती

पुन्हा एकदा निसर्गरम्य प्रदेशातून आमचा प्रवास सुरु झाला. आत्ताचा हा हायवे असावा कारण गाड्याची रहदारी खूप होती व त्या तुफान वेगात जात होत्या. अधूनमधून वाहनाना मार्गदर्शक वेग मर्यादेचे फलक लावलेले दिसत होते पण आमची ड्रायव्हर आजी आज भलतीच मूडमध्ये दिसत होती व सगळ्या वेगमर्यादाच उल्लघन करीत तुफान वेगाने गाडी हाणीत होती

३-३ ॥ तासाच्या प्रवासानतर, रात्रीच्या साडेआठनतर दूर अतरावर न्यूयॉर्क शहरातील दिवे किंचित दिसू लागले आता रस्त्याचे जाळेही वाढलेले दिसू लागले मोटारीची सख्या प्रचड प्रमाणात वाढलेली दिसू लागली नतर नतर रस्त्याना इतके फाटे फुटलेले दिसू लागले की ते पाहूनच चक्रावल्यासारखे वाटू लागले तुफान वेगात सूळकन् इकडून तिकडे भराभर गाड्या जात येत होत्या रहदारीवर घारीसारख लक्ष ठेऊन, एकाग्रचित्ताने तरीही सुसाट वेगाने ड्रायव्हर आजी त्या तसल्या कोळ्याच्या जाळ्यासारख्या मार्गावरुन चालली होती वेग जराही कमी करीत नव्हती. अखेर रात्री ९ च्या सुमारास आमची कार न्यूयॉर्क शहराच्या सीमेलगत आली कारची गर्दी प्रचड वाढली ट्रॅफिक जाम मुळे गाडी मुगीच्या पावलाने सरकू लागली ट्रॅफिक जाम मुळे आजी चिडली पण आम्हाला बर वाटल गेले चार तास ताशी १००-१२५ कि. मी वेगाने गाडी चालवून, ते पाहून मलाच भोवळ येते की काय अस वाटू लागल होत आता खिडकीच्या काचेवर गाल टेकवून मी रस्त्यावरील गाड्या आणि दिव्याची रोषणाई पाहू लागलो त्यानतर २०-२५ मिनिटातच आमची मेटॅडोर 'वाय एम सी ए' हॉस्टेल समोरच्या रस्त्यावर उभी राहीली सर्वजण खाली उतरले म्हणून मीही उतरलो भराभर मी आतले सर्वांचे बॅगेज बाहेर काढून दिले ड्रायव्हर आजी आमचा निरोप घ्यायला उभी होती तिला पुढे जायचे होते आम्ही सर्वानी तिचे मनःपूर्वक आभार मानले. माझ्याशी जिव्हाळ्याने हस्तादोलन करीत आजी उद्गारली "वुई वील सर्टनली मिट अगेन. ॲन्ड वुई विल अगेन वॉक टूगेदर फॉर वर्ल्ड पीस " आजीचा आशावाद

खरोखरच दुर्दम्य होता. म्हातारी खरोखरच जिगरबाज होती मानना पडेगा।

मी ही दिलखुलासपणे मग तिला दाद देत म्हणालो "सर्टनली मामा, सर्टनली, वुई विल।"

आम्ही सामान पलिकडल्या फुटपाथवरुन वायएमसीए हॉस्टेलच्या बुकींग काऊंटरजवळ आणतोय तोपर्यंत इशिबाजी भनेजीनी आमच्या खोल्याचे बुकींग केलेही होते २० व्या मजल्यावर माझी खोली होती माझे सामान आत ठेवल्यावर इशिबाशी म्हणाले "कृपा करुन आजची रात्र इथे काढा. आता खूप उशीर झालाय. उद्या सकाळी ८ ला मी येईल व तुम्हाला घेऊन जाईन आता आपण जेवायला जाऊ या"

पट्कन सामान ठेऊन आम्ही लगबगीने खाली आलो व एका चागल्या हॉटेलात सर्वांनी जेवण घेतले पुन्हा मी माझ्या रुमवर आलो लॅच लवकर उघडेनाच. शेवटी कसेबसे ते उघडले लाईट लावली दरवाजा बद केला व धडधडल्या अतःकरणाने खोलीचे निरीक्षण केले

खोली छोटीशीच १० फूट बाय १० फूट ची होती सिंगल बेडवर मऊ मऊ गादी, शुभ्र चादर, उशा, ब्लॅकेट सर्व काही छान होते. बेडच्या पायथ्याशी स्टूलावर टी व्ही होता. तो मी ऑन केला. कुठला तरी कार्यक्रम सुरु झाला बॅगा नीट पलगाखाली ठेवल्या. आत दुसरा एक दरवाजा होता तो उघडला. समोर बाथरुम होते शॉवरबाथ होता मी नळ सुरु केला गरम पाणी आले टेबलावर साबणाची छोटीशी वडी होती रुम वातानुकुलीत होता. मी छानपैकी गरम पाण्याच्या शॉवरखाली आघोळ केली थकवा भूर्रदिशी पळून गेला शरीर हलक फुलफुलीत वाटू लागल अगावर उबदार रग गुडाळून थोडा वेळ टी व्ही चा कार्यक्रम पहात बसलो. थोड्याच वेळात डोळे पेंगुळायला लागले घड्याळात रात्रीचे अकरा वाजायला आले होते टी व्ही चा स्वीच ऑफ केला लाईट तशीच चालू ठेवली व सरळ ताणून दिली उद्या कुठ जाव लागणार होत कुणास ठाऊक। बघू, उद्याची बात उद्या. तोंडावर पाघरुन घेत मी शका झटकून टाकली

# १३ : आमचे जागतिक कुटुंब

दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता मला जाग आली डोळे उघडले क्षणभर मी कोठे आहे याचा काहीच उलगडा होईना. मग अचानक सार काही स्पष्ट झाल मी पलगावर उठून बसलो टी व्ही ऑन केला कुठलातरी कार्यक्रम सुरु झाला नतर थोडा वेळ मी उगीचच चॅनेल बदलण्याचा खेळ सुरु केला कुठलही चॅनेल फिरवल तरी आपले कार्यक्रम लागताहेतच ! टी. व्ही तसाच चालू ठेऊन मी बाथरूममध्ये गेलो प्रातर्विधी, दाढी, आघोळ सार काही आटोपून आरामात येऊन पलगावर बसलो खिडकीतून बाहेर पाहील उजाडू लागल होते रस्त्यावर माणस अधूनमधून जात येत होती. नेहमीच्या सवयी प्रमाणे साडसहालाच भूक लागला काहीतरी खायला पाहीजे होते पण जाणार कुठ ? तसाच टी व्ही पहात बसून राहीलो काल कुणीतरी भेट दिलेल्या, सामानात असलेल्या चॉकलेटची अचानक आठवण झाली ते काढून चघळीत बसलो. थोड बर वाटल

ठाक आठ वाजता दारावरची बेल वाजली दरवाजा उघडून पाहातो तो इशिबाशी भन्तेजी दारात हजर. "नम्यो - हो - रेन्गे - क्यो" मी हात जोडून प्रणाम करीत म्हणालो

"नम्यो - हो - रेन्गे - क्यो" अस म्हणून प्रसन्न हसत ते आत येऊन खूर्चीवर बसले व सागू लागले की, त्याच्यावर इतर पाहुण्याच्या प्रयाण व्यवस्थेची जबाबदारी सस्थेने सोपविल्यामुळे मला त्याना त्याच्या जागेवर (जिथे मी पहिल्या दिवशी मुक्काम केला होता) नेता येत नव्हते परतू आम्हा ४-५ परदेशी पाहुण्याची निवास, भोजन व्यवस्था न्यूयॉर्क शहरात स्थायिक झालेले

श्रीलंकेचे एक बौध्दधर्मीय सद्‌गृहस्थ विजीथा याचेकडे करण्यात आली होती 'जमैका क्वीन्स' या विभागात त्याचा मोठा बगला होता व यापुढे हवे तितके दिवस तिथे राहण्याची व्यवस्था केली होती त्याचप्रमाणे सस्थेतर्फे आमची देखभाल करण्यासाठी इटालीयन बुद्धभिक्षूनी नारा तिथे आल्या होत्या व शेवटच्या पाहुण्याला विमानात बसवेपर्यंत त्या तिथेच राहणार होत्या.

इशिबाशीकडे पुन्हा जायला मिळणार नाही हे ऐकून मला वाईट वाटले होते पण नवीन जागी आमच्या पदयात्रेतील भिक्षूणी नारा आहेत हे कळल्यावर जरा उत्साह वाटला.

आता आम्हाला सामान घेऊन ११ व्या मजल्यावर असलेल्या श्रीलकेच्या पोहियाप्पुहरीय याच्या खोलीत थाबावयाचे होते आम्हाला न्यायला येणारी मडळी तिथे येण्याचे ठरले होते

मला सामानासहीत त्याच्या खोलीत सोडून इशिराबाशीजी जायला निघाले मी त्याना थाबवले व त्याच्या पायावर डोके ठेऊन प्रणाम केला. त्यानी मला छातीशी कवटाळून प्रेमाने मिठी मारली व क्षणार्धात निघून गेले नतर मी व ते सिलोनी गृहस्थ गप्पा मारीत बसलो

पधर-वीस मिनिटानी दारावरची बेल वाजली पाहतो तो काय ? दारात श्री परेरा व कालची ती जपानी स्त्री ! ताबडतोब सामान उचलून आम्ही त्याच्या समवेत निघालो खोलीच्या चाव्या खाली काऊटरवर सुपूर्द केल्या. व बाहेर पडलो

बाहेर स्वच्छ उन पडले होते गार वारा वाहत होता प्रसन्न वाटल मी दीर्घ श्वास घेतला व आजूबाजूच्या इमारती दुकाने पहात पहात त्याच्या समवेत चालू लागलो

तेथून जमैका क्वीन्स खूप दूर होते व आम्हाला ट्यूब रेल्वेनी जायचे होते अमेरिकेत त्याला "सब-वे" म्हणतात. जमीनीखालच्या बोगद्यात आमची मिरवणूक शिरली भुयारी रेल्वेचा हा माझा पहिलाच प्रवास. त्यामुळे मी विलक्षण उत्तेजित झालो होतो तळघरातील त्या सब-वे स्टेशनात विजेचा लखलखाट होता जराही कोदट वाटत नव्हते गर्दी अगदी तुरळक होती काचेच्या तिकीट घरात असलेल्या स्त्रीने आम्हाला एकेक कॉईन टोकन दिले हेच तिथल तिकीट बुकिग ९० सेटस् द्यायचे, ते कॉईन घ्यायचे प्लॅटफॉर्मवर शिरताना तेथील धातूच्या बैठ्या खाबाच्या पोकळीत सोडायचे की एका माणसाला आत जाता येत मग तुम्ही दिवसभर आत बसलात किंवा गाडीत

फिरत राहीलात तरी हरकत नाही फक्त स्टेशनच्या बाहेर यायच नाही आलात की पुन्हा जायच असेल तर पुन्हा कॉईन घ्या. अशी मजा तिथल्या तिकीट देणाऱ्या व्यक्तीला विनती केल्यास सबध न्यूयॉर्क शहराच्या सब-वे मार्गाचा सुरेख रगीत नकाशा फुकट मिळतो उत्तम सोय पण त्याचा कुणीही गैरफायदा घेताना तिथ दिसत नाही आमच्याकडे अशी सोय केली असती तर तिकीटबाबूने डोक वापरुन आपली सोय करुन घेतली असती काऊटरवर `नकाशे सपले' असा बोर्ड असता आणि बाहेर तोच नकाशा १ रु. देऊन घ्यावा लागला असता. रेव्हेन्यू स्टॅम्प्स, पोस्टल ऑर्डर याचा आमच्या पोस्ट ऑफिसात नेहमीच दुष्काळ असतो पण समोरच्या पानाच्या गादीवाल्याकडे त्याचा सुकाळ असतो आमची राष्ट्रीय दानत ही अशी उकिरडे फुकीत फिरत असते.

आमच मुक्कामाच स्टेशन बरच दूर असाव सब-वे ट्रेन स्टेशनामागून स्टेशन मागे टाकीत होती प्रत्येक स्टेशन आले की डब्याच्या आतील भागात लावलेल्या स्पिकरवर त्याचे नाव सागितले जाई दरवाजे आपोआप उघडत बद होत माणस आत येत होती उतरत होती सपूर्ण डबा जवळजवळ रिकामाच होता गर्दी नव्हती, गोंगाट नव्हता हमालाचे ओरडणे नव्हते भिकाऱ्याचे विव्हळणे नव्हते जुगार खेळणारी टोळकी नव्हती भजन बोबलणारे भोदू नव्हते फेरीवाले तानसेन, पाकीटमार, कलाकार, हवालदार इत्यादी आपल्या रेल्वेचे अविभाज्य अग असलेले "महापुरुष" नव्हते डब्यात कचऱ्याचा कपटा शोधूनही सापडला नसता बसण्याच्या सीटस् उत्तम स्थितीत होत्या "यह रेल अमेरिकन जनता की सपत्ती है" वगैरे भपक वाक्ये लिहिलेले फलक नव्हते त्याऐवजी त्या मार्गाचे नकाशे स्टेशनाची नावे लिहून लावले होते आपल स्टेशन आल की सहजपणे कळत होत "भई, ये कौनसा इस्टेशन है ? दादर आल का वऽ ?" अशा गर्दीत दामटलेल्या "पॅसिंजराच्या" हैराण आरोळ्या नव्हत्या. सार कस शातपणे, शिस्तीत चालल होत प्रवासात सोय होती, वक्तशीरपणा होता, आनद होता तासाभराने ज्यावेळी आम्ही आमच्या "जमैका क्वीन्स" स्टेशनवर उतरलो त्यावेळी मी गाडीत बसताना होतो तितकाच तरतरीत आणि मजेत होतो.

पुन्हा भुयारातून आम्ही रस्त्यावर साडलो. हातातली बॅग खाली ठेवून मी भोवतालचा परिसर सावकाशपणे न्याहाळला मुख्य रस्त्याला लागून दुकानाच्या चकाकत्या रागा होत्या आणि डाव्या उजव्या ॲव्हेन्यूजवर दुतर्फा टुमदार बगले होते. डाव्या बाजूच्या एका रस्त्यावर आमची वरात वळली व पाच मिनिटातच एका टुमदार बगल्यासमोर थाबली चागला दुमजली, लाकडी

बगला होता "अच्छा, तर आता न्यूयॉर्कमधला उरलेला मुक्काम इथे करायचा। छान।" मी खुष होत मनातल्या मनात म्हणालो व इतर मडळींच्या पाठोपाठ आत शिरलो

भिक्षूणी नारा यानी आमचे मन पूर्वक स्वागत केले आम्ही गुबगुबीत सोफ्यावर विसावलो व ॲपल ज्यूसचे घुटके घेत घेत हास्यविनोदात रगून गेलो दुपारच्या लच नतर बरेच जण निद्राधीन झाले. मी तिथला पत्ता कागदावर लिहून घेतला व सशोधकाच्या आवेशात एकटाच त्या नवख्या प्रदेशाच अवलोकन करायला बाहेर पडलो तास दीड तास तास चालता-चालता दुकानाचे निरिक्षण करीत होतो या विभागात काळया लोकाची वस्ती खूपच दिसत होती आणि बहुसख्य दुकाने भारतीय लोकाची होती

अशाच एका खेळण्याच्या दुकानात मी सरळ घुसलो कॅशबॉक्समागे उभ्या असलेल्या तरुणाकडे क्षणभर रोखून पाहीले व त्याला काही विचारायची सधी देण्याआधी सरळ हिंदुस्तानकी राष्ट्रभाषामे सवाल टाकला, "आप भारतीय हो क्या?" माझ्या प्रश्नाने तो क्षणभर बावचळला पण दुसऱ्याच क्षणाला सावरुन हसत म्हणाला, "जी हॉं, आप भी भारतीय हो क्या?"

खूप दिवसानी हिंदी बोलायला मिळाल्यामुळे किती बोलू न किती नको, असे मला झाले मी माझ्या आगमनापासून आत्तापर्यंतची सर्व "इस्टोरी" त्याला भडाभडा सागितली दुकानातले त्याचे भाऊ आणि बहीण माझ्याजवळ आले ते गुजराथी कुटुब होत मुबईला पार्ल्याला त्याच घर होत आता ते न्यूयॉर्कमय झाले होते; पण मायभूमीची ओढ कायम होती. आणि आपला "गाववाला" भेटल्यामुळे तेही खूष झाले होते मी ही दोन तीन खेळणी खरेदी करुन "बोहनी" केली व "इथे असेपर्यंत तुम्हाला आता सतत त्रास देणार" असे गमतीने म्हणून त्याचा निरोप घेतला. बगल्यावर परतल्यावर "नारा" मावशीला हा किस्सा सागितला. त्यानाही गमत वाटली

दुपारी ३ च्या सुमारास मी एकटाच टी. व्ही पहात बसलो होतो तोच मिस्टर परेरा हळूच माझ्या कानाजवळ येऊन म्हणाले, "मिस्टर रॉपीस, कम हियर" मी आपला त्याच्या पाठोपाठ बगल्याच्या तळघरात आलो इथेही कुणीतरी रहात असाव कारण बेड, इतर फर्निचर, कपडे, फोन सर्व काही तिथे होते समोर टीपॉयवर व्हीस्कीची बाटली व ग्लास ठेवले होते एका हाताने "ते" दाखवित व दुसरा हात माझ्या गळ्याभोवती टाकून मनमोकळे हसत परेरा म्हणाले "कमॉन, जॉईन अस" मी नम्रपणाने त्याना नकार दिला. त्याना नुसती

गप्पा मारण्याची कपनी देण्याचे आश्वासन देऊन त्याच्याजवळ बसलो माझ्या नकाराने गडी थोडे हिरमुसले अर्धी बाटली रिकामी दिसत होती म्हणजे आधी त्याचे पिणे झालेलेच होते मला गाणे म्हणण्याची फर्माईश झाली व नव्या उत्साहात साग्रसगीत पिण सुरु झाल त्याचे दोन-तीन राऊड झाल्यावर श्री परेराना एकदम त्याच्या कुटूबियाची आठवण झाली "आय विल टॉक टू माय वाईफ" असे म्हणून चेबूरहून दादरला फोन लावावा इतक्या सहजतेने त्यानी इग्लडला आपल्या घरी फोन लावला व चागला १५-२० मिनिट रगात येऊन गप्पा केल्या. त्यानतर दुसऱ्या सिलोनी गृहस्थानीही इग्लडला त्याच्या घरी फोन लावून ख्यालीखुशाली विचारली ते ऐकत असताना एकदम माझी घरची आठवण उफाळून आली आपल्या मुबईला फोन लावून कुटूबियाशी बोलण्याची इच्छा अनावर झाली मी चाचरतच त्याना तसे बोलून दाखविले आणि त्यानी तात्काळ होकार दिला "पण घरमालकाला न विचारता कसा करायचा?" मी शका व्यक्त केली "मित्रा, तू त्याची काळजी करु नकोस. घरमालक आमचा परममित्र आहे तू आल्यापासून घरच्या लोकाशी सपर्क साधला नाहीस. तू बोल. ते काळजीत असतील" ते म्हणाले

मुबईला माझ्या बिल्डीगमध्ये तळमजल्यावर शिंदे नावाचे जज्ज राहतात त्याचा आमचा खूप स्नेह. ऑपरेटरला फोनवर मी तो नबर दिला. मुबईचा कोड नबर सागितला आणि धडधडल्या अतःकरणाने वाट पहात बसलो ऑपरेटरकडे मी तीन मिनिटाची वेळ मागून घेतली होती मी घड्याळात पाहीले दुपारचे पावणे चार वाजले होते आश्चर्य म्हणजे दोन मिनिटातच फोनची रिग वाजली. ऑपरेटरने मला बोलायला सागीतले_

——मी विलक्षण उत्तेजित स्वरात 'हॅलो' म्हटले फोनवर शिंदेंचा मुलगा श्रीरग बोलत होता. मी त्याला माझी पत्नि आणि मुलाना लवकर बोलावायला सागीतले बायको मुलाची खुशाली आधी श्रीरगकडे विचारुन घेतली. सगळे खुशाल होते व माझ्या येण्याची आतुरतेने वाट पाहत असल्याचे त्याने सागीतले. मी सहज वेळेची चौकशी केली तर तो म्हणाला रात्रीचे सव्वा एक वाजलेत. ते ऐकून मी उडालोच. गडबडीत भारतातील वेळ ऑपरेटरला विचारण्याचे विसरलो होतो घड्याळाचा काटा क्षणाक्षणाला पुढे सरकत होता. मी मनाशी हिशोब केला. आमचा फ्लॅट तिसऱ्या मजल्यावर, लिफ्टने गेले तरी वर जाऊन बेल वाजवून यायला ३-४ मिनिटे तरी हवीत. आता रात्रीचा सव्वा एक म्हणजे सगळे गाढ झोपेत. तेव्हा मग श्रीरगला मी म्हटले की माझ्याकडे ३ मिनिटेच आहेत. तेव्हा माझा निरोप तू पट्कन कागदावर लिहून घे रजना

फोनवर आली की मग तिला सागेनच. मी ११ ऑक्टोबर रोजी रात्री ११४० वाजता सहार एअरपोर्टवर TWA च्या विमानाने येतो आहे रजनाला साग की मनिषा, किरण, रागिणी सर्वाना घेऊन एअरपोर्टवर ये माझ एवढ होईतो तीन मिनिट झाली. पलि फोनवर येऊ शकली नव्हती पण घरी निरोप पोहोचला याचा आनद थोडका नव्हता

रात्री घरात राहणारी मडळी भराभर जमू लागली आमच्या यममानाना पाहून मी चकितच झालो ३६-३७ वर्षांचा उचपूरा, निमगोरा, देखण्या, आकर्षक व्यक्तिमत्वाचा तो तरुण होता. गेली १० वर्षे न्यूयॉर्कमध्ये स्थायिक झालेला होता त्या आधी ७ वर्षे जपानमध्ये राहीला होता आईबापाचा एकूलता एक मुलगा, घरचा सोन्याचा पिंजरा तोडून आकाशात झेप घेतलेला, मुक्त स्वातत्र्य उपभोगणारा! माझी त्याची प्रथमदर्शनीच दोस्ती जमली. तो बगला जणू जगातल्या वेगवेगळ्या देशातून आलेल्या धाडशी पारवराच निवासस्थान होत तिथे अकाऊटटची नोकरी करणारा एक मलेशियन तरुण रहात होता युनोच्या कचेरीत ऑफीसर असलेले ब्रह्मदेशाचे एक गृहस्थ तिथे रहात होते. बेबी सिटरचे काम करणाऱ्या दोघी तरुण इटालीयन बहिणी होत्या गुणागोविदाने सारे रहात होते आज आम्ही आलेल्यात मी भारतीय. दोघे सिलोनी नारा भिक्षूणी इटालीयन, तेरासोवा भन्तेजी व जपानी मायलेकर जपानची, अजितसिंग नावाचे इग्लडमध्ये स्थायिक असलेले शिख गृहस्थ व नेपाळी वशाचे बुध्दभिक्षू लोद्रो थायो त्या परक्या देशात इग्रजी भाषेने आमची हृदये एकमेकाना जोडली होती आमचे यजमान विजिया हिदी जुन्या चित्रपट गीताचे चाहते निघाले व डीनरनतर उत्तर रात्रीपर्यत आमची गाण्याची मैफल जमली

दुसऱ्या दिवशी सकाळी दोघा सिलोनी गृहस्थाच्या समवेत न्यूयॉर्क शहर पाहण्यास मी निघालो सर्व प्रथम सब-वेने आम्ही वर्ल्ड ट्रेड सेंटरला गेलो तिथे एका बॅकेत मी माझे ट्रॅव्हलर्स चेक इनकॅश करण्यास दिले पण गडबडीत पासपोर्ट घरी राहील्यामुळे करु शकलो नाही त्यामुळे काही खरेदी करण्याचा बेत रहित केला. तिथून पुन्हा सब-वेने आम्ही 'फ्लशिंग' येथे गेलो तिथे सिलोनी बुध्द मदिर होते तिथले प्रमुख भिक्षू पियातिस्सा यानी आमचे स्वागत आमि आदरातिथ्य फार आपलेपणाने केले न्यूयॉर्क शहरातील दुसऱ्या दिवसाच्या मुक्कामाच्या दिवशी प्रमुख बौध्द नागरिकाचे जे 'गेट टुगेदर' झाले होते त्यात त्याची माझी भेट झाली होती मी त्याचे स्मरण करुन दिल्यावर त्याना फारच आनद झाला आमचे दुपारचे जेवण तिथेच झाले नतर आम्ही

मिळून बुध्दप्रार्थना केल्या 'महामगल सुत्र' म्हणून त्यानी तो दोरा आमच्या प्रत्येकाच्या हातात बाधला मी मुबईला आल्यानतर कितीतरी दिवस तो तसाच होता. सिलोनी बुध्दमदिरातील वास्तव्याने माझे मन प्रफुल्लीत झाले मोठ्या आनदाने आम्ही परतलो सायकाळची वेळ मी गुजराती मित्राच्या दुकानात गप्पा मारण्यात घालवली.

दुसऱ्या दिवशी लोद्रो थाये मला आपल्याबरोबर घेऊन जाणार होते. प्रथम आम्ही न्यूयॉर्कमधील एका रशियन बौध्द स्त्रीच्या घरी जायचे व नतर माझ्या खरेदीसाठी जायचे ठरले होते.

सकाळी १० च्या सुमाराला मी लोद्रो थायेसह बाहेर पडलो प्रथम बॅंकेत जाऊन थोडे ट्रॅव्हलर्स चेकचे पैसे घेतले व निघालो. नेहमीप्रमाणे गाडी मोकळीच होती आमच्या गप्पा चालू होत्या. लोद्रो थाये उचीने खूपच कमी पण रगाने गोरेपान-चेहऱ्यावर अत्यत तेज वाणी प्रेमळ आणि मधूर. कुठल्याशा स्टेशनवर उतरुन आम्ही रशियन स्त्रिच्या घरी निघालो आम्ही पोहोचलो तेव्हा त्या आमची वाटच पहात होत्या चाळीशीच्या आसपासची ती अत्यत देखणी स्त्री होती लोद्रो थायेचा व त्याचा अत्यत घरोबा असावा आमचे स्वागत अविस्मरणीय असेच झाले त्या मूळ रशियन बौध्द धर्मीय, घरात बुध्द मुर्ति, भिंतीवर बुध्दकालीन चित्रे, रशियन बौध्दधर्मियाची कुठलीशी सस्था त्या चालवित होत्या. चहाफराळात व गप्पांत २-३ तास भुर्रकन् निघून गेले त्याच्या अविट गोडव्याच्या आतिथ्याच्या स्मृती मनात रेगाळत आम्ही निघालो. मला खरेदी करावयाची होती ना।

---

तिथून चालत चालत, इथल्या तिथल्या दुकानात शिरुन खरेदी करीत आम्ही एम्पायरस्टेट इमारतीजवळ येऊन पोहोचलो. त्याच्या जवळपास "वुलवर्थ" चे विशाल स्टोअर होते त्या प्रचड दुकानातील सामानाचे ढीग पाहून मती चक्रावली. २००-२५० शे डॉलर्सच्या तऱ्हेतऱ्हेच्या खेळण्या, वस्तू मुलासाठी घेतले. चार मोठ्या कागदी पिशव्यंची ओझी साभाळत धापा टाकीत आम्ही सब-वे च्या भूयारात घुसलो गाडीतून येताना मी फारच आनदी होतो आमचे बच्चे लोक आता खुष होणार होते.

रात्री त्या सर्व खेळण्याचे डेमॉन्स्ट्रेशन आमच्या जपानी मुलाने सर्वांना दाखविले. सर्व मडली काही काळ लहान होऊन खेळण्यात रगून गेली

रात्री ज्यावेळी मी बिछान्यावर पडलो त्यावेळी मी विलक्षण बेचैन होतो उद्या माझा अमेरिकेतील वास्तव्याचा शेवटचा दिवस होता १० नोव्हेंबर

८५ उद्या TWA च्या विमानाने सायकाळी ७ च्या फ्लाईटने माझा परतिचा प्रवास सुरु होणार होता गेले तिन आठवडे अमेरिकेची जास्तीतजास्त भूमी मी पायी चालतो होतो तिथल निसर्गसौंदर्य आधाशासारख नजरेन पिऊन घेत होतो तिथली सुबत्ता अनुभवीत होतो शेकडो अमेरिकन माणसाना भेटलो होतो अनेक नवे मित्र जोडले होते अमेरिकन गाव पाहीली होती शहर पाहीली होती विविध अगानी अमेरिकेचे दर्शन घेत होतो जास्तीजास्त मनात साठवायचा प्रयत्न करीत होतो या छोट्याशा वास्तव्यात मी माझे डोळे व कान सतत जागृत ठेवल होत मन स्पजासारख दिसेल ते ते शोषून घेत होत दिसेल त्याची नकळत मायभूमीतील परिस्थितीशी तुलना करीत होतो अस्वस्थ होत होतो ज्यावेळी हे अनुभव कागदावर उतरणार होते, त्यावेळी त्या प्रतिबीबातून मी पुनःप्रत्ययाचा आनद घेणार होतो

सकाळी लोद्रो थायेसह ७४ स्ट्रीट, रुझवेल्ट अॅव्हेन्यू या सब-वे स्टेशनवर उतरलो तेथे भारतीयाची दुकाने असल्याचे कळले होते एका छोट्याशा रस्त्यावर दोन्ही बाजूना १०-२० भारतीयाची दुकाने होती काही पजाबी, बाकीची गुजराथी व्यापाऱ्याची शोकेसेस मध्ये साड्या टागलेल्या होत्या. दुकानात आणि विक्रेत्याच्या चेहऱ्यावर तीच टिपीकल "सुतकी" भारतीय कळा होती आपल्या मुबईला कुलाबा विभागात जशी दुकाने दिसतात तशी दुकानात गिऱ्हाईक अशी नव्हतीच आणि साड्याही एकतर चायना सिल्क नाहीतर भारतात दोन वर्षापूर्वी होऊन गेलेल्या फॅशन्सच्या. ते पाहून माझा विरस झाला केवळ नाममात्र खरेदी करुन बाहेर पडलो इतर दुकानातून खरेदी करीत दुपारी १२ ३० ला बगल्यावर पोहोचलो

दुपारच्या लचनतर सामानाच्या बाधाबाधीला सुरुवात केली सायकाळी ७ ची फ्लाईट होती भिक्षूणी नारा, जपानी मायलेकर, लोद्रो थाये मला मदत करीत होते ४ वाजता नारा टॅक्सी घेऊन आल्या आमचे यजमान विजिथा, दोघी इटालीयन बहीणी, मलेशियन तरुण, ब्रह्मदेशाचे गृहस्थ याचा सकाळीच निरोप घेतला होता सिलोनी जोडीने माझे सामान टॅक्सीत ठेवले जपानी मायलेकर वारवार प्रवासाचे शुभचिंतीत होती माझ्याबरोबर एअरपोर्टवर नारा व लोद्रो थाये येणार होते टॅक्सीत प्रवेश करण्या आधी निरोप घेण्यासाठी मी प्रत्येकाशी हस्तादोलन केले या माणसानी अकृत्रिम जिव्हाळ्याने आणि निरपेक्ष स्नेहाने माझ इथल वास्तव्य सुखद केल होत कधीही स्मृतीपटलावरुन पुसली न जाणारी अशी ती व्यक्तिमत्व होती आता त्याची ताटातूट होणार होती. पुनः कधी भेट होईल, कशी होईल? सारच अनिश्चित

होत मला भडभडून आल कठ दाटून आला काही बोलवेना डोळे अश्रूनी डबडबले माझ्यासारखीच त्याचीही अवस्था झाली होती टॅक्सी सुरु झाली निरोपाचे हात हलले ते दृष्टीआड होईपर्यंत मी त्याना हात हलवून निरोप देत होतो.

अर्ध्यापाऊण तासातच आमची टॅक्सी 'जेएफ्के' विमानतळावर पोहोचली. टर्मीनल आठवरुन विमान सुटणार होते गेल्याबरोबर फ्लाईट काऊंटरवर जाऊन बॅगाचे वजन, पाठवणी, तिकीट तपासणी, सीट रिझर्वेशन वगैरे सोपस्कार नाराच्या सहकार्याने उरकले ह्यावेळीही मला विंडोसीटच मिळाली ती नॉन-स्मोकींग विभागात मिळाल्यामुळे भिक्षूणी नारा खुष झाली "इट इज गुड फॉर युवर जर्नी !" नारा स्मितहास्य करीत, डोळे मिचकावत म्हणाल्या व आम्ही तिघेजण वरच्या मजल्यावर असलेल्या कॅफेकडे निघालो सभोवती सपूर्ण काचा लावलेल, त्रिकोणी आकाराच ते कॅफे. प्रवाशाची बरीच वदळ होता एक कोपऱ्यातल टेबल आम्ही पटाकावल तिथे सेल्फ सर्व्हीस होती मी पिशव्या साभाळत बसलो नाराजी व लोंद्रो थाये आइस्क्रीम आणायला गेले

त्या कॅफेची रचना अशी होती की तिथून सबध विमानतळ दिसत होता. सतत येणारी, जाणारी विमाने आणि विमानतळाभोवती पार्कींग करुन ठेवलेली TWA व PANAMA ची कितीतरी विमाने त्या विमानतळाच दृष्य इतक लोभसवाण होत ; मला आधी कल्पना असती तर एखादा दिवस या कॅफेत बसून "विमानतळ पहाणे" असाच कार्यक्रम ठेवला असता असो पुढच्या अमेरिका भेटीत तो बेत नक्की पूर्ण करण्याचे मनात पक्के केले

माझ काचेमधून विमानतळाच निरिक्षण चालू असतानाच माझ्या समोरच्या टेबलावर बसलेली एक अमेरिकन आजी मला कौतुकाने न्याहाळते आहे असे मला जाणवले मी उत्सुकतेने त्याच्याकडे वळून पाहिले त्यानी माझ्याकडे पाहून वात्सल्यपूर्ण स्मित करुन हात हलवला त्याच्या शेजारीच बसलेले त्याचे पतीही मोठ्या आपलेपणाने माझ्याकडे पाहात होते

"आर यू फ्रॉम इडिया ?" आजीने प्रश्न केला.

"येस माम, आय ॲम" मी उच्चारलो

त्याच्या आवाजात एवढ मार्दव होत की, का कुणास ठाऊक मला अस वाटल की, क्षणभर त्याच्याजवळ जाऊन बसाव मी उठून त्याच्या शेजारी खुर्चीवर बसलो त्यानी मोठ्या आस्थेने माझी चौकशी केली मी माझ्या

अमेरिकेतील वास्तव्याविषयी, अमेरिकन लोकाविषयी चार चागले शब्द त्याच्याशी बोललो सभाषणाच्या ओघात मला कळले की त्याचा मुलगा कुठल्याशा भारतीय कपनीत कॉम्प्युटर इजिनियर होता व अमेरिकेतील त्या कपनीचे काम पहात होता म्हणून आजीला भारतीय लोकाविषयी आस्था होती त्यानी आपले कार्ड मला दिले व "पुन्हा अमेरिकेला आल्यास जरुर माझ्या घरी ये" असे आमत्रणही दिले तेवढ्यात नारा व लोद्रोथाये आईस्क्रीम घेऊन आले मी त्याचा निरोप घेऊन उठलो. "तुझा प्रवास सुखाचा होवो !" जाता जाता आजीने तोडभरुन आशिर्वाद दिला

सायकाळचे सहा वाजले विमानाकडे जाणाऱ्या धातूच्या बोगद्याच्या लाबचलाब प्रवेशद्वाराशी खाद्यावर बॅग अडकवून मी उभा होतो भिक्षुणी नारा व लोद्रो थाये मला निरोप द्यायला उभे होते माझ्यावर इतकी माया करणाऱ्या, इतक अकृत्रिम प्रेम करणाऱ्या, मला एवढ जिवापाड जपणाऱ्या या देवतुल्य माणसापासून कधी दूर जाऊच नये कधी त्याना सोडून जाऊच नये, असे वाटले लोद्रोथाये याच्या पायावर डोके टेकून मी त्रिवार प्रणाम केला. भिक्षुणी नाराच्या पायावर डोके ठेवून वदन करताना मला गलबलून आले इतका वेळ महत्प्रयासाने अडवून धरलेला अश्रूचा बाध फुटला लहानमुलासारखा हमसून मी रडलो नाराजीनी मोठ्या ममतेने मला शात केले. त्यानी आपला आवेग मोठ्या प्रयासाने आवरला होता त्याचे निळे प्रेमळ नेत्र अश्रूनी डबडबले होते त्यात माझ्या स्मृतीचे प्रतिबिंब सोडून मी त्याचा निरोप घेतला

सायकाळी ७.२५ वाजता विमान आकाशात झेपावले लक्ष-लक्ष दीपाच्या झगमगाटात नटलेल न्यूयॉर्क शहर मी डोळे भरुन पाहून घेतल या शहराविषयी, अमेरिकेविषयी, तिथल्या माणसाविषयी, तिथल्या अनुभवाविषयी आठवणीचे लक्षदीप माझ्याही हृदयात उजळले होते. त्यानी माझ्या मनातला अधार दूर केला होता शाती आणि विश्वबधुत्वाची ज्योत माझ्या अत करणात प्रकाशमान झाली होती ती सतत तेवत राहणार होती येताना शेकडो प्रश्नचिन्हाचा गुता घेऊन आलो होतो जाताना निर्मळ मनाने चाललो होतो मनातला अधार दूर झाला होता. आता मी प्रकाशाचा यात्री झालो होतो

परतीच्या प्रवासात मी विमानाच्या खिडकीतून केवळ यात्रिकपणे पाहत होतो निसर्गाची भव्य-दिव्य रुप मनाला फारशी मोहवीत नव्हती नियमाप्रमाणे विमान कैरोला थाबल, कुवैतला थाबल, तिथूनही निघाल अमेरिका, युरोप, अशिया खडाचा प्रवास करीत चालल होत प्रचड वेगाने, पण त्यापेक्षाही प्रचड वेगाने माझ्या मनाच पाखरु भराऱ्या मारीत निघाल होत त्याला आपल्या

घरट्याची ओढ लागली होती माझी पत्नी रजना, मुलगा किरण, मुली मनिषा, रागिणी, - ही माझी चिमणी - पाखर सारखी माझ्या नजरसमोर येत होती त्याच्या भेटीसाठी मी आतूर झालो होतो कधी एकदा विमान मुबईला पोहोचतय अस झाल होत

अखेर एकदाचे विमानातून मुबईचे दर्शन घडले मुबई शहर आकाशातून "प्रकाशाच बेट" दिसत होत देखण लोभसवाण, तेज-पूज दहा पधरा मिनिटे सथपणे विमान मुबई शहरावरुन उड्डाण करीत चालल होत आता विमानतळ दिसू लागला सीटबेल्ट पोटाभोवती आवळून श्वास रोखून मी डोळे मिटले विमानाची चाके जमीनीला टेकल्याचे जाणवले मी डोळे उघडले धावपट्टीवरील दिवे वेगाने मागे जात होते आस्ते आस्ते विमानाची गती मदावली आणि अलगद थाबले "हाय बॉम्बे !" आनदातिशयाने मी आरोळी ठोकली. उठून मस्तपैकी आळस दिला. घड्याळात पाहीले रात्रीचे ११४० वाजले होते विमानाच्या बाहेर शिडीवर उभा राहताच दमट हवेचा परिचीत गध नाकात शिरला. खाली उतरुन मायभूमीला वदन केले

पासपोर्ट, कागदपत्राची तपासणी, वगैरे सोपस्कारात अर्धा पाऊण तास गेला कस्टमचेकिंगच्या काऊटरजवळ सामानाची जुळवाजुळव करीत असतानाच माझा मित्र शफी पटेल भेटला माझी बायको-मुल बाहेर थाबल्याचे, सर्व आनदात असल्याचे शुभवर्तमान त्याने दिले कस्टमचेकिंगला मला १० मिनिटेही लागली नाहीत सरकारने उदारहस्ते दिलेले ५०० डॉलर्सपैकी, १ महिना अमेरिकेत वास्तव्य करुन १५० डॉलर्सचे ट्रॅव्हलर्सचेक वाचवून आणणारा मी एकमेव देशभक्त असावा माझ्याकडे पाहून त्याचा कठ दाटून (!) आला असावा मला एकदा अपादमस्तक त्याने न्याहाळले झटकन क्लिअरन्स दिले आणि कारण नसताना हस्तादोलन केले त्यानी फक्त "जयहिद" म्हणायचे बाकी ठेवले, ते मी मनातल्या मनात म्हणून घेतले

सामानाची ट्रॉली ढकलीत बाहेर आलो माझी पत्नी, मुले यानी गळ्यात पडून मला गुदमरवून टाकले माझे परममित्र मुश्ताक पटेल व शफी पटेल स्मितहास्य करीत, आमच कौतुक न्याहाळीत शेजारी उभे होते त्याना मी कडकडून मिठी मारुन भेटलो मुश्ताकने आणलेला हार माझ्या गळ्यात घातला आमच्या बच्चे लोकानी टाळ्या वाजवल्या. माझ्या डोळ्यात आनदाश्रू तरळले

टॅक्सीने चेंबूरला आमच्या फ्लॅटवर पोहोचलो त्यावेळी रात्रीचे ३ वाजले होते घरी आल्याबरोबर मी शॉवरखाली बसून सचैल स्नान केले

शुचिर्भूत होऊन आम्ही कुटूबातील सर्वांनी भगवान बुध्दाच्या मुर्तिसमोर बसून मनोभावे प्रार्थना केली परमपूज्य डॉ आबेडकरानी आम्हाला अस्पृश्यतेच्या उकिरड्यातून काढून बौध्दधर्माच्या नदनवनात नेऊन सोडले, म्हणूनच माझ्यासारखा पूर्वश्रमीचा गरीब महाराचा पोरगा, आता बौध्दधर्माचा अनुयायी म्हणून बुध्दतत्वाच्या प्रसारासाठीच मोठ्या सन्मानाने पृथ्वीच्या चार खडाचा प्रवास करुन आला होता मी धन्य झालो होतो । कृतार्थ झालो होतो

# १४ : प्रश्नचिन्हांचा प्रवासी

प्रश्नचिन्हे ! असख्य प्रश्नचिन्हे ! अमेरिकेच्या प्रवासाच्या पूर्वतयारीपासून तो सपेपर्यंत असख्य प्रश्नचिन्हे माझ्या मार्गात आडवी आली मला खिजवत राहीली, सतावीत राहीली भेडसावीत राहीली कधी ती छोटी छोटी असायची कधी भ्रांतचित्त करणारी असायची, तर कधी आक्राळविक्राळ रुप धारण करुन उरात धडकी भरवायची तसा मी एकाकी होतो असहाय्य होतो दुबळा होतो पण माझी श्रध्दा अढळ होती निष्ठा अविचल होती जिद्द दुर्दम्य होती ह्या प्रश्नचिन्हानी "मारा" च्या सेनेप्रमाणे माझ्यावर हल्ला केला आणि मी सिध्दार्थाच्या निग्रहाने तो परतवून लावला. आभाळाच्या पोकळीतून, दऱ्याखोऱ्यावरुन, महासागरावरुन, अज्ञात भूमीवरुन पृथ्वीच्या चार खडाचा प्रवास केला मनाच्या होकायत्राचा काटा योग्य दिशेतच राहिला प्रवास निर्विघ्न झाला. सुखरुप पार पडला.

प्रवास सुखरुप पार पडला तरी प्रश्नचिन्हे सपली नाहीत. "एवढा मोठा प्रवास मी पार पाडूच कसा शकलो ?" हे नवच प्रश्नचिन्ह माझ्यासमोर उभ राहिल ज्यावेळी मी या सर्व घटनाक्रमाचे अलिप्त मनाने सिंहावलोकन केल, त्यावेळी जे काही मन पटलावरुन तरळत गेल, ते माझ मलाच अविश्वसनीय वाटू लागल ।

मोठा प्रश्न होता पैशाचा. जरी अमेरिकेतील वास्तव्य आणि तेथील प्रवासासहीत सर्व खर्च सस्थाच करणार होती, तरी देखील विमानभाड आणि फॉरिन एक्सेजच्या पैशाची उभारणी हा माझ्यापुढे यक्षप्रश्न होता. त्यातुन कसाबसा मार्ग काढतोय तो त्याच्यापाठोपाठ प्रश्नाची भेडोळी आली पासपोर्ट,

व्हीसा, इमिग्रेशन क्लिअरन्स, पूर्वतयारी प्रश्नच प्रश्न ! विमानतळावर गेल्यावर काय कराव लागत आपल्या बॅगा विमानात स्वतःच घेऊन जाव्या लागतात की हमाल नेतात ? (वस्तुतः त्या आपोआप यांत्रिक पट्ट्यावरुन सरकत जातात हा "चिमित्कार" मी तिथेच पाहीला) पोलीस, कस्टम तपासणीसाठी कुठ उभ रहायच ? आपण जाणार विमान नक्की कस कळणार ? वस्तुतः हे प्रश्न इतरासाठी अत्यत बाळबोधच नव्हे तर हास्यास्पदही होते पण त्याच्या नुसत्या स्मरणाने त्यावेळी माझा जीव व्याकूळ व्हायचा आयत्यावेळी काहीतरी महत्वाच करायच आपल राहून जाणार आणि विमानतळावरुन आमच "पार्सल साभार परत" येणार तर नाही ना ? हा दुष्ट प्रश्न तर वारवार मला भेडसावायचा.

काही लोकाना एस टी "लागते", तस विमान वगैरे "लागत" असाव का ? जमीनीपासून हजारो फूट उचीवरुन प्रवास करताना चक्कर वगैरे तर येणार नाही ना ? खिडकीतून खाली पाहील्यास भोवळ येईल का ? वेळोवेळी विमानाच लॅंडींग, टेकऑफ व्यवस्थित होईल ना ? हवामानात काही बिघाड तर होणार नाही ना ? विमानाच अपहरण , इथपर्यंत माझ्या प्रश्नाची साखळी आली की मी ती प्रयत्नपूर्वक झटकून टाकीत असे व सिगारेट पेटवून शातपणे धुराची वलये काढून त्यात सारी प्रश्नचिन्हे बुडवून टाकायचा प्रयत्न करीत असे

"तिकडच्या जेवणामुळे तुम्हाला कदाचित पोटाचा त्रास होईल औषधी गोळ्या घेऊन जा" असा सल्ला मला "मोरीता" भिक्षूनी दिला होता. तसे निघण्यापूर्वीच मला पोटाच्या तक्रारीने सतावले होते, तरीदेखील काही झाल तरी कुठलही औषध बरोबर न्यायच नाही हे मी पक्के ठरवले होते एअरपोर्टवर जाण्यापूर्वी माझे मित्र डॉ प्रकाश कवळी याच्या औषधाचा शेवटचा डोस घेतला. तेवढाच आणि गमतीची गोष्ट म्हणजे विमानप्रवासात आणि अमेरिकेच्या आपल्या दृष्टीने प्रतिकूल हवामानातील वास्तव्यात आजारी पडणे सोडा, मला साधी शिंक देखील आली नाही अमेरिकन खाद्यपदार्थाशी तर माझी गेल्याबरोबर दोस्ती जमली आणि चागल झकास वजन वाढवून मी परत आलो

विमानप्रवासाचा आनद मी पुरेपुर उपभोगला पण माझी खरी तारांबळ उडाली, न्यूयॉर्कच्या 'जे-एफ्के' विमानतळावर. नवखा प्रदेश, नवखी माणस, त्यात न्यायला कोण येणार त्याच नावगाव माहीत नाही. ते कसेबसे भेटल्यावर जिथ आपण जाणार ती जागा कशी असेल ? इतर माणस कशी असतील ! आपल्याला सामाऊन घेतील का ? समजून घेतील का ?

भारतसारख्या गरीब देशातला म्हणून उपेक्षा तर करणार नाहीत?

इशीबशीच्या कार मध्ये बसून ज्यावेळी आम्ही न्यूयॉर्क शहराच्या झगमगाटातून, प्रशस्त रस्त्यावरुन रुबाबात जाऊ लागलो त्यावेळी "मी खरोखर कोण?" असा प्रश्न माझा मलाच पडला. मायदेशाच्या वातावरणाच्या आणि घरच्या मंडळीच्या स्मृती मनात ताज्या होत्या. त्याचा आणि ज्या वातावरणातून मी जात होतो, त्याचा कुठे मेळच बसेना. संगती लागेना पुन्हा आपलं "ऊतारा" म्हणून सिगारेट आहेच त्या "धुम्रकांडीने" वेळोवेळी मला बराच दिलासा दिला.

न्यूयॉर्कच्या मुक्कामाच्या बंगल्यावर पोहोचल्यावर व तिथली मंडळी माझ्या अपेक्षेपेक्षा चांगली मिळाल्यावर माझ्या मनाला एक नवाच घोर लागला. त्यांच्याशी वागण्याबोलण्यात आपली काही चूक तर होणार नाही ना? आपल्याविषयी त्यांच वाईट मत होईल, किंवा आपण त्यांच्या मनातून उतरु अस अनवधनाने आपल्याकडून काही घडणार तर नाही ना? त्यामुळे मी प्रत्येक लहानसहान गोष्ट करताना अगदी सावधपणे, जपून व त्यांचा पूर्ण आदर राखून करण्याची काळजी घेई.

आपल्याकडून काही अजागळासारखी अथवा मुर्खपणाची कृती घडू नये म्हणून मी त्यांच्या बोलण्या वागण्याच्या, खाण्या-पिण्याच्या पध्दतीचे अगदी लक्षपूर्वक, बारकाईने अवलोकन करीत असे आणि जाणिवपूर्वक जास्तीजास्त त्यांच्यासारख वागण्याचा प्रयत्न करीत असे सुरवातीला मला हे जड गेल, थोड अवघडल्यासारख वाटल पण सवयीने मी त्यात हुशार झालो त्यात नवीन आणि चांगल शिकण्याची मला उपजत आवड आणि नवीन गोष्ट चट्कन आत्मसात करण्याचा जन्मजात गुण, त्या भांडवलावर फार थोड्या अवधीत खूप काही मला शिकता आल अमेरिकन माणसाच्या चालीरीती वागण्याच्या पध्दती, बोलण्याची विशिष्ठ लकबी, मी पाहता पाहता आत्मसात केल्या. देश तसा वेष घेतला, त्यांच्या उच्चाराचे पुनरुच्चार शिकून घेतले, भारतात अंगवळणी पडलेली माझी मंदगती चाल सोडून अमेरिकेच्या थंड हवेतली द्रुतगती चाल स्विकारली त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चाललो तिथल्या पदपथावर माझ्या पाऊलखुणा उमटल्या नसतील पण माझ्या देशोदेशींच्या पदयात्रींच्या मनावर माझ्याविषयीच्या सुखदस्मृतींच्या, सौहार्दाच्या पुसल्या न जाणाऱ्या खुणा उमटवून आलो आजही मला जगाच्या कानाकोपऱ्यातून येणारी त्यांची पत्रे त्यांची साक्ष देतात.

पदयात्रा करताना एका गावावरुन (खर म्हणजे त्याना गाव म्हणणे जीवावर येत, आपल्याकडील अत्यत प्रगत शहरदेखील तशी टुमदार देखणी आणि आधुनिक सुखसोयींनी युक्त नाहीत.) दुसऱ्या गावाला जाताना मागच्या प्रमाणेच तिथ आमच स्वागत होईल का? याची मला चिता पडायची मार्गात काही विघ्न तर येणार नाही ना? ही भिती तर सदोदित। पदयात्रा चालू असताना रोज अमेरिकन पोलीस ऑफीसर्सच्या गाड्या आमच्या मागे पुढे असायच्या. नवीन गाव लागले की नवीन पोलीस ऑफीसर यायचे एखादा गरम डोक्याचा "इनिस्पेक्टर सायेब" भेटून काही लचाड निर्माण होणार नाही ना? याचीही मनात धाकधुक असायची अमेरिकेच्या "वेस्ट ओव्हर" एअरबेसवर आत घुसून आम्ही जेव्हा निदर्शन केले त्यावेळी अक्षरश: धमालच झाली होती. सर्व जगात प्रसिद्ध असलेल्या अमेरिकेच्या गुप्तहेर यत्रणेला शाततामय निदर्शन करणाऱ्या आम्ही "शाती - पदयात्रीनी" चागलेच चकविले होते आमची निदर्शन सुरु होताच १० - १५ मिनिटाच्या अवधीत एअरबेसचा परिसर सायरनच्या आवाजानी आणि भराभर येणाऱ्या मोठमोठ्या लष्करी आधिकाऱ्याच्या गाड्याच्या आवाजानी दणाणून गेला सार वातावरण काही क्षणात बदलून गेल त्यावेळी मला वाटल की आपला अमेरिकेचा प्रवास आता इथेच सपणार. कुठल्याही क्षणी आमची गाठोडी वळून लष्कराच्या गाड्यात कोबली जाणार आणि परस्पर विमानतळावर नेऊन आमची पाठवणी करणार अस वाटू लागल अर्ध्यावरच प्रवास सपवून जाण्याच्या कल्पनेने वाईटही वाटल पण तिथे माघार घ्यायची नव्हती कोणत्याही प्रसगाला तोड देण्यास सज्ज होऊनच आम्ही गेलो होतो सुदैवाने विपरित काही घडल नाही सिस्टर बेथच्या शिष्ठाईने त्याना आमच्या सद्‌हेतूची खात्री पटली आणि शेवट गोड झाला

लॅव्हरेत शातीस्तूपाचा उद्‌घाटन सोहळा पार पडल्यावर मला न्यूयॉर्कला जायला मिळेल की उरलेला मुक्काम लॅव्हरेत पीस पॅगोडाशेजारच्या बगल्यात करावा लागेल? की एखाद्या अमेरिकन स्नेह्याच्या घरी व्यवस्था करतील? - काहीच माहीती नव्हते ग्रॅफ्टन पीस पॅगोडा ग्राऊडब्रेकीग सेरीमनी पार पडल्यावर जमलेली शेकडो मडळी ज्यावेळी आपापल्या गाड्यातून भराभर पागू लागली त्यावेळी तर मी वेधळ्याप्रमाणे ह्याच्या त्याच्याकडे पाहतोय!

आपल्याला कुठे आणि कोणाबरोबर जायचय हेच कळेना पण आमच्या सस्थेशी व्यवस्था इतकी चोख होती की माझी काळजी अनाठायी होती हे मला लगेच उमगले कुठून कायसे इशीबाशी भन्तेजी आले आणि

माझं सामान उचलून एका मेटडारमध्ये ठेवले "कम, वुई आर गोईंग टू, न्यूयॉर्क, यू वील स्टे विथ मी" प्रसन्न हसत ते म्हणाले कार्यक्रमाला आलेल्या प्रत्येक पाहुण्याची जातीने काळजी घेणाऱ्या अशा संस्था माझ्या देशात कधीकाळी जन्माला येतील का? मी स्वतःलाच प्रश्न केला। आमच्या देशात कुठल्याही मोठ्या संस्थांनी आयोजिलेले कार्यक्रम त्यांच्या गैरव्यवस्थेनेच गाजतात. बाहेरुन बोलाविलेल्या सन्माननीय पाहुण्यांच्या वाट्याला हेळसांड व गैरव्यवस्था ठरलेली। मग ते साहित्य संमेलन असो, खेळाच्या स्पर्धा असोत की "अपना - उत्सव" सारखा बेंडबाजा वाजवून, करोडो रुपयांची उधळपट्टी करुन केलेला सरकारी उत्सव असो तीच बेबंदशाही अशावेळी संयोजक शोधून सापडत नाहीत आलेली मंडळी शिव्याशाप देत परत जातात. वर संयोजकाचे उत्तर ठरलेले। "एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचं आयोजन करायचं म्हणजे थोडी गैरसोय होणारच!" आपल्याकडच्या अशा पाहुणचाराचा कटु अनुभव गाठीशी असल्यामुळे अमेरिकेत असा अनुभव आला तर काय करायचं? हा प्रश्न माझ्यापुढे ऊभा होताच। सुदैवाने आमच्या संस्थेच्या कार्यक्रमाचं आयोजन अत्यंत चोख होतं अप्रतिम होत।

न्यूर्याकला परतल्यावर इशिबाशी भन्तेजी कडून जेव्हा मला कळलं की, "त्यांच्यावर संस्थेने इतर जबाबदारी सोपविल्यामुळे मला त्यांच्याकडे राहता येणार नव्हते व एका सिलोनी गृहस्थाच्या बंगल्यावर उरलेला ४-५ दिवसाचा मुक्काम करायचा होता., त्या बातमीने माझ्या मनात वेगळेच प्रश्न उभे राहीले कारण त्यावेळी श्रीलंकेतील भारतीय वंशाचे तामिळी आणि सिंहली यांच्यात हिंसक चकमकी सुरु होत्या. त्यात मी भारतीय आणि यजमान सिंहली म्हणजे आली का नस्ती आफत? मी भारतीय म्हणून उगाच त्यांनी माझ्याविषयी गैरसमज करुन घेतला तर? नसती कटकट। भारतीय वंशाच्या तामिळी टायगर्सचा आणि माझा काही संबंध नाही हे मी त्यांना कसे पटविणार होतो? वस्तुतः एकाही तामिळ टायगरची मी साधी शेपटी देखिल पाहिली नव्हती श्रीलंकेत जाफना कुठे आहे ते देखील मला ठाऊक नव्हते. पण या काल्पनिक संकटाने मी उगाच मनात धास्तावलो होतो पण झालं उलटंच आमचा श्रीलंकेचा यजमान पहिल्या भेटीतच माझा जानी दोस्त झाला. तो निघाला रेडिओ सिलोनवरच्या हिंदी गाण्यांचा चाहता. चार दिवसाच्या मुक्कामात श्रीलंकेचा उल्लेखही आला नाही "खाओ पिओ और गाना गाओ" हे सोईस्कर आंतरराष्ट्रीय धोरण आम्ही स्विकारलं.

अमेरिकेतील सुपर मार्केटमध्ये जाऊन खरेदी करण्याचा प्रश्न मी

लाद्राथाये भन्तेजींच्या सहकार्याने सोडवून टाकला चार पाच दिवसाच्या न्यूयॉर्कच्या मनसोक्त भटकतीचा आनद पूर्णपणे उपभोगला. माझ सुदैव अस की त्या चार पाच दिवसाच्या न्यूयॉर्क मुक्कामात हवामान अगदी स्वच्छ - कुरकुरीत राहील स्वच्छ सुर्यप्रकाश, थड उबदार हवा आणि न्यूयॉर्कमधील सुबत्ता। मनसोक्त आनद उपभोगला एरवीच्या, घडीत ढगाळ...घडीत पाऊस, घडीत सुर्यप्रकाश अशा लहरी हवामानाने माझ्यावर जणू प्रसन्न होऊन झकास प्रसन्न हवामानाची मला भेट दिली. अमेरिकन टी व्ही वर हवामानाच वृत्त देताना तिथला निवेदक "त्या" हवामानाला "इडियन - समर - क्लायमेट" म्हणायचा.

मला व्यक्तिश सिमेटच्या जगलाच आकर्षण नाही त्यामुळे न्यूयॉर्क शहराशी माझे भावनिक नाते जडलेच नाही. माझ मन गेले १५-२० दिवस पायी फिरलेल्या निसर्गरम्य, टुमदार, लोभसवाण्या अमेरिकेच्या कट्रीसाईडवर जडलेले होते ती छोटी छोटी गाव, नितळ रस्ते, गर्द झाडी, मोजकीच चारसहा दुकाने "हैयँ" म्हणून हसून हात हालविणारी अमेरिकन माणस, देखण्या कॉटेजेस, आतिथ्यशील माणस ते पार्क्स, ते फुलाचे ताटवे, ते रेखीव हिरवेगार लॉन्स, ती गोरी - गुलाबी गुटगुटीत देखणी मुल ती सारी दृष्य माझ्या मनात कायमची घर करुन बसली होती त्याच्या पार्श्वभूमीवर न्यूयॉर्क शहर मला बकाल वाटल अठरापगड जातीची, जगातल्या सर्व प्रकारच्या माणसाची इथे विचित्र सरमिसळ झाली आहे. त्यामुळे या शहराचा निश्चित तोडवळा काय तो लक्षातच येत नाही

अमेरिकेतील २०-२२ दिवसाच्या वास्तव्यात अमेरिकन माणूस जवळून पाहण्याची सधी मिळाली अमेरिकन माणूस मेहनती आहे. त्याला त्याच्या देशाच्या प्रत्येक चागल्या गोष्टीचा अभिमान आहे. त्याच्या देशाच्या प्रत्येक गोष्टीवर प्रेम आहे "सुदर मुबई, मराठी मुबई" असा वर बोर्ड आणि खाली कचऱ्याचा ढीग, असा भारतीय नमुना तिथे दिसला नाही कुठलेही फलक न लावता त्यानी अमेरिका नितात सुदर ठेवली आहे आणि ती अधिकाधिक सुदर करण्याकडे त्याचा कटाक्ष आहे.

अमेरिकन लोकाच्या उच्छृखलपणाच्या आपल्याकडे खूप अफवा आहेत. त्यात तथ्याश फार कमी आहे त्याना जे करावस वाटत ते, ते उघडपणे करतात आणि आपण ते लपवून करतो, हा फरक। अमेरिकन खेळायचे तिथे खेळतात, नाचायचे तिथे नाचतात. आपल्यासारखे देवाच्या नावान दारु पिऊन रस्त्यात हैदोस घालण्याइतके ते पुढारलेले नाहीत। अमेरिकेच्या ३००-३५०

मलाच्या हायवेवरुन मी पायी प्रवास केला मोटारीतूनही १०००-१५०० मैलाचा प्रवास केला पण कुठेही मला रस्त्यात खड्डा आढळला नाही, की रस्त्याच्या कडेला एकही ट्रक उलटलेला आढळला नाही आपल्याकडे मुबईपासून पुण्यापर्यंत जाता जाता १०-२० तरी ट्रक उताणे झालेले आढळतील इथ रहदारीची शिस्त काटेकोरपणे पाळली जाते शिस्त तोडली तर कठोर शासन मग तो मोठा असो नाहीतर छोटा असो कायद्याला तिथ मान आहे. आपल्याकडे कायदा आर. टी ओ इन्सपेक्टरच्या खिशात असतो दारूवाल्याच्या आणि स्मगलरच्या गाड्याना तो सलाम करुन जाऊ देतो आणि हातगाडीवाल्याना दड ठोकतो। अनावश्यक हॉर्न इथ कोणी वाजवीत नाही माणस रस्ता ओलाडण्यास उभी असताना गाडी आपण होऊन थाबविण्याची सत्प्रवृत्ती इकडे फार आढळली

कुठल्याही दुकानात गेलात तर माल चोख व उत्तम त्यावर किमती लिहीलेल्या. शिवाय विक्रेत्या मुल - मुली हसत मुखाने तुमच स्वागत करणार. जाताजाता 'हॅव अ गुड डे, हॅव ए नाईस डे" अस म्हणून निरोप दिला जातो आमच्याकडे व्यापार करणे म्हणजे राजरोस फसवणूक हे समीकरण ठरलेले वस्तु आधी निर्मळ व खात्रीची मिळणे दुरापास्त कारखानदार आधी वस्तू तयार करतानाच त्यात खोटेपणा करणार, उरलेली कसर व्यापारी काढणार. मग ती घासाघीस, कुचकट बोलणे, शाब्दीक चकमक, हे झाल्याशिवाय आमची खरेदी होत नाही

अमेरिका हा अत्यत प्रगत देश. जगातील प्रथम क्रमाकाच राष्ट्र पण सर्वसामान्या अमेरिकन माणसाच्या बोलण्या वागण्यात या "उच्चत्वाच्या" गडाचा लवलेशही दिसत नाही आपल्या देशाच्या अथवा अमेरिकन माणसाच्या श्रेष्ठत्वाची फालतू लेक्चरबाजी करताना कोणी आढळला नाही खर म्हणजे उद्योगशीलतेमुळे त्याना असल्या फालतु गोष्टीत वेळ वाया घालविणे परवडणार नाही ते धदे कृतीशून्य, रिकामटेकड्या लोकाचे। म्हणून आमच्याकडे भ्रष्टाचाराने बरबटलेल्या एखाद्या विद्यापीठाच्या कुलगुरुपासून, रस्त्याच्या कडेला जुन्या पायतानाना टाके मारीत बसलेल्या मोच्यापर्यंत कुणीही भारतीय सस्कृतीच्या मोठेपणावर लेक्चर देताना आढळतो अमेरिकन माणूस आमच्यासारखा पूर्वग्रहदुषित वृत्तीचा नाही कोणाकडूनही चागल असेल ते शिकण्याची वृत्ती त्याच्यात आढळली. अमेरिकन माणूस सर्वगुणसपन्न आहे अस माझ म्हणण नाही, पण सर्वसामान्य अमेरिकन माणूस हा "माणूस" ह्या शब्दाच्या व्याख्येशी फार जवळीक ठेवून आहे. त्याच्या सस्कृतिचे आदर्श

आपल्यासारखे पुरातन नसतीलही, पण आपल्या जनमानसात मुरलेल्या पुरातन विकृतीही तिथे आढळत नाहीत दोन-अडीचशे वर्षात परिश्रम करुन, बुद्धी वापरुन, वैज्ञानिक दृष्टीकोन व वास्तवता याच भान ठेऊन त्यानी आपली प्रगती करुन घेतलेली आहे प्रगती आपणही केली आहे. आपल्याकडे त्याच्याप्रमाणे औद्योगिक कारखाने आहेत, व्यापारी सस्था आहेत, उच्च इमारतीनी गजबजलेली शहर आहेत, यान्त्रिक सुखसोयी आहेत मग त्याच्यात आणि आपल्यात फरक काय आहे? फरक इतकाच आहे, की त्यानी केलेल्या प्रगतीचा फायदा देशातल्या अगदी तळाच्या नागरिकापर्यंत पोहोचला आहे अन्न, वस्त्र, निवाऱ्याची त्याला ददात नाही आपल्या आवडीच काम तो निवडू शकतो आणि थोड्याशा श्रमात देखील भरपूर कमाई करुन सुखी राहू शकतो आमच्या प्रगतीची फळ काही ठराविक धनिक वर्गापर्यंतच पोहोचली आहेत. त्याच ऐश्वर्य दिवसेदिवस उतू जात आहे आणि बहुसख्य सामान्य माणूस दरिद्री आणि भुकेकगाल राहीला आहे. देशाच्या प्रगतीची भारतीय समाजावर, रोगट "सूज" चढलेली आहे. म्हणून आपल ऐश्वर्यही किळसवाण वाटत आणि त्याच प्रगतीच "बाळस" अमेरिकन समाजावर दिसत म्हणून ते लोभसवाण वाटत

कर्तबगार बापाच्या पोटी जन्मलेल्या नालायक, दिवाळखोर पोरासारखी आमची अवस्था आहे गत वैभवाच्या भग्नावशेषावर बसून उकिरडे निवडण्याचे आमचे उद्योग चालू आहेत आमच्या जनमानसात भिनलेल्या दुर्गुणाकडे सोईस्कर डोळेझाक करुन, खोटेपणा, दाभिकता याना उराशी कवटाळून आधळ्यासारखी चाचपडत, दिशाहीन अशी आमची वाटचाल चाललेली आहे उन्मत्त राजकारणी, गब्बर उद्योगपती, बदमाष व्यापारी आणि धूर्त वरिष्ठ सरकारी अधिकारी हे साऱ्या देशाच रक्तशोषण करुन माजले आहेत. सामान्य जनता धर्माच्या, प्राताच्या, जातीच्या नावावर आपापसात कोंबड्यासारखी झुजत राहीली आहे. "इक्कीसवी सदी" कडे वेगाने जाण्याच्या गप्पा आम्ही मारतो पण आम्ही २१ व्या शतकाकडे चाललो आहोत की अश्मयुगाकडे चाललो आहोत याचा आम्ही शातपणे बसून कधी विचार करीत नाही

वस्तुत: आमच्या समाजव्यवस्थेला जी उदात्त धर्मतत्वांची जोड आहे, ऐहिक सुखाना गौण मानून विश्वबधुत्वाची जी शिकवण आमच्या सतमहात्म्यानी दिली आहे, त्या उदात्त विचारसरणीचा फायदा अमेरिकन लोकाना अथवा पाश्चात्य सस्कृतिला नाही त्यामुळे ऐहिक सुखे पायाशी असून देखील आत्मिक शाततेसाठी त्याची धडपड चालू आहे आम्ही पुराणातली वागी पुराणात ठेऊन

खोटेपणाचे देव्हारे माजवित फिरत आहोत. "तुझ आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी।" अशी आमची अवस्था झाली आहे यातून आम्ही कधी बाहेर पडू तो सुदिन!, अमेरिकन आणि भारतीय लोकाच्या स्थितीची तुलना करताना "ते तसे का?" "आणि आम्ही असे का?" हा प्रश्न माझ्या मनात सतत येत राहीला. त्या प्रश्नाची सोडवणूक कोण करणार?

अमेरिकेच्या प्रवासाला जाण्यापूर्वी व परत आल्यावरही अशी अनेक प्रश्नचिन्हे मला सतावित राहीली सतावित राहणार आहेत.

——प्रश्नचिन्ह कधी संपत नसतात. कुठूनशा येणाऱ्या धुक्याच्या लाटाप्रमाणे ती एकामागोमाग एक येत राहतात. त्याना आपण घाबरायच नसत त्याना भिऊन आपण उभ रहायच नसत. तसच पुढे चालत राहायच असत काहीशा निग्रहाने काहीशा सावधपणे आपण चालत राहीलो की आपल्याला पाऊलवाट दिसू लागते. धुक तेवढस दाट नाही हे जाणवत आणि चालता चालता पुढे दूर कुठेतरी प्रकाशाचा किरण दिसतो आपली उमेद वाढते. गती वाढते. थक वितळ लागत [illegible] आपण न्हाऊन निघतो -- आणि मग केलेल्या प्रवासाच आपल्याला सार्थक वाटायला लागत थकलेल्या गात्रात पुन्हा उत्साह सचारतो मन उल्हसित होते जीवन जगण्यातील गोडी वाढत जाते ।

जीवनाच कधीही न सुटणार प्रश्नचिन्ह। त्याच उत्तर शोधायला आपण नव्या जोमाने निघतो हा प्रवास आजतागायत अगणित प्रवासी करीत आले आहेत. यापुढेही करणार आहेत आपणही हा प्रवास असाच करीत राहायचा आहे. प्रश्नचिन्हाचा प्रवास।

॥ नम्यो - हो - रेन्गे - क्यो ॥

वा. क्र.

REFBK-0027085